

र. ए. सोसायटीचे

## पी. जी. अभ्यंकर कला, वाणिज्य आणि
## आर. बी. कुलकर्णी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी

२०२५-२६

# सहकार

# मार्च २०२५ - उच्च माध्यमिक परीक्षेतील गुणवंत

## कला



मुळ्ये स्वरा अरुण
बारावी कला प्रथम
९५.८३ %



जोशी अदिती मिलिंद
बारावी कला द्वितीय
९५.५० %



पाटणकर स्वरा शैलेश
बारावी कला तृतिय
९३.३३ %

## वाणिज्य



करमरकर मधुरा दिगंबर
बारावी वाणिज्य प्रथम
९७.५० %



पानगले आदित्य मनिष
बारावी वाणिज्य द्वितीय
९७.०० %



दुदगीकर वरुण श्रीकांत
बारावी वाणिज्य तृतिय
९६.५० %

## विज्ञान



वैशंपायन धनश्री निलेश
बारावी विज्ञान प्रथम
९२.६७ %



बोरकर पार्थ प्रफुल्ल
बारावी विज्ञान द्वितीय
८९.८३ %



घारपुरे अंकुर अमित
बारावी विज्ञान द्वितीय
८९.८३ %



जोशी सारंग मंदार
बारावी विज्ञान तृतिय
८८.०० %

## एमसीव्हीसी



दवे रफा खालिद
बारावी एमसीव्हीसी प्रथम
९२.६७ %



भाटकर मारिया राहिल
बारावी एमसीव्हीसी द्वितीय
९०.६७ %



आजगेकर सेजल अजय
बारावी एमसीव्हीसी तृतिय
९०.०० %

## विभागानुसार निकाल (टक्केवारी)

| कला | वाणिज्य | विज्ञान | एमसीव्हीसी |
|---|---|---|---|
| ९६.९९ % | १०० % | ९८.२७ % | १०० % |

२०२५-२६

# सहकार

र. ए. सोसायटीचे

## पी. जी. अभ्यंकर कला, वाणिज्य आणि
## आर. बी. कुलकर्णी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी

**प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर**
संयोजक व प्रकाशक

**उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी**
सल्लागार-संपादक मंडळ

**प्रा. मानसी प्रसाद गानू**
संपादक

**संपादक मंडळ सदस्य**
प्रा. जलील इस्माईल हुश्ये
प्रा. मकरंद प्रभाकर दामले
प्रा. शिल्पा जयप्रकाश देसाई
प्रा. क्षमा सुरेश पुनसकर
प्रा. अभिजीत विनायक भिडे

## ।। महाविद्यालय गीत ।।

ज्ञानमंदिरात आणि अंतरात परिमळतो । अपरान्ती ज्ञानगंध हिरवळीवर दरवळतो ।।धृ।।
सानथोर वृक्ष इथे । ज्ञानोत्सुक गाती गीते । तरुछाया देत इथे परंपरा जागवितो ।। १ ।।
रम्य इथे नंदनवन । शास्त्रांचे ज्ञानसदन । भाषांचा ज्ञानकुंभ चिंबचिंब भिजवितो ।। २ ।।
कलारंग इथे दंग । अर्थपूर्ण देती रंग । स्वर्णभूमी मैदानी ध्वज डौले फडफडतो ।। ३ ।।
तारांकित, मानांकित । यश इथले शुभसंचित ।। ज्ञानार्णव ज्ञानियास नित्य इथे खुणवितो ।। ४ ।।

## ।। छंदोत्सव गीत ।।

या मुठीत घेऊ आभाळाला कळू द्या । या जीवनातल्या आनंदाला भिडू द्या ।। धृ ।।
हे लाईफ झालं दिलोजान से प्यारं । हे जगणं अवघं भणाणलेलं ऽऽऽ वारं ।
या आयुष्याची गंमत न्यारी । आम्हाला ही बघु द्या ।।। १ ।।
छंदांचा उत्सव हा जगण्यास जोम देई । छंदांचा उत्सव हा दृष्टी नवीन देई ।
ती दृष्टी घेऊन अवकाशाला भरु द्या ।। २ ।।

**रचना डॉ. श्रीकृष्ण जोशी**
माजी उपप्राचार्य, अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी

गीते ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा!

महाविद्यालय गीत

छंदोत्सव गीत

महाविद्यालयाचे संकेतस्थळ
https://akjcrtn.ac.in/

# अंतरंग


| | | | |
|---|---|---|---|
| संपादकीय | प्रा. मानसी गानू | | ७ |
| उपप्राचार्य मनोगत | प्रा. सुनील गोसावी | | ९ |
| प्राचार्य मनोगत | डॉ. मकरंद साखळकर | | ११ |
| | **मानाचे पान** | | **१३** |
| विद्यार्थी घडवता घडवता मीच घडलो | प्रा. प्रसाद गोखले | एम्.सी.व्ही.सी. विभाग | १५ |
| एका आदर्श शिक्षकाचा प्रेरणादायी प्रवास | प्रा. योगेशानंद हळबे | एम्.सी.व्ही.सी. विभाग | १८ |
| | **मराठी विभाग** | | |
| पाण्यातील पहिली पावले : वेदा सरफरे | वैदेही वैद्य | ११ वी कला | २१ |
| चाफा | स्मृती पडवळ | ११ वी विज्ञान | २१ |
| भारतीय संस्कृती : परंपरेचा विपर्यास | स्वरुपा आठवले | ११ वी कला | २२ |
| स्वातंत्र्याचा तळपता सूर्य | पर्णवी प्रभुदेसाई | ११ वी कला | २४ |
| माणसातील देव | आर्या बोरकर | ११ वी विज्ञान | २५ |
| एकटेपण | कस्तुरी घुमे | ११ वी विज्ञान | २६ |
| वस्तू | लावण्या नार्वेकर | ११ वी विज्ञान | २६ |
| वामन असा अवतरावा | निरंजन सावरे | १२ वी विज्ञान | २७ |
| आमच्या घरचा गणपती | वैदेही वैद्य | ११ वी कला | २९ |
| बालपण | आर्या बोरकर | ११ वी विज्ञान | २९ |
| छत्रपती शिवाजी महाराज | लावण्या नार्वेकर | ११ वी विज्ञान | ३० |
| माझं पहिलं शिबीर | प्रा. रिद्धी हजारे | एम्.सी.व्ही.सी. विभाग | ३१ |
| गणपती | स्वरदा केळकर | १२ वी कला | ३२ |
| पहिलं प्रेम | कुणाल गझने | १२ वी कला | ३३ |
| एक तूच रे | सानिया शिरवाडकर | १२ वी कला | ३३ |
| आयकार्ड : एक ओळख | प्रा. सुप्रिया टोळ्ये | अर्थशास्त्र विभाग | ३४ |
| जीवन | प्रणव हातीसकर | ११ वी वाणिज्य | ३५ |
| एन्.एस्.एस्. एक हक्काचं घर | पर्णवी प्रभुदेसाई | ११ वी कला | ३५ |
| जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती | स्वानंदी शेंबवणेकर | ११ वी वाणिज्य | ३६ |
| आभाळमाया | मीरा मोरे | १२ वी विज्ञान | ३८ |
| दिवाळी | वैदेही वैद्य | ११ वी कला | ३९ |
| माझी लाडकी | कस्तुरी घुमे | ११ वी विज्ञान | ३९ |
| सूर्यपुत्र | अपूर्वा घेवडे | ११ वी विज्ञान | ४० |
| जीवन देणारी ती | स्वरा हरचकर | ११ वी वाणिज्य | ४१ |
| आपला छंदोत्सव | चिन्मयी खेडेकर | १२ वी कला | ४२ |
| मालिकांचे विश्व | चिन्मयी खेडेकर | १२ वी कला | ४३ |

# अंतरंग


| | | | |
|---|---|---|---|
| कोकण | सानवी केळकर | ११ वी वाणिज्य | ४४ |
| रुपाली रेपाळेची सागरी झेप : जल आक्रमिले | प्रा. मानसी गानू | इंग्लिश विभाग | ४५ |
| छंदोत्सव | प्रा. आदेश मुकणे | समाजशास्त्र विभाग | ४९ |
| पाणी आहे तर जीवन आहे | सानिका घाणेकर | १२ वी कला | ५० |
| निरोगी आयुष्याचा मूलमंत्र | सादिया सय्यद | १२ वी कला | ५१ |
| तुझ्याविषयी मनातलं... | प्रा. विस्मया कुलकर्णी | इंग्लिश विभाग | ५२ |
| लोककल्याणार्थ वेचि जो जीवित | अर्पिता बापट | ११ वी वाणिज्य | ५३ |
| कटू सत्य | दीक्षा मोहिते | ११ वी कला | ५४ |
| आहेस लाखात एक तू | प्रा. मनस्वी लांजेकर | इंग्लिश विभाग | ५४ |
| व्याघ्रसंवर्धनासाठी एक पाऊल | प्रा. ऋषिराज नागवेकर | पर्यावरण विभाग | ५५ |
| आयुष्यमान | सुखदा गावकर | १२ वी कला | ५९ |
| गंगा आली रे अंगणी | विदुला कुलकर्णी | १२ वी वाणिज्य | ६० |
| सय अंगणाची | प्रा. अदिती कोकजे | अर्थशास्त्र विभाग | ६१ |
| पुढे जाणे तू थांबू नको! | दीक्षा मोहिते | ११ वी कला | ६२ |
| निसर्गाची कुजबूज | फरहीन अन्सारी | ११ वी विज्ञान | ६२ |
| जीवनधन | समीक्षा घाणेकर | १२ वी कला | ६३ |
| आरोग्यम् धनसंपदा | सानिका गोवळकर | १२ वी वाणिज्य | ६३ |
| मुखवटे | दीक्षा मोहिते | ११ वी कला | ६४ |
| आयुष्य | दीक्षा मोहिते | ११ वी कला | ६४ |
| इंटरनेटचे मायाजाल | प्रा. क्षमा पुनसकर | मराठी विभाग | ६५ |
| एकाच्या चुकीची शिक्षा सर्वांना का? | वैष्णवी कांबळे | १२ वी कला | ६७ |
| जागतिक हवामान बदल | प्रा. दत्तात्रय माळवदे | भूगोल विभाग | ६८ |
| आरोग्य हेच खरे धन | रिया वारिशे | १२ वी कला | ७१ |
| भारतासमोरील आव्हाने | आभा साखळकर | १२ वी विज्ञान | ७२ |
| सायबर गुन्हेगारी : जागरुकतेची गरज | अदिती फडके | ११ वी वाणिज्य | ७५ |
| आरोग्य धनसंपदा | पूजा गोरे | १२ वी कला | ७८ |
| वादळी विचार | दीक्षा मोहिते | ११ वी कला | ७८ |
| अद्‌भूत भारताच्या जगात | प्रा. निनाद तेंडुलकर | इतिहास विभाग | ८० |
| फर्निचर | प्रा. विस्मया कुलकर्णी | इंग्लिश विभाग | ८४ |
| आनंदाचं हळदीकुंकू | प्रा. अदिती कोकजे | अर्थशास्त्र विभाग | ८७ |
| पगारापलीकडची श्रीमंती | प्रा. सुप्रिया टोळ्ये | अर्थशास्त्र विभाग | ८९ |


## हिंदी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| शिक्षा से प्रगति | हिमांक खातू | ११ वी वाणिज्य | ९३ |
| राजस्थान की वीरभूमी | सरिता जांगीड | ११ वी वाणिज्य | ९३ |

# अंतरंग


| | | | |
|---|---|---|---|
| सोशल मीडिया का सही उपयोग | भूमिका पवार | ११ वी कला | ९४ |
| न दिखी... | ऐमन मजगांवकर | १२ वी कला | ९५ |
| मानवता ही सबसे बडा धर्म हैं | हर्ष पेंढारकर | ११ वी कला | ९६ |
| किताबें हमारी सच्ची मित्र | नीलम पवार | ११ वी कला | ९७ |
| सुंदरता | संग्राम कांबळे | १२ वी कला | ९८ |
| बेटी बचाओ, बेटी पढाओ | तन्वी गोविलकर | ११ वी कला | ९८ |
| सामाजिक मीडिया और वास्तविक जीवन | अनुष्का नांदगांवकर | ११ वी कला | ९९ |
| विज्ञान और तंत्रज्ञान में विकास | अल्फीया संगमेश्वरी | ११ वी विज्ञान | १०० |
| युवाओं में घटता पुस्तक प्रेम | आस्था घोसाळे | १२ वी कला | १०१ |
| राजनेताओं का धर्म और धर्म की राजनिती | विदुला कुलकर्णी | १२ वी वाणिज्य | १०२ |
| निसर्ग के चमत्कार | सिमीन सुवर्णदुर्गकर | ११ वी विज्ञान | १०३ |
| मेरे सपनों का भारत | विदुला कुलकर्णी | १२ वी वाणिज्य | १०४ |
| मेरे प्रिय गायक महंमद रफी | फातिमा मजगांवकर | ११ वी विज्ञान | १०५ |
| मेरे जीवन की रोशनी | उमैमा पावसकर | ११ वी विज्ञान | १०५ |
| मेरा प्रिय अभिनेता : विजय थलपती | सुभान मजगांवकर | ११ वी विज्ञान | १०६ |
| आयसीसी महिला क्रिकेट वर्ल्ड कप २०२५ | सानवी घुगरे | ११ वी विज्ञान | १०७ |
| आजादी की पुकार | इन्शा मुल्ला | ११ वी विज्ञान | १०७ |
| वर्ल्ड चॅम्पियन गुकेश डी | तेजस्वी शितप | ११ वी विज्ञान | १०८ |


## ENGLISH SECTION


| | | | |
|---|---|---|---|
| Nature | Varada Gokhale | 11th Science | 111 |
| Beauty of ordinary days | Anushka Talekar | 11th Science | 112 |
| Nanda Pradhan | Prof. D. R. Walawalkar | English Dept. | 113 |
| Being young feels confusing | Anushka Talekar | 11th Science | 121 |
| Kathak | Abha Sakhalkar | 12th Science | 122 |
| Through a poet's eyes | Ayman Majgaonkar | 12th Arts | 124 |
| LIfe | Sarvesh Sangare | 11th Science | 124 |
| The real joy of college life | Tanmay Bhandari | 11th MCVC | 125 |
| Beneath the tender sunshine | Nastaeen Shemna | 11th Commerce | 126 |
| Our beautiful world | Ishana Khan | 11th Commerce | 126 |
| My observation on Indian villages | Purva Mulye | 11th MCVC | 127 |
| Where the ghats meet the sea | Tazmeen Majgaonkar | 11th Commerce | 128 |
| Never | Faiza Sayyed | 12th Science | 129 |
| Ophelia's death | Aiman Majgaonkar | 12th Arts | 130 |
| Education | Ishana Khan | 11th Commerce | 131 |
| When the world gets loud | Ayman Majgaonkar | 12th Arts | 131 |
| Dreams Change & that's ok | Anushka Talekar | 11th Science | 132 |
| Friendship | Gargi Kulkarni | 11th MCVC | 133 |

# अंतरंग


| | | | |
|---|---|---|---|
| Happy Friendship | Sarvesh Sangare | 11th Science | 133 |
| The Kitchen | Ayman Majgaonkar | 12th Arts | 134 |
| Unheard men | Nastaeen Shemna | 11th Commerce | 135 |
| In constant proportion | Varada Gokhale | 11th Science | 135 |
| Future of AI | Purva Mulye | 11th MCVC | 136 |
| Our beautiful world | Ishana Khan | 11th Commerce | 137 |
| Evening by the riverside | Himank Khatu | 11th Commerce | 137 |
| The earth is tired of explaining | Nastaeen Shemna | 11th Commerce | 138 |
| A quiet moment | Tanmay Bhandari | 11th MCVC | 138 |

## संस्कृत विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| कातळशिल्पस्य वर्णनम् | श्रुती बोरवणकर | १२ वी वाणिज्य | १४१ |
| श्रावणमास: | आदिती फडके | ११ वी वाणिज्य | १४१ |
| लोकमान्यतिलकमहोदय: | पार्थ चितळे | १२ वी वाणिज्य | १४२ |
| संस्कृत भाषा - भारतीयसंस्कृते: आत्मा | आर्या पडये | ११ वी विज्ञान | १४२ |
| सुभाषितानी | जान्हवी सावंत | १२ वी वाणिज्य | १४३ |
| कोङ्कणप्रदेश: | स्वानंदी शेंबवणेकर | ११ वी वाणिज्य | १४४ |
| महर्षि: वेदव्यास: | वरदा ताम्हनकर | ११ वी कला | १४४ |
| अनुशासनम् | श्रावणी जाधव | ११ वी विज्ञान | १४५ |
| आचार्य चाणक्य: | वैदेही वैद्य | ११ वी कला | १४५ |
| महान् सङ्गीताचार्य: शार्ङ्गदेव: | अनन्या गोरे | ११ वी कला | १४६ |

## ऊर्दू विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| आलमी बवा और उसके सामाजिक असरात | सहर इसब | १२ वी कला | १६१ |
| डिजीटल इंडिया | अर्शिया दर्वे | १२ वी कला | १५९ |
| आज की नस्ल का रवैय्या | समा इसब | १२ वी कला | १५७ |
| रुहानियत की हकीकत | मुशर्रफ शाह | १२ वी कला | १५५ |
| नयी तालिमी पॉलिसी २०२० | रुखसार काझी | १२ वी कला | १५४ |
| सायबर सिक्युरिटी | फिजा काझी | १२ वी कला | १५२ |

कार्य अहवाल

क्रीडा विभाग

वेचक वेधक सोनेरी क्षण...


## चित्रकार व छायाचित्रकार

प्रा. सुमेध मोहिते, अस्मिता शेरखाने, मुक्ता जोशी, अदिती देसाई

कासिम बुडये, रिझा सोलकर, आदित्य नागले, गौरेश नांदगावकर

गौरी ठाकुरदेसाई, पूर्वा शिरगावकर, तनया कांबळे, निधी शिंदे, देव सडकर

ऋषभ कोतवडेकर, राधा गझने, अन्वय देसाई, भावना निगरे, हिमांक खातू

क्षितिज नांदावडेकर, ज्ञानदा काटकर, स्नेहा चव्हाण, वरद आरेकर

स्मृती पडवळ, विभूती चव्हाण, पार्थ शिरवाडकर, आर्या कीर

अक्षरजुळणी, मुखपृष्ठ आणि ई प्रकाशन तंत्र
सत्यशोधक प्रिंटींग प्रेस
श्री. नितीन लिमये, टिळक आळी, रत्नागिरी.
संपर्क : ९४२३२९१३१९



कासीम बुड्ये (१२ वी वाणिज्य)



**गौरी ठाकुरदेसाई (११ वी कला)**

# संपादकीय...



सस्नेह नमस्कार,

अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाचा सहकार हा वार्षिक अंक आपल्या हाती सुपूर्द करताना अत्यंत आनंद होत आहे.

कलेच्या मुक्त अभिव्यक्तीतूनच जगभरातील संस्कृतींचा विकास झालेला आहे. किंबहुना संस्कृतीच्या विकासात, बहरामध्ये विविध कलांच्या अभिव्यक्तीचं योगदान महत्त्वाचं आहे. चित्रकला, शिल्पकला, साहित्य, संगीत, नृत्य, नाटक, चित्रपट, वास्तुकला आणि हस्तकला यांसारख्या माध्यमातून कलाकार आपल्या भावना, विचार आणि कल्पना व्यक्त करतात. यापैकीच व्यक्त होण्याचे अतिशय प्राचीन आणि प्रभावी साधन म्हणजे साहित्यनिर्मिती. सृजनशील आणि आनंद मिळवून देणारा हा 'लेखन' प्रकार!

भामह हा संस्कृत मिमांसक म्हणतो, साहित्य निर्मितीमुळे लेखकाला कीर्ती म्हणजे प्रसिद्धी तर वाचकाला प्रीती म्हणजेच आनंदाचा लाभ होतो.नुसत्या शब्दातून वेगळे जग निर्माण करण्याचीच नव्हे तर त्या जगात आपल्याला घेऊन जाण्याची लेखणीची ताकद आपणा सर्वांना ज्ञात आहे. आपल्या भावना, अनुभूती, सृजनत्व इतरांपर्यंत अतिशय समर्पकपणे आणि प्रभावीपणे पोहोचवण्याचे माध्यम म्हणजेच लेखन!

विद्यार्थ्यांमधील अभिव्यक्ती विकसित होण्यासाठी आणि उत्तम साहित्याचा आविष्कार घडविण्यासाठी 'सहकार' महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच एक हक्काचे व्यासपीठ ठरला आहे. 'सहकार'च्या गौरवशाली परंपरेचा वारसा आपण पुढे नेत आहोत, याचा विशेष आनंद होत आहे.

दरवर्षीप्रमाणेच याहीवर्षी मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत आणि ऊर्दू या पाचही भाषांमधून वैविध्यपूर्ण लेख, कविता, प्रवासवर्णने, एकांकिका, समीक्षा अशा बऱ्याच साहित्य प्रकारांना स्पर्श करणारे साहित्य विद्यार्थ्यांनी भरभरून दिले आहे. अतिशय रेखीव आणि कलात्मक चित्रे आणि फोटो प्राप्त झाले आहेत.

"Every picture tells a story", शब्दचित्रे अधिक प्रभावी ठरावीत या हेतूने उत्तम सचित्र प्रभाव साधण्यासाठी यावर्षी AI चा वापर करण्यात आला आणि त्यामुळे अंक प्रभावी आणि अधिक परिणामकारक झाला आहे.

या सर्वांमुळेच सहकार दरवर्षीप्रमाणे वाचनीय, संस्मरणीय, मनोरंजक, ज्ञानप्रद आणि बोधप्रद ठरेल असा प्रयत्न संपादक म्हणून मी आणि संपादक मंडळातील सर्व सदस्य यांनी केला आहे. या सहकार्याबद्दल संपादक मंडळातील सर्व सदस्यांचे मनःपूर्वक आभार! याचबरोबरीने हे सर्व साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणाऱ्या आणि मार्गदर्शन करणाऱ्या माझ्या सर्व सहकाऱ्यांचेही आभार मला आवर्जून मानावेसे वाटतात.

या भगीरथ प्रयत्नात आम्हाला मार्गदर्शन करणारे प्राचार्य डॉक्टर मकरंद साखळकर सर, तसेच उपप्राचार्य सुनिल गोसावी सर यांचेही मी मनापासून आभार मानते. याचबरोबर सर्व विभागप्रमुख आणि पर्यवेक्षक यांचेही आभार!

हा अंक सर्वांगसुंदर, देखणा आणि वाचनीय करण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणारे 'सत्यशोधक प्रिंटिंग प्रेसचे' श्री. नितीन लिमये आणि श्री. सचिन सिधये यांचेही विशेष आभार! त्यांच्या सहकार्यानेच हा अंक पीडीएफ आणि ई-बुक स्वरूपातही उपलब्ध होऊ शकला आहे.

या अंकात काही कमतरता, त्रुटी, दोष असतील तर संपादक म्हणून या सर्वांची जबाबदारी मी स्वीकारते आणि काही सुधारणा असल्यास त्या आमच्यापर्यंत पोहोचवाव्यात, अशी विनंती करते. धन्यवाद!

-प्रा. मानसी गानू
संपादक



**ऋषभ कोतवडेकर (१२ वी वाणिज्य)**

# उपप्राचार्य मनोगत...



नमस्कार,

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ हे अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष! या विशेष निमित्ताने ५० वा सहकार वार्षिक अंक आपल्या हाती सुपूर्द करताना अत्यंत आनंद होत आहे.

अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाने नुसतेच गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले नाही, तर सामाजिक जाणिवा, मूल्यशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले. शैक्षणिक क्षेत्रातील आमचे योगदान हे रत्नागिरीसह संपूर्ण कोकणासाठी प्रेरणादायी ठरले आहे. हे योगदान असेच अविरत सुरू राहावे आणि समाजापर्यंत अधिक चांगल्या पद्धतीने पोहोचावे यासाठी यावर्षी School Connect Mission चे आयोजन करण्यात आले.

फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इ. १२ वीच्या बोर्ड परीक्षेत कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्या सातत्यपूर्ण शैक्षणिक यशाची परंपरा यंदाही ठळकपणे अधोरेखित केली. संख्यात्मक आणि गुणात्मक या दोन्ही प्रकारे महाविद्यालयाचा निकाल उल्लेखनीय ठरला. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९८.५३% होता. एमसीव्हीसी विभाग १००%, वाणिज्य १००%, विज्ञान ९८.२७%, तर कला शाखेचा निकाल ९६.९९% असा अभिमानास्पद आहे.

दरवर्षीप्रमाणेच विविध समित्यांची कामे अतिशय नियोजनबद्धपणे सुरू आहेत. प्रामुख्याने अभ्यासक्रम नियोजन अतिशय काटेकोर आणि वेळेत झाल्यामुळे अभ्यासक्रम वेळेत शिकवून पूर्ण झाले. वेळेमध्ये केलेले नियोजन आणि जादा तासिका यामुळे अभ्यासक्रम पूर्ण होऊन, दरवर्षीप्रमाणे सराव, परीक्षा आणि विशेष मार्गदर्शन तसेच अभ्यासपूरक उपक्रमांना वेळ देता आला. सुकाणू समिती, कार्यक्रम आणि समारंभ समिती, वाङ्मय मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक मंडळ, जिमखाना, परीक्षा आणि विद्यार्थी मूल्यमापन, विद्यार्थी सहायता निधी, महिला विकास कक्ष, इतिहास शोध-बोध अभियान, पर्यावरण जाणीव जागृती, दिनविशेष, छंदोत्सव, परीक्षा, मूल्यमापन व तांत्रिक सहाय्यक समिती तसेच NEP IQSC आणि SSSC, वसुंधरा जिज्ञासा मंडळ अशा सर्व समित्या कार्यरत आहेत.

महाविद्यालयाने आपली गुणवत्ता फक्त शैक्षणिक निकषांवरच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाद्वारे सिद्ध केली आहे. श्रिया झोरे, आरोही पिलणकर, सायली कर्लेकर, योगेंद्र तावडे, राज पाडावे, अजय मीना, अदिती देसाई यांनी क्रीडा स्पर्धांमध्ये तर अनेक स्पर्धांमध्ये निरंजन सावरे, वीणा काळे, मधुरा रावणंग, साक्षी हरळीकर, रिया पांचाळ, विदुला कुलकर्णी, स्नेहल कोकरे, स्वरदा केळकर, श्रिया केळकर, श्रावणी खांडेकर, प्रणव हातीसकर या विद्यार्थ्यांनी उत्तम यश प्राप्त केले. या सगळयांचे अभिनंदन आणि भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा!!!

शिक्षकांनीसुद्धा अभिमानास्पद कामगिरी केली. श्री. सागर पोकळे यांनी राष्ट्रीय पातळीवरील परिषदेमध्ये आपला सहभाग नोंदवला. राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत श्री. सुमेध मोहिते यांनी २ रौप्य, १ कांस्य पदक जिंकले. SCERT मार्फत आयोजित वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षणासाठी श्री. प्रभात कोकजे, सौ. मानसी गानू, श्री. सागर पोकळे यांची मार्गदर्शक म्हणून निवड झाली. श्री. निनाद तेंडुलकर यांनी SCERT तर्फे शिक्षक प्रशिक्षण आणि घटक संच निर्मिती कार्यशाळेत सहभाग घेतला. हे सर्व शिक्षकांच्या उपक्रमशील मनोवृत्तीचे निदर्शक आहे.

महाविद्यालयाच्या शिरपेचातील मानाचा तुरा असणारा छंदोत्सव अतिशय उत्साहाने व शिस्तबद्धरितीने संपन्न झाला. यामध्ये क्रीडा महोत्सव, गीतगायन, वैयक्तिक व समूह नृत्य स्पर्धा, आकर्षक कला प्रदर्शने, फूड फेस्ट, फिलर्स आणि महाविद्यालयाची वैशिष्ट्यपूर्ण मानबिंदू असलेली शामराव करंडक एकांकीका स्पर्धा घेण्यात आली. दैनंदिन अध्यापन, वक्तशीरपणा, शिस्त, नवोपक्रम यामध्ये नेहमीच महाविद्यालय आघाडीवर आहे. महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी, प्राचार्य, सर्व विद्यार्थी वर्ग, अध्यापक वृंद आणि सर्व शिक्षकेतर-कार्यालयीन कर्मचारी यांचा मोलाचा वाटा आहे, याबद्दल सर्वांना धन्यवाद!

**-श्री. सुनील गोसावी**
उपप्राचार्य

उद्याचा भविष्यकाळ वर्तमानाच्या त्यागातून निर्माण होत असतो.

Statement about ownership and other particulars about Magazine
**'SAHAKAAR'** to be published in the first issue every year before
the last day of January

## Form No. IV (Rule No. 8)

Central Rule 1956)

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of Publication | : | Abhyankar Kulkarni Junior College, Ratnagiri. |
| 2. | Periodicity of Publication | : | Annual |
| 3. | Composer's Name | : | Mr. Nitin Limaye |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | Satyashodhak Press, Tilak Lane, Ratnagiri. |
| 4. | Publisher's Name | : | Dr. Makarand Raghunath Sakhalkar |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | 3618, "Laxmi-Nrusinha" Lower lane, Ratnagiri. 415612 |
| | Phone | : | (02352) 221311/7588264348 |
| 5. | Editor's Name | : | Mrs.Manasi Prasad Ganoo |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | A-203, Janardan Plaza, Tilak Lane, Ratnagiri. 415612 |
| | Phone | : | 7083111479 |
| 6. | Name & Address of individuals who own the magazine or shareholders holding more than one percent of the total capital | : | Dr. Makarand Raghunath Sakhalkar Abhyankar Kulkarni Junior College, Ratnagiri-415612. |

Place : Ratnagiri
Dated : 26 January, 2026

Sd/-
**Principal**
**Abhyankar KulkarniJunior College**
**Ratnagiri-415612**

# प्राचार्य मनोगत...



नमस्कार,

अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय यावर्षी आपले सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. सुवर्ण महोत्सवी वर्ष हे केवळ कालगणनेचे नसून, ही स्वप्नांची, मूल्यांची आणि अखंड परिश्रमांची सुवर्णगाथा आहे. ५० वर्षांपूर्वी ज्ञान, संस्कार आणि समाजभान यांची जी मशाल प्रज्वलित झाली, ती आजही तितक्याच तेजाने उजळत आहे, ही बाब अत्यंत अभिमानास्पद आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त २०२५-२६ चा 'सहकार' सुपूर्द करताना आनंद होत आहे.

सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुंग कार्यासाठी आयडियल एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटीतर्फे महाविद्यालयाचा सन्मान करण्यात आला असून यशस्वी वाटचालीत सर्व माजी प्राचार्य, माजी आणि विद्यमान उपप्राचार्य, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, माजी विद्यार्थ्यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच महाविद्यालय आज विश्वासार्हतेचे आणि गुणवत्तेचे प्रतीक बनले आहे.

महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे अध्यापन कार्य अत्यंत शिस्तबद्ध, नियोजनपूर्वक आणि गुणवत्तेला केंद्रस्थानी ठेवून सुरू झाले. फेब्रुवारी व मार्च २०२५ मध्ये झालेल्या HSC चा निकाल महाविद्यालयाच्या उज्ज्वल परंपरेला साजेसा असून निश्चितच उत्साहवर्धक आणि गौरवास्पद ठरला आहे. संख्यात्मक तसेच गुणात्मक विचार करता हा निकाल महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता अधोरेखित करणारा आहे.

जि. प. शिक्षण विभाग रत्नागिरीकडून महाविद्यालयाची पथक तपासणी करण्यात आली. शिक्षणाधिकारी (योजना) श्री. किरण लोहार यांनी केलेल्या मूल्यमापनात आणि निरीक्षणात महाविद्यालयाला चांगले गुणांकन प्राप्त झाले आणि महविद्यालयाची कार्यपद्धती आणि विविध उपक्रम याबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दरवर्षी महाविद्यालयामध्ये अनेक अभ्यासानुवर्ती आणि अभ्यासेतर उपक्रमांचे आयोजन केले जाते. स्वातंत्र्यदिनानिमित्त समूह गीतगायन स्पर्धा, राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे आयोजन, इतिहास विभागाने आयोजित केलेली मध्यप्रदेश येथील अभ्यास सहल, वाचन प्रेरणा दिनानिमित्त विशेष व्याख्यान, स्वच्छता मोहीम, पोमेंडी देवराई येथील निसर्ग भ्रमण, विविध स्पर्धा आणि अनेक विषयांवरील व्याख्याने आणि उपक्रम तसेच अतिशय उत्साहाने संपन्न झालेला छंदोत्सव असे अनेक उपक्रम आणि कार्यक्रम महाविद्यालयातर्फे संपन्न झाले.

महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी वक्तृत्व, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून महाविद्यालयाच्या गौरवात भर घातली आहे. श्रीरंग जोगळेकर याने भारत सरकार आयोजित राष्ट्रीय कला उत्सव स्पर्धेत स्वरवाद्य वादन या कलाप्रकारात विशेष पारितोषिक प्राप्त केले. मोहिनी फड हिने राष्ट्रीय पातळीवरील ड्रॅगन बोट स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. दिव्या पाल्ये हिने खो-खोसाठी राज्याच्या संघात स्थान पटकावले. रिया मयेकर हिने राष्ट्रीय स्तरावर तायक्वांदोमध्ये सहभाग घेतला. स्वामी स्वरूपानंद आंतरराज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत स्वानंदी शेंबवणेकर हिने उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले. या सगळ्यांच्या गौरवास्पद यशाबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन!

श्री. प्रसाद गोखले नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत, त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षण आणि व्यवस्थापन सुनियोजितपणे चालू राहण्यासाठी, रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या कार्याध्यक्षा श्रीमती शिल्पाताई पटवर्धन, उपकार्याध्यक्ष अॅड. विजय साखळकर, कार्यवाह श्री. सतीशजी शेवडे, सहकार्यवाह श्री. श्रीकांत दुदगीकर, शालेय समिती अध्यक्ष श्री. आनंदजी देसाई आणि सर्व पदाधिकारी या सर्वांचे आम्हाला मोलाचे सहकार्य मिळाले, त्याबद्दल त्यांचे आभार!

'सहकार' मागील काही वर्षांप्रमाणे ई रुपात आपण प्रकाशित करीत आहोत. यासाठी संपादक म्हणून सर्व जबाबदारी पार पाडणाऱ्या प्रा. मानसी गानू तसेच संपूर्ण अंक डिझाईन करणारे सत्यशोधक प्रेसचे श्री. नितीन लिमये, श्री. सचिन सिधये यांच्या अथक परिश्रमातून साकारलेला, 'सहकार' तुमच्या हाती देताना मला प्राचार्य म्हणून अतिशय आनंद होतो आहे. सर्वांना धन्यवाद आणि भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**डॉ. मकरंद साखळकर**
प्राचार्य




**क्षितिज नांदावडेकर (१२ वी विज्ञान)**

ज्या माणसाजवळ संयम आहे तो प्रत्येक गोष्टीचा धनी असतो.

# मानाचं पान



प्राचार्य मकरंद साखळकर
उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार
करिअर कट्टा



प्रा. महेश नाईक
र. ए. सोसायटीच्या
एल्. एम्. बोर्डाच्या अध्यक्षपदी निवड



प्रा. सुनील भोईर
राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर
शोधनिबंध प्रसिद्ध



प्रा. सागर पोकळे
आर.आय.ई. आयोजित
राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षणात सहभाग



प्रा. निनाद तेंडुलकर
एस.सी.ई.आर.टी.तर्फे नवीन पाठ्यक्रम
शिक्षक प्रशिक्षणात सहभाग



प्रा. ऋषीराज नागवेकर
यूजीसी नेट परीक्षा उत्तीर्ण



प्रा. सुमेध मोहिते
राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत २ रौप्य, १ कांस्य



श्रीरंग जोगळेकर
राष्ट्रीय स्तरावर विशेष पारितोषिक



मोहिनी फड
राष्ट्रीय ड्रॅगन बोट स्पर्धेत ७ सुवर्ण,
३ रौप्य व १ कांस्यपदक




रिया मयेकर
राष्ट्रीय पातळीवर
तायक्वादो स्पर्धेत सहभाग



दिव्या पाल्ये
राष्ट्रीय स्तरावर
खो-खो संघात निवड

# मानाचं पान



कस्तुरी दळवी
आंतरराज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत द्वितीय



स्वानंदी शेंबवणेकर
आंतरराज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ



श्रुती बोरवणकर
संपूर्ण संस्कृत सारिका परीक्षेत प्रथम



मृदुला पाटील
राज्यस्तरीय तायक्वांदो
स्पर्धेत सुवर्णपदक



सेजल जाधव
राज्यस्तरीय कॅरम
स्पर्धेत तृतीय



अदिती देसाई
राज्यस्तरीय तलवारबाजी
स्पर्धेत सहभाग



श्रिया झोरे
राज्यस्तरीय तलवारबाजी
स्पर्धेत सहभाग



सायली कर्लेकर
राज्यस्तरीय खो-खो
स्पर्धेत सहभाग



आरोही पिलणकर
राज्यस्तरीय जलतरण
स्पर्धेत सहभाग



राज पाडावे
राज्यस्तरीय कबड्डी
स्पर्धेत सहभाग



योगेंद्र तावडे
राज्यस्तरीय जलतरण
स्पर्धेत सहभाग



अजय मीना
राज्यस्तरीय क्रिकेट
स्पर्धेत सहभाग



ऋषिकेश कोतवडेकर
आदर्श विद्यार्थी



जान्हवी सावंत
आदर्श विद्यार्थिनी



वीणा काळे
अष्टपैलू विद्यार्थिनी



हर्षा पाथरे
आदर्श स्वयंसेवक



मानस मानावे
गोल्डन बॉय



पद्मिनी भितळे
गोल्डन गर्ल



# विद्यार्थी घडवता-घडवता मीच घडलो!

-प्रा. प्रसाद नंदकिशोर गोखले
इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, व्यवसाय अभ्यासक्रम विभाग

कोकणातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील नामांकित अशा रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या, कोकण बोर्डात अव्वल स्थानावर असलेल्या अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाच्या व्यवसाय शिक्षण विभागातून शिक्षक पदावरून निवृत्त होत असताना भावना दाटून आल्या आहेत. व्यवसाय शिक्षण विभागात ( जो जुन्या MCVC ह्याच नावाने अजूनही ओळखला जातो) इलेक्ट्रॉनिक्स विषयाचा शिक्षक म्हणून मी सुमारे २८ वर्षे कार्यरत आहे आणि हा सगळा प्रवास शब्दांकित करण्याची संधी मला आपला वार्षिकांक सहकार मुळे मिळाली आहे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रम हे सुवर्णक्षण आहेत आणि त्यात सहभागी होताना आनंद होतो आहे. आणखी भाग्याची गोष्ट म्हणजे रौप्य महोत्सवी वर्षात आयोजित कार्यक्रमात आणि निधीसंकलन यांतसुद्धा मी सहभागी होतो. आजपर्यंतचा हा सगळा कालावधी नजरेसमोर येतोय. जून १९९८ मध्ये नोकरीत हजर होण्यापूर्वी झालेल्या मुलाखतीवेळी तत्कालीन कार्याध्यक्ष कै. अरूआप्पांचे शब्द अजूनही आठवतात. ते म्हणाले की, ''तुम्ही इंजिनिअर लोक चांगल्या पगाराची नोकरी मिळाली की लगेच सोडून जाल. आपल्याला नवीन विभाग दोन वर्षांत व्यवस्थित सेट करायचा आहे'' आणि तेव्हा मला कै. मालतीबाई आणि कै. बाबूराव जोशी यांनी स्थापन केलेल्या ह्या आपल्या संस्थेत काम करण्याची संधी मिळाली. माझे आजोबा कै.पं. महादेवशास्त्री गोखले हे मिरजेतील नामवंत अशा मिरज विद्या समिती ह्या शिक्षण संस्थेचे एक संस्थापक. माझी आई कै.सौ.शुभांगी गोखले आणि वडील कै. श्री. नंदकिशोर गोखले हे दोघेही शिक्षक आणि मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. अशा शैक्षणिक वातावरण असलेल्या घरातून मला हा वारसा मिळाला.

कामाचा पहिला दिवस मला चांगला लक्षात आहे. ऑफीसमध्ये तत्कालीन प्राचार्य कै. देव सरांना भेटल्यावर त्यांनी कामाविषयी माहिती दिली आणि आमच्या विभागातील ज्येष्ठ शिक्षक आणि सध्या संस्थेच्या आजीव सभासद मंडळाचे अध्यक्ष श्री.महेश नाईक सरांना बोलावून मला कॉलेज, विभाग आणि शिक्षकांची ओळख करून द्यायला सांगितले. त्या दिवसापासून श्री.नाईक सर आजपर्यंत मला वेळोवेळी मार्गदर्शन करत आहेत. तेव्हा MCVC विभागाला वेगळी जागा नव्हती. आम्ही स्टाफरुममध्ये एकत्र बसत असू. तत्कालीन उपप्राचार्य कै. श्री. लेले सर, सौ. केळकर मॅडम, कै. श्री. खांबेटे सर, श्री. देशमुख सर यांनी सुरवातीपासूनच मला मार्गदर्शन केले. सुरवातीला इलेक्ट्रॉनिक्सची प्रॅक्टिकल्स फिजिक्स विभागात जी पूर्वी डार्करूम म्हणून ते वापरत तेथे सकाळी लवकर घेत होतो. तास दुपारी जुने कॅन्टीन म्हणून जो वर्ग ओळखला जायचा तेथे असत. काही दिवसांनी वेगळा MCVC विभाग आणि लॅबचे बांधकाम झाले आणि तिथे प्रत्यक्ष शिकवण्याचे काम सुरू झाले. लॅबमध्ये साहित्य, उपकरणे, पुस्तके वगैरे घेतांना मा.प्राचार्य कै.देव सरांनी काही कमी पडू दिले नाही. त्यांची नियमितपणे आमच्या विभागात फेरी असायची आणि मग कॉम्प्युटर साध्या टेबलवर पाहिल्यावर आपणहून वेगळे खास टेबल देणे, चॉकलेस बोर्ड आणि अनेक सुविधा त्यांनी उपलब्ध करून दिल्या. एखाद्या साहित्याची आम्ही मागणी केली आणि आमच्या विभागाची ग्रँट जरी शिल्लक नसली तरी ते ऑफीसमधील श्री.साठे आणि श्री.सरदेसाई यांना बोलावून दुसऱ्या विभागातून खरेदीच्या सूचना देत. तत्कालीन विभाग प्रमुख, सहकारी शिक्षक यांचेही सहकार्य मिळाले. नवीन लॅबची उभारणी करताना आमचा विद्यार्थी उमेश आंबर्डेकर याने दोन वर्षे प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून मोलाची साथ दिली. इंजिनीअरिंग झाल्यावर पहिली तीन वर्षे इंजिनीअरिंग कॉलेजला लागणारी उपकरणे तयार करणाऱ्या कंपनीत आणि नंतरची तीन वर्षे पॉलिटेक्निकमध्ये शिक्षक म्हणून काम केल्याचा अनुभव खूप उपयोगी पडला. त्यामुळे आम्ही प्रॅक्टिकल साठी लागणारे बहुतेक सर्व कीट बाहेरून विकत न आणता लॅबमध्येच तयार करत गेलो. आणि आजपर्यंत आमचा हाच प्रयत्न राहिला आहे. त्यानंतर आता मुलांचा बावादादा आणि आमचा प्रदीप सुर्वे यांचे सहकार्य लाभत आहे. आमचा इलेक्ट्रॉनिक्स (MCVC) कोर्स सुरू झाल्यानंतर दोन वर्षांनी

द्विलक्ष्यी इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर (सायन्स) असे दोन नवीन अभ्यासक्रम सुरू झाले. त्यांपैकी इलेक्ट्रॉनिक्ससाठीची प्रयोगशाळा तयार करणे आणि शिकवण्याची जबाबदारी प्रा.कै. देव सरांनी मला दिली. त्यासाठी लागणारी प्राथमिक माहिती मला पुण्यातील एस. पी. कॉलेजचे श्री. राजन सुपेकर सर आणि कोल्हापूर येथील न्यू कॉलेजचे श्री. मिलिंद चिटणीस सर यांनी दिली. तत्कालीन शास्त्र शाखेचे प्रमुख श्री.देशमुख सर यांनी वेळोवेळी ह्यांत विशेष लक्ष दिले. नवीन लॅबच्या उभारणीमध्ये लागणारे साहित्य आणि उपकरणे यांच्या खरेदीसाठी स्वतः श्री. नाईक सर आणि श्री. देशमुख सर अनेकदा माझ्याबरोबर मुंबईला आलेले आहेत. दोन वर्षे एकाच वेळी दोन्ही कोर्सना शिकवण्याचे अवघड काम केले. अवघड अशासाठी की तोच भाग ९० -९५ टक्के मार्क मिळालेल्या मुलांना आणि ४० पासून ६० टक्के मिळालेल्या मुलांनाही शिकवायचा. कॉम्प्युटर सायन्सलाही दोन वर्षे शिकवण्याची संधी मिळाली. त्यानंतर आजपर्यंत MCVC मध्ये कार्यरत आहे.

मी शिक्षक म्हणून हजर झालो तेव्हा रत्नागिरीत नवीन असल्याने फारशा ओळखी नव्हत्या. पण आपल्या संस्थेचे आणि महाविद्यालयाचे ब्रँडनेम तेव्हा उपयोगी आले आणि आजही हाच अनुभव प्रकर्षाने येतो. लॅबमध्ये रेडिओ, टीव्ही, डिश वगैरे प्रॅक्टिकल असल्याने सुरवातीच्या काळात गुरुकृपा रेडिओ हाऊसचे श्री. भालचंद्र हळबे (योगेश हळबे सरांचे वडील), संजय रेडिओ हाऊसचे श्री.भावे, सौ.सकपाळ मॅडमचे मिस्टर श्री. विलास सकपाळ तसेच महाराष्ट्र वॉच कंपनीचे श्री.काळे बंधू आणि उल्हास एजन्सीजचे श्री.लिमये या सर्वांची मदत आणि मोलाचे मार्गदर्शन झाले. त्या सर्वांबद्दल ऋणनिर्देश करणे मला अगत्याचे वाटते.

MCVC विभागातील काही वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींचा उल्लेख करणे गरजेचे आहे. एक म्हणजे On the Job Training. मुलांनी एक महिना प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी अनुभव घेणे. हे करताना आसपासच्या वेगवेगळ्या आस्थापना आणि उद्योजक यांच्याशी संपर्क आला. दुसरे म्हणजे Visits. यांमध्ये अनेक ठिकाणी जसे आकाशवाणी, दूरदर्शन, टेलिफोन एक्सचेंज आणि इतर अनेक ठिकाणी जाता आले. वर्गात शिकवण्याबरोबरच बाहेरही शिकवता आणि शिकता आले. आमच्या कोर्स मध्ये प्रॅक्टिकलला जास्त प्राधान्य दिलेले असल्याने स्वाभाविकच मी जास्त वेळ आमच्या लॅबमध्ये रमलो. नवीन कीट, चार्टस्, नोट्स, प्रॅक्टिकल्सचे फोल्डर्स तयार करणे, वेळोवेळी हे सर्व अपडेट करणे हे माझे आवडीचे काम राहिले आहे. मागील सुमारे एक वर्षापासून म्हणजे जुनी ईमारत पाडून कॉलेजचे नवीन बांधकाम सुरू झाल्यापासून आम्ही मागच्या PG बिल्डिंगमध्ये पुन्हा फिजिक्स विभागाच्या लॅबमध्ये काम करत आहोत.

वर्गात शिकवण्याबरोबरच महाविद्यालयातील अनेक उपक्रमांमध्ये सहभागी होता आले. अनेक व्याख्यात्यांना ऐकता आले. संस्थेच्या, वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या तसेच संस्थेच्या घटक शाखांच्या वाटचालीतील महत्त्वाच्या टप्प्यातील कार्यक्रमांचे साक्षीदार बनण्याचे भाग्य मला लाभले आहे. अनेक वेगवेगळ्या समित्यांमध्ये काम करत सहकारी शिक्षकांकडून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. मग मी परीक्षा समिती सदस्य म्हणून काम करताना श्री.नाईक सरांनी धडाडीने घेतलेले निर्णय असतील तसेच कामाचे केलेले अचूक नियोजन असेल. त्यांनी कॉलेजची परीक्षा असूदे किंवा बाहेरील पोलिस विभागाची किंवा मेडिकलची नीट परीक्षा असूदे, नाईक सर सहकारी शिक्षक आणि कर्मचारी सर्वांना विश्वासात घेऊन कमी वेळ असला तरी ती काटेकोर नियोजन करून यशस्वीपणे पार पाडणारच. सध्या संस्थेच्या सहकार्यवाह पदावर कार्यरत, नेहमी हसतमुख, शांत आणि संयमी असे श्री.श्रीकांत दुदगीकर सर यांच्या सहवासात काम करण्याचे भाग्य लाभले. तत्कालीन उपप्राचार्य डॉ. श्रीकृष्ण जोशी सरांनी सुरू केलेल्या 'नित्य नवे नित्य हवे' या उपक्रमात दोनवेळा दिलेल्या विषयावर तयारी करून बोलण्याची संधी दिली. कोट्याधीश (भाषेच्या शाब्दिक कोट्या करणारे अशा अर्थाने) सहकारी शिक्षक श्री. माधव पालकर सर, श्री. सुशील वाघधरे सर आणि भाषाप्रभू आणि शब्दप्रभू म्हणून ओळखले जाणारे डॉक्टर श्रीकृष्ण जोशी सर यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. तसेच मितभाषी आणि कमी शब्दांत आशय मांडणारे श्री.विद्याधर केळकर सर, सतत नवीन उपक्रम हाती घेऊन सर्वांना सहभागी करून घेणारे आत्ताचे उपप्राचार्य श्री.सुनिल गोसावी सर, टेक्नोसॅव्ही श्री. चेतन मालशे सरांकडून अनेक नवीन तंत्रांची ओळख झाली. अलिकडील नवीन सहकारी शिक्षकांमध्ये श्री. निनाद तेंडूलकर आणि श्री. प्रभात कोकजे यांची कोणतेही काम उत्साहीपणे करण्याची पद्धत वाखाणण्याजोगी आहे. अनेक वर्षे परीक्षा समिती सदस्य म्हणून कॉमर्स बिल्डिंगमध्ये काम करताना विभागप्रमुख सौ. तारगावकर मॅडमनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. जीवशास्त्र विभागातील सहकारी शिक्षक आणि मोठा लोकसंग्रह असणारे श्री. दिलीप शिंगाडे सर ह्यांचा आणि माझा जुना स्नेह आहे.

कोकण प्रज्ञा शोध परीक्षेसाठीचा एक पेपर काढणे, पुस्तकांसाठी लिखाण, वर्कशॉप्ससाठी रत्नागिरी, सिंधूदुर्ग, रायगड जिल्ह्यातील शाळांमध्ये जाणे, सर्टिफिकेट तयार करणे, इ.मध्ये सहभाग घेतला. वर्ष २०१६ साठीचा कोकण प्रज्ञा शोध परीक्षेसाठी 'कार्यकर्ता पुरस्कार' मला मिळाला. कोकण बोर्डाच्या १२ वीच्या पेपर तपासणीचे काम आजपर्यंत केले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र व्यवसाय शिक्षण मंडळासाठी काही वर्षे प्रश्नपत्रिका काढायचे काम केले. काही वर्षे ITI परीक्षांसाठी निरीक्षक म्हणून काम केले.

आता माझ्या विद्यार्थ्यांविषयी सांगायचंय. खरं तर ११ वी १२ वी दोन वर्षे असली तरी प्रत्यक्ष दीड वर्षच विद्यार्थी आमच्या संपर्कात असतात आणि तो काळ भुर्रकन उडून जातो. इतक्या कमी कालावधीत देखील त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांमुळे विद्यार्थी कायम

स्मरणात राहतात. मर्यादित विद्यार्थी संख्या असल्यामुळे त्यांची आणि पालकांची चांगली ओळख होते. त्यांपैकी काही जणांचे उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. मला सांगताना अभिमान वाटतो की संस्थेचा गेल्यावर्षीचा कै. मालतीबाई जोशी आदर्श कर्मचारी पुरस्कार मिळालेला, आम्हाला MSCIT चे धडे देणारा, आपल्या संस्थेच्या बारटक्के इन्स्टिट्यूटमध्ये कार्यरत असणारा अमित पालकर माझा पहिल्या बॅचचा विद्यार्थी आहे. अमित नेहमी आमच्या बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहे. त्यानंतर मी येथे आल्यावर इ. ११ वी मध्ये प्रवेश घेतलेला, अनेक अडचणींवर मात करत शिक्षण पूर्ण करत, घरचा व्यवसाय पहात सध्या माझ्याबरोबर सहकारी शिक्षक असलेला योगेश हळबे. त्यानंतर कॉम्प्युटर उद्योगात असणारा आणि आमच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारा शैलेश प्रभुदेसाई. स्पीकर रिकोनिंग आणि म्युझिक सिस्टिम मधला तज्ज्ञ मंदार खेडेकर. परिस्थिती बेताची असल्याने पार्ट टाईम नोकरी करत इंजिनिअर होऊन आय.टी. क्षेत्रात नोकरी करणारा ओंकार रहाटे. खेडशीत मोबाईल डॉक्टर म्हणून ओळखला जाणारा सागर पालेकर. माझा काही वर्षे शिक्षक सहकारी आणि सध्या पुण्यात कार्यरत तेजस नाचणकर. मुंबई मेट्रोमध्ये लोकोपायलट म्हणून कार्यरत असणारे अनुया कोळंबेकर आणि शुभम जाधव, सॅमसंग टीव्ही सर्व्हीस सेंटरमधील मुख्य टेक्निशियन अजय केळकर आणि असे असंख्य विद्यार्थी जे चांगले व्यवसाय अथवा नोकरी करताहेत. नेहमी फोनवर किंवा प्रत्यक्ष भेटून चौकशी करत आहेत. असे विद्यार्थी लाभणं हाच माझ्यासाठी मोठा पुरस्कार आहे असं मला वाटतं.

MCVC विभागात आम्ही इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, अकौंटिंग आणि ऑफिस मॅनेजमेंट, लॉजिस्टिक्स आणि सप्लाय चेन मॅनेजमेंट आणि मेडिकल लॅब टेक्निशियन या चार विषयांचे शिक्षक एक कुटुंब म्हणून कार्यरत आहोत. भाषा विषयांचे आमच्याकडे शिकवणारे शिक्षक, क्रिडा शिक्षिका सौ. लीना घाडीगावकर मॅडम आणि आम्ही शिक्षक यांची मधल्या सुट्टीच्या वेळी चहाच्या निमित्ताने एकत्र भेट होते. सौ. लिना मॅडमनी अनेकदा दिलेल्या अल्पोपहाराचा आम्हाला लाभ झाला आहे. विभागातील सेवक श्री.रमेश कालकर आणि चहा हे एक समीकरण आहे. त्यांच्या हातचा चहा घेऊन मगच आम्ही वर्गाकडे जातो. कुटुंबप्रमुख म्हणून आधी श्री.माधव पालकर सर आणि नंतर आजपर्यंत संस्थेचे सध्याचे सहसचिव आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक श्री. श्रीकांत दुदगीकर सर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच ज्युनिअर कॉलेजमधील कै.श्री.खांबेटे सर, श्री. दिक्षित सर, श्री.एस.आर.कुलकर्णी सर आणि सीनियर कॉलेजचे श्री.चंद्रशेखर पटवर्धन सर यांनी अडचणीच्या काळात धीर दिला. सुरवातीला पगार वेळेवर होत नसत तेव्हा प्राचार्य कै. देव सरांनी सॅलरी ॲडव्हान्स दिला हे सांगितले पाहिजे. तसेच माझे एम. ई. चे प्रोजेक्टचे राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी मला गरजेनुसार सांगलीत वालचंद कॉलेजला आणि विद्यापीठात जाण्यासाठी रजेची परवानगी प्राचार्य कै. डॉ. देव सर आणि विभागप्रमुखांनी दिली; त्यामुळे एम.ई. ची डिग्री मला मिळाली. आजपर्यंतच्या प्रवासात गुजर मॅडम, सुर्वे मॅडम, फळणीकर मॅडम, सौ. सनगरे (वाडकर) मॅडम, सौ.तळेकर(प्रदिशा शेट्ये) मॅडम, सौ. भिवंदे मॅडम, श्री. तेजस नाचणकर, काही काळ श्री. शुभम जाधव आणि गेल्या तीन वर्षांपासून आजपर्यंत श्री. योगेश हळबे या सर्व सहकारी शिक्षकांनी मला उत्तम सहकार्य केले. तसेच इतर सर्व शिक्षकांनी वेळोवेळी केलेले सहकार्य मी विसरु शकत नाही. ऑफिस, ग्रंथालय आणि जिमखाना येथील सर्व कर्मचारी, आमच्या विभागातील निवृत्त लिपिक श्री.रघुनाथ साठे आणि सध्या कार्यरत असलेले श्री. रोहन मुळे यांचे उत्तम सहकार्य मिळत आले आहे. सेवक वर्गात श्री. कालकर आणि श्री. प्रदीप सुर्वे यांच्याशिवाय आमच्या विभागातील कोणतेही काम होऊ शकत नाही. त्यानी कोणत्याही कामाला नाही म्हणले नाही. संदेश नेहमी काही ना काही संदेश (ऑफिसच्या सूचना) घेऊन येत असतो. तसेच MLT/FPT विभागातील सेवक श्री. बाबू सुवरे यांचेही सहकार्य लाभले.

महाविद्यालयातील शिक्षकांबरोबरच बाहेरील काही शिक्षकांचा उल्लेख करतो. रयत शिक्षण संस्थेच्या शिरगाव कॉलेजचे श्री.सुरेश जांबोटकर सर, ज्यांच्याकडून मला नेहमी मार्गदर्शन मिळत आले आहे. तसेच व्यवसाय शिक्षक संघटनेचे मुंबईचे श्री. विद्याधर गोडबोले सर आणि चिपळूणचे श्री.माधव ओक सर यांची साथ आहेच. तसेच जिल्हा व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण अधिकारी कार्यालय रत्नागिरी मधील अधिकारी आणि कर्मचारी यांचा मी आभारी आहे.

आजवर महाविद्यालयातील परीक्षा समिती सदस्य म्हणून अनेक वर्षे काम करण्याची संधी मिळाली. छंदोत्सव आणि इतर समित्यांमध्ये काम करत बरेच काही नवीन शिकायला मिळाले. आजवर महाविद्यालयाने तसेच विभागाने माझ्याकडे जी कामे सोपवली ती प्रामाणिकपणे करण्याचा मी नेहमीच प्रयत्न करत आलो. महाविद्यालयाच्या यशाची कमान नेहमी चढती राहिली आहे आणि आमच्या विभागाचा आणि विषयांचा निकाल वर्षानुवर्षे १००% असा आहे. मला कनिष्ठ महाविद्यालयाचा गेल्यावर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. आत्तापर्यंत केलेल्या कामाचे चीज झाले असे आनंदाने सांगावेसे वाटते. आजवर मला संस्थेने, महाविद्यालयाने, सहकारी शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी भरभरून दिले, आणि म्हणूनच विद्यार्थी घडवताना नकळत मीही घडत गेलो असे म्हणावेसे वाटते. शेवटी मी रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक कै.मालतीबाई आणि कै. बाबूराव जोशी, तसेच माजी कार्याध्यक्ष कै. अरुआप्पा जोशी, माजी प्राचार्य कै. सुभाष देव सर, संस्थेचे सर्व पदाधिकारी, आजी माजी प्राचार्य, सर्व सहकारी शिक्षक आणि विद्यार्थी या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करुन माझे मनोगत थांबवतो.

# एका आदर्श शिक्षकाचा प्रेरणादायी प्रवास

– **प्रा. योगेशानंद हळबे** (विद्यार्थी आणि सहकारी)

श्री. प्रसाद गोखले सरांविषयी बोलताना सर्वप्रथम जाणवते ती त्यांची निष्ठा, शिस्त आणि कार्यतत्परता. जवळपास २७ वर्षांच्या अखंड सेवाकाळात त्यांनी अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयातील उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण विभागातील इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञान या शाखेला केवळ अध्यापनाचा विषय म्हणून नव्हे, तर घटनात्मक घडण देणाऱ्या एका जिवंत प्रयोगशाळेचे रूप दिले. सध्या विज्ञान विभागांतर्गत सुरू असलेला हा द्वै-विषयक (बायफोकल) इलेक्ट्रॉनिक्स विषय प्रत्यक्षात महाविद्यालयात रुजवण्याचे आणि विकसित करण्याचे श्रेय गोखले सरांनाच जाते. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीमधून बी.ई. आणि देशातील मान्यवर वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली येथून एम.ई. पदवी प्राप्त करून त्यांनी उच्च दर्जाचे तांत्रिक ज्ञान विद्यार्थ्यांच्या मनामनात नि:स्वार्थपणे ओतले.

लहानपणापासूनच संघाच्या शाखेमधील शिस्तप्रिय संस्कारांचा सरांवर प्रभाव होता. व्यक्तिमत्व हे शिस्तीतून उभं राहतं हे त्यांनी तेव्हाच आत्मसात केले, आणि हीच मूल्यं त्यांनी आयुष्यभर विद्यार्थ्यांना दिली.

त्यांची शिकवण्याची शैली – स्पष्टता, शिस्त, संकल्पना आणि सृजनशीलता – यांचा सुंदर संगम होती. इलेक्ट्रॉनिक्स विषय समजण्यासाठी सिद्धांत आणि प्रयोग हे दोन्ही एकमेकांचे पूरक आहेत, हे ते शांतपणे आणि संयमाने विद्यार्थ्यांना पटवून देत. सरांचं एक वाक्य विद्यार्थ्यांच्या मनात आजही कोरलेलं आहे – सिद्धांतातून स्पष्टता मिळते आणि प्रयोगातून आत्मविश्वास निर्माण होतो.

नीटनेटकी हस्तलिखित प्रयोगवही ही त्यांच्या अध्यापनाची खास ओळख बनली. प्रत्येक विद्यार्थ्याकडून ते स्वच्छ लेखनात संकल्पनेची शिस्तबद्ध मांडणी अपेक्षित ठेवत. प्रयोगशाळेत उपकरणे हाताळताना सुरक्षितता, अचूकता, मापनातील शिस्त आणि तपास कौशल्य ही ते अत्यंत बारकाईने शिकवत. त्यांनी विद्यार्थ्यांना औद्योगिक सर्किट्स, रिअल लाईफ बोर्डस् प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शिकवले. सर्किटची कार्यप्रणाली प्रत्यक्ष दाखवून संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात दृढ केली.

परीक्षेच्या काळात त्यांनी अतिरिक्त सत्रे, सराव आणि तोंडी चाचण्या घेत विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिक भक्कम केला. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक कल्पना मनापासून ऐकणे, त्यांना योग्य दिशा देणे आणि त्यांच्या क्षमतांचा विकास साधणे – हे त्यांच्या स्वभावातच होते.

गोखले सरांमध्ये शिक्षक, मार्गदर्शक आणि निर्माता अशी त्रिसूत्री होती. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात प्रामाणिकपणे केलेले कार्य हेच यशाचं मर्म आहे ही भूमिका दृढ रुजवली. त्यांच्याकडे दिलेले कोणतेही कार्य वेळेच्या आधी, अचूकतेने आणि शिस्तबद्धपणे पूर्ण होणार – ही खात्रीच असायची. त्यांच्या वेळेची काटेकोर सवय,कामातील सूक्ष्म नीटनेटकेपणा आणि दिलेल्या कामाबद्दलची प्रामाणिकता संपूर्ण विभागासाठी आदर्श बनली. विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्यांची तत्परता आणि प्रत्येक विद्यार्थ्यांच्या यशात त्यांना मिळणारा आनंद हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोलाचे पैलू आहेत.

अशा सर्व गुणांच्या आणि योगदानाच्या या शिखरावर, २६ जानेवारी २०२५ या राष्ट्रीय पर्वदिनी त्यांना प्राप्त झालेला 'सर्वोत्कृष्ट शिक्षक' हा बहुमान केवळ एक पुरस्कार नाही; तो त्यांच्या अध्यापनातील समर्पणाचा, त्यांच्या कष्टांचा आणि विद्यार्थ्यांच्या मनातील खोल आदराचा जिवंत पुरावा आहे. त्यांनी केवळ विषय शिकवला नाही, तर शिस्त, प्रामाणिकता, कष्टाची किंमत आणि मूल्याधारित जीवन जगण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत आहेत – आणि त्या प्रत्येक यशामध्ये गोखले सरांचा अंश दडलेला आहे.

सरांच्या निवृत्तीप्रसंगी विभाग, संस्था, सहकारी आणि असंख्य विद्यार्थी एकाच भावनेने नतमस्तक होतात–

ज्ञानाची शिस्त आणि शिस्तीचे ज्ञान हे शिकवणारे श्री. प्रसाद गोखले सर, आपल्या पुढील आयुष्यप्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

# मराठी विभाग



गौरी ठाकुरदेसाई (११ वी कला)

करू ना ! काय घाई आहे, म्हटलं की ती गोष्ट होतचं नाही. आजचा दिवसच योग्य.

# पाण्यातील पहिली पावले
# वेदा सरफरे

**वैदेही वैद्य** (११ वी कला)



**उत्साहो बलवानार्य नास्ति उत्साहात् परं बलम् ।**

अर्थात, उत्साह आणि मेहनत असेल तर वय किंवा मर्यादा यशाच्या आड येत नाहीत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे अवघ्या १ वर्ष ९ महिने या वयात पोहण्याचा विक्रम करणारी ‘वेदा सरफरे’.

वेदा सरफरे ही महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील अवघ्या दीड वर्षाची चिमुरडी. या वयात तिने १०० मीटर पोहण्याचा विक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला. २५ मीटर लांबीच्या स्विमिंग पूलमध्ये चार फेऱ्या पूर्ण करत तिने हा विक्रम साध्य केला. विशेष म्हणजे हे अंतर तिने १० मिनिटे ८ सेकंदात पार केले आणि तिचे नाव India Book of Records मध्ये नोंदवले गेले.



सामान्यतः या वयातील मुले आई–वडिलांच्या आधाराशिवाय दोन पावले चालतानाही धडपडतात. मात्र वेदाने पाण्यात उतरून भीतीवर मात केली आणि पाण्याशी एक नातं निर्माण केलं. ती केवळ ९ महिन्यांची असतानाच तिच्या जलतरण प्रशिक्षणाची सुरुवात झाली होती. सुरुवातीला खेळ म्हणून सुरू झालेला हा प्रवास हळूहळू शिस्तबद्ध सरावात रूपांतरित झाला. तज्ज्ञ प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन, सुरक्षिततेचे भान आणि नियमित सराव यामुळे वेदाची क्षमता अधिक विकसित झाली.

आपल्या सर्वांनाच असं मनात कुठेतरी वाटत असतं की, आपणही काहीतरी वेगळं करावं! अगदी विलक्षण.... निराळं असं काहीतरी. वेदाकडून आपल्याला हाच संदेश घेता येईल की,

**गुणा: पूजास्थानं गुणिषु न च लिङ्गम् न च वय: ।**



**स्मृती पडवळ (११ वी विज्ञान)**



# चाफा

**स्मृती पडवळ** (११ वी विज्ञान)

**चाफ्याचे ह्या काय करू मी...??**
**चाफ्याशी नातं असू शकतं...?**
**फुलासारखं फूल असुनही इतकं वेड लावू शकतं...?**
**साधं पण मोहक चाफ्याचं झाड दिसलं की पाऊल थबकतं....**
**आपलं ओळखीचं कुणीतरी आहे असं मनात कुठेतरी जाणवतं...**
**तोडलं नसेल कधी फूल चाफ्याचं पण पडलेलं फूल मात्र उचललं जातं आल्हाददायक आनंदाने मग मन कसं अलगद भरून येतं....**
**चाफा एखाद्या रागासारखा अमर्याद, अथांग आणि अनंत**
**ज्याचा आरोह भावनांनी भरलेला आणि अवरोहात व्याकुळता मूर्तीमंत...!!**

रिकामे डोके सैतानाचे घर असते.



# भारतीय संस्कृती-परंपरेचा विपर्यास

**स्वरूपा आठवले**
(११ वी कला)

संस्कृती या शब्दांमध्ये सम हा उपसर्ग तर कृ हा संस्कृत धातू आहे. संस्कृतीचा अर्थ सर्वसमावेशक कृती असा होतो. धर्मासह समग्र अंतर्बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द वापरला जातो.

प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचा संस्कार.

भारतीय संस्कृतीचा विपर्यास म्हणजे तिचे चुकीचे चित्रण करणे, इतिहासाचे विकृतीकरण करणे किंवा तिच्याबद्दल नकारात्मक आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करणे, जे अनेकदा पाश्चात्य लेखकांच्या दृष्टिकोनातून मांडले जाते. या विपर्यासामुळे भारताच्या समृद्ध संस्कृतीबद्दल, विशेषतः तिच्या आध्यात्मिक आणि तात्विक मूल्यांबद्दल गैरसमज निर्माण होतो आणि त्यातील विविधता व एकता यांसारख्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांकडे दुर्लक्ष केले जाते.

भारतीय संस्कृती ही देशाच्या इतिहासामुळे, विलक्षण भूगोलामुळे आणि जनतेतील वैविध्यामुळे आकारास आली आहे. शेजारच्या देशांतील चालीरिती, परंपरा व कल्पना सामावून घेत भारतीय संस्कृतीने सिंधू सरस्वती सभ्येतेदरम्यान जन्माला आलेले तसेच वैदिक काळात, दक्षिण भारतातील लोहयुगकाळात, बौद्ध धर्माच्या उदय आणि ऱ्हासाच्या काळात तसेच भारताचे सुवर्णयुग, इस्लामी आक्रमण व युरोपीयन देशांच्या वसाहती दरम्यान झालेले बदल पचवून देखील स्वतःचे परंपरागत प्राचीनत्व टिकवून ठेवले आहे. भारतीय संस्कृतीने तिच्या इतिहासाने, अद्वितीय भौगोलिक रचनेने, वैविध्यपूर्ण लोकजीवनाने आणि शेजारील देशांच्या परंपरा व कल्पना स्वीकारून तसेच पुरातन परंपरा जपून आकार घेतला आहे. परंतु सध्या पाश्चात्य संस्कृतीचे व मार्क्सवादी डाव्या विचारसारण्यांचे भारतीय संस्कृतीवर झालेले अतिक्रमण तिच्या विपर्यासाला मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरत आहे.

भारतात जागोजागी वेगवेगळे लोक, धर्म, वातावरण, भाषा, चालीरिती आणि परंपरा यात वैविध्य दिसत असूनही आढळणारे साम्य हे या देशाचे वैशिष्ट्य आहे. देशभरात पसरलेल्या विविध उपसंस्कृती आणि हजारो वर्षांच्या परंपरा यांची एकत्रित वळलेली मोट म्हणजे भारतीय संस्कृती. ती अनेक प्रसिद्ध आध्यात्मिक गुरुंचे व योगशिक्षकांचे आश्रयस्थान आहे. भारतीय संस्कृतीला स्वतंत्र अशी वेगळी वैशिष्ट्ये आणि परंपरा लाभलेली आहे.

भारतीय संस्कृती ही अतिप्राचीन आहे. वैदिक साहित्य हे भारतीय संस्कृतीचे मूळ साधन ग्रंथ आहेत. भारतीय संस्कृती समजून घेताना या धार्मिक साहित्याचा उपयोग होतो. वैदिक साहित्यामध्ये प्रामुख्याने वेदांचा, उपनिषदांचा, आरण्यक ग्रंथ यांचा प्रामुख्याने समावेश होतो.




परंतु सध्या भारतीय संस्कृती म्हणजे एक प्रकारे अंधश्रद्धा, चुकीच्या चालीरिती, रूढी परंपरा यांचे अनुकरण करणारी संस्कृती आहे. अशा आशयाचे समज समाजामध्ये प्रचलित केलेले दिसून येतात. भारतीय संस्कृतीतील गुरुपरंपरेची खिल्ली उडवताना दिसून येतात. भारतीय संस्कृतीचे मूळ असलेल्या वेदांना चुकीचे ठरवले जाते. त्यासोबत उपनिषदे, आरण्यके यामध्ये सांगितलेले आध्यात्मिक, भौतिक आणि व्यावहारिक ज्ञानाचा उपहास करत तेथील ज्ञान म्हणजे केवळ अंधश्रद्धाच आहे असा समज करून घेतला जातो. उपनिषदे व आरण्यके यांमध्ये सांगितलेल्या नीतीमूल्यांचा संबंध केवळ समाजातील एखाद्या वर्गाशी जोडला जातो आणि त्यामुळे इतरांनी त्याचे आचरण करू नये असे परस्पर मानले जाते.

मनुष्य व त्याच्या भोवतीचे विश्व मिळून निसर्ग बनतो या निसर्गामध्ये जीवनाच्या उत्कर्षाला अनुकूल असे बदल करून म्हणजेच निसर्गावर काही संस्कार करून मनुष्य आपली जीवनयात्रा चालवितो. तो केवळ बाह्य विश्वातील पदार्थांवर संस्कार करतो असे नव्हे तर स्वतःचा देह आणि मन, बुद्धी यांच्यावरही संस्कार करून स्वतःच बदल घडवून आणतो. संस्कृती या शब्दात हे दोन्ही प्रकारचे बदल अभिप्रेत आहेत.

सध्या भारतीय संस्कृतीत संस्कार हे व्यवहाराशी संयुक्तिक नाहीत असा समज करून घेतला जातो आणि अर्धे मोजकेच संस्कार केले जातात. तेव्हा मानवी आयुष्यात मोठ्या प्रमाणात विसंगती निर्माण होते. स्वतःचा देह, मन व बुद्धी यांच्यावर संस्कार होतच नाहीत. त्यामुळे अनेकदा स्वतःमध्ये बदल घडवून आणले जात नाहीत.

भारताच्या सांस्कृतिक इतिहासाची वाटचाल पाहिली असता तिच्यात प्रमुख तीन वैशिष्ट्ये दिसून येतात.

१. अखंडित परंपरा

२. राजकीय व धार्मिक सत्तांच्या केंद्रीकरणाचा अभाव

३. संस्कृती संघर्ष टाळून संस्कृती संगम करण्याची प्रवृत्ती

सध्या भारतीय संस्कृतीची परंपरा ही खंडित झालेली दिसून येते. भारतीय संस्कृतीला अनुसरून असलेले आचरण कमी होताना दिसत आहे. भारतीय संस्कृतीतील प्रवृत्ती ही नेहमी संस्कृती संगमाची राहिली आहे. पण आता सातत्याने वैदिक विरुद्ध बौद्ध विरुद्ध जैन असा संस्कृती संघर्ष अजून वाढताना दिसतो आहे. यात तिन्ही संस्कृतीचे मूळ ही भारतीय संस्कृती आहे हे पूर्णतः विसरून गेलेले आहेत. या तिन्ही संस्कृतींचा संगम अजिंठा, वेरूळ या लेण्यांसारख्या तसेच काही मंदिरांसारख्या ठिकाणी दिसून येतो. परंतु सद्य स्थितीत मात्र या संस्कृतीचा संगम होण्याऐवजी त्यात संघर्ष चालू असलेला दिसून येतो. म्हणजेच इथे भारतीय संस्कृतीतील संगमाचा विपर्यास संघर्षाच्या स्वरूपात पाहायला मिळतो.

संस्कृतीच्या संदर्भात विविध संकल्पना मानल्या आहेत–

**१. ऋणकल्पना–** ही भारतीय समाजशास्त्रीय महत्त्वाची संकल्पना असून आश्रम व्यवस्थेशी या संकल्पनेची सांगड घातलेली दिसून येते.

**२. आश्रम–** मानवी आयुष्याचे चार भाग कल्पून त्या प्रत्येक भागाला आश्रम असे नाव दिले आहे. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास असे हे चार आश्रम आहेत.

**३. पुरुषार्थ–** धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ मानले असून नीतीशास्त्राच्या दृष्टीने यांना विशेष महत्त्व आहे.

**४. चातुर्वर्ण्य–** ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार वर्ण मानले गेले आहेत.

ब्रह्मचर्य आश्रमात गुरुगृही राहून गुरुच्या आज्ञेत विद्याभ्यास करावा लागत असे. हे जीवन अत्यंत साधे आणि सोज्वळ असे. सर्व इंद्रियांवर ताबा ठेवून त्याला ब्रह्मचर्य आश्रमात ऐहिक सुखाचा त्याग करावा लागे. परंतु सध्या ब्रह्मचर्याश्रमाच्या वयात गुरूंची आज्ञा तर दूरच परंतु गुरूंचा अपमानच केलेला दिसून येतो. भारतीय संस्कृतीत गुरूला असणारे अनन्यसाधारण महत्व सध्या कमी होत चाललेले दिसून येते. तसेच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र हे चातुर्वर्ण्य कर्मावर आधारलेले होते ते आता दिसून येत नाहीत.

काही दिवसांपूर्वीच आपण गणेशोत्सव साजरा केला. लोकमान्य टिळकांनी त्याकाळी सुरू केलेल्या सार्वजनिक

गणेशोत्सवामागे राष्ट्रभक्तीची भावना होती. परंतु आत्ताच्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरूप आपणास ठाऊकच आहे. गणेश मूर्तीपेक्षा मंडळे महत्त्वाची आहेत का? असा प्रश्न सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरूप पाहिल्यानंतर नक्कीच पडतो. त्याआधी झालेल्या दहीकाल्याच्या उत्सवामध्ये तर सतत वृत्तवाहिन्यांतून विविध दहीहंडीच्या ठिकाणी कोणत्या ना कोणत्या स्त्रीचे नृत्य आणि त्याला साथ संगत देणारी विचित्र गाणी दिसत होती. म्हणजेच भगवद्गीतेतून जीवनाचे कर्तव्य सांगणाऱ्या श्रीकृष्णाच्या नावाने अशा पद्धतीचे नेत्रसुखद कार्यक्रम साजरे केलेले दिसतात. त्यानंतर आपण नवरात्रीचा उत्सव साजरा केला.त्यामध्ये असणारा 'गरबा' हा नृत्यप्रकार हा मूळतः गुजरातमधील शेतकऱ्यांचा पारंपरिक नृत्यप्रकार आहे. परंतु सध्या आपल्याकडे त्या गरब्याचे केलेले आधुनिक उद्वातीकरण हा त्या संस्कृतीला दिलेला छेदच आहे. महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने 'भोंडला' हा पारंपरिक खेळ खेळण्याची परंपरा आहे. परंतु सध्याची तरुणाई या परंपरेकडे पूर्णतः दुर्लक्ष करीत आहे. विपर्यासामागची काही मुख्य कारणे म्हणजे आपल्या संस्कृतीविषयीचा असलेला दुराभिमान, आपल्या संस्कृतीचे नसलेले ज्ञान व आपणच आपल्या संस्कृतीचे कमी करत असलेले अनुकरण. अशाप्रकारे भारतीय संस्कृती, परंपरा यांचा आज विपर्यास होताना आपल्याला दिसतो आहे.



अस्मिता शेरखाने (अकरावी विज्ञान)



# स्वातंत्र्याचा तळपता सूर्य

**पर्णवी प्रभुदेसाई** (११ वी कला)

भारतभूच्या पवित्र मंदिरी जन्मास आला
एक वीरपुत्र....
तीच भारत भूमी स्वतंत्र करण्याची त्याने हाती
घेतली सर्व सूत्र....
ज्यांच्यासमोर इंग्रजांनीही टेकला
माथा....
अशी या महामानवाची स्वातंत्र्याची पवित्र
गाथा....
खळाळत्या पाण्यातही ज्यांनी मातृभूमीसाठी
देह वाहिला....
त्यांच्या झेप घेण्याने तो अथांग महासागरसुद्धा
पावन झाला....
मातृभूमीच्या ओढीने तो सागरसुद्धा
तळमळला....
आणि त्याचवेळी इंग्रजांच्या अंगणात भारतीयांचा
सूर्य तळपला....
ज्यांच्या जन्माने धन्य झाले स्वतः राधाबाई आणि
दामोदर....
असा हा भारतभूचा तळपता सूर्य म्हणजे
विनायक दामोदर सावरकर....

# माणसातील देव

**आर्या बोरकर** (११ वी विज्ञान)

आपण प्रत्येक जण देवाची पूजा करतो. देवाची आराधना करतो. आपण देवाकडे प्रार्थना करतो. आपले मागणे मागतो. आपण देवाला देवघरात, मंदिरात, मूर्तीत शोधत असतो; पण देव केवळ देवळात किंवा मूर्तीत नसतो.मग देव असतो कुठे? तर तो असतो माणसात, माणसाच्या मनात. आपण देवाला बाहेर शोधत असतो; पण माणसाच्या आतल्या देवाला शोधण्याचा प्रयत्न करत नाही. आपण माणसातल्या देवाला ओळखलं पाहिजे.



आता हेच पाहा ना! आपण देवाच्या दर्शनासाठी दोन -दोन, तीन-तीन तास रांगेमध्ये उभे राहतो. जर कोणी वृद्ध व्यक्ती रांग सोडून पुढे जात असेल तर आपण त्यांना त्यांच्या वयाचा विचार न करता अडवतो. सण-उत्सवप्रसंगी आपण स्वतःसाठी, कुटुंबातील व्यक्तींसाठी हजारो रुपयांचे नवनवीन कपडे घेतो आणि आपले वापरलेले टाकाऊ कपडे गरिबांना देतो. एवढेच कशाला? हॉटेलमध्ये गेल्यानंतर तिथल्या वेटरला शंभर-दोनशे रुपये टीप म्हणून देतो; पण रस्त्यावर बसलेल्या अंध-अपंग व्यक्तींना एक- दोन रुपये देऊन पुढे जातो. आपण असे वागतो कारण आपण माणसांची किंमत करत नाही. माणसामाणसांमध्ये भेदभाव करतो. केवळ स्वतः पुरताच विचार करतो. आपण स्वतःच्या पलीकडे पाहायला शिकलं पाहिजे. गरजवंतांना आपल्याला शक्य असेल तेवढी मदत केली पाहिजे, कारण त्यांच्या आशीर्वादामध्ये ईश्वराच्या आशीर्वादाएवढी ताकद असते.

समाजामध्ये अशी अनेक माणसं आहेत जी दररोज सकाळ-संध्याकाळ देवाची पूजाअर्चा करतात. मंत्रजप करतात; पण भले ते कितीही श्रीमंत असोत, गरजवंतांच्या मदतीसाठी त्यांचा हात कधीच पुढे येत नाही. ते वृद्ध माणसांचा, गोर-गरिबांचा मान ठेवत नाहीत. त्यांच्या मनामध्ये दुसऱ्यांच्या दुःखाबद्दल संवेदनशीलता नसते. ते केवळ स्वतःच्याच फायद्याचा विचार करतात. जरी त्यामध्ये दुसऱ्याचे नुकसान असले तरी त्यांना काहीही फरक पडत नाही; पण समाजामध्ये अशीही काही माणसे आहेत जी स्वतःबरोबरच इतरांचाही विचार करतात. आपल्यामुळे इतरांचे नुकसान होणार नाही याची नेहमी काळजी घेतात. वृद्धांचा मान ठेवतात. गोर-गरिबांचा कधीही अनादर करीत नाहीत. गरजू व्यक्तींना तसेच संकटात असणाऱ्यांना स्वतःला शक्य असेल तेवढी मदत करतात. जरी ते आर्थिकदृष्ट्या सक्षम नसले तरी मदतीसाठी त्यांचा हात नेहमी पुढे असतो. अशीच माणसे नेहमी गोर-गरिबांचा, गरजवंतांचा, थोरा-मोठ्यांचा आशीर्वाद मिळवतात आणि हाच असतो माणसातल्या देवाची पूजा करून मिळवलेला खरा आशीर्वाद!



**रिझा सोलकर (अकरावी विज्ञान)**



कासीम बुड्ये (बारावी वाणिज्य)

# एकटेपण

कस्तुरी घुमे (११ वी विज्ञान)

लाखोंच्या गर्दीतुन जरा बाजुला झाले
स्वतःत स्वतःला शोधू लागले
जरा विसावा भेटला या जीवाला,
म्हटलं हे चांगलय
मलासुद्धा हे एकटेपण आवडायला लागलयं

नको ते जगाला समजून घेणं
नको ते कोणावर रुसणं रागावणं
सोडून देऊन सगळ्या चिंता,
शांततेतल सुख आता मला उमगलय
मलासुद्धा हे एकटेपण आवडायला लागलयं



इंटरनेटच्या जगातून थोड लांब जावसं वाटत
मनमोकळ भरभरून जगावस वाटत
स्वःत स्वतःला शोधता शोधता ,
स्वतःत आनंदी राहणं आता जमलय
मलासुद्धा हे एकटेपण आवडायला लागलयं

भल्या मोठ्या आकाशात उंच उडायचंय
स्वबळावर खूप मोठ्ठं व्हायचंय
एकटेपण आणि माझं आता
चांगलच जुळलय
मलासुद्धा हे एकटेपण आवडायला
लागलयं

# वस्तू

लावण्या नार्वेकर (११ वी विज्ञान)



वस्तू फक्त एक वस्तूच नसते
हे विसरून चालणार नाही,
वस्तूलाही मन असेल हे
मनाला कधी कळणार नाही.

वस्तू असतात कधीतरी निरुपयोगी
म्हणून काय त्यांना फेकून द्यायचे नसते,
फक्त घराच्याच नाही तर
आठवणींच्या कोपऱ्यात त्यांना साठवायचे
असते.

वस्तूंनाही असेल का मन आणि भावना
याचा शोध नक्कीच घ्यायला हवा,
कशाही असतील त्या मोडक्या-तोडक्या
पण आपणही त्यांना आसरा द्यायला हवा.

कधीकधी ही मोडकी-तोडकी,
निरुपयोगी वस्तूच उपयोगाला येते,
काहीही म्हणा पण तेव्हाच आपल्याला
त्यांची खरी किंमत उमगते.

# वामन असा अवतरावा!

**निरंजन सावरे** (१२ वी विज्ञान)

ही कहाणी आहे आधुनिक काळातल्या एका भयाण घटनेची..! विक्रम सिंघानिया नावाच्या प्रसिद्ध आणि सर्वात श्रीमंत उद्योजकाच्या बाबतीत घडलेली ही घटना. विक्रम सिंघानिया हा फक्त एक उद्योजक म्हणूनच नाही, तर एक बुद्धिमान शास्त्रज्ञ म्हणूनही प्रसिद्ध होता. त्याच्या ह्या बुद्धिमत्तेच्या जोरावरच त्याने 'कार्गोटेक' ला अढळस्थान प्राप्त करून दिले होते. कार्गोटेक ही एक नामांकित तंत्रज्ञान कंपनी होती, जिने कम्प्युटर, रोबोटिक्स आणि ए.आय. या सर्व क्षेत्रांमध्ये स्वतःच वर्चस्व प्रस्थापित केलं होतं. अगदी सर्वसामान्य लोकांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचावे, हे एकच उद्दिष्ट विक्रम समोर होतं. विक्रमने विकसित केलेलं तंत्रज्ञान एवढं खोलवर रुजलं की त्याचा फायदा प्रत्येकाला होत होता.

सिंघानिया कुटुंब प्रतिष्ठित कुटुंब म्हणून ओळखलं जात असे. क्रिती ही विक्रमची पत्नी आणि आर्यन व विवेक हे त्याचे दोन मुलगे. आर्यन हा विवेकचा मोठा भाऊ. विक्रमची आई लवकर गेल्याने राजेंद्र सिंघानिया म्हणजेच विक्रमचे वडील हीच घरातली ज्येष्ठ व्यक्ती होती. विक्रमचे हे पाच जणांचं कुटुंब फार आनंदी होतं. खरंतर त्यांचे सर्वांशीच चांगले संबंध होते. एके दिवशी, विक्रम कुटुंबासह एका कार्यक्रमाला गेला होता. सिंघानिया परिवाराने उपस्थिती दर्शविल्याने सर्व नातेवाईकांच्या नजरा त्यांच्यावरच होत्या. विक्रम सिंघानिया सारखं भारदस्त व्यक्तिमत्व आपल्या आजूबाजूला आहे, यामुळे सर्वजण भारावून गेले होते. प्रत्येक जण त्यांच्याशी ओळख करून घेण्याच्या प्रयत्नात होते. जवळचे लोक कोणती तरी नाती काढून व बाकीचे लोक ग्राहक म्हणून विक्रमशी ओळख करून घेत. विक्रम एक हुशार शास्त्रज्ञ व यशस्वी उद्योजक असल्याने ओळख करून घेण्यास आलेल्या प्रत्येक माणसाला आवर्जून प्रश्न विचारायचा. 'तुम्ही वापरताय त्या यंत्रणेमध्ये काही सुधारणा हवी आहे का?', 'तुम्हाला यंत्रणा वापरताना काही अडचण तर येत नाही ना? पण भारावून गेलेला प्रत्येक जण विचार न करता सकारात्मक उत्तर देई. हे विक्रमला जाणवलं. घरात आल्यावर सर्वांशी गप्पा मारताना त्याच्या एक गोष्ट लक्षात आली. त्याने ती पाहिली होती, पण तेवढ्या गांभीर्याने त्याकडे पाहिले नव्हते. ही गोष्ट म्हणजे भेटायला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला काही ना काहीतरी आजार होता. क्रितीशी ही गोष्ट बोलल्यावर तिने फार काही ह्यात रस दाखवला नाही. याउलट तिने विक्रमला ह्या सगळ्याचा जास्त विचार न करण्यास सांगितले. क्रिती समोर विक्रमने तिने सांगितलेलं ऐकल्याचं नाटक केलं, पण त्याच्या डोक्यात कुठेतरी हे विचार सुरूच होते. दुसऱ्या दिवशी ऑफिसला जाताना रस्त्यावर त्याला नेहमीपेक्षा जास्त गर्दी जाणवली. पण विक्रमला त्याच्या नवीन रोबोटच्या लॉन्चिंग इव्हेंटला जायचं असल्याने त्याने ह्या गोष्टीकडे फारसं लक्ष दिलं नाही. ती गर्दी होती नोकरी गेलेल्या तरुण वेटर्स, डिलिव्हरी बॉइजची. या तुलनेने स्वस्त व सर्वाधिक कार्यक्षम रोबोट्सनी व्यापाऱ्यांचे लक्ष वेधून घेतल्यामुळे या सर्व हातावर पोट असणाऱ्यांना भूक मारून जगण्याची वेळ आली होती. या सर्वांसमोर अशी परिस्थिती येऊन उभी



ठाकली ज्यावर मात करणं त्या ठोक्याला निव्वळ अशक्य होतं. कारण त्यांचा वैरी होता कायम सोबत असणारा आणि कधीही न संपणारा 'दिवस'....

विक्रमला मात्र त्याच्या या नवीन रोबोने चांगली कमाई करून दिली व ती देखील फार कमी काळात..! त्यामुळे कार्गो टेकचे शेअर्स गगनाला भिडत होते असं म्हणण्यास काही वावगं ठरणार नाही. त्यात दिवसेंदिवस कार्गोटेकच्या नवनवीन उत्पादनांच्या वाढत्या मागणीमुळे विक्रमला मिळणाऱ्या थोड्याशा निवांत वेळेतही घट झाली. बिझनेसच्या कामामध्ये तो एवढा बुडाला की जगात घडणाऱ्या गोष्टींचा त्याला अंदाजही नव्हता. हळूहळू ऑफिस लोडमधून सुटका होत गेली, तसा विक्रमला मोकळा श्वास घ्यायला वेळ मिळाला. असंच एके दिवशी, विक्रम आरामखुर्चीत बसलेला असतो. आर्यन आणि विवेक त्यांनी शिक्षकांनी दिलेल्या विषयावर केलेला प्रोजेक्ट दाखवायला आले. विषय होता 'सध्या घडलेल्या मानवनिर्मित आपत्ती..!' तो प्रोजेक्ट पाहताना त्याने त्यात कात्रण पाहिलं. त्या कात्रणावर विक्रमची नजर खिळून राहिली. त्या कात्रणात तीच बातमी आणि तीच दृश्य होती, जी विक्रमने स्वतःच्या डोळ्यांनी प्रत्यक्षात पाहिली होती. विक्रम स्तब्ध झाला. त्याने दुर्लक्षित केलेले दृश्य एवढं भयाण असेल याची त्याला जरासुद्धा कल्पना नव्हती. विक्रम तसाच उठून वडिलांकडे गेला. खात्री करण्यासाठी त्याने राजेंद्र यांच्याकडून ते कात्रण असणाऱ्या वर्तमानपत्राची तारीख विचारून घेतली. त्या दिवशीच रोबोट लॉन्चिंग होतं, हे त्याच्या लक्षात आलं. तरीही त्याने पेपर काढून पुन्हा एकदा तपासले. पेपरच्या मुख्य पृष्ठावरच रोबो लॉन्चिंगची बातमी व जाहिरात होती. हे सगळं बघताच विक्रम फक्त कोसळायचा बाकी राहिला होता. जेव्हा क्रीतीने विक्रमला अशा अवस्थेत पाहिलं तेव्हा न राहून ती त्याच्या जवळ गेली. 'काय झालं?' विचारताच विक्रमने कात्रण व पेपर तिच्या समोर ठेवला. जेव्हा तिला सगळ्याचा अंदाज आला तेव्हा तिला देखील धक्का बसला. पण स्वतः सावरत तिने विक्रमला शांत करण्याचा प्रयत्न केला. त्याची समजूत घालून त्याला आधार दिला. दुसऱ्या दिवशी विक्रमला टेबलवर ठेवलेला प्रोजेक्ट दिसतो. थोडासा सावरल्याने तो प्रोजेक्ट वाचायला सुरुवात करतो. शालेय जीवनात वावरणाऱ्या मुलांची भाषा किती प्रगल्भ असू शकते याला पण एक मर्यादा असते. आर्यन आणि विवेककडून एवढं प्रतिभावंत लेखन विक्रमला अनपेक्षितच होतं. खूप विचार करूनसुद्धा त्याला ह्याचा उलगडा होत नाही. शेवटी तो आर्यन आणि विवेकला बोलावतो. विचारल्यावर त्याला कळतं की विवेकने ते लिहिलंय. जरा जास्त खोलात जाऊन विक्रम प्रश्न विचारतो तेव्हा विवेकने ए.आय. जनरेटेड डेटा उतरवल्याचे कळते. आर्यनला ही गोष्ट कळल्यावर ह्या ए.आय. वरूनच त्याच्या बाबतीत घडलेला प्रकार विक्रमला सांगतो. क्रीतीने नवीन मिठाईचा खोका फोडलेला असतो. आई आपल्याला हव्या असणाऱ्या प्रमाणात मिठाई देत नसल्याने आर्यन गुपचूप चोरून खायचं ठरवतो. विवेक ए.आय. शी बोलताना ही गोष्ट सांगतो. त्यावर ए.आय. 'चोरी करणे चुकीचं आहे. चोरी हा एक गुन्हा आहे. असं करताना कोणी आढळलं तर एक जागरूक नागरिक म्हणून आपण त्यास अडवलं पाहिजे व न ऐकल्यास त्याला धमकावून, मारून पोलिसांना कळवलं पाहिजे' असा रिपोर्ट जनरेट करून दाखवतो. विवेकला एवढंच कळलं की दादा ऐकला नाही तर आपण मारायचं किंवा आईला सांगून पोलिसांना बोलवायचं. त्याप्रमाणे तो आर्यनला अडवायला जातो. पण आर्यन त्याला न जुमानता खायला पुढे जातो. दादा ऐकत नाही म्हणून विवेक आर्यनला मारतो आणि आईला सांगायला जातो. तेव्हा आर्यनच त्याला अडवतो व खाणार नाही याची खात्री देतो. हे सगळं ऐकून विक्रम जोरजोरात हसायला लागतो. बिचाऱ्या आर्यनचा चेहरा बघून त्याला मिठाई खाण्यास सांगतो. आर्यन आणि विवेक दोघेही गेल्यानंतर विक्रम आवरायला जातो. त्याला सारखा आर्यनने सांगितलेला प्रसंग डोळ्यासमोर उभा राहत असतो. पण अचानक त्याच्या लक्षात येतं की ह्या सगळ्यात विवेकने स्वतःच डोकं वापरलंच नाही, ए.आय. ने दिलेल्या सूचना पाळल्या. हे सर्व फार धोकादायक आहे हे त्याला जाणवतं. आता विक्रमच्या डोक्यात सर्व घडलेल्या गोष्टी समोर असतात. रोबोजच्या वापरांमुळे, आधुनिक यंत्रामुळे माणसांना जडणारे आजार, रोबोटच्या वापराने माणसांच्या नोकऱ्या जाण्याची वाढती संख्या, ए.आय. च्या वापराने आपला मेंदू गमावणारी, कला कौशल्यांवर, गुणांवर स्वतःच बंधने टाकणारी नवीन पिढी या सर्व गोष्टी काही क्षणात त्याच्या डोळ्यासमोरून गेल्या. ह्या सगळ्याचा फार मोठा धक्का विक्रमला बसला. पण ह्या धक्क्यातून एक जाणीव जन्माला आली. विक्रम त्याच दिवशी ऑफिसला गेला व सर्व कर्मचाऱ्यांसमोर हे सगळे मुद्दे मांडले. काहींना हे मुद्दे पटले पण दगडाचं हृदय असणाऱ्यांना ह्याचं काहीच वाटलं नाही. चेअरमन विक्रम असल्याने त्याचा निर्णय हा शेवटचा शब्द होता. विक्रमने फायदा-तोटा न बघता अनेक मानवकेंद्रित निर्णय घेतले. ए.आय. वापरणाऱ्यांवर वयाची अट घातली. वॉरंटी संपलेल्या यंत्रणा परत घेऊन नवीन यंत्रणा विकसित केल्या, ज्यामुळे मानवाच्या आरोग्यास हानी पोहोचणार नाही. अनेक यंत्रणांच्या निर्मितीवर बंधने घातली. विक्रमच्या निर्णयाने मशीन्सचा माणसावरचा अंमल नाहीसा होऊन माणसाच्या हाताखाली यंत्र काम करू लागली.

या एका जाणिवेने माणसाला स्वतःच आरोग्य, मेंदू आणि बऱ्याच अमूल्य गोष्टी परत मिळवून दिल्या, हजारो बेरोजगारांना रोजगार आणि शेकडो उपाशी लोकांना दोन घास मिळवून दिले आणि फुलवलं त्या कातळावर पुन्हा एकदा एक भलं मोठं नंदनवन!



# आमच्या घरचा गणपती

वैदेही वैद्य (११ वी कला)

आमच्या घरी गणरायाचे वेध हरतालिकेला लागतात
दुर्वा, आरास, सजावटीत सगळेच रमून जातात

गणेश चतुर्थीच्या दिवशी पहाट जरा लवकरच होते
सगळ्यांनी कामे वाटून घेतल्याने गप्पांना सवड मिळते

पटापट आंघोळी उरकून सुरू होते बाप्पाची पूजा
प्रार्थना करून, मुलांची सुरु होते दंगामस्ती मजा

सगळ्यांनी एकत्र येऊन मोदक करतानाची मजाच न्यारी
आकारही लहान मोठे, एक दोन आणि तीन पदरी

आरती करुन झाल्यावर मग बसते जेवणाची पंगत.
पोटभर मोदक खाल्ल्यावर पत्यांच्या खेळाला येते रंगत.

रात्री सगळं आवरल्यावर होतं कलागुण दर्शन
कसा वेळ निघुन जातो भरतच नाही मन

बाप्पाचा मुक्काम दिड दिवसांचाच
असल्यामुळे सकाळ जरा घाईत जाते.
अथर्वशीर्ष, जेवण झाल्यावर विसर्जनाची तयारी होते

सगळीजणं एकत्र येऊन बाप्पाला प्रार्थना करतात
चुकलं माकलं माफ कर असा आर्जव मागतात

तल्लीन होऊन, गजर करीत, सगळे धबधब्यावर पोचतो.
मनोभावे आरती करून, बाप्पाला निरोप देतो.

कितीही काही म्हटलं तरी, मन थोडे भरुन येतं
दिड दिवसातली मजा, मस्ती सारं झटकन संपून जातं
घरातली २०-२५ माणसे एकदम दहावर येतात
दिड दिवसातल्या सगळ्या आठवणी मनात घर करतात

गणेशोत्सव दीड, पाच की दहा बाप्पा बघत नाही
डीजे, दंगा अशी भक्ती त्यालाही साहवत नाही

बाप्पा, एकच प्रार्थना आहे, तुझी कृपा अखंड राहुदे
सगळ्यांना सुबुद्धी दे, तुझी सेवा सदैव घडु दे!
(गणपती बाप्पा मोरया)



पूर्वा शिरगांवकर (१२ वी विज्ञान)



# बालपण

आर्या बोरकर (११ वी विज्ञान)

कधी कधी वाटते मनाला
करावासा संवाद स्वतःशी
वाटतात आठवावेसे ते क्षण
साठलेले मनाच्या तळाशी

वाटते आठवावेसे बालपण
खेळ खेळलेले अंगणी
तो भातुकलीचा खेळ
अन् जीवाभावाच्या मैत्रिणी

वाटते आठवावीशी ती मैत्री
जिला ठाऊक नव्हती मोह-
माया
ती होती निखळ -निरागस
नव्हती स्वार्थाची छाया

जरी बसायचो रुसून
प्रेम होते रुसण्यात
होता सर्वांचा आनंद
रुसलेल्याच्या हसण्यात

आमच्या कळत-नकळत
हरवले निरागस बालपण
आज मन येते भरून
आठविता ते गोड क्षण

वाटतात यावेसे ते दिवस
वाटतो तो प्रत्येक क्षण हवा
नकळत मनात येतो विचार
' बालपण देगा देवा '

संभाषणाचा सर्वात वाईट प्रकार म्हणजे वादविवाद.

# छत्रपती शिवाजी महाराज

**लावण्या नार्वेकर** (११ वी विज्ञान)



महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री 'छत्रपती शिवाजी महाराज' हे सतराव्या शतकातील एक महान योद्धे आणि मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. शिवाजी महाराजांनी बलाढ्य मुघल आणि आदिलशाही साम्राज्यांना आव्हान देऊन स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी आपल्या अतुलनीय लष्करी व प्रशासकीय कौशल्य आणि मावळ्यांसमवेत एक स्वतंत्र राज्य उभारले, जे आज मराठा साम्राज्याच्या नावाने ओळखले जाते. शिवाजी महाराजांनी केवळ एक साम्राज्य स्थापन केले नाही, तर त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात एक महत्त्वाचे स्थान निर्माण केले. शिवाजी महाराजांनी अनेक किल्ले जिंकले आणि आपल्या सैन्याची उभारणी केली, ज्यांनी मराठा साम्राज्याच्या संरक्षणासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांनी स्वराज्यासाठी व त्याच्या रक्षणासाठी अष्टप्रधान मंडळाची नेमणूक केली.  शिवाजी महाराजांनी कधीही रयतेवर अन्याय होऊ दिला नाही, सोबतच त्यांनी आपल्या कारकीर्दीत मराठी भाषेला प्रोत्साहन दिले आणि प्रशासकीय भाषेत तिचा वापर सुरू केला. एवढेच नाही तर ६ जून१६७४ रोजी रायगडावर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करण्यात आला ज्यामुळे भारतात 'हिंदवी स्वराज्याची' सुरुवात झाली जी भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना ठरली. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीमुळे व जनतेच्या मनातील ठाम विश्वासामुळे त्यांना 'जाणता राजा' असे संबोधण्यात आले. १७ व्या शतकापासून ते आजही शिवाजी महाराज हे मराठी लोकांच्या अस्मितेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. त्यांच्या कार्यामुळे अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळते आणि आजही त्यांची शिकवण काळाच्या कसोटीवर खरी उतरते. अशा या महान राजाला माझे कोटी कोटी प्रणाम...!!

**आई भवानीचा लेक तो**
**मराठी मातीचा स्वाभिमान होता,**
**झुकला नाही कोणासमोर**
**मराठ्यांचा तो 'जाणता राजा' होता...!!**
**छत्रपती शिवाजी महाराज की जय...!!**



**पूर्वा शिरगांवकर (१२ वी विज्ञान)**

# माझं पहिलं शिबीर

प्रा. रिद्धी हजारे (MCVC डिपार्टमेंट)






पहिल्यांदा घेतली जबाबदारी,
मनात होती थोडीशी तयारी,
थोडं घाबरलेलं, थोडं हसतं मन,
सुरू झालं **NSS** चं नवं प्रवासाचं गान.

सकाळच्या किरणात, ओठांवर हाक,
**NSS ......NSS!** म्हणत सगळ्यांची साद,
डोळ्यांत स्वप्नं, मनात उत्साह,
त्या तरुणाईचा पाहिला मी प्रवाह.

कधी ओरडले त्यांच्यावर थोडं,
कधी हसले मनसोक्त मोठं,
त्यांच्या भल्यासाठी जेव्हा बोलले,
त्यांनी प्रेमानंच माझं ऐकले.

गावाची वाट, पावसाचा सुगंध,
एकत्र चाललो सगळे आनंदबंध,
कामं करताना हास्य उमटलं,
थकले शरीर तरी मन कधी न थांबलं.

संध्याकाळच्या गप्पा, गाण्यांचा रंग,
ताऱ्यांखाली आठवणींचा संग,
प्रत्येक दिवस सोन्यासारखा झाला,
मनात नवा प्रकाश उजळला.

शिबिर संपलं, पण मन नाही शांत,
त्यांच्यावाचून दिवस थोडे निवांत.
त्यांची आठवण आली की हसू येतं,
आणि नकळत डोळ्यात पाणी दाटतं.

**Not Me But You -** अर्थ कळला खरा,
सेवेचा मार्गच आनंदमय सारा.
त्या क्षणांचं सोनं मनात झळकतं,
माझं पहिलं शिबिर चांदण्यात चमकतं.

# गणपती

**स्वरदा केळकर** (१२ वी कला)



**गौरी फुटक (अकरावी वाणिज्य)**

वर्षभरात होणारे सगळेच सण आनंद देऊन जातात. पण विशेष उत्साह, आनंद देणारा सण म्हणजे गणपती ..!! यावर्षी आलेल्या गणपतींच विसर्जन होण्याच्या आधीच पुढच्या वर्षी गणपती कधी येणारेत हे बघितलं जात. एवढंच कशाला घरात नवीन वर्षाच कॅलेंडर आलं की त्यात बाकी सगळ्या सुट्ट्या बघायच्या सोडून आधी गणपती कधी येणारेत,किती दिवस आहेत हे बघितलं जातं.. वर्षभर अगदी आतुरतेने बाप्पा कधी येणार याची वाट पाहिली जाते. गणपतीचे दिवस जसे जसे जवळ येतात,तसा प्रत्येक व्यक्तीच्या अंगात एक उत्साह संचारतो. मग ती व्यक्ती एक लहान मुल असो नाहीतर वृद्ध व्यक्ती असो. गणपतीच्या सुट्ट्या लागायच्या आधी घरापासून लांब राहणाऱ्या व्यक्ती फक्त शरीराने कामाच्या ठिकाणी असतात आणि मनाने घरी पोहोचलेल्या देखील असतात..

काय तो गणपती येणार याचा आनंद.सगळीकडे नुसती लगबग घाई गडबड सुरू होते.. हरितालिकेच्या पूजेसाठी लागणारी पत्री काढायची, त्यासाठी फुलांच्या परड्या घेऊन पत्रीसाठी सगळीकडे फिरायचं... यात पण एक वेगळीच मजा असते. हरितालिकेच्या दिवशी नवरा चांगला मिळावा यासाठी केलेला उपवास.. आणि मग संध्याकाळी गणपती आणण्याची लगबग. गणपतीत असणारा अत्यावश्यक भाग म्हणजे सजावट..!!! जी कधीच लवकर पूर्ण होत नाही, बहुतेक ती गणपतीच्या आदल्या रात्री उशिरा जागून पूर्ण झाल्याशिवाय ती पूर्ण झाल्याचा आनंद मिळत नसावा..

ज्या दिवसाची अगदी सगळीजण वाट बघतात तो दिवस म्हणजे गणेश चतुर्थी..!! बाप्पाची षोडशोपचार पूजा, आवर्तनं,आरत्या हा माहोलच वेगळा असतो. त्या दिवशी बाप्पाच्या नैवेद्यासाठी केलेल्या मोदकांची चव वर्षभरात खाल्लेल्या कुठल्याही मोदकाला नसते.. गणपतीत रात्री होणाऱ्या आरत्यांची मजाच वेगळी. आरत्या म्हणताना थोडासा गोंधळ उडाल्याशिवाय त्याही झाल्यासारख्या वाटत नाहीत.. त्यानंतर होणार भजन म्हणजे निव्वळ सुख..!! गणपतीच्या दिवसांत सगळ्यांनी एकत्र मिळून मारलेल्या गप्पा,खेळलेले पत्ते हे सगळंच न विसरता येण्यासारख असत..

मला स्वतःला असं वाटतं की, गणपती म्हणजे असा सण आहे ज्यातील एक एक दिवसांत वर्षभर आनंदात जगण्याचं औषध आहे. हेच दिवस पटकन कधी निघून जातात कळतसुद्धा नाही. अखेर नको वाटत असलेला दिवस येऊन ठेपतो तो बाप्पाच्या विसर्जनाचा.. पाणावलेल्या डोळ्यांनी सगळेच 'पुढल्या वर्षी लवकर या' म्हणत बाप्पाला निरोप देतात.. गणपतीसाठी भरलेलं, गजबजलेलं घर शांत होऊन जात.

**।।भरल्या डोळ्या निरोप द्यावा भादव्यात तुम्ही नक्की या।।**



**राधा गझने (१२ वी विज्ञान)**

# पहिलं प्रेम

**कुणाल गझने** (१२ वी कला)

कळलं नव्हतं मला,
कधी आणि कसं झालं हे;
मनात माझ्या हळूच,
तुझं घर कसं झालं हे!
भेट आपली झाली
जणू नशिबाचा खेळ,
नजरेत तुझ्या पाहिलं
आणि थांबला वेळ.

माझ्या स्वप्नांच्या गावी,
तूच होतीस राजकन्या;
हृदयाच्या या पानावर,
तुझंच होतं चित्र हसऱ्या वदना.
हातात हात घेऊन
चालायची एक इच्छा,
प्रत्येक गुपित तुझ्यासोबत
करायची होती चर्चा.

शब्दांवाचून कळल्या
कितीतरी भावना गोड,
पहिल्या प्रेमाची ही नशा
होती थोडी आणि अनोड.
आजही आठवतो तो क्षण,
जेव्हा तुझी ओढ कळली;
आयुष्याच्या पुस्तकात,
गोड अशी सुरुवात झाली.





# एक तूच रे

**सानिया शिरवाडकर** (१२ वी कला)

डोळ्यात त्याच्या मज जग दिसते,
तो हासतो तेव्हा मज सुख लाभते.
चेहरा त्याचा हसरा जणू हिऱ्यासारखा,
अनमोल आहेस तू माझ्यासाठी
कोहिनूरसारखा.
वेड लागले मज प्रेमाचे तुझ्या,
कस सांगू मी तुज वेड्या मनाची
गाथा.
वाटेल तुज वेडेपणा हा सगळा,
पण हिच आहे माझ्या वेड्या मनाची
गाथा.
गुंतूनी तुझ्यात मी आज विसरले मज रे,
आता तूच माझं जग रे.
असतील तुझ्याकडे माझ्यासारखे बरेच रे,
पण माझ्या कडे एक तूच रे...



**ज्ञानदा काटकर (११वी विज्ञान)**

# आयकार्ड एक ओळख

**प्रा. सुप्रिया टोळ्ये** (अर्थशास्त्र विभाग)



नमस्कार, काही दिवसांपूर्वी 'आता थांबायचं नाय' हा मराठी चित्रपट मी पाहिला. खरं तर अर्थशास्त्रातील 'जाहिरात' या मागणी निर्धारित करणाऱ्या घटकाचा परिणाम माझ्या या चित्रपट पाहण्याच्या मागणीला कारणीभूत ठरला. कारण या चित्रपटाचे प्रोमोज इतके वेळा दाखवले गेले की न राहवून मी हा चित्रपट पाहायचं ठरवलं. चित्रपट बघण्यासारखाच आहे. यातला एक सीन मला खूप भावला आणि म्हणूनच हा लेखनप्रपंच!

मुळात हा चित्रपट मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत काम करणाऱ्या सफाई कामगारांवर आधारित आहे. या सफाई कामगारांनी दहावी पास व्हावं यासाठी तेथील आयुक्तांनी केलेले प्रयत्न आणि त्यांना मिळालेलं यश – या आशयाभोवती संपूर्ण कथानक फिरतं. त्यातलाच एक सीन असा आहे की सफाई कामगार एकत्र येऊन ड्रेनेज पाईप साफ करणं सोपं कसं होईल यासंदर्भात आराखडा तयार करतात आणि तो आयुक्तांपुढे मांडतात. आयुक्तांना ती कल्पना पटते.




या सगळ्याची पाहणी करण्यासाठी एक विदेशी कमिटी येणार असते. कामगारांचं तोडफोडक इंग्रजी आणि मध्येच मराठी असे टक्केटोणपे खात ती कमिटी कामगारांचं म्हणणं ऐकून घेते, समजून घेते. त्यांना कामगारांची कल्पना पटते, रुचते. कमिटी या कामगारांसोबत एक फोटो काढण्याचा आग्रह धरते. त्यावेळी सगळ्या कामगारांचे हात अक्षरशः स्प्रिंगसारखे आपल्या खिशात असलेल्या आयकार्डकडे जातात. ते आयकार्ड ते गळ्यात घालतात आणि मग फोटो काढतात.

तेव्हा माझ्या मनात आलं की – अरे, या कामगारांनी एवढ्या लगबगीने आपलं आयकार्ड गळ्यात का बरं घातलं असेल? या आयकार्डवर असं त्यांचं कोणतं मोठं पद आहे, ज्यामुळे अभिमान वाटावा?

तेव्हा जाणवलं – तो अभिमान, प्रेम किंवा आदर हा स्वतःच्या पदाचा नव्हता; तर आपल्या कामाप्रती असणाऱ्या निष्ठेचा होता. आपल्या संस्थेच्या मोठेपणाचा होता.

आपण जेव्हा कोणतंही आयकार्ड गळ्यात घालतो, तेव्हा माझं पद ही ओळख फारशी विचारात न घेता – मी या संस्थेचा एक घटक आहे, मग छोटासा का असेना! – असा विचार करतो. हा एखाद्या संस्थेचं मोठं यश असतं.

प्रत्येकानं आयकार्ड गळ्यात घालताना – मी किंवा माझं काम भले अत्यंत नगण्य असेल, पण माझ्या संस्थेने उचललेलं पाऊल समाजाला, पर्यायाने देशाला दिशा देणारं आहे – असा विचार केला पाहिजे.

मी जे आयकार्ड घालत आहे, ते आयकार्ड मिळवण्यासाठी भलेभले तरसतात; आणि मला ते अतिशय कमी कष्टांत मिळालं आहे – हे ज्याला कळलं, तोच खरा निष्ठावंत. आयकार्ड म्हणजे देखावा, मोठेपणा नव्हे; तर जबाबदारी आहे. याची जाणीव आपण सगळ्यांनी ठेवायला हवी.

आपल्या पदाला, वयाला आणि अनुभवाला साजेशी जबाबदारी आपल्यावर पडते. ती प्रामाणिकपणे निभावली पाहिजे. मग भले कधीकधी अपयशी पदरी पडेल – पडू दे! पण आयकार्डवरील निष्ठा मात्र ढळू द्यायची नाही.

जेव्हा-जेव्हा कामाचा त्रास होईल, राग येईल, तेव्हा त्यांना आठवा – जे तुमच्या गळ्यात असणाऱ्या या आयकार्डसारखं आयकार्ड मिळवण्यासाठी जीवतोड प्रयत्न करत आहेत.

जसं आपल्या आयकार्डला भौतिक स्वरूपात एक सुरक्षित जागा दिलेली असते – स्त्रियांच्या पर्समध्ये किंवा घरातील ड्रॉवरमध्ये – तसंच त्याचं स्थान आपल्या मनातही सुरक्षित ठेवूया. मग कामाने त्रस्त न होता आपण त्या कामात रममाण होऊ.

आणखी एक – प्रत्येक आयकार्डधारकाचा, मग तो वरिष्ठ असो वा कनिष्ठ, आपल्या क्षेत्रातील असो वा इतर क्षेत्रातील – सन्मान करूया. आणि आपल्या ज्युनिअर्सचं आयकार्ड जपण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या नाही जमलं तरी नैतिकदृष्ट्या का असेना पण प्रयत्न करूया.

सगळ्यांची आयकार्डे अबाधित गळ्यात राहोत – या सदिच्छांसह थांबते. धन्यवाद!

# जीवन

**प्रणव हातिसकर** (११ वी वाणिज्य)

सकाळचा श्वास, ताजातवाना,
आशांनी भरलेला सारा जमाना ।
जीवन असतं असच छोटं,
क्षणाक्षणात शोधायचं मोठं ।

जीवन म्हणजे प्रवास अखंड,
कधी ऊन, कधी सावली मंद ।
प्रत्येक दिवस नवा असतो,
नव्या वाटेवरचा ध्यास असतो ।

आशेच्या रंगांनी रंगवूया जीवन,
काळोखातही शोधूया आशेचे किरण ।
हरवलेला क्षण पुन्हा सापडेल,
जर मनामध्ये विश्वास असेल ।

संघर्षाचं पाणी जेव्हा वाहतं,
त्यातूनच जीवन फुलतं ।
अंधार झाला तर घाबरू नको,
चांदणे नेहमीच उगवतं ।




# NSS एक हक्काचं घर

**पर्णवी प्रभुदेसाई** (११ वी कला)

पहिलंच वर्ष असूनसुद्धा
सगळ्यांनी आपलंस केलं...
NSS च्या घरात जाऊन
नवं भावकीचं कुटुंब मिळालं...

सगळे एकत्र येऊन आम्ही
अनमोल क्षण अनुभवतो...
भावकी एकत्र आली की
अख्खा दिवस आनंदी जातो...

अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या
या कुटुंबात आल्यावर...
शिस्त म्हणजे नेमकं काय
हे कळलं मनावर संस्कार झाल्यावर...

आम्हा मुलांचे पालकत्व स्विकारून
सर आमचे लाड करतात...
पण आम्हाला ओरडल्यावर
त्यांचेच डोळे भरून येतात...

कोणीही उपाशी असलं तरी
ताई दादा लगेच घास भरवतात...
माया करणारे ताई दादा मिळायला
देवाचे आशीर्वादच पाठीशी लागतात...

एकदा का NSS च्या घरात पाउल पडलं
की मनाला खूप समाधान मिळते...
एकमेकांचे हात हाती घेतले की
सुखाचे अंगण भरून जाते...



विश्वास ठेवा चुकीतूनही चांगले निष्पन्न होते.

# जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती

**स्वानंदी शेंबवणेकर** (११ वी वाणिज्य)



**।। मागणे ते आम्हा नाही हो कोणासि**
**आठवावे संतांसी हेची खरे ।।**

भारत ही संतांची भूमी आहे. संत म्हणजे सत्पुरुष. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती पर उपकारे' ,अशी खरी संतांची भूमिका आहे. संतांनी समाजप्रबोधन, समाजकल्याण याकडे विशेष लक्ष दिले. स्वतःसाठी काहीही न मागता सामान्य माणसांसाठीच सगळे संत आयुष्यभर झटले. बुडतां हे जन न देखवे डोळां येतो कळवळा म्हणऊनी, यासाठी संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत कबीर आणि वारकरी संप्रदायातील सर्व संत आपल्या साहित्यातून उत्कृष्ट शिकवण देऊन आपल्याला विश्वबंधुत्वाकडेच नेतात! भारतात लहानपणापासूनच आपल्याला बंधुत्वाची शिकवण दिली जाते. एवढंच काय अगदी आपल्या संविधानात देखील बंधुत्व आहे. आपल्या संस्कृतीमध्ये बंधुत्व आहे. तसंच आता आपल्याला विश्वबंधुत्व साध्य करायचं आहे!! आणि हे आपल्या संस्कृतीच्या मुळांमध्येच घट्ट रुजलेलं आहे. संतांनी खूप उदात्त विचार आपल्यासमोर मांडले.गरज आहे ते फक्त आपण जाणून घेण्याची.

संत ज्ञानेश्वरांनी वयाच्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली, ही काही सोपी गोष्ट नाही. याच ज्ञानेश्वरीमध्ये पसायदान आहे. ज्ञानेश्वरांनी पसायदानात म्हटले आहे,

**दुरितांचे तिमिर जावो ।**
**विश्वस्वधर्मे सूर्ये पाहो।**
**जो जे वांछील तो ते लाहो प्राणिजात।।**

माणसाने आपल्या मनातील दुष्टावा नाहीसा केला पाहिजे. दुरित म्हणजे दुष्कर्म. या जगातून दुष्कर्माचा अंधार नाहीसा होऊ दे. ज्याला जे जे हवे ते ते मिळू दे अशी विश्वकल्याणाची प्रार्थना त्यांनी केली. त्याप्रमाणे निसर्गातील सर्व घटक एकोप्याने राहतात; त्याप्रमाणे माणसांनीही एकत्र 'गुण्यागोविंदाने'रहावे अशी शिकवण ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानातून दिली. त्यांनी तेव्हा दिलेली शिकवण ही आजच्या काळात खूप गरजेची आहे.

आता लांब कशाला जाता अगदी आपलं कॉलेज ते जागतिक संघटना प्रत्येक ठिकाणी आपल्याला "Group" ही संकल्पना पाहायला मिळते. इथूनच सुरुवात होते. आपण सगळ्यांना सामावून घेऊन कोणतंही काम करायला हवं. एकतेने राहायला हवं. तरंच विश्वबंधुत्व साध्य करता येईल.

समर्थ रामदास तर दासबोधातून खूप चांगल्या गोष्टी अगदी साध्या आणि मोजक्याच शब्दात सांगताना दिसतात. त्यातल्या दुसऱ्या समासात त्यांनी आदर्शत्वाची संकल्पना मांडताना 'काय करावे ' व 'काय करू नये' याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले आहे. यामध्ये कोणाचे उपकार घेऊ नयेत, आळशीपणा करू नये, असत्याच्या मार्गाला जाऊ नये, नुसतीच निरर्थक बडबड न करता कृती करावी अशा अनेक रोजच्या जीवनातल्या छोट्या पण महत्त्वाच्या गोष्टी समर्थांनी शिकवल्या. समर्थांनी दैनंदिन जीवनाबद्दल केलेलं मार्गदर्शन आजच्या युगात खूप महत्त्वाचं आहे. आज भ्रष्टाचार, चोरी,अत्याचार यांचं प्रमाण किती वाढलंय जगात!! समर्थांची शिकवण प्रत्येकाने नीट अभ्यासून अमलात आणली तर चांगलं आचरण करून विश्वबंधुत्वाकडे जाण्यासाठी आपण अजून एका पायरीवर चढू!

**अहंकाराचा वारा न लागो राजसां ।**
**माझ्या विष्णुदासां भाविकांसी।।**

संत नामदेवांनी या चरणातून नम्रतेची शिकवण दिली आहे. माणसाला कधीही अहंकार होता कामा नये. एकदा अहंकार आला तर माणूस यशस्वी होत नाही. आपल्याला जीवनात यशस्वी व्हायचं असेल तर नम्रपणा अंगी असायलाच हवा. नामदेवांनी दिलेली शिकवण समजायला सोपी पण अमलात आणायला फार कठीण आहे. म्हणजे बघा ना प्रत्येकातच थोडाफार अहंभाव असतो. जे षड्रिपू आहेत त्याला कोणीही माणूस चुकलेला नाही. पण तरीही आपण जमिनीवर राहायचा प्रयत्न करायला हवा. नम्रतेने आपण अनेक गोष्टी साध्य करू शकतो. अनेक लोकांना जोडू शकतो. विश्वबंधुत्व साकारण्यासाठी हेच तर महत्त्वाचं आहे ना!

संत एकनाथांनी

**'सर्वांभूती भगवद्भावो।**
**हा चि निजभक्तीचा ठावो।।'**

असे लिहीले आहे. माणसा माणसांमध्ये मैत्री असली की विश्व आनंदाने राहू शकते. मैत्री म्हणजे दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानणे आणि दुःखात त्याला धीर देणे. मनात कोणतीही अढी न ठेवता निःस्वार्थपणे मैत्री करावी अशी शिकवण एकनाथांनी दिली. पण एकनाथांनी सांगितल्याप्रमाणे आज वागतोय कुठे आपण? आजच बघा ना शेजारच्याने नवीन गाडी घेतली तर तोंडावर आपण छान म्हणतो पण खरंच त्याच्या आनंदात आपण किती आनंदी असतो? हेच त्याच्याकडे जर चोरी झाली तर लगेच आपण बघायला जातो. आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील हेच आहे. कुठलंही राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राच्या प्रगतीत तेवढ्या उत्साहाने सामील होत नाही. त्यामुळे एकनाथांची ही शिकवण आपल्याला विश्वबंधुत्वाच्या जवळ घेऊन जाते.

संत गाडगेबाबांनी प्रामुख्याने कृतीवर भर दिला. सगळ्यांनी शिकून समृद्ध व्हावे हे त्यांचे ध्येय होते.

**।।नको धर्मकृत्ये पैसा खर्चूनिया**
**घेण्यासाठी विद्या तोच खर्चा।।**

धर्मकृत्यांवर पैसा खर्च करण्यापेक्षा त्याच पैशात शिक्षण घ्या. सुसंस्कृत व्हा. माणसं जोडा अशी शिकवण त्यांनी दिली. गाडगेबाबांच्या या शिकवणीमुळे राष्ट्र प्रगती होईल. सगळेच सुसंस्कृत, सुशिक्षित झाले तर अर्थातच चांगला विचार ,आचार करतील. त्यामुळे तर विश्वबंधुत्व अगदी सहज साध्य होईल.

विविध संतांकडून आपल्याला चांगल्याच शिकवणी मिळाल्या. लहानपणी आपण ह्याच संतांच्या कथाही ऐकलेल्या आहेत. त्यांची दूरदृष्टी किती उत्तम आहे याची प्रचिती आता तुम्हाला आलीच असेल. जरी कोणत्याही शाळेत गेले नसले तरी विचार ,अध्यात्म आणि जगायला उपयोगी पडणारी तत्त्व याचं ज्ञान त्यांना फार उत्तम होतं. आपण फार कोणी मोठे नसून सामान्यांसारखेच आहोत ही भावना त्यांच्यात होती, बंधुभाव त्यांच्यात होता. दुर्दैवानं आपली अवस्था त्या कस्तुरीमृगासारखी आहे. आपल्याकडे आधीपासून आहे ते सोडून आपण उगाच मोठ्या मोठ्या Theories चा अभ्यास करायला जातो. मुळात बाराव्या तेराव्या शतकातच आपल्या संतांनी बंधुत्वाची शिकवण दिलीच की, मग तरीही आज एकविसाव्या शतकात आपण विश्वबंधुत्व का नाही साध्य करू शकलो आहोत? अजूनही आपण विश्वबंधुत्वाकडे वाटचालच का करतोय?

तर याला अनेक कारणं आहेत. मुळात जगात अनेक राष्ट्र आहेत. ह्या राष्ट्राराष्ट्रांमध्ये अंतर्गत अनेक वाद आहेत . आज दहशतवाद, हिंसा यांचे प्रमाण वाढलंय. यामुळे जगात शांतता राहत नाहीये. प्रत्येकालाच सगळं हवंय,प्रत्येकाला सरस ठरायचंय. ह्या स्पर्धेच्या जगात आज कुठेतरी माणुसकीचं प्रमाण कमी होतंय. त्यामुळेच बंधुत्व साध्य करता येत नाहीये. मग यावर उपाय काय?

पूर्वीच्या काळचा धागा आत्ताच्या जगाशी जोडणे. संतांच्या शिकवणीचा आधार घेऊन त्याप्रमाणे आचरण करणं हा त्यावरचा उपाय. जरी विज्ञानयुग असलं तरी संतांचे महान विचारच राष्ट्राची श्रीमंती वाढवतात. त्यामुळे संतांची शिकवण प्रमाण मानूया, त्याप्रमाणे आचरण करूया, श्रद्धा ठेवूया, विश्वबंधुत्व आपोआप साध्य करता येईल अशी खात्री मला आहे!!

# आभाळमाया...

**मीरा मोरे** (१२ वी विज्ञान)

रात्रीचं आभाळ शांत असतं,
चंद्र दिसता मन प्रसन्न होतं...
आभाळात दूर चंद्र दिसतो,
थंड प्रकाश सगळीकडे पसरतो...
तारे चमकतात आकाशभर,
जणू लहान दिवे लुकलुकतात वर...
ढग येतात आभाळाला पांघरतात,
पण तारे पुन्हा चमकतात...
वाऱ्याची झुळूक हलकी होऊन जाते,
थंड हवा गालावर येते...
रात्रीचं दृश्य खूप छान वाटतं,
मन ही शांत तृप्त वाटतं...
निसर्गाचा हा सुंदर खेळ,
रोजच दिसतो नवा मेळ..




**गौरी ठाकुरदेसाई (११ वी कला)**



**रिझा सोलकर (११ वी विज्ञान)**



**स्मृती पडवळ (११ वी विज्ञान)**

एक मिनिट उशिरा येण्यापेक्षा तीन तास लवकर येणे चांगले.



अस्मिता शेरखाने (११ वी विज्ञान)

# माझी लाडकी

कस्तुरी घुमे (११ वी विज्ञान)



कळत नाही वळत नाही
तिचं आणि माझं नातं जुळता जुळत नाही.....
ती जवळी येता मी लांब होते
मी जवळी जाता ती रुसुन बसते
नेहमी असेच होत राही
तिचं आणि माझं नातं फुलता फुलत नाही.....

साद घातल्या घातल्या कधी कधी ती धावत येते
आणि मी ही तिच्यात गुरफटून जाते.....
कधी कधी काही केल्या ती येत नाही
आणि मी ही तिची झुरून वाट पाही
तिचं आणि माझं नाते काही खुलता खुलत नाही
तशी ती रात्रीच भेटते थोडकी
दुसरं - तिसरं कोणी नाही हो
झोप माझी लाडकी....!

# दिवाळी

वैदेही वैद्य (११ वी कला)

सवत्स धेनूचे पूजन करुनी नवं विचार मांडू गोधनाचा ।
धन्वंतरी वर देवो आरोग्यदायी जीवनाचा ।।

वर्तमान नरकासुरांना पराभूत करण्या,
आदर्श श्रीकृष्णाचा ।
लक्ष्मीचे पूजन करुनी तेवत ठेवा,
दीप समृद्धीचा ।।

बलीसम उन्मत्तांचा संहार करण्या,
अवतार व्हावा वामनाचा ।
भाऊ-बहिणीच्या अतूट नात्यासह ।
साजरा करू आनंद दीपावलीचा ।।





अस्मिता शेरखाने (११ वी विज्ञान)

# सूर्यपुत्र

अपूर्वा घेवडे (अकरावी विज्ञान)

।। दुर्वासांच्या 'देवहुती' मंत्राने 'कुंती' मोहित झाली,
भास्कराच्या दिव्य तेजाने जन्मला तो महाभारताचा महारथी।
समाजाच्या भयाने कुंती बेचैन झाली,
कोवळ्या जिवाला पेटीत ठेवून ती पाण्यात सोडली।
पाण्याच्या प्रवाहाने पेटिका चंपानगरीत गेली,
अधिरथ नावाच्या सारथ्याने ती आपलीशी केली।।

।। अधिरथ बाबा आणि राधा मातेच्या पर्णकुटीत,
'कर्ण' आणि 'शोण' धिंगामस्ती करीत।
गंगा मातेच्या काठी पसरलेल्या ओलसर वाळूत,
धावताना कर्णाची निर्भीड चिमुकली पावले उमटली।
आकाशातल्या लुकलुकणाऱ्या तारकांना मोजताना,
बाणासारखे सर्रकन गेले 'बालपण' चंपानगरीत।।

।। युद्धविद्येचं शिक्षण घेण्यासाठी हस्तीनापुरी गेला,
द्रोणांनी 'विद्या' शिकवण्यास विरोध केला ।
विद्या शिकवण्यास 'कृपांनी' कर्णाचा स्वीकार केला ,
हा अपमान पचवून 'कर्ण' युद्ध शाळेत आला।
एका मासात अनेक शस्त्रास्त्रांमध्ये पारंगत झाला,
'धनुर्विद्येत' जास्त रुची होती त्याला।।

।। नित्य पहाटे गंगा किनारी सूर्यदेवांना अर्घ्य देई,
डोळे भरून त्या तेजस्वी कर्णाकडे एकटक पाही ।
हा हा म्हणता वासंतिक पौर्णिमेचा नियोजित दिन उजाडला,
आखाड्यामध्ये चालली होती पांडवांचीच वाहवाह ।
काळीज कापत आत शिरणाऱ्या बाणासारखा आखाड्यात 'कर्ण' घुसला,
प्रत्येक आखाड्यात आपले 'शौर्य' दाखवून निपुण ठरला,
तरीही समाजाने त्याला 'सूतपुत्र' म्हणून हिणवला ।।

।। त्या समयी 'दुर्योधनाने' त्याला आपला मित्र केला,
दुर्योधनामुळे 'कर्ण' अंग देशाचा 'अंगराज' झाला ।
'अश्वत्थामा' तर कर्णाचा कंठमणी बनला,
काहीच दिवसात वृषालीसह कर्णाचा विवाह पार पडला ।
काही काळ कर्णाच्या जीवनात बहर आला,
कारण पुढे कठीण 'प्रहर' होता आला ।।

।। चारी दिशांना दिग्विजय करून परतले 'कर्ण' आणि 'शोण',
कर्णाचा जयजयकार करू लागले सर्व नगरजन ।
कर्णापुढे जग उभं राहिलं तेच मुळी समरांगण,
तरीही कोणत्याही प्रसंगी 'कर्ण' नाही गेला कुणाला शरण ।
येणाऱ्या अतिथीस तृप्त करी देऊन दान,
पण द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या वेळी 'कर्ण' होता मौन ।।
।। ओळखून इंद्राचे सत्य 'जीवन' त्याला दान दिले,
'कवच कुंडल' देऊन अर्जुनाला विजयाचे दान दिले ।
'भीम' आणि 'द्रोणानंतर' एकटाच सर्वात बलवान होता,
जरासंधासारख्या योद्धाला जीवनदान देणारा 'दानवीर' होता ।
'ब्रह्मास्त्र' विद्येसाठी परशुरामांचा शिष्य बनला,
एका अलर्कामुळे त्यांच्या 'श्रापाचा' भागीदार ठरला ।।



।। माता कुंतीला भेटून कर्णाचे 'अश्रू' वाहून गेले,
'सत्य' सांगूनही कुंतीचे पुत्र पाचच राहून गेले ।
मातेच्या चुकीचे फळ आयुष्यभर भोगत राहिला,
'सूर्यपुत्र' असूनही अंधारात जगत राहिला ।
ज्येष्ठ पांडव, महान क्षत्रिय असूनही 'सूतपुत्र' राहिला,
ज्याला 'कौंतेय' व्हायचे होते तो 'राधेय' बनून राहिला ।।

।। युद्ध नियोजन समयी पितामहांनी कर्णाचा अपमान केला,
युद्धामध्ये त्या 'अर्धरथी' म्हणून त्याला घोषित केला ।
हा निर्णय ऐकून कर्ण पितामहांवर क्रोधित झाला,
त्याने भर सभेत ऐक निकराचा पण केला ।
'जेव्हा पितामहांचे युद्धात पतन होईल तेव्हाच रणांगणावर पाय ठेवीन'
हा तो पण होता ।।

।। युद्धामध्ये 'कर्ण' हा धगधगीत अंगार होता,
कौरवसेनेचा जणू तो अंजलीक बाण होता ।

या सूर्यपुत्राच्या
दंडाचे सामर्थ्य कृष्णाने ओळखले होते,
कुरुक्षेत्रात कर्ण बघून पांडवही घाबरले होते ।
भीष्म पडला, द्रोण हरला तरीही दुर्योधन विजयाची आशा धरत होता,
कारण सोबत महारथी,अंगराज कर्ण होता ।।

।। ऋषीमुनींच्या श्रापाने कर्णाच्या रथाचे चक्र भूमीत रुतले,
ऐन वेळप्रसंगी त्याला ब्रह्मास्त्र नाही आठवले।
रथचक्र बाहेर काढण्यास तो रथाखाली उतरला होता,
तोच समय पाहून कृष्णाने अर्जुनास अर्धचंद्राकृती अंजली बाण
सोडण्याचा आदेश दिला होता ।
अर्जुनाचा तो बाण कर्णाच्या कंठात रुतून बसला,
तो महारथी, अंगराज कर्ण रथचक्राजवळ चिखलात कोसळला ।।
।। ऐन मृत्यूच्या दारात असताना याचक तेथे आला,
दगडाने आपले सोनेरी दात पाडून दिले त्याला ।
मृत्यू समक्ष असूनही भिऊन नाही पळाला,
धैर्याने, शौर्याने टक्कर दिली त्या मरणाला ।।



# जीवन देणारी ती

**स्वरा हरचकर** (११ वी वाणिज्य)



थकली आहे आता ती थोडी
पण हार ती मानत नाही
ढगांमागे दडलेल्या सूर्याला
ती रोज पुन्हा जागवत राही

वादळांनी जर पाय घसरले
तर ती डोंगरांना घट्ट धरते
अंधार कितीही वाढला तरी
स्वतः मध्येच प्रकाश भरते



आपल्याला शिकवते ती
लहानसा बदल मोठे रूप घेतो
एक छोटीशी कृतीही
भविष्याचा संपूर्ण मार्ग लिहितो

विश्वासाची रेघ धरून
पाऊल पुढे टाकलं
स्वप्नांच्या आकाशाला
हातातून अलगद पकडलं

किती सोसतेस तू आमुचे ओझे
करतेस माफ चुका हजार
तुझ्यामुळेच उभा आहे आज मी
तू आहेस जीवनाचा आधार



# आपला छंदोत्सव

चिन्मयी खेडेकर (१२ वी कला)

या वर्षी आहे
महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव
आपल्या महाविद्यालयाचा छंदोत्सव
हा आहे भव्य उत्सव!

शोभायात्रेची रंगतच न्यारी
अवघ्या रत्नागिरीत सर्वात भारी
शोभायात्रेसाठी पालखीत विराजमान होतात नटराज
पारंपारिक वेशभूषेत मुलं – मुली नटतात आज!

शोभायात्रेला सुरुवात होते क्रीडांगणात
पोहोचते खातूनाट्यमंदिराच्या प्रांगणात
भासे देवदेवता लावी
हजेरी या समारंभात!

मग होते उद्घाटन सर्व प्रदर्शनांचे
यात असते फूड फेस्ट, चित्र, फोटो आणि रांगोळी
सुवर्ण महोत्सवी महाविद्यालयाच्या
छंदोसवासाठी रचल्यात मी या काही ओळी!

खातूनाट्यमंदिरात छंदोत्सवाची होते मग सुरुवात
सुरुवातीला दिला जातो घंटानाद सन्मान
दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आहे उत्सुकता
या सुवर्ण महोत्सवी वर्षी कोणाला मिळणार हा मान!



मग प्रत्यक्ष छंदोत्सव सुरू होतो
विद्यार्थ्यांच्या कलागुणांना इथे वाव मिळतो
सुरुवात होत आहे फॅन्सी ड्रेस स्पर्धेला
प्रेक्षकांच्या टाळ्यांनी हुरूप येतो कलाकाराला!

पुढील कार्यक्रम आहे
या छंदोत्सवाची शान
शामराव करंडक एकांकिका आहे
रत्नागिरीतील मानाचे पान!

पहिल्या दिवसाचा अंत असतो
दुसऱ्या दिवसाचा आरंभ
छंदोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाच्या
कार्यक्रमांना करू आता प्रारंभ!

दुसऱ्या दिवशी असते
स्पर्धा नृत्य आणि गायनाची
गुंफण असते यात
सुंदर नव्या क्षणांची!

स्पर्धा सगळ्या संपतात
आता वेळ बक्षीस वितरणाची
शेवटी सांगता होते
या अविस्मरणीय सोहळ्याची!






चिंता पाहुणा म्हणून येते आणि लवकरच मालक बनून राहते.




# मालिकांचे विश्व

**चिन्मयी खेडेकर** (१२ वी कला)

हो, तुम्ही बरोबर वाचलंत मालिकेचे विश्व.हेच ते विश्व ज्यात सध्याची नवीन पिढी अडकत चालली आहे. आपल्या टीव्हीवर अनेक प्रकारचे चॅनल लागतात. त्या चॅनलवर वेगवेगळ्या ढंगाच्या मालिका लागतात.



हिंदी आणि मराठी मालिका या प्रेक्षकांच्या आवडत्या असतात. आपल्या महाराष्ट्रात मराठी आणि हिंदी मालिका आवडीने बघितल्या जातात. अनेक रियालिटी शोज जसे की बिग बॉस हा तर अख्ख्या देशभर आवडीने बघितला जाणारा शो आहे. म्हणतात की या कार्यक्रमात लोकांचे खरे रूप/चेहरे बाहेर येतात. हा कार्यक्रम सर्व वयातील लोकांचा आवडता आहे.

वृद्ध व्यक्ती भरपूर देवांच्या मालिका बघतात. जसे की, मराठीतील जय मल्हार, बाळूमामाच्या नावानं चांगभलं, विठू माऊली, आई माझी काळुबाई, स्वामी समर्थ इ. तर हिंदीतील राधाकृष्ण, देवों के देव महादेव, महाभारत, रामायण इ. मालिका बघितल्या जातात.

तारुण्यातील किंवा मध्यम वयातील गृहिणी ह्या मनोरंजक अशा मालिका बघतात. जसे की, लागिर झालं जी, सुख म्हणजे नक्की काय असतं, ये रिश्ता क्या कहलाता है, नागिन इ. मालिका अगदी आवडीने बघतात.

प्रेक्षक या मालिकेच्या कथानकामध्ये काहीतरी रंजक शोधतात. कधी कधी ते स्वतःचे आयुष्य त्या मालिकेशी जोडतात की माझं आयुष्यही असंच या मालिकेतील नायिकेसारखं आहे इ. ते त्या मालिकेच्या विश्वात गुंतून जातात.

मालिका या शक्यतो काल्पनिक असतात. त्यांचा आपल्या वैयक्तिक आयुष्यावर किती प्रभाव होऊ द्यायचा हे ज्याचे त्याने ठरवावे.

**मालिकांचे विश्व**
**वाटते तितके नाही छोटे**
**एकदा लळा लागता त्याचा**
**आयुष्यही वाटे खोटे**

# कोकण

–सानवी केळकर (११ वी वाणिज्य)



पहाटेच्या गारव्यासंगे कोकण होई जागे,
दिनचर्येची सुरुवात होई व्यायामाच्या संगे

कोकण म्हणजे जणू सृष्टी सौंदर्याची खाण,
निळाशार सागर वाढवी आणिक याची शान



खाद्यपदार्थांनी आहे समृद्ध हे कोकण,
कधी खीर, कधी मोदक असे साग्रसंगीत भोजन

साधी सरळ माणसं कोकणी, साधे त्यांचे स्वभाव,
साधे जीवन जगुनही नाही कशाचा अभाव

कोकण चाललंय पुढे करूनी आधुनिकतेचा स्वीकार,
तरी उत्साहात सादर होती जाखडी अन् दशावतार

बदलतंय जग, घाई साऱ्यांना परप्रांती जाण्याची,
शहरी म्हणू पाहणाऱ्याला ओढ शेवटी कोकणाची





चारित्र्य स्वच्छ तसेच चमकणारे असावे.




# रूपाली रेपाळेची सागरी झेप : जल आक्रमिले

## लेखक-सुमेध वडावाला

प्रा. मानसी गानू (इंग्लिश विभाग)

**अनंत आमची ध्येयाशक्ती**
**अनंत अन् आशा**
**किनारा तुला पामराला**

कोलंबसाच्या गर्वगीतातील कवी कुसुमाग्रज यांनी सागराला उद्देशून लिहिलेल्या या कवितेत खवळलेल्या समुद्राला जिद्दी आणि निर्भय खलाशी सुचवतात की तू कितीही रुद्र रूप धारण करुन आम्हाला घाबरवलेस तरीही तुझ्या या विराट वादळाला घाबरुन किड्या–मुंगीसारखं जगणं आम्हाला अजिबात मान्य नाही. तुझ्यासमोर पराभूत होऊन जगण्यापेक्षा आम्ही जलसमाधी घेऊ . भव्य आणि विराट असणाऱ्या सागरा, तू कितीही रुद्र , भीषण असलास तरी तुला किनारा आहे, सीमा आहे. आमची – मानवाची ध्येयाशक्ती आणि महत्त्वाकांक्षा यांना मात्र कोणतीही सीमा नाही.

माणसाची इच्छाशक्ती दुर्दम्य असेल तर बिकट आणि प्रतिकूल परिस्थितीतूनही मात करता येते आणि आपल्या ध्येयासाठी आकाशालाही गवसणी घालता येते हा प्रेरणादायी विचार देणारं एक पुस्तक माझ्या वाचनात आलं.

आजच्या या प्रसारमाध्यमांच्या जगात अनेक गोष्टी बातम्या सदोदित आपल्यापर्यंत पोहोचत असतात. अचानकच एखादे नाव प्रकाशझोतात येते, चकितही करते आणि माणसांच्या कर्तृत्वाची, वेगळेपणाची, त्यांच्या ध्यासाची, लढ्याची आणि अविरत कष्टांची ही माध्यमे दखल घेतात. अनेक व्यक्ती आपल्या क्षेत्रात उज्ज्वल कामगिरी करतात अविस्मरणीय असा ठसा उमटवतात, वेगवेगळ्या आव्हानांना तोंड देतात आणि विक्रम घडवतात.

अशाच एका अतुल्य व्यक्तिमत्त्वाबद्दलचे पुस्तक माझ्या वाचनात आलं त्या पुस्तकाचे नाव आहे 'जल आक्रमिले.'

महान नाटककार आणि लेखक विल्यम शेक्सपियर याने म्हटले की What's thy in the name?-नावात काय आहे पण हे पुस्तक वाचताना मात्र हे पुस्तकाचं शीर्षक अतिशय योग्य आणि यथार्थ आहे असंच वाटलं. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये पोहण्यासाठीचे विक्रम रचणाऱ्या, जगातील सात खाड्या सर्वात कमी वयात पोहून पार करणाऱ्या सागर कन्या रूपाली रेपाळेचे हे चरित्र! जल आक्रमिले ह्या नावावरून अथांग, विस्तीर्ण धीरगंभीर आणि खवळलेल्या आक्रमक अशा समुद्राला जिंकणाऱ्या या जलतरणपटूचा चेहरा डोळ्यासमोर येतो हेच त्या मुखपृष्ठाचे यश!

आपल्या सहज,सोप्या, खुमासदार शैलीतून सुमित वडावाला म्हणजेच मृत्युंजय रिसबूड यांनी हे चरित्र आपल्यापर्यंत उकलले आहे.हे लेखक रत्नागिरीतील खेडमधल्या एकदिवसीय ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. राजहंस प्रकाशन या प्रतिथयश प्रकाशनाने २००६मध्ये हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

अनेक गुणांचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाताना आपण पाहतो. रूपाली रेपाळे घडवण्यामध्ये जसा महत्त्वाचा वाटा तिच्या नैपुण्याचा आणि परिश्रमाचा आहे तसाच तिच्या आई–वडिलांची जिद्द, त्यांची परिस्थितीशी असलेली झुंज याचाही आहे.

रूपाली रेपाळे हीच हे चरित्र आपल्यासमोर तीन व्यक्तींच्या मनोगतातून स्पष्ट होत जात. स्वतः रूपाली, तिचे व्यक्तिमत्व घडवण्यासाठी अतिशय कष्ट घेणारे तिचे वडील रामदास रेपाळे आणि ह्याच बरोबर तिच्या आहाराकडे चौकसपणे लक्ष ठेवणारी, तिला समजून घेणारी, बाकीच्या कुटुंबाकडेही लक्ष देणारी आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे कुटुंबासाठी अर्थव्यवस्थापन सांभाळणारी तिची आई – रेखा रेपाळे.

The greater the effort, the sweeter the reward म्हणजेच आपल्या मराठीत आपण म्हणतो ना–

'चणे खावे लोखंडाचे मग ब्रह्मपदी नाचे' ही उक्ती सार्थ ठरवणारेच हे चरित्र आहे.

हे प्रयत्न आणि परिश्रम फक्त रूपालीचेच नव्हे तर तिच्या आई–वडिलांचेही आहेत जसा महासागरात तरंगणाऱ्या एखादा




हिमनगाचा दिसणाऱ्या भागापेक्षा न दिसणारा भाग प्रचंड मोठा आणि विस्तीर्ण असतो तसंच ही यशोगाथा वाचताना आपल्याला जाणवते की जेवढा खडतर प्रवास आपल्यापर्यंत पोहोचतो, आपल्याला कळतो त्यापेक्षाही त्यांचा संघर्ष हा कितीतरी पटीने अधिक तीव्र होता. प्राप्त परिस्थितीत संकटाला तोंड देऊन पुढे जाण्याचे बाळकडू जणू काही रुपालीला तिच्या आई–वडिलांकडून वारशाने मिळाले, कांदळी वडगाव यासारख्या दुष्काळी भागात राहणाऱ्या रामदास रेपाळे यांचा जगण्यासाठीचा, अन्न मिळवण्यासाठीचा संघर्ष मन हेलावून टाकणार आहे.

शाळेत शिकतानाही बारा वर्षांचे रामदास पेपर टाकत असत .सातवी पास झाल्यावर मुंबईत येताना 'भीती' जर असेल तर ती फक्त 'पोटाच्या भूकेचीच' आणि तणाव असेल तर

'आपल्यावर कोणाच्या तरी पोटाची जबाबदारी आहे' याचाच असे खडतर दिवस त्यांनी अनुभवले. हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करणे,फळ विकणे, फुलवाल्याला मदत करणं एवढंच नव्हे तर हमालीसुद्धा त्यांनी केली.

आयुष्यात संधी दार ठोठावत असते यावर विश्वास असणाऱ्या रेपाळे यांना ट्रकवर क्लिनर म्हणून काम करण्याची संधी चालून आली. त्यांनी ड्रायव्हिंगही शिकून घेतलं, याचा उपयोग त्यांना बेस्टमध्ये ड्रायव्हर होण्यासाठी झाला, पण महत्त्वाकांक्षी असणाऱ्या रामदास रेपाळे यांनी त्याबरोबर ट्रक व्यवसायही करायला सुरुवात केली.

मोठ्या कुटुंबात जन्मलेल्या रेखा म्हणजेच रूपालीच्या आईचीही जडणघडण अशाच हलाखीच्या परिस्थितीतील. दहावीपर्यंतचे शिक्षण पार पडल्यावर उच्च शिक्षण घ्यावं अशी मनीषा असणाऱ्या रेखा यांना कौटुंबिक जबाबदारीसाठी मुंबईला यावं लागलं, त्यामुळे कॉलेजला जाऊन शिक्षण घेण्याचे त्यांचे स्वप्न अर्धवट राहील, दहावीनंतर सहज म्हणून एम्प्लॉयमेंट कार्ड काढून ठेवणाऱ्या रेखा यांना नोकरीसाठी बोलावणं आलं आणि कामगार विमा योजना या खात्यात त्यांना नोकरी मिळाली जी भविष्यकाळात त्यांच्या कुटुंबातील स्थैर्यासाठी अतिशय महत्त्वाची ठरली, यातच घरातल्या मोठ्या माणसांनी फारसा विचार न करता आणि चौकशीही न करता त्यांचं लग्न रामदास रेपाळेंशी लावून दिलं.

डोक्यावर छताचा आधारही नसणाऱ्या आणि शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या ह्या दांपत्याला सुरुवातीपासूनच खूप संघर्ष करावा लागला आणि ३ फेब्रुवारी १९८२ मध्ये रूपालीचा जन्म झाला.

स्वस्थ न बसणाऱ्या रामदास यांनी तोपर्यंत बेस्टची नोकरी सोडून बसेस विकत घ्यायला सुरुवात केली होती त्यामुळे आर्थिक स्थैर्य कुटुंबाला लाभलं होतं यातच रूपालीचे पूर्ण आयुष्य बदलून टाकणारी घटना घडली. आपणही सुदृढ व्हावं या भावनेने रूपालीचे बाबा जलतरण तलावावर पोहण्यासाठी जाऊ लागले आणि एके दिवशी तीन वर्षांच्या रुपालीने बाबांबरोबर पोहायला मिळावे यासाठी हट्ट केला. पाण्यात उतरल्यावरही सलग दोन–तीन तास ती पाण्यामध्येच खेळत होती. असा हट्ट आता दर रविवारी होऊ लागला, त्यातच कालिदास ह्या जलतरण तलावाचे कोच–विनायक कांबळे यांनी रामदास यांना सुचवलं की तिच्या हातापायात ताकद आहे आणि तिला रोज सराव मिळत राहिला तर ती नक्की प्रगती करेल.

विनायक कांबळे यांचे हे शब्द जणू भविष्यवाणीच होती. पुन्हा एकदा व्यवसायात येत असलेल्या अपयशाला तोंड देतानाही रामदास यांनी ठाम निश्चय केला. रूपालीच्या ह्या कौशल्यासाठी लागेल त्या सर्व गोष्टींची पूर्तता करण्याचा जणू काही त्यांनी चंगच बांधला. आता रुपालीला रोजच दोन–तीन तास पोहण्याचा सराव करावा लागत होता. पहिलीत असणाऱ्या चिमुकल्या रूपालीला सकाळी थंडीत पोहणं अजिबात नकोसं वाटू लागलं होतं. ती त्याबद्दल तक्रार करत असे, रडत असे. पण ह्या कशालाच दाद न देता तिच्या वडिलांनी रोज नियमित पोहण्याचा आग्रह धरला.

रामदास रेपाळे यांनी रूपालीच्या सुरुवातीच्या चिडण्याकडे,

रुसण्याकडे, रडण्याकडे अजिबात लक्ष दिले नाही आणि तिच्या अंगभूत असलेल्या कौशल्याला हेरून एक जागतिक दर्जाचा जलतरणपटू घडवला.

बरोबरीची पोहणारी उच्चभ्रू कुटुंबातील मुलं आणि आपली परिस्थिती याचा विचारही रूपाली करू लागली तसंच कोचचा पक्षपात अशी अनेक कारणे तिच्या पोहण्याच्या अरुचीसाठी कारण ठरू लागली, पण तरीही तिला आई-वडिलांनी केलेल्या सक्तीमुळे पोहायला जावंच लागत असे अगदी वाढदिवशीसुद्धा. पोहणे आणि त्याचा सराव ही तिची तपस्या झाली होती.

त्यातच वयाच्या नवव्यावर्षी 'सन क्रॉक' या गेटवेपासून ५ किलोमीटरवर असणाऱ्या दीपगृहापासून गेटवेपर्यंत पोहोचण्याची संधी रूपालीला मिळाली. पोहण्याचा कंटाळा करणाऱ्या रूपालीने इथे असं दाखवायचा प्रयत्न केला की तिला पोहणे नीट जमतच नाही आणि त्यामुळेच तिने चक्क प्रयत्नपूर्वक मागे राहण्याचा प्रयत्न केला, तिने ते अंतर पार करण्यासाठी चक्क एक तास काढला पण तरीसुद्धा निश्चयी बाबांनी तिचं पोहणं अजिबात थांबवलं नाही.

अलिबागजवळच धरमतर ते गेटवे ऑफ इंडिया या ३८ नॉटिकलच्या जलप्रवासाने तिच्या विक्रमांची सुरुवात झाली. या अशा खाड्या पार करणे ही वाटते जितकी सोपी गोष्ट नसते.समुद्रातील खार पाणी, तिथले जलचर, हवामानात होत जाणारे बदल, अंतर्गत प्रवाह, वाऱ्याचा वेग, भरती व ओहोटी अशा अनेक गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात, याप्रमाणे पोहण्याचा प्रवास ठरवावा लागतो. धरमतरच्या या प्रवासात शेवटच्या टप्प्यात असताना मधुकर कोळी यांनी सांगितलेले शब्द रामदास रेपाळे यांच्यासाठी प्रेरणा देणारे ठरले. त्यांनी पोहणाऱ्या रूपालीला बघून सांगितले की, ''ही मुलगी against current म्हणजे प्रवाहाविरुद्ध पोहणारी आहे, अशी मुलं swimmer म्हणून नाव कमावतात, तुम्ही तुमच्या मुलीला इंग्लिश खाडीवर पाठवायला हवी.''

धरमतरच्या यशापासून सर्वात कमी वयात हा प्रवास पार पाडणारी जलतरणपटू म्हणून प्रचंड प्रसिद्धी रूपालीला मिळाली, त्याच वेळेला रूपालीचे बाबा मात्र रूपाली इंग्लिश खाडी कशी पोहून पार करेल याचा विचार करत होते .

इवल्याशा दिसणाऱ्या ,कमी वजन आणि वय असणाऱ्या रूपालीला इंग्लिश खाडी पोहण्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागणार होती. अल्पशिक्षित असूनही पत्रव्यवहार करणे, प्रवासासाठी आणि एकूण खर्चासाठी पैसे उभे करणे, पासपोर्ट मिळण्यामधल्या अनेक अडचणी अशा अनेकविध समस्या, अडचणी यांच्यावर रूपालीच्या वडिलांनी मात केली. प्रयत्नपूर्वक तिचं वजन वाढवण्यात आलं. एवढंच नव्हे तर यासाठी परवानगी मिळवणं हेसुद्धा तितकंच कठीण काम होतं. फक्त ५ डिग्री तापमान असणाऱ्या समुद्रात सलग ६ तास पोहण्याचा सराव पूर्ण करणे अशाही अनेक अटी होत्या.



या सगळ्यातून जर ती कार्यक्षम वाटली तरच तिला पोहायची परवानगी असोसिएशन देणार होतं. प्रचंड थंड पाणी असलेल्या समुद्रात सराव करताना सुरुवातीला अपयश आलं तरीही ती मनाने अजिबात खचली नाही. ६ तासांच्या सरावाची ही अट केवळ चौथ्या दिवशी ती पास झाली आणि अखेर सज्ज झाली -इंग्लिश खाडी पोहण्यासाठी.

अखेरीस १५ ऑगस्ट १९९४ ला इंग्लिश खाडी पोहण्यासाठीची तिला परवानगी देण्यात आली. सलग १६ तास ७ मिनिटं ५ डिग्रीपेक्षा कमी तापमान असलेल्या थंड पाण्यात पोहून ओहोटीला तोंड देऊन तिने इंग्लिश खाडी पार केली.

रूपालीसारख्या गुणवान, ध्येयवान आणि निष्ठा असणाऱ्या, चिकाटी असणाऱ्या रुपालीचे हे यश बघून तिच्या वडिलांनी तिला आता साहसाच्या यशोगाथा रचण्यासाठी सातत्याने नवनवीन ध्येय दाखवायचा ध्यास घेतला.

एका मागोमाग एक अशी उत्तम उत्तम कामगिरी करून रूपालीने 'सागरी कन्या' हे आपले नाव सार्थकी ठरवायला सुरुवात केली. त्याचवर्षी ऑक्टोबरमध्ये १२ वर्षाच्या रूपालीने जिब्राल्टर खाडी पार केली. यावेळेस प्रचंड वाऱ्याने तिला अडवायचा प्रयत्न केला. जणू काही समुद्र हा एखादा कागद असेल तर पृथ्वी पेपरवेट म्हणून ठेवावी लागेल असा भयंकर वादळी वारा वाहू लागला. तरीही अथक प्रयत्नाने ७ तासात रूपालीने ही खाडी ओलांडली. प्रत्येक खाडी पोहणे हे तिच्यासाठी आता वेगळं आव्हानच होतं. आता पुढचं ध्येय होतं पाल्कन स्ट्रेट - भारत आणि श्रीलंका यांच्या दरम्यान असलेल्या काळ्यापाण्याच्या ह्या समुद्रात विषारी सापही आहेत, त्याचबरोबर तामिळ वाघांचीही भीती ह्या परिसरावर आहे. त्यामुळे परवानगी मिळणंसुद्धा कठीणच होतं. शार्क असलेल्या या समुद्रात पोहणे ही खूपच कसोटीची गोष्ट होती कारण शार्कला ३ नॉटिकल मैलावरूनसुद्धा माणसाच्या रक्ताचा वास येतो आणि सहकार्यासाठी जरी माणसं असली तरी निरीक्षण करणाऱ्या बोटीतून माणसं जवळ पोहोचेपर्यंत आणि मदत मिळेपर्यंत शार्कच्या प्रचंड वेगामुळे आणि चपळाईमुळे जलतरणपटू



त्याची शिकार होऊ शकतो. हवामानाचा विचार करून रात्रीची वेळ निश्चित करण्यात आली होती आणि रूपालीने बरेचसे अंतर पार केल्यावर तिचे निरीक्षण करणारी बोट बंद पडली. या सगळ्यांमध्ये रूपाली कोणालाही दिसेना. शार्क, विषारी साप असलेल्या समुद्रात रात्रीच्या वेळी आपली मुलगी न सापडणं म्हणजे काय अवस्था असेल हे आपण समजून घेऊ शकतो. अखेरीस रूपालीचा शोध लागला. एकूण ११ तास पोहणाऱ्या रूपालीने दिसणाऱ्या दिव्यांच्या दिशेने पोहत राहून सागरी किनारा गाठला होता.



बास स्ट्रेट किंवा फिलिप्स स्ट्रेटही आव्हानात्मक होती. ७५ नॉटिकल किलोमीटरची ही खाडी होती आणि यातही शार्क माशांची मोठी वर्दळ होती. इथे पोहणं आणखीनच वेगळं होतं. कारण शार्क माश्यांपासून संरक्षण मिळण्यासाठी पिंजऱ्यात पोहायचं होतं आणि ह्याबरोबरच रूपालीला झालेली छोटीशी जखम हीसुद्धा धोक्याची घंटा होती. शार्क माशांना सुगावा लागण्याची भीती होतीच. प्रत्यक्ष खाडी पार करताना सततच्या पिंजऱ्यातल्या पोहण्यामुळे हातापायांवरती आपटून जखमा झाल्या होत्या आणि जखमा घेऊन त्या खाऱ्या पाण्यात पोहत रूपालीने ही खाडीसुद्धा पार केली.

न्यूझीलंडच्या साऊथ आयलँड आणि नॉर्थ आयलँड या दोन प्रदेशांना जोडणारी कुक स्ट्रेट ही खाडी ओलांडणे हा आता पुढचा टप्पा होता. हवामान लक्षात घेऊनही पोहायचा दिवस निश्चित केला गेला असला तरीही पोहायला सुरुवात करून झाल्यावर चार–पाच तासाने प्रचंड वेगाने वारा वाहू लागला आणि मच्छीमारांनासुद्धा २५ नॉटिकल माइल्स या वेगाने वारा वाहत असेल तर समुद्रातून माघार घ्यावी असा इशारा देण्यात येतो असे असतानाही ३२ नॉटिकल माइल्स ह्या वाऱ्याच्या वेगामध्ये रूपालीला समुद्रात पोहत राहावे लागले. जिथे जहाजही तग धरत नाही, अशा अवस्थेत जिथे कोणताही सजीव पाण्यावर तरंगू शकणार नाही असा सर्वसामान्य विश्वास असतानाही प्रचंड धैर्याने ती समुद्राशी झगडत राहिली. ह्या तिच्या प्रवासात तिच्या अवतीभोवती डॉल्फिन जणूकाही संरक्षणासाठी फेर धरून साथसंगत करत होते. ज्याठिकाणी पाच ते साडेपाच तास ह्या प्रवासासाठी लागले असते तिथे या सगळ्या प्रतिकूल परिस्थितीत तिला तब्बल २० तास लागले, पण तरीही तो विक्रम तिने चुकवला नाही. तिला एखादा समुद्र जलचर चावला नाही ना, हे पाहण्यासाठी तिचे रक्तही मिळवता येत नव्हते कारण थंड पाण्यात पोहल्यामुळे तेही गोठले होते. या तिच्या कर्तृत्वानेच स्तिमित होऊन तिला न्यूझीलंडने ‘डॉल्फिन क्वीन’ असा किताब दिला.

आता शेवटचा विक्रम म्हणून रॉबिन आयलँड स्ट्रेट पार करायचा फक्त शिल्लक राहिला होता, पण जणू काही खडतर परीक्षा बघून झालेल्या सागराने ही आता रूपालीला हळूवारपणे जपले. निसर्गही अनुकूल होता आणि केवळ ९ तासात तिने हा ३४ नॉटिकल मैलांचा प्रवास पार पडला आणि सर्वात कमी वयात जगातील सर्वाधिक म्हणजेच ७ खाड्या पोहल्याने तिचे नाव ‘गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये नोंदवले गेले.

या सर्वांबरोबरच तिचे शिक्षणही सुरू होतेच. सरावासाठी शाळा खूपवेळा चुकूनसुद्धा दहावी आणि बारावीतही ती चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. आपल्याच मालकीच्या वडिलांनी स्थापन केलेल्या कंपनीमध्ये ती कार्यरत आहे .

या पुस्तकात जसा रूपालीचा संघर्ष आहे तसंच वडिलांनी पूर्णतः रूपालीकडे लक्ष दिल्यामुळे संपूर्ण कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या रूपालीच्या आईचाही संघर्ष आहे. नोकरी सांभाळून रूपालीच्या दोन भावांना सांभाळणे आणि त्याचबरोबर पतीच्या वेगवेगळ्या व्यवसायात त्यांना खंबीर साथ देणे ही तारेवरची कसरत त्यांना करावी लागली.

पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक आणि पुरेसे बोलके आहे. मुखपृष्ठावर समुद्राच्या लाटांवर स्वार झालेली रूपाली आणि तिची विजिगीषू वृत्ती प्रकट करते. असं म्हणतात की, मनुष्य आपल्या कार्यक्षमतेचा पुरेपूर वापर करत नाही. स्वत:मधली कार्यक्षमता ओळखून जर सुनिश्चित दिशेने वाटचाल केली तर आपले ध्येय गाठता येईल. हवी फक्त दुर्दम्य इच्छाशक्ती आणि योग्य दिशेने वाटचाल!

# छंदोत्सव

प्रा. आदेश मुकणे (समाजशास्त्र विभाग)

छंदोत्सव म्हणजे काय ?
हा मनात एक प्रश्न होता.
मिळेल ते अनुभवायचा हा,
वेगळाच विचार घोळत होता.

परीक्षेच्या तारखा आल्या,
चर्चेला झाली सुरुवात
हळूहळू कमिटीच्या लिस्टची,
होऊ लागली ग्रूपवर बात!

कसे करावे नियोजन अन्,
जबाबदारी कशी असेल कुणाची,
स्पष्ट झाले सोबती,
अन् वाटणी झाली कामाची.

हा हा म्हणता सरावाची,
तालीम सुरू झाली.
हौशी नौशी पोरं,
सगळी एक होऊन गेली.

खातू नाट्यमंदिर सजले,
कार्यक्रमांची रेलचेल सुरू झाली.
संगीत, नाटक, नृत्यकलेत,
विद्यार्थी मने न्हाऊन गेली.

ओळख, मैत्री, आपुलकीचे बंध,
जोडती वरिष्ठ जिथे.
म्हणून नाचलो, रमलो,
अन् खेळलोही आम्ही तिथे.

कुठे लागले स्टॉल,
किती कलागुण झाले रंजक.
नाट्यकलेच्या दिव्यतेचा परीस,
म्हणजे जणू आमचा श्यामराव करंडक.

क्रिकेट, कबड्डी, व्हॉलीबॉल,
मैदान गच्च भरले मुलांनी.
मैत्री, उत्साह, कुठे हसू,
धमाल मस्तीच्या क्षणांनी.

सहकारी हे किती वेगळे,
पुन्हा नव्याने भेटले.
शिक्षकी पेशातले त्यांचे,
कलागुण ते दिसले.

अप्रूप वाटले या संस्कृतीचे
कसं सारं ठेवलंय जपून.
परंपरेच्या प्रतिभेतून,
विद्यार्थ्यांमध्ये आलंय ते रुजून.

अशा आसमंती ८४ फुलांची,
भासे आगळी मांदियाळी.
खूप काही शिकवून गेली,
सहकार्याची अतूट साखळी.

किती कलेचे प्रकार घेऊन,
जन्माला येतो हा छंदोत्सव.
तरुणाईच्या उंबरठ्यावरचा,
बहर गुणांचा हा उत्सव.

छंदोत्सवाचं देखणं रूप
पुन्हा पुन्हा अनुभवायचंय...
नव्या नव्या या पाऊलवाटेत,
अजून खूप काही शिकायचंय...







# पाणी आहे तर जीवन आहे

**सानिका घाणेकर** (१२ वी कला)

पाणी हा घटक सजीव सृष्टीसाठी किती महत्त्वाचा आहे हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही. प्रत्येकजण पाण्याचे महत्त्व जाणतो. पाणी हे संपूर्ण सजीव जगतासाठी अमृत आहे. पाणी हे संपूर्ण सजीवसृष्टीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. पृथ्वीतलावर पाण्याची उपलब्धता आहे म्हणूनच येथे सजीवांचे वास्तव्य शक्य आहे. पृथ्वीवर पाणी असल्याकारणाने येथे सजीवांचे अस्तित्व टिकून आहे. ज्या दिवशी पृथ्वीवरील पाण्याचे स्त्रोत संपतील त्या दिवशी पृथ्वीवरील सजीवसृष्टी देखील नष्ट होईल.

आज मनुष्याने खूप प्रगती केली आहे. तो चंद्र, मंगळ यासारख्या ग्रहांची सफर करत आहे. तेथे जाऊन तो मानवी वस्ती प्रस्थापित करण्याच्या विचारात आहे; पण ज्याठिकाणी मानवी वस्ती असेल, त्याठिकाणी सजीवांच्या जगण्यासाठी आवश्यक असणारे सर्व मूलभूत घटकदेखील असायला हवेत. त्यात सर्वात महत्त्वाच्या घटक म्हणजे पाणी! पाण्याशिवाय मानवी वस्ती अशक्य आहे; कारण पाणी हा मनुष्याला जिवंत राहण्यासाठी लागणारा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. पाणी जर उपलब्ध नसेल तर तेथे मनुष्य वस्तीचे वास्तव्य ही संकल्पनाच अशक्य आहे. त्यामुळेच मनुष्य मानवी वस्ती प्रस्थापित करण्यासाठी अनेक ग्रहांवर पाण्याचा शोध घेत आहे.

पाण्याला जल हेच जीवन आहे' असे म्हटले जाते किंवा त्याला हिंदीमध्ये 'जल ही जीवन हैं। असे म्हटले जाते.आपण सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत फक्त पिण्यासाठीच नव्हे तर इतर अनेक कामासाठी पाण्याचा वापर करत असतो. त्यात स्वच्छतेसाठी वापर, घरगुती कामासांठी वापर जेवण बनविण्यासाठी व इतर असंख्य कामं आहेत जेथे आपल्याला पाण्याची अतोनात गरज भासते. हेच पाणी आपल्याला नदी, तलाव, विहीर , धरणं यांच्या मार्फत वापरण्यासाठी उपलब्ध होते. शिवाय पाऊस हा देखील पृथ्वीतलावरील पाण्याचा सर्वात मुख्य स्त्रोत आहे.या स्त्रोतातील पाणी आपण पिण्यासाठी, शेतीसाठी कारखाने ,उद्योग धंद्यांसाठी वापरत असतो.

पाऊस हा भारत देशातील मुख्य आधार आहे. शेतीसाठी

लागणारे सर्व पाणी पावसातून उपलब्ध होत असते. शिवाय पावसाव्यतिरिक्त नद्या, तलाव, विहीर, बोअरवेल इत्यादीमधील पाणी देखील विद्युत पंपाच्या साहाय्याने शेतीला पुरवले जाते. शेती भरभरून पिकून आपल्याला अन्नधान्य उपलब्ध होते. पण आजच्या काळातील शेतकरी खूप हवालदिल झाला आहे. कारण मागच्या काही वर्षापासून सतत दुष्काळ पडत आहे. शेतीला पाणी पुरत नाही त्यामुळे अपेक्षित तेवढे उत्पन्न देखील शेतीतून मिळत नाही. पाणी असेल तरच शेती शक्य आहे आणि नसेल तर अन्नधान्य कुठून येणार? माणूस काय करणार, काय खाणार ?म्हणजे पाण्याचा थेट संबंध सजीवांच्या जगण्याशी आहे. त्यामुळे पाणी खरोखरच मनुष्यासाठी जीवन आहे. पण आज सजीवांना पुरेसे पाणी या पृथ्वीतलावर उपलब्ध आहे का? जेवढे आहे तेवढे तरी पाणी पिण्यायोग्य आहे का? पृथ्वीवर एकूण ७१% पाणी उपलब्ध आहे. पण हे सर्व पाणी पिण्यायोग्य नाही. यातील केवळ दोन ते तीन टक्केच पाणी संजीवांसाठी पिण्यायोग्य आहे. बाकीचे पाणी वाफ, बर्फ, हिमनग, समुद्रातील खारट पाणी यांच्या स्वरूपात उपलब्ध आहे ;म्हणजे पृथ्वीवर केवळ मर्यादित पिण्याच्या पाण्याचा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे आपल्याला पाण्याचा खूप काटकसरीने वापर करणे गरजेचे आहे. जेवढे पिण्यायोग्य पाणी पृथ्वीवर उपलब्ध आहे त्यातील सर्वात जास्त पाणी हे भूगर्भात आहे. ते आपल्याला विहिर, बोअरवेल यांच्यामार्फत उपलब्ध होते. शिवाय हे पाणी पिण्यासाठी खूप शुद्ध असते, कारण या पाण्याची नैसर्गिक पद्धतीने चाळणी होते.

जे पाणी पृथ्वीच्या पृष्ठभागावर उपलब्ध आहे ते सुद्धा खूपच दूषित आणि प्रदूषित करून टाकले आहे.पृथ्वीवरचे पाणी अगदी पिण्यास अयोग्य झाले आहे. पृथ्वीवरील पाण्याचा साठा मर्यादित आहे ही गोष्ट मनुष्य नक्कीच विसरला आहे. पण त्याला एक दिवस या गोष्टीची नक्कीच जाणीव होईल, त्याने केलेल्या कृत्याचा पश्चाताप होईल, पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असेल.

जर भविष्यात उद्भवणाऱ्या पाणी संकटापासून वाचायचे असेल तर पाण्याची बचत करणे फार गरजेचे आहे. मनुष्याने एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की जे पाणी मानवासाठी सध्या जीवन आहे तेच पाणी त्याच्यासाठी भविष्यात सर्वनाशाचे कारण ठरू शकते.. त्यामुळे पाणी बचत करणे फार गरजेचे आहे. शेवटी मूला एवढेच म्हणावेसे वाटते- जल है तो कल हैं।





# निरोगी आयुष्याचा मूलमंत्र

**सादिया सय्यद** (१२ वी कला)

एक छोट्याश्या गावात रमेश नावाचा एक श्रीमंत जमीनदार राहत होता. त्याच्याकडे भरपूर शेती, पैसा, नोकरचाकर, गाड्या होत्या; पण त्याला एक मोठी समस्या होती. त्याचे शरीर खूपच नाजूक होते. मधुमेह, रक्तदाब, पचनाचा त्रास असे अनेक आजार त्याला सतावत होते.

दुसऱ्या बाजूला त्याच्याच गावात शंकर नावाचा एक सामान्य शेतकरी राहत होता. त्याच्याकडे फारसा पैसा नव्हता, पण तो रोज सकाळी लवकर उठून योगासने करत असे, शेतात राबत असे, ताजे अन्न खात असे, शेतात राबून आपले कुटुंब चालवत असे. आयुष्य अगदी समाधानाने आणि निरोगी जगत होता. त्याचं आयुष्य बघून रमेशला नेहमीच नवल वाटत होते. याच्याकडे फार पैसा नाही तरीसुद्धा हा इतकं छान आयुष्य कसं जगतो.

एक दिवस रमेशला खूप त्रास होऊ लागला. त्याचे घरचे त्याला दवाखान्यात घेऊन गेले. डॉक्टरांनी सांगितल की त्याने आपल्या जीवनशैलीत त्वरीत बदल केला नाही, तर गोष्टी अधिक बिकट होऊ शकतात. त्याला प्रश्न पडला की आता काय करायचं. त्याला त्यावेळी शंकरची आठवण झाली. रमेश निरोगी आयुष्याचं रहस्य जाणून घेण्यासाठी शंकरकडे गेला. शंकरने त्याला सांगितलं, कितीही पैसा असला तरी शरीर ठणठणीत नसेल तर त्या पैशाचा काही उपयोग नाही. मी रोज सकाळी चालतो, ताजं अन्न खातो, वेळेवर झोपतो आणि मन शांत ठेवतो.

रमेशने त्याचा सल्ला मानायचा ठरवलं आणि हळूहळू त्याने आपल्या आरोग्याला प्राधान्य द्यायला सुरुवात केली. व्यायाम, संतुलित आहार, वेळेवर झोप, आणि तणावमुक्त जीवनशैली. काही महिने त्याला खूप मेहनत घ्यावी लागली. पण हळूहळू त्याचे रोग कमी होत गेले. त्याने आपल्या कुटुंबालासुद्धा त्याचं मार्गावर चालायला सांगितले. त्यामुळे त्याचे सर्व कुटुंबच निरोगी आयुष्य जगू लागले.

# तुझ्याविषयी मनातलं...

**–प्रा. विस्मया कुलकर्णी** (इंग्लिश विभाग)

**आदरणीय अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय,**

सर्व आजी माजी शिक्षक वृंदाकडून तुझ्या सुवर्ण महोत्सवी वाटचाली निमित्त सस्नेह नमस्कार! कै. श्री. बाबुराव जोशी आणि सौ. मालतीबाई जोशी यांनी स्थापन केलेल्या रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचं तू एक लाडक अपत्य. सध्या तू सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मागच्या ४९ वर्षांच्या कालावधीत आलेल्या अनुभवावर आधारित अधिक समृद्ध आणि संपन्न आयुष्य जगायचं असं नक्कीच ठरवत असशील. आत्तापर्यंतच्या आयुष्याच्या पटाचं सिंहावलोकन करून राहून गेलेल्या गोष्टी पूर्णत्वाकडे नेण्याचा तुझा प्रयत्न असेल. रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांना तुझं कर्तृत्व उंचावण्यासाठी आवश्यक असलेली सगळी स्वप्न सतत पडतात आणि त्या स्वप्नांना आकार देण्यासाठी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अनेक हात हा गोवर्धन उचलण्यासाठी कायम प्रयत्नशील असतात. त्यामुळे भविष्यामध्ये तुझ्या प्रगतीची पताका सतत फडकत राहील यात संदेह नाही.

मागच्या ४९ वर्षामध्ये कोकणातील विद्यार्थ्यांना तुझ्यामुळे शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या. रत्नागिरी शहराची वैचारिक प्रगती झाली आणि तिचा चेहरा मोहराच बदलला. तुझ्या जन्माच्या वेळी १९७६ मध्ये तुला गोगटे जोगळेकर कनिष्ठ महाविद्यालय या नावाने ओळखत असत. पण तुझं कार्य कर्तृत्व आणि एकूणच तुझ्या बौद्धिक आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन श्री. आर. बी. कुलकर्णी यांनी तुझ्या विज्ञान शाखा या महत्त्वाच्या अंगाला देणगी दिली त्यावेळी तुला आर. बी. कुलकर्णी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय अशी नवी ओळख मिळाली. याचबरोबर कै. पी. जी .अभ्यंकर यांनी कला व वाणिज्य विभागासाठी देणगी दिली आणि त्यानंतर तुझं एक छान भलेभक्कम कै. पी.जी.अभ्यंकर कला व वाणिज्य आणि आर. बी. कुलकर्णी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय असं नामकरण करण्यात आलं आणि तुझ्या मोठ्या नावाइतकंच मोठं कर्तृत्व तू गाजवलं आहे.

अतिशय अनुभवी आणि व्यासंगी प्राध्यापक वर्ग, प्रशस्त वर्ग खोल्या, अद्ययावत प्रयोगशाळा, मोठं क्रीडांगण, उत्तम ग्रंथालय, अद्ययावत कम्प्युटर लॅब्स आणि गरजेनुसार बांधल्या जाणाऱ्या नवनवीन इमारती या सर्वाचा उपयोग स्वतःच्या प्रगतीसाठी करून घेणारा, तुझ्यावर प्रेम करणारा, तुझा चाहता विद्यार्थी वर्ग ही तुझी खरी समृद्धी. कला,विज्ञान, वाणिज्य आणि एच. एस. सी. व्होकेशनलमध्ये शिकून उपलब्ध असलेल्या वैद्यकीय क्षेत्र, अभियांत्रिकी, सनदी लेखापाल, राज्य आणि केंद्रीय स्पर्धा परीक्षा, लेखन, शिक्षण इ. आणि अन्य सर्व व्यवसाय आणि सेवा क्षेत्रांमध्ये स्वतःच्या कामाचा ठसा उमटवून तुझं नाव मोठं करण्याचा सतत प्रयत्न हा विद्यार्थी वर्ग करतो आहे. आज जग हे एक छोटं खेडं झालं आहे आणि छोट्या खेड्यांना जागतिक पटलावर मोठं नाव कमावण्याची संधी आहे. रत्नागिरी शहराला, आजूबाजूच्या गावांना आणि रत्नागिरीतील इतर तालुक्यांना बौद्धिकदृष्ट्या समृद्ध करून त्यांना स्वतःची ओळख मिळवून देण्यामध्ये तुझा सिंहाचा वाटा आहे.

आजच्या सामाजिक आणि शैक्षणिक बदलांना सामोरे जाण्यासाठी तू आमच्याबरोबर कायम असशील. बदलत्या शैक्षणिक गरजांना अनुसरून तू बदलाला तयार असशील. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सुवर्णाक्षरांनी तुझ्या इतिहासाचा आढावा घेण्याची संधी आम्हाला मिळाली तुला हीरक महोत्सवी वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा!



# लोककल्याणार्थ वेची जो जीवित...

अर्पिता बापट (११ वी वाणिज्य)

आज आपण एका सुंदर ओवीच्या माध्यमातून संतांची व्याख्या व त्यांचे आपल्या जीवनातील महत्त्व समजून घेणार आहोत ती ओवी म्हणजे

**आणिकांचे दोष आणि ना जो मनी ।**
**गुणांते वाखाणी तोची संत।।३।।**
**लोककल्याणार्थ वेची जो**
**जीवित संत तो महंत स्वामी म्हणे ।।४।।**

संत केवळ एक व्यक्ती नाही तर एक विचार आहे , भावना आहे. संत दुसऱ्यांच्या मनात असणारे दोष त्यांना दाखवून सुधारण्याचा प्रयत्न करतात. ते कधीही दुसऱ्यांच्या दोषांवर लक्ष केंद्रित करत नाहीत याउलट त्यांचे गुण वाखाणून त्यांना अधिक प्रोत्साहित करतात.



**संत म्हणजे काय?**

जो मनुष्य कोणाची निंदा करत नाही, कोणाचे दोष मनातही आणत नाही याउलट इतरांचे कौतुक करतो त्यांना अधिक प्रोत्साहित करतो तोच खरा संत असतो. साध्या आणि सोप्या भाषेत सांगायचं झाल्यास साधू अथवा सद्गुणी मनुष्य.

स्वामी स्वरूपानंदांप्रमाणे संत केवळ वैयक्तिक मुक्तीसाठी नाही तर समाजाच्या कल्याणासाठी कार्य करतात. ती कार्य समाजाला स्थिरता, संतुलन, आणि सामाजिक मूल्यांचे धडे देते. संतांच्या शिकवणीनुसार केलेले सेवाकार्य ही देखील एक उपासनाच असते ज्यातून आपल्याला गरीब, गरजू लोकांना मदत करता येते. त्यांच्या याच कार्यामुळे आणि विचारांमुळे समाजात सदाचार, नीतिमत्ता आणि धर्मांचे महत्व रुजले आहे याचमुळे आपले मानवी जीवनं धन्य होते.

स्वामी स्वरूपानंदांच्या विचारांतून हेच लक्षात येते की खरी आणि निःस्वार्थी भक्ती जगाचे तारण करते पण त्यासाठी वैयक्तिक सुख, फायदा, लोभ या सगळ्याचा त्याग करून जगाच्या किंवा समाजाच्या कल्याणासाठी झटावे लागेल.

ही ओवी वाचली की लक्षात येत की जन्माला येणाऱ्या प्रत्येकामध्ये दोष ही असतातच, पण त्या दोषांना कवटाळून न राहता प्रत्येक माणसाच्या अंगी असणारे गुण लक्षात घेतले तर मानवी जीवन सुखकर होईल....पण आजच्या काळात संत होणं तर दूरच, चांगलं माणूस बनायला इतरांच्या दोषांकडे दुर्लक्ष करावं लागतं.

आपल्या रोजच्या आयुष्यातसुद्धा एखाद्याच्या दोषांवर जितकं बोललं जातं तितकं त्याच्या गुणांवर बोललं जातं का? तर त्याचं उत्तर नाही असंच असणार. त्यामुळे होतं असं की एखाद्याच्या अंगी असणारे हे चांगले गुण त्याच्यातील असणाऱ्या दोषांमुळे झाकले जातात.

दोषांकडे दुर्लक्ष करून गुण पाहिले पाहिजेत याची उदाहरणे द्यायची झाली तर अनेक आहेत, पण ती आपल्या दृष्टीस पडली नसतील तर आज आपण जाणून घेऊ. आता हेच बघा निसर्ग आहे म्हणून आपण आहोत ते त्याचंच एक उदाहरण घेऊ. आपल्या अंगणात अनेक प्रकारची फुलझाडं असतील पण सगळीच काही सुवासिक असतीलच अस नाही. अबोली हे फूल दिसायला किती छान आहे? त्याचा गजरा केसात माळल्यावर किती सुबक दिसतो, पण त्याला वास कुठे असतो? तरीपण आपण तो गजरा माळतोच ना.....? पाऊस पडला की मोगऱ्याचा वास दरवळण्याची कितीजण वाट बघत असतात, त्याचासुद्धा गजरा अगदी छान असतो पण त्याचा देठ किती नाजूक असतो? तरी हा दोष बाजूला ठेवून आपण गजरा माळतोच ना....

**लोककल्याणार्थ वेची जो जीवित ।**
**संत तो महंत स्वामी म्हणे ।।**

माझ्या मते ही ओवी आपल्या आदरणीय सिंधुताई सपकाळ यांच्या कार्याला तंतोतंत जुळते, कारण त्यांनी आपले आयुष्य हे उपेक्षितांसाठी झिजवले, निराधार लोकांना आधार दिला, भिक्षा मागून मुलांना डॉक्टर, इंजिनिअर केलं. खरंच धन्य धन्य ती माऊली!

संतांची शिकवण ही अशी विश्वबंधुत्वाची संकल्पना सत्यात उतरवू शकते. म्हणूनच एक दोहा असाही आहे कि

**साधू ऐसा चाहिये, सार सार को गहरीये।**
**थोता देय उडाय । जैसे सूप सोहाय ।।**

म्हणजेच साधू अथवा संत कसा असावा? जो फक्त गुणांना पाहिल, त्याविषयीच बोलेल बाकी दुर्गुणांकडे दुर्लक्ष करेल. अशा या श्री स्वामी स्वरुपानंदांच्या शिकवणीमुळे प्रत्येक मनुष्य, घर, गाव, तालुका, जिल्हा, राज्य, देश आणि विश्व आपलेच वाटायला लागेल आणि राग, लोभ, क्रोध, अहंकार सर्व दोष लयाला जातील आणि फक्त मानवजातच नव्हे तर समस्त प्राणीमात्र आनंदाने जीवन व्यतीत करतील.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की –

**जगाचे कल्याण हीच ती भक्ती,**
**उपकार सेवा हीच करी मुक्ती,**
**ठायी ठायी त्याची रुपेही अनंत ।।**




दीक्षा मोहिते (११ वी कला)

कुणी कसे दिसावे
कुणी कसे असावे
का बरं हे आपण ठरवावे?

सतत दुसऱ्यांच्या उणीवा दाखवण्यापेक्षा, अहो!
कधीतरी स्वतःकडे ही एकदा डोकावून पहावे.

इतरांसाठी वेगळाच कायदा आणि स्वतःसाठी वेगळा नियम.
अहो! हे तर चालायचेच कारण हाच आहे जीवनक्रम.

न्याय हक्कासाठी आरडाओरडा करता पण हक्कासाठी आवाज
उठवणाऱ्यांचे का बरं गळे घोटता?

समोर घडणारा अन्याय उघड्या डोळ्यांनी पाहता
सत्य सांगण्याची वेळ येते तेव्हा मात्र मूग गिळून गप्प बसता.

देवीसमोर हात जोडतात पण त्याच हातांनी स्त्रीची अब्रू लुटतात.
खऱ्याला मातीत दफनवून खोट्याचं श्राद्ध घालतात.

कटू आहे पण सत्य आहे
माणूसच माणसाचा खरा वैरी आहे!



# आहेस लाखात एक तू...

–प्रा. मनस्वी लांजेकर (इंग्लिश विभाग)

सावित्री, जिजाऊ, लक्ष्मीबाईंची लेक तू
नको घाबरू हो निर्भय आणि निर्भीड तू..

उंच उंच झोके घेत, उंच शिखरावर पोहचलीस तू
कल्पना चावला, सुनीता विल्यम्ससारखी घे भरारी तू

उत्तम शुश्रुषा हा तर तुझाच हातखंडा
डॉ. आनंदीबाई, इंदिरा हिंदुजा, पद्मावती यांच्या पंक्तितलीच तू..

कोण म्हणे राजकारण हे नाही स्त्रियांच काम
सुषमा स्वराज, द्रौपदी मुर्मू यांचा घे आदर्श तू

समजू नकोस उन्हात खेळून होशील काळी तू
हरमनप्रीत, पी.व्ही.सिंधू, पी.टी.उषा यांना जरा आठव तू

शालीन सौंदर्याइतकच कर्तृत्व जपणारी तू
किरण बेदी, मीरा बोरवणकर यांचा ठेव आदर्श तू

कोणतही क्षेत्र घ्या समर्पण स्त्रियांचंच आहे
पुरुषप्रधान संस्कृतीत घेऊन आलीस जननी होण्याचं वरदान तू

नराधमांसमोर नको नरमून जाऊस तू
दाखव त्यांना तुझं महिषासुरमर्दीनीचे रूप तू

स्त्रियांचा तुच्छतेने अपमान करणाऱ्या पुरुषांना
आठवण करुन दे श्रीकृष्णाची तू

आईबाबांची लाडकी लेक तू
खचू नको, मोडू नको, आहेस लाखात एक तू

सर्वांचे ऐकून घ्या, पण फार थोड्यांजवळ स्वतःचे मन मोकळे करा.

# व्याघ्र संवर्धनासाठी एक पाऊल...

–**प्रा. ऋषीराज नागवेकर** (पर्यावरण विभाग)

नैसर्गिक परिसंस्थेच्या निरामय अस्तित्वासाठी वन्य प्राणी संरक्षण अभियान राबवण्याची गरज काळानुसार निर्माण होते आहे. जंगली प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासावर आक्रमण होते आहे परिणामी त्यांचे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता आहे हे ओळखून महाराष्ट्र सरकारने काही ठोस पावले उचलण्याचे ठरविले आणि त्यातूनच गेल्या वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यापासून राज्यातील वाघांची राजधानी असणाऱ्या ताडोबा व्याघ्र प्रकल्पातून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात केल्या जाणाऱ्या वाघांच्या स्थलांतरावरून पश्चिम घाटातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्प अचानक चर्चेत आला. याच वाघांच्या स्थलांतराविषयी आपण थोडी माहिती देण्याचा हा प्रयत्न आहे.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प महाराष्ट्रातील पश्चिम घाटातील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये असून या प्रकल्पाला पश्चिम घाटाच्या सह्याद्री डोंगररांगावरून सह्याद्री व्याघ्र प्रकल्प हे नाव देण्यात आले. २०१० मध्ये चांदोली राष्ट्रीय उद्यान आणि कोयना वन्यजीव अभयारण्य एकत्रित करून ते क्षेत्र अधिसूचित करण्यात आले. हेच ठिकाण का शोधले गेले हे खालील कारणांमधून स्पष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. यासाठी येथील अधिवासाची वैशिष्ट्ये लक्षात घ्यावी लागतील.

### **अधिवास वैशिष्ट्ये** (Habitat Attributes)

सह्याद्रीचा अधिवास हा वने, गवताळ प्रदेश आणि पठारांनी बनलेला आहे. येथील पठारांना स्थानिक भाषेत सडा असे म्हटले जाते. हे सडे लॅटराइट (जांभा दगड) स्वरूपाचे असून अधिवासाच्या दृष्टीने अत्यंत मौल्यवान आहेत.

चांदोली राष्ट्रीय उद्यानातील उतार कमी तीव्र असून तिथे लहान जलसाठे आणि अनेक 'इकोटोन' क्षेत्रे (दोन परिसंस्थांच्या मधला भाग) आहेत. या व्याघ्र प्रकल्पाचे सर्वात वैशिष्ट्यपूर्ण अंग म्हणजे येथील सडा (पठार). यावर बारमाही वनस्पती कमी असल्या तरी टोकावर कडे आणि दाट काटेरी झुडपे आहेत.

### **वनस्पती** (Flora)

१. पश्चिम (मॉन्टेन) उपोष्णकटिबंधीय डोंगरी जंगले: सह्याद्रीच्या १००० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या रांगांवर ही जंगले आढळतात. यांची वाढ खुंटलेली असते



२. पश्चिम किनारपट्टी निम-सदाहरित जंगले: ही जंगले दऱ्यांमध्ये मर्यादित असून झाडांची उंची १२ ते २० मीटर असते. येथे समृद्ध प्राणी आणि वनस्पती जीवन आढळते.

३. दक्षिण दमट मिश्र पानझडी जंगले: ही जंगले सह्याद्रीच्या खालच्या उतारावर आढळतात.

येथे कारवी, बांबू, कुंभळ यांसारख्या चाऱ्याच्या प्रजाती कमी असल्या तरी तोरण (Zizyphus rugosa), उंबर (Ficus racemosa), गेळा (Sideroxylon tomentasa), आळू (Vangueria spinosa), हिरडा (Terminalia chebula), बेहडा (Terminalia bellerica), आवळा (Emblica officinalis), करवंद (Carissa congesta) यांसारख्या फळांच्या प्रजाती मुबलक प्रमाणात आहेत.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प हे एकमेव ठिकाण आहे जिथे पारिस्थितिकीय अनुक्रमणानुसार अंतिम अवस्थेच्या जवळ पोहचलेली वनस्पती समुदाय रचना असलेल्या वनस्पती मुबलक प्रमाणात आढळतात आणि येथे भविष्यात प्रतिकूल मानवी प्रभावाची शक्यता कमी आहे.

### **प्राणीसृष्टी** (Fauna)

हा व्याघ्र प्रकल्प वाघ, जंगली कुत्रा (ढोल) आणि बिबट्या यांसारख्या संकटग्रस्त मांसाहारी प्राण्यांचे निवासस्थान आहे. शाकाहारी प्राण्यांमध्ये गवा, सांबर, भेकर, पिसुरी हरीण

(Mouse Deer) आणि शेकरू (Giant Squirrel) यांचा समावेश होतो. येथे सस्तन प्राण्यांच्या ३० प्रजाती, गिधाडे, मगरी आणि ५८ प्रकारचे साप आढळतात. कोयना जलाशयात 'निळ्या पंखांचा महाशीर' हा मासा आढळतो. टलस मॉथ, मून मॉथ आणि अनेक दुर्मिळ फुलपाखरांची नोंद येथे झाली आहे.

**व्याघ्र भ्रमणमार्ग (टायगर कॉरिडॉर)**

उत्तर पश्चिम घाटातील वाघांची संख्या राधानगरी अभयारण्यामार्गे गोव्याशी आणि पुढे दक्षिणेकडे कर्नाटकातील अंशी-दांडेली व्याघ्र प्रकल्पाशी जोडलेली आहे. आंबा आणि राधानगरी दरम्यान ५ वनक्षेत्रांना 'मिनी-कोर' क्षेत्र म्हणून ओळखले जाते:

१. गेलवडे धरण ते अणुस्कुरा
२. बारकी
३. वाशी - पाडसाळी
४. कोदे - आसळज - वेत्रफ
५. गगनबावडा - पदमसती

यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील गावे (ओझरे, कोळवण, बामणोली, दख्खन) आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यातील गावांचा (ढोणे, दिंडवडे, तळीये) वरचा डोंगराळ भाग येतो.

**सह्याद्रीतील वाघांची वर्तमान स्थिती**

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची स्थापना झाल्यापासून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये आत्तापर्यंत तीन नर वाघ स्थिरावले असून त्यांना व्याघ्र प्रकल्पामध्ये सुभेदार (STRT1), सेनापती (STRT2) आणि बाजी (STRT3) अशी नावे देण्यात आली असून सदर वाघांपैकी सेनापती हा वाघ चांदोली राष्ट्रीय उद्यानामध्ये स्थिर झालेला असून, बाजी हा वाघ कोयना अभयारण्यात आढळून येत आहे तसेच सुभेदार हा वाघ सुद्धा या दोन्ही अभयारण्याच्या सीमांवर आढळून येतो.

**प्रकल्पाच्या बाहेरील वाघांचा वावर**

व्याघ्र प्रकल्पाबाहेर असणारा वाघांचा अधिवास हा महाराष्ट्रासमोर मानव-व्याघ्र संघर्षाच्या दृष्टीने सद्यस्थितीत अस्तित्वात असणारा मोठा प्रश्न आहे. विदर्भातील व्याघ्र प्रकल्पाप्रमाणेच सह्याद्रीमध्येही व्याघ्र प्रकल्पाबाहेरील क्षेत्रामध्ये वाघांचा अधिवास आणि वावर असल्याचे समोर आले आहे. खास करुन सह्याद्रीमधील 'राधानगरी वन्यजीव अभयारण्य' ते 'तिलारी कॉन्झर्वेशन रिझर्व्ह'दरम्यानच्या वनपट्ट्यांमध्ये वाघांचा अधिवास केंद्रीत झाला आहे. २०१९ मध्ये राधानगरी अभयारण्यामध्ये एका नर वाघाचे छायाचित्र कॅमेरा ट्रॅपमध्ये टिपण्यात आले आहे. 'आजरा-भुदरगड कॉन्झर्वेशन रिझर्व्ह' दरम्यानही २०२० मध्ये वाघाचा वावर निदर्शनास आला आहे. तसेच राधानगरी ते तिलारी वनक्षेत्रादरम्यान नर वाघाचे छायाचित्र कॅमेरा ट्रॅपमध्ये कैद झाले आहे. त्यामुळे राज्यातील इतर व्याघ्र प्रकल्पाप्रमाणेच सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्राबाहेर वाघांचा अधिवास असल्याचे स्पष्ट झाले असून राधानगरी ते चांदोली राष्ट्रीय उद्यानादरम्यान असलेला व्याघ्र भ्रमणमार्ग सुरक्षित करणे आवश्यक आहे.

**चांदोली ते कालीदरम्यान भ्रमणमार्ग**

महाराष्ट्र आणि कर्नाटक दरम्यान पश्चिम घाटामध्ये व्याघ्र भ्रमणमार्ग अस्तित्वात असल्याचा पुरावा समोर आला आहे. वन विभागाला 'सह्याद्री व्याघ्र प्रकल्पा'मधील चांदोली अभयारण्यात २०१८ साली २३-२४ मे रोजी नर वाघाचे छायाचित्र कॅमेरा ट्रॅपमध्ये टिपण्यात यश मिळाले होते. 'सह्याद्री व्याघ्र प्रकल्पा'च्या स्थापनेनंतर प्रथमच प्रकल्पात नर वाघाच्या अस्तित्वाचा छायाचित्रित पुरावा हाती लागला होता. मधल्या दोन वर्षांच्या काळात प्रकल्पात या वाघाचा वावर आढळून आला नाही. मात्र, मे २०२० मध्ये हा प्रौढ वाघ (टी-३१) कर्नाटकातील 'काली व्याघ्र प्रकल्पा'चा भाग असलेल्या दांडेली अभयारण्यात आढळला. या वाघाने या दोन्ही वनक्षेत्रांदरम्यान साधारपणे २१५ किमी स्थलांतर केले. त्यामुळे चांदोली राष्ट्रीय उद्यान, राधानगरी अभयारण्य, तिलारी राखीव संवर्धन क्षेत्र, भिमगड अभयारण्य आणि 'काली व्याघ्र प्रकल्पा'दरम्यान व्याघ्र भ्रमणमार्ग अस्तित्वात असल्याचे सिद्ध झाले आहे

**तिलारी प्रजनन केंद्र**

तिलारी परिसरातील २९.५३ चौ.किमी राखीव वनक्षेत्र 'कॉन्झर्वेशन रिझर्व्ह' म्हणून घोषित करण्यात आले आहे. यामध्ये बांबर्डे, घाटिवडे, केंद्रे, केंद्रे बुद्रुक, पाटिये, शिरंगे, कोनाळ, ऐनवडे, हेवाळे आणि मेढे या गावातील राखीव वनक्षेत्र आहे. 'सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाला' जोडणाऱ्या व्याघ्र भ्रमणमार्गामधील तिलारी हे महत्त्वाचे क्षेत्र आहे. कारण या परिसरात वाघांचे प्रजनन होते. तिलारी परिसर हा महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक या तीन राज्यांच्या सीमेवर स्थित आहे. गोव्यातील म्हादाई अभयारण्य, कर्नाटकातील भीमगड अभयारण्य आणि तिलारी राखीव संवर्धन हे तीन क्षेत्र वन्यप्राण्यांच्या दृष्टीने विशेषत: वाघांच्या भ्रमणमार्गाकरिता अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडते. कर्नाटकातील भीमगड आणि गोव्यातील म्हादाई अभयारण्यामधून वाघांचे स्थलांतर तिलारीमध्ये होते. त्यामुळे तिलारी परिसरात कायमस्वरुपी वाघांचा अधिवास असून सह्याद्रीमधील व्याघ्र अधिवासाकरिता हा परिसर अत्यंत महत्त्वाचा आहे.

**सह्याद्रीतील व्याघ्र संवर्धन उपक्रम**

खासगी वनक्षेत्र आणि खाणकामामुळे तुटलेला सह्याद्रीमधील व्याघ्र भ्रमणमार्ग जोडण्यासाठी वन विभागाने या भूप्रदेशामध्ये 'संवर्धन राखीव वनक्षेत्रां'ची म्हणजेच 'कॉन्झर्वेशन रिझर्व्ह'ची निर्मिती केली आहे. त्यानुसार साताऱ्यातील जोर जांभळीपासून सिंधुदुर्गमधील तिलारीपर्यंत एकूण आठ 'कॉन्झर्वेशन रिझर्व्ह'ची

निर्मिती करण्यात आली आहे. या क्षेत्रासंबंधी समजून घ्यावयाचे झाल्यास, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या (कोयना-चांदोली) उत्तरेला 'जोर जांभळी कॉन्झर्वेशन रिझर्व्ह' (६,५११ हे) आरक्षित करण्यात आले आहे. चांदोली राष्ट्रीय उद्यान ते राधानगरी वन्यजीव अभयारण्यादरम्यान असलेला महत्त्वपूर्ण व्याघ्र भ्रमणमार्गाला जोडण्यासाठी तीन 'कॉन्झर्वेशन रिझर्व्ह'ची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये कोल्हापूरमधील विशालगड (९,३२४ हे), पन्हाळा (७,२९१ हे), गगनबावडा (१०,५४८ हे) 'कॉन्झर्वेशन रिझर्व्ह'चा समावेश आहे. राधानगरी अभयारण्य ते तिलारी दरम्यानचा व्याघ्र भ्रमणमार्ग संरक्षित करण्यासाठी आजरा-भुदरगड (२४,६६३ हे), चंदगड (२२,५२३ हे), आंबोली-दोडामार्ग (५,६९२ हे) आणि 'तिलारी कॉन्झर्वेशन रिझर्व्ह' आरक्षित करण्यात आले आहे.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये वाघ स्थिरावल्यानंतर येथे वाघांचे खाद्य असणाऱ्या तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढवण्याचे प्रयत्न वनविभागाकडून मोठ्या प्रमाणावर होत आहेत. त्यासाठी तृणभक्षी प्राण्यांसाठी कुरणे विकसित करण्याचा कार्यक्रम सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात राबवण्यात आला. यामुळेच सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये गवे, सांबर, पिसुरी, हरण यासारखे स्थानिक तृणभक्षी प्राणी मोठ्या प्रमाणावर स्थिरावले आहेत.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये चितळ, भेकर अशा हरीण प्रजातीतील प्राण्यांची संख्या वाढवण्यासाठी सागरेश्वर अभयारण्यातून या प्राण्यांचे कळप सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये सोडण्यात आले आहेत.

नैसर्गिक अधिवास बघता या व्याघ्र प्रकल्पामध्ये सुमारे ३५ ते ३७ वाघ सामावून घेऊ शकतात एवढी सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची क्षमता 'वाईल्ड लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'च्या शास्त्रज्ञांनी घोषित केली.

या व्याघ्र प्रकल्पामध्ये असणारे तीनही वाघ हे नर वाघ असल्यामुळे या व्याघ्र प्रकल्पामध्ये वाघिणी असतील तर हे वाघ कायमस्वरूपी स्थिरावू शकतात या शक्यतेमुळेच या व्याघ्र प्रकल्पामध्ये राज्यातील इतर व्याघ्र प्रकल्पांमधून वाघिणी स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव देण्यात आला.

**भारतातील वाघांचे स्थलांतर**

भारतातील वाघांचे स्थलांतर हे एक प्रमुख संवर्धन धोरण आहे, जे प्रामुख्याने राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) द्वारे प्रोजेक्ट टायगरअंतर्गत व्यवस्थापित केले जाते, ज्याचा उद्देश वाघांची अनुवांशिक विविधता वाढवणे, वाघांची जास्त लोकसंख्या व्यवस्थापित करणे आणि कमी लोकसंख्या असलेल्या अभयारण्यांमध्ये वाघांची संख्या पुनर्संचयित करणे आहे, ज्यामध्ये आंतरराज्यीय हस्तांतरण (जसे की मध्य प्रदेश ते राजस्थान) आणि अंतर्गत हालचालींचा समावेश आहे.

**वाघांच्या स्थलांतराची प्रमुख कारणे**

*अनुवांशिक विविधता:* अंतर्प्रजनन रोखण्यासाठी वेगळ्या व्याघ्र लोकसंख्येमध्ये नवीन वाघांचा परिचय करून देणे.

*लोकसंख्या व्यवस्थापन:* प्रादेशिक संघर्ष कमी करण्यासाठी उगमस्थानाच्या क्षेत्रात वाघांची उच्च घनता कमी करणे.

*अधिवास पुनर्संचयित करणे:* ऐतिहासिकदृष्ट्या वाघांनी समृद्ध असलेल्या भागात वाघांची पुनर्बांधणी करणे जिथे वाघांची संख्या कमी झाली आहे.

*पर्यावरणीय संतुलन:* मुख्य क्षेत्रांमधील गावे स्थलांतरित करून वाघांसाठी अभेद्य जागा निर्माण करणे.

*मानव वन्यजीव संघर्ष कमी करणे:* ज्या ठिकाणी वाघांची संख्या जास्ती आहे अशा भागातील वाघ इतर भागात स्थलांतरित केल्यामुळे वाघ आणि माणूस यांच्यातील संघर्ष कमी करता येऊ शकतो तसेच ज्या अभयारण्यांमध्ये वाघांची संख्या कमी असते तेथील तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढून ते मानवी वस्तीत येण्याचा धोका वाढतो, त्यामुळे अशा ठिकाणी वाघांचे स्थलांतर केल्यामुळे तृणभक्षी प्राण्यांची संख्या नियंत्रित करता येते व त्यांचा मानवी वस्तीतील वावर कमी करता येतो.

**'ऑपरेशन तारा'**

व्याघ्रगणनेच्या २०२२ च्या अहवालात सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात सध्या एकही वाघ नाही, असे नमूद होते. त्यामुळे राज्याच्या वन खात्याने पहिल्या टप्प्यात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघांना सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात सोडण्याची योजना आखली. हा प्रस्ताव राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडे गेला आणि दीड वर्षांपूर्वी परवानगी मिळाली. मात्र, प्रस्तावात तीनवेळा त्रुटी निघाल्या. त्या दूर करून पुन्हा हा प्रस्ताव केंद्राकडे पाठवण्यात आला.

केंद्रीय मंत्रालयातील उपमहासंचालक (वन्यजीव) डॉ. सुरभी राय यांनी राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एम. श्रीनिवास राव यांना पत्र पाठवून पश्चिम घाटातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघांच्या स्थलांतराला अखेर केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने हिरवा कंदील दाखवल्याचं कळवलं. तसंच ताडोबा-अंधारी आणि पेंच व्याघ्र प्रकल्पातून तीन नर आणि पाच मादी, आठ वाघांना जेरबंद करण्याची परवानगी देण्यात आली आणि सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात ऑपरेशन तारा ला सुरुवात करण्यात आली.

*सह्याद्रीतील स्थानांतरणासाठी ताडोबातील वाघिणीची निवड कशी करण्यात आली?*

ताडोबातून 'सह्याद्री व्याघ्र प्रकल्पा'त वाघिणीचे स्थानांतरण करण्यासाठी सर्वप्रथम काही निकष ठरवण्यात आले. हे निकष 'भारतीय वन्यजीव संस्थान'चे (डब्लूआयआय) संशोधक आणि 'सह्याद्री व्याघ्र प्रकल्पा'तील अधिकारी यांनी

एकत्रितरित्या बसून निश्चित केले. या निकषामधील प्रमुख निकष होता की, याठिकाणी अशा वाघिणीचे स्थानांतरण करणे, जी निमवयस्क अवस्थेतून प्रौढावस्थेत आलेली आहे. साधारण वाघाची पिल्ले ही एक ते दीड वर्षानंतर शिकार करण्यास सुरुवात करतात. दोन वर्षांनंतर निमवयस्क वाघ हे स्वतःची हद्द प्रस्थापित करणे वा स्वतंत्र शिकार करण्यास सज्ज असतात आणि तीन वर्षांपासून पुढे ते लैगिंकदृष्ट्या प्रजनन करण्यास सक्षम होतात. त्यामुळे आपल्याला नुकतीच प्रजनन करण्यासाठी सक्षम झालेली वाघीण आणायची होती. जेणेकरून 'सह्याद्री व्याघ्र प्रकल्पा'त सद्यस्थितीत प्रजननास सक्षम असणाऱ्या वाघासोबत ती लवकरात लवकर प्रजनन करू शकेल या सगळ्याचा विचार करून आम्ही सह्याद्रीतील व्याघ्र स्थानांतरणासाठी आवश्यक असणाऱ्या वाघिणीच्या वयाचा निकष हा तीन वर्षांचा ठेवला. याशिवाय 'सह्याद्री व्याघ्र प्रकल्पा'त वाघांसाठींचे मुख्य अन्न हे गवा आणि सांबर आहे. त्यामुळे ताडोबातील ज्या भागात गवा आणि सांबरांची संख्या जास्त आहे, त्या भागात या प्राण्यांची शिकार करणाऱ्या वाघिणीला पकडण्याचा निकष ठेवण्यात आला.


**विभुती चव्हाण (११ वी विज्ञान)**

**चंदा वाघीण :** ऑपरेशन ताराच्या पहिल्या टप्प्यात सुमारे तीन वर्षांची 'चंदा' (STRT 4) वाघीण ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पातील खाडसंगी परिसरातून NTCA च्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांनुसार बुधवारी १२ नोव्हेंबर रोजी सुरक्षितपणे पकडण्यात आली. तिची कागदपत्रे, वैद्यकीय तपासणी आणि शारीरिक क्षमता तपासल्यानंतर, बुधवारी रात्री १० वाजता तिला विशेष वन्यजीव वाहतूक वाहनातून सह्याद्रीकडे रवाना करण्यात आले. प्रवासात तिला योग्य पशुवैद्यकीय उपचारही देण्यात आले. वाघीण 'चंदा' शुक्रवारी, १४ नोव्हेंबर रोजी पहाटे १:३० वाजता चांदोली येथे पोहोचली. तिथे तिची पुन्हा वैद्यकीय आणि शारीरिक तपासणी करण्यात आली. त्यानंतर तिला सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील (core zone) एका हेक्टरच्या कंपाऊंडमध्ये 'सॉफ्ट रिलीज' (soft release) करण्यात आले. 'सॉफ्ट रिलीज' म्हणजे वाघिणीला लगेचच मोकळ्या जंगलात न सोडता, एका सुरक्षित कंपाऊंडमध्ये ठेवून तिला नवीन वातावरणाशी जुळवून घेण्याची संधी देण्यात आली. सदर वाघिणीचे चार दिवस निरीक्षण केल्यानंतर ती नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यासाठी योग्य असल्याचे आढळून आल्यानंतर दिनांक १८ नोव्हेंबरला विलग्नवासातील पिंजऱ्याचे दरवाजे उघडण्यात आले व दिनांक २० नोव्हेंबर रोजी चंदा वाघिणीने सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये स्वतःचा मुक्त संचार सुरू केला.

**तारा वाघीण :** यानंतर ऑपरेशन ताराच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोलारा कोअर रेंज, पांढरपौनी परिसरात ८ डिसेंबर रोजी सायंकाळी या वाघिणीला सुरक्षितपणे पकडण्यात आलं होतं. वाघीण पूर्णतः तंदुरुस्त, निरोगी व स्थलांतरास योग्य असल्याचे निदर्शनास आल्यानंतर तिला चांदोली राष्ट्रीय उद्यानात आणून सोनारली अनुकूलन कुंपणात सोडण्यात आलं. या वाघिणीला तारा असे संबोधण्यात येत असून तिचा सांकेतिक क्रमांक STRT5 असा आहे. या वाघिणीला विलग्न वासाच्या पिंजऱ्यात ठेवल्यानंतर तिथे सर्व निरीक्षण केल्यानंतर १२ डिसेंबर रोजी विलग्नवासाच्या पिंजऱ्याचे दरवाजे उघडण्यात आले. दिनांक १८ डिसेंबर रोजी सदर तारा वाघीण विलग्नवासाच्या पिंजऱ्यातून बाहेर पडली व तिने सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये मुक्त संचार करण्यास सुरुवात केली. या तारा वाघिणीने कोयना धरणाच्या जलाशयाचा सुमारे दीड किलोमीटरचा पट्टा पोहत जाऊन धरणाच्या पलीकडील पठारावर आपला प्रवास सुरू ठेवला.

दोन्ही वाघिणींच्या व्याघ्र प्रकल्पातील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांच्या गळ्यामध्ये रेडिओ कॉलर्स लावण्यात आलेले असून सदर व्हिडिओ कॉलर्समार्फत दर अर्ध्या तासाने वाघिणींची लोकेशन्स वनविभागाला समजते. त्यावरून वाघिणी कुठे आहेत याचा ठावठिकाणा लागतो. सदर रेडिओ कॉलरमुळे वाघिणींच्या दिनचर्या, त्यांचा व्याघ्र प्रकल्पातील वावर इत्यादी गोष्टी समजण्यास वन अधिकाऱ्यांना मदत होत आहे.

वाघांचे पुनर्वसन हे केवळ एका प्रजातीचे संरक्षण नाही, तर संपूर्ण परिसंस्थेचे आरोग्य सुधारण्यासाठी आवश्यक आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील वाघांची संख्या वाढल्यास त्याचा सकारात्मक परिणाम येथील वन्यजीव आणि पर्यावरणावर होईल. या प्रकल्पासाठी वन विभाग, वन्यजीव तज्ज्ञ आणि स्थानिक लोकांचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे. 'ऑपरेशन तारा' हे या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे आणि धाडसी पाऊल आहे.





# आयुष्यमान...!

**सुखदा गांवकर** (१२ वी कला)

**आरोग्याची उंच कमान**
**वाढवी आपुले जीवनमान ।।**

या उक्तीप्रमाणे आपले दिर्घायुष्य जगणं हे फक्त उत्तम आरोग्यावरच अवलंबून आहे.

उत्तम आरोग्य म्हणजे सर्वोत्तम जगणं होय. जर आपल्याला आयुष्यमान व्हायचे असेल तर आपले आरोग्य निरोगी असायला पाहिजे. निरोगी शरीरात निरोगी मन वास करते आणि निरोगी मनात निरोगी विचारांचा उगम होतो. हे विचार सकारात्मक, प्रेरणादायी असतात जे फक्त उत्तम आरोग्यातून मिळतात. आपल्या विकासाचा मूळ पाया आपले आरोग्य आहे. आपला आनंद, वर्तन, सहकार्य, प्रेम, भावना आणि माणुसकी या सर्वांचा संबंध आपल्या आरोग्याशी जोडलेला आहे.

उत्तम आरोग्य लाभले आम्हास झालो आम्ही धन्य! ही धन्यता अनुभवण्यासाठी आरोग्य सुदृढ असायला हवे. बदलत्या युगात आरोग्यावर परिणाम करणारे अनेक घटक आपल्या अवतीभोवती आहेत . त्यापैकी कोणत्या घटकांच्या आहारी आपण जातोय यावर तुमच्या शरीराची बांधणी अवलंबून असते. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक किंवा अतिवापर झाला की त्याचा परिणाम आपल्या जगण्यावर होतोच.... त्यामुळे प्रमाणात असावे सर्वकाही असे म्हणत चांगल्या सवयींचे संस्कारच आपणास निरोगी आयुष्य जगण्यास प्रेरित करतात. आपण आपल्या जगण्याकडे कसे पाहतो यावर खूप काही गोष्टी आधारलेल्या आहेत. म्हणजेच शारिरीक, मानसिक, भावनिक विकासासाठी आपल्या मनाची जडणघडण कशी होते याचा विचार करण्याची गरज सध्या या जलद् धावणाऱ्या जगाकडे पाहाताना वाटते. तरच आपल्याला सक्षमपणे घट्ट पाय रोवून ताठ मानेने आनंदाने जगता येईल; आपले आरोग्य आपल्याच हाती आहे असे वाटते. आपल्या आपल्या निरोगी आयुष्यासाठी नियम आखून त्याप्रमाणे वर्तन केल्यास आनंदाने जगता येईल.

**आरोग्याची कास धरु**
**आनंदाने जीवन जगू**
**निसर्ग नियमाचे पालन करू**
**आपले जगणं दिर्घायुष्यी करू ।।**

सकस आहार, नियमित व्यायाम, योग्य झोप, मानसिक शांती आणि सकारात्मक विचारसरणी या गोष्टी उत्तम आरोग्य टिकवण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आजच्या धावपळीच्या युगात तणाव, चिंता, असमाधान आणि अयोग्य जीवनशैलीमुळे अनेक आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागत आहे. म्हणूनच आपण वेळेवर जागरूक होणे गरजेचे आहे.

शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आणि सामाजिक आरोग्यसुद्धा तेवढेच महत्वाचे आहे. चांगले विचार, चांगली मैत्री, प्रेमळ नाती आणि समाजात सकारात्मक सहभाग हे मानसिक आरोग्यास पोषक ठरतात. जेव्हा एखादी व्यक्ती सर्वार्थाने तंदुरुस्त असते, तेव्हाच ती व्यक्ती खऱ्या अर्थाने यशस्वी आणि समाधानी जीवन जगू शकते.उत्तम आरोग्य हिच मानवाची खरी संपत्ती आहे. आपल्याकडे पैसा, सोने, बंगला, धनदौलत असली तरी त्याचा उपभोग घेण्यासाठी आपल्याला चांगल्या आरोग्याचे वरदान मिळणे आवश्यक आहे. म्हणूनच तर आरोग्य चांगले, उत्तम, निरोगी, सक्षम असायला हवे. आरोग्य आणि प्रसन्न मन यांचाही अगदी जवळचा संबंध आहे. लहानपणी देवापुढे दिवा लावल्यावर आपण एक प्रार्थना म्हणत होती. शुभंकरोती कल्याणम । आरोग्यम् धनसंपदा । मला वाटतं आजच्या युगात याच प्रार्थनेचा संस्कार प्रत्येकावर झाला पाहिजे तरच आपल्याला 'आयुष्यमान'होऊन जगता येईल.

**जो एकांतात राहू शकतो तो खरोखरच महान असतो.**



# गंगा आली रे अंगणी

**विदुला कुलकर्णी** (१२वी वाणिज्य)

**'गंगा आली रे अंगणी**
**लक्ष्मी आली रे अंगणी'**

गीताच्या या ओळीतून गंगेच्या पाण्याला लक्ष्मीची उपमा दिली आहे. पाणी म्हणजे अमृत .पाणी म्हणजे जीवन. पाण्यावाचून कोणताच जीव जगू शकणार नाही. कारण पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे.

पंचमहाभूतांच्या आधाराने साऱ्या सृष्टीची उभारणी झाली आहे. या पंचमहाभूतांपैकी एक म्हणजे जलतत्व होय. पाण्यामुळे निसर्ग हिरवागार राहतो, समृद्धी नांदते, सजीव सृष्टीला नवजीवन लाभते. ग्रामीण भागात नदया, तळी, आड, विहीर येथून पाणी उपलब्ध होते तर शहरात नळाद्वारे घरोघरी पाणी मिळू शकते. पाणी ही जीवनावश्यक बाब, पण पाण्याचा वापर नेमका कसा करावा हेच मानव लक्षात घेत नाही. यातून जल प्रदूषण होते. अथांग, निळाशार जलाशय मनाला मोहवितो, पण वाढती लोकसंख्या, वाढते शहरीकरण यामुळे पाण्याचे निर्मळ रुप बदलून जाते. जशी शहरे वाढली तशा उंच इमारती वाढल्या, पिण्याच्या पाण्याचे नळ घरोघरी गेले. सांडपाण्याचे एकत्रिकरण होऊन हे पाणी नदीच्या प्रवाहात सोडले गेले. औदयोगिकीकरणामुळे कारखाने वाढत आहेत. अनेक कारखान्यांतून रसायनयुक्त, जीवसृष्टीस घातक असे पाणी नदीमध्ये सोडले जाते हे जलप्रदुषण आहे.

पाण्यामुळे भूमी हरित होते. सुंदर होते. त्याचप्रमाणे जीवसृष्टी निर्मळ आणि स्वच्छ राहू शकते. मानव हा स्वच्छतेचा भोक्ता आहे; पण या स्वच्छतेच्या नादात तो नदीचे पाणी मात्र अस्वच्छ करतो. प्रदूषित करतो. नदीमध्ये कपडे धुणे, भांडी धुणे, जनावरे धुणे, आंघोळ करणे इत्यादीमुळे नदीचे पाणी दूषित होते. पाणवनस्पतीची अतिरिक्त वाढही पाणी खराब करते. पाण्यात टाकले जाणारे निर्माल्य, कचरा यासर्वांमुळे पाण्याचे रूप पालटते.

पाण्यात अनैसर्गिक, दूषित घटक मिसळण्याचे काम माणूस करतो. पाण्याचे स्वच्छ, निर्मळ आणि जीवनोपयोगी रुप बदलून त्या पाण्याला गंगेऐवजी 'गटारगंगा' बनविण्यास माणूस कारणीभूत आहे.

महात्मा गांधी म्हणतात, 'वर्तमानात आपण काय करतो त्यावर देशाचे भविष्य अवलंबून असते'. मानवाकडून होणाऱ्या जल प्रदूषणाचे परिणाम सर्व सजीवसृष्टीला भोगावे लागतात. दूषित पाण्यामुळे अनेक रोगांना निमंत्रण मिळते व जनजीवन धोक्यात येते. जलचरांच्या जीविताला धोका पोहोचतो.

पाणी म्हणजे अखिल जीवन आहे;म्हणून पाणी स्वच्छ व शुद्ध ठेवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. जल प्रदुषणाचे चित्र पाहिल्यानंतर ते टाळण्यासाठी प्रत्येकाने कृतिशील व्हायला हवं. तरच म्हणता येईल, पाणी हेच जीवन

**मरण सोपे असते, जगण्यासाठी मात्र धैर्य लागते.**



# सय अंगणाची

– प्रा. अदिती कोकजे (अर्थशास्त्र विभाग)

मंडळी, कोकण म्हटलं की डोळ्यासमोर काही ठराविक गोष्टी उभ्या राहतात. हल्लीच्या पद्धतीप्रमाणे म्हटलं तर जशी सोशल मिडियावरची रील्स झपकन डोळ्यासमोरून जातात ना अगदी तस्संच कोकणाचं नाव काढलं की कोकणातल्या अनेक गोष्टी, प्रथा, परंपरा, कथा, माणसं डोळ्यासमोर उभी राहतात. कोकणातली कौलारू घरं, फणसासारखी वरून काटेरी आणि आतून गोड माणसं, त्यांचे अनेक किस्से, अंगणातल्या गोष्टी, वाळवणा–सुकवणांचे कार्यक्रम, नारळी– पोफळींच्या हकीगती आणि काय काय किती किती सांगू! मात्र या वरच्या यादीतील एक गोष्ट माझ्या स्वतःच्या अत्यंत जवळची आहे आणि ती म्हणजे कोकणातलं गजबजलेलं अंगण! अंगणातल्या गप्पा, तिथे केलेले अनेक श्रमपरिहार आणि बरंच काही. अंगण असलेलं घर आणि त्या घरात राहणाऱ्या व्यक्ती किती भाग्यवान नई? खरंच असं मनापासून वाटतं की प्रत्येक घराला अंगण असावं. अर्थात, प्रत्येक वेळी हे शक्य होईलच असं नाही. पण मरू दे, आपल्याला वाटायला काय पैसे पडतायत? चांगल्या कल्पना करायला, त्यात रममाण व्हायला काय हरकत आहे? मंडळी तुम्हाला सांगते, अंगण आणि त्यासंबंधीच्या आठवणी पुष्कळ आहेत अगदी. अंगण म्हणजे एक प्रकारची मोठी संपत्तीच आहे असं वाटतं मला.

खेड्यामधलं कौलारू घर, दारासमोर नाना तऱ्हेची फुलझाडं, पक्ष्यांचा किलबिलाट, लांबलचक आणि भरमसाठ फांद्या असलेली चिंच, वेड्यावाकड्या वाकलेल्या नारळी पोफळी, या सगळ्या गोष्टी वेगवेगळ्या बाजूने बघता येण्यासाठी अनेक वर्ष दारासमोर ताठ मानेने उभं असलेलं म्हणजे ते अंगण. बरं ते अंगण करायचे कष्टही तितकेच महत्त्वाचे आहेत. तोंडून म्हटलं आणि पटकन झालं असंही नव्हे. आधी माती टाकून जमीन करायची, चोपण्याने ती चोपायची, पाण्याचा हबका मारून ती बसवायची, आणि सगळं झाल्यानंतर ती शेणाने सारवायची याला वेगळच कौशल्य लागतं. मला चांगलं आठवतंय शेणाचा वास घेणं म्हणजे भयंकर वाटे. अगदी शेण आहे तिथे वास वाऱ्याला पण उभं राहू नये. पण मग हळूहळू सवय झाली. कधी तरी हाताने सारवायचं, कधी वाढवणीने सारवायचं. दर आठवड्याला, सण वारी आदल्या दिवशी ठरलेला उद्योगच हा! अंगण सारवणे. सारवून झालं रे झालं की रांगोळीचं भांडं हातात दिसलंच पाहिजे. काय इकडे तिकडे फिराल तुम्ही? घेतलेलं काम वेळेच्या वेळेतच पूर्ण करायचं, तेही त्याच्या सगळ्या तपशीलांसकट हा शिरस्ताच! अंगण सुखायला लागलं की लगेचच सुंदर अशी छोटीशी का होईना पण रांगोळी काढायची. निरनिराळे रंग भरायचे. हळदी कुंकू घालायचं. कोपऱ्यात एखादी सुवासिक उदबत्ती लावायची की बघा.... झालं..... अंगण कसं शोभून दिसतं. अगदी टिको – मिको केलेल्या लहान बाळासारखं.

खरं सांगायचं तर, नुसती माणसंच नव्हे तर अगदी पाळीव प्राणीसुद्धा या अंगणात पहुडायला आतुर असतात. एखाद्या झुकलेल्या झाडाच्या फांदीखाली उन्हाच्या कवडशात मनी माऊला ऐटीत झोपायला आवडतं. कुत्रेसुद्धा घराचं रक्षण करायला अंगणाच्या तोंडाशीच बसून राहतात. अंगणाच्या एका कोपऱ्यात ठेवलेलं, सुंभाने विणलेलं बाजलं म्हणजे सगळ्या गजालींची साक्ष देतं. खुर्चीपेक्षा या बाजल्यावर बसायला, रेलायला, लोळायला कशी मौज वाटते. बाजलं हे अंगणातच शोभून दिसतं. त्याची मजा अंगणातच. माणसांच्या अनेक पिढ्या या अंगणात घडल्या आहेत. नांदल्या आहेत. सुखदुःख कशी एकत्रितपणे अनुभवली आहेत. एप्रिल–मे महिन्यामध्ये कोकणमेवा खाण्याची आणि त्याचा आनंद अनुभवण्याची खरी मज्जा ही अंगणातच येते. भुताखेतांच्या गोष्टी ऐकत, जुन्या पिढीचे किस्से ऐकत कधी या अंगणात वेळ जातो पत्ताही लागत नाही. गोणपाट भरून झाडपिके आंबे गोळा करून आणायचे, अंगणाच्या एका कोपऱ्यात विळी घेऊन आंबे कापायला बसायचं की लगेच समोर आंबे खाणाऱ्या माणसांची रीघ लागते. आंबे खाण्याच्या बाबतीत वानरांना स्पर्धा देणारी आमची माणसं भराभर केव्हा सगळे आंबे फस्त करून टाकतात त्याचा पत्ताही नाही लागत. कापे फणस, बरके फणस खायला सगळ्यांनाच आवडतात. पण ते खाण्यायोग्य करणं, हे मात्र अतिशय क्लिष्ट काम. अंगणात एखादी पोतळी घालून दिली आणि फणसाच्या चार शेडी काढून दिल्या की काम कसं सोप्पं होतं. या सगळ्या

सर्वसाधारण व्यक्ती सुप्त मेंदूचा केवळ १० टक्केच वापर करतो.

कामांना घरात थारा नाही हो! आंबा खाताना, मनसोक्त चाखताना शर्टावर कपड्यांवर एकही डाग पडला नाही असं होणारच नाही. फणस सोलताना त्याचा चिक लागला नाही असं होणारच नाही. म्हणूनच या सगळ्या उपक्रमांची योग्य जागा म्हणजे अंगण. तिथे काही सांडलं, उतू गेलं, पडलं तरी कशाचीच खंत नसते. ते लगेच मातीमोल होऊन जातं. जमिनीच्या मुखी लागतं. घरातल्या पॉश भिंतींना याची मजा ठाऊक नाही.

खाण्यापिण्यावरून आठवलं, अंगणातला श्रमपरिहार हा न विसरण्यासारखाच. घरातलं एखादं मोठं कार्य झालं की सगळ्या मदतनीसांना दिलेली एक छोटीशी खाद्य भेट म्हणजे श्रमपरिहार. हा श्रमपरिहार करण्याची उत्तम जागा कुठली असेल तर ती म्हणजे अंगण. चुलीत भाजलेले कांदे, चुलीवर भाजलेलं खोबरं, तयार केलेला ताजा मसाला, अंगणाच्या मागच्या बाजूला पटकन तीन दगड मांडून तयार केलेली चूल, त्या चुलीवरची गरम मसाल्याची आमटी, चुलीवरचा फडफडीत भात, कवडीचं दही, आलं मिरची कोथिंबीर लावलेलं ताक, विहिरीचं थंडगार पाणी आणि या सगळ्या थाटासोबत अंगणात जमिनीवर बसून जेवणाचा घाट ! बास आणखी काय हवं आयुष्यात? ज्या मातीतून वर आलो त्याच मातीत बसून जेवण्याचं सुख काही औरच आहे. भर उन्हाळ्यातदेखील शेणाने सारवलेल्या मातीचा थंडावा, आकाशाच्या छपराखाली AC ऐवजी चंद्राची शीतलता याला कशाचीच उपमा नाही. आता एवढी सोबर परिस्थिती असताना बारीक बारीक डास, किडे आले तर नवल नव्हे! बारीकशी धुरी केली की या सगळ्या अडचणींवर उतारा होतो. कधी गरम मसाल्याची आमटी, कधी भजी, कधी आमरसपुरीचा बेत, कधी भाकरी–भाजीचा बेत या सगळ्याला अंगणाची साथ असेल तर काय बिशाद भूक नाही म्हणायची. पैरी, गडी माणसं, अगदी घरातली माणसं, नातेवाईक या सगळ्यांचं एकत्रित जमून गोष्टी मारण्याचं ठिकाण म्हणजे अंगण. अंगणात उभ्या उभ्या बोलायला काही वाटत नाही की पाय दुखत नाहीत. जातीणीवर बसलं की ओवी आठवते तसं अंगणातल्या पायरीवर बसलं की चाय प्यायची आठवते. मग घरातल्या वैनीला साद घातली की चायची सोय झालीच समजा. एकदा का चाय हातात आली की बारा गावच्या बातम्या तुमच्यासमोर हजर.

अनेक पिढ्यांची सुख दुःख, बालपणं या अंगणाने पाहिली आहेत. आताच्या नवीन पिढीला हे सुख मिळेल का? अंगणातल्या भावना अनुभवता येतील का? कॉंक्रीटच्या जंगलात अंगणाचं अस्तित्व टिकेल का? रिल्सच्या दुनियेत वेगाने पळणारा माणूस अंगणातल्या घटनांकडे थोडं सावकाशीने बघेल का? अंगणाशी जोडलेल्या भावनांचा त्याला मागमूस लागेल का? तसं म्हटलं तर हा प्रश्न अनुत्तरित राहणार नी म्हटलं तर आपणच उत्तर देणार! कितीही नवीन यंत्रणा आली तरी अंगणाची महती कमी होणार नाही हे मात्र खरं!

# पुढे जाणे तू थांबवू नको!

**दीक्षा मोहिते** (११ वी कला)

**चालणे कुणा चुकले नाही,**
**चालणे तू थांबवू नको.**
**वाटेवर काटे आले म्हणून चालायचे तू सोडू नको.**
**खोट्याला जवळ घेऊन सत्याला दूर लोटू नको.**
**आयुष्य म्हणजे एक ऋतूचक्र एका ऋतूत अडकून पडू नको.**
**तुझा प्रवास असला कितीही कठीण तरी**
**तुझा निर्धार ढळू देऊ नको.**
**अपयश म्हणजे यशाची पायरी,**
**पुढे जा तू स्वतःस थांबवू नको!**





# निसर्गाची कुजबुज

**फरहीन अन्सारी** (११ वी विज्ञान)

**पहाटेच्या श्वासात मातीचा गंध,**
**सूर्यकिरणांत विरघळलेले स्वप्नसंध ।**
**पानापानांतून वारा जे सांगतो,**
**ते शब्दांपेक्षा खोल कुठे तरी जातो ।**

**नदी वाहते प्रश्न न विचारता,**
**डोंगर उभा राहतो काळाला थांबवता ।**
**पक्ष्यांचे सूर, ढगांची चाल,**
**निसर्ग शिकवतो जगण्याचा ताल ।**

**मी थांबलो क्षणभर, ऐकू लागलो,**
**निसर्ग म्हणाला – तूही माझाच भाग आहेस।**




समिक्षा घाणेकर (१२ वी कला)

आरोग्य हेच खरे धन
जपा ते आहे अनमोल रत्न
शरीर निरोगी, मन प्रसन्न,
तेथेच सापडे जीवनधन.

सोनं, चांदी, पैसा, दागिना,
सगळं काही आहे क्षणभंगुर खजिना पण शरीर जर झाले
अशक्त, आजारी, तर वैभवाचं रूप होत फिक्कट, हताश भारी.

तंदुरुस्तीतच दडलेय सामर्थ्य सारे घडतात स्वप्नांचे गगनचुंबी
मनोरे
जो मनुष्य आरोग्य सांभाळतो
तोच जीवनाच्या प्रत्येक लढाईत जिंकतो.

व्यायाम, प्राणायाम, स्वच्छ आहार यातूनच जपतो आपण
जीवनसंसार सद्गुणी सवयी, मनशांतीचा आधार, घडवतात
आपल्याला सुखाचा संचार

आजारांपासून दूर स्वतःला ठेवा
स्वच्छतेला जीवनमंत्र बनवा
निरोगी मन आणि शरीर मिळाले,
की खरे सुखाचे दार उघडले.

लक्षात ठेवा एक सत्य
आरोग्य हेच आहे खरे धन,
याहून नाही काही मोठं.

निरोगी राहणे हीच खरी संपत्ती
जपा तिला, वाढवा जीवनशक्ती.

# आरोग्यम् धनसंपदा

सानिका गोवळकर (१२ वी वाणिज्य)

आरोग्य ही संपत्ती अनमोल,
तर राहील जीवनाचा तोल
रोज सकाळच्या शुद्ध हवेचा श्वास,
देई जीवनाला नवचैतन्याचा ध्यास

योगासने, जोड व्यायामाची
शरीराला बलसौष्ठव करण्याची
समतोल आहार, भरपूर पाणी
उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली खरी

विचार करा नेहमी सकारात्मक,
ताणतणावापासून रहा दूर हे आवश्यक
हसणे - खेळणे, आनंदी जीवन,
आरोग्याचे हेच खरे लक्षण

आरोग्य चांगले, मनही प्रसन्न,
जीवनातील प्रत्येक क्षण होईल रम्य
आरोग्याची काळजी घ्या नेहमी,
सुखी जीवन हीच गुरुकिल्ली खरी!





# मुखवटे

दीक्षा मोहिते (११ वी कला)

कोणीतरी बोलायला हवचं का सतत,
मी एकटी नाही का राहू शकतं?
असं वाटतं सतत कोणीतरी सोबत असावं,
मला एकटीला सोडून कोणीही कुठेही न जावं.
पण मला हे असं का बरं वाटतं?
एकटेपण खरचं इतकं वाईट असतं...?

आजकाल आयुष्यात माणसांची इतकी सवय झाली आहे की....
त्यांच्याशिवाय माझं आयुष्यचं अपूर्ण आहे असं वाटू लागलंय.
सतत कुणाचातरी सहवास, सतत कोणाचीतरी बडबड
ह्या गोष्टींचीं इतकी सवय लागलेय की
स्व चा आवाज नकोनकोसा वाटतो.

कधी कधी मनात एक प्रश्न डोकावून जातो की
खरंच किती गुंतलेय मी इतरांमध्ये
पण ते इतर तर सगळे माझेच आहेत? मग हरकत काय आहे.
माणसांमध्ये गुंतणं फार वाईट असं म्हणतात.
अहो पण आपली माणसं आपल्याला कुठे काय करतात.
उलटं ती तर कायम आपल्या सोबतं असतात
अन....
गरज संपल्यावर मात्र कायमची सोडून निघून जातात.
एका क्षणात सगळे आपले परके होऊन जातात.
सोबतीच्या वाटेवर सगळे परके भेटतात.
माणसं निघून जातात पुढे

पण मुखवटे मागे राहतात....



# आयुष्य

दीक्षा मोहिते (११ वी कला)

जन्माला येताचं एक गोष्ट समजली.
आपण इतरांपेक्षा थोडे वेगळे आहोत ह्याची जाणीव झाली.
कोण म्हणतं सर्व माणसं एकसमान असतात.
अहो ! कुणी असतात श्रीमंत तर कुणी गरीब असतात.

जेव्हा लहानग्या वयातचं अंगावर जबाबदारी पडते.
तेव्हा इच्छा मरण पावतात आणि मन कठोर बनते.
डोक्यावर छप्पर नसतं, की घालायला कपडे .
अश्रूंनी भरले जातात भुकेलेल्या पोटाचे खळगे.

उन्हाचे हे चटके काळजाला लागतात.
परिस्थितीच्या पावसात स्वप्न वाहून जातात.
गोठतात ह्या भावना आणि विचार गळून पडतात.
आम्हां गरीबांचे ऋतु हे असेच काहीसे असतात.

काय करावं ह्या परिस्थितीचं काही दिलं नाही म्हणून रडावं की
सगळं काही कसं मिळवाव हे शिकवलं म्हणून हसावं.
कोण आपलं कोण परकं परिस्थिती शिकवते.
अन्नाच्या एका कणालाही खूप तरसवते.

परिस्थिती म्हणजे काय हे कळणाऱ्यालाचं कळते.
काश! कळले असते सगळ्यांना तर
आज प्रत्येकाचे आयुष्य चांगले असते.




**मुक्ता जोशी**
**(१२ वी विज्ञान)**




# इंटरनेटचे मायाजाल

**-प्रा क्षमा पुनसकर** (मराठी विभाग)

गरज ही शोधाची जननी आहे असं म्हणतात. माणसाला ज्या ज्या गोष्टीची गरज निर्माण झाली ती गरज पूर्ण करण्यासाठी माणसाने नवनवीन शोध लावले. माणसाशी केव्हाही आणि कुठेही संपर्क करता यावा या गरजेतून मोबाईलचा शोध लागला. तंत्रज्ञान विकसित झाल्यावर मोबाईलला इंटरनेटची जोड मिळाली. सुरवातीला मोबाईल आणि इंटरनेट दोन्हीही गरजेपुरतेच वापरले जाऊ लागले.

कालांतराने मोबाईल कंपन्यांमध्ये स्पर्धा वाढली. अधिक ग्राहक मिळवण्याच्या हेतूने मोबाईल कंपन्या कमी पैशात अधिक सुविधा देऊ लागल्या. त्यातलीच एक सुविधा म्हणजे मोबाईल डाटा. सुरवातीला जास्त पैशात कमी मोबाइल डाटा मिळत असल्यामुळे इंटरनेचा वापर मर्यादित होता;पण कमी पैशात मोबाईल डाटा मिळण्याची सोय मोबाईल कंपन्यांनी आपला स्वार्थ साधण्यासाठी उपलब्ध करून दिला.

एका नाण्याला दोन बाजू असतात. या इंटरनेटचा वापर विधायक कामांसाठी जसा होतो तसाच तो विघातक कामांसाठी सुद्धा होतो हे आपणा सर्वानाच माहिती आहे. खरतर इंटरनेटची सुविधा उपलब्ध असणं ही भारतीय तरूणांसाठी एक चांगली संधी आहे. इंटरनेटचा वापर तरुणांनी देशाच्या आणि स्वतःच्या विकासासाठी केला पाहिजे. पण दुर्देवाने असे घडताना दिसत नाही.

आजचा तरुण दीड जीबी डाटा परडे कसा संपवायचा या विवंचनेत दिसतो. आजकाल रस्त्यावर काम करणाऱ्या मजुरापासून ते महालात राहणाऱ्या श्रीमंतापर्यंत प्रत्येकाच्या बजेटमध्ये बसणारा डाटा प्लॅन कंपन्या उपलब्ध करून देतात.इंटरनेटचा स्वतःच्या विकासासाठी वापर करणारे खूप कमी तरूण दिसतात.पण याचा गैरवापर करणारे बरेच दिसतात.

सध्या समाजात सायबर क्राईम खूप वाढले आहेत. त्याचं एक कारण उपलब्ध असणारा अतिरिक्त इंटरनेट डाटा हेदेखील असू शकत.तरुणांना उपलब्ध असणारा वेळ बऱ्याचदा दीड जीबी डाटा संपवण्यात घालवतात असं चित्र आजकाल सगळीकडे दिसतं.

पूर्वीच्या काळी मोबाईल, इंटरनेट नसताना तरुण आपला वेळ मित्रांबरोबर, कुटुंबियांबरोबर, छंद जोपासण्यात किंवा वाचन करण्यात घालवायचे. आजमात्र असं चित्र दिसतं की ज्याच्या त्याच्या हातात मोबाईल आहे आणि जो तो आपल्या आपल्या मोबाईलमध्ये मशगुल आहे. हे तरुण मोबाईलमध्ये इतकं काय बघतात असा प्रश्न पडला असेल तर त्याचं उत्तर आहे. सोशल मिडीया आणि रिल्स ! कोणाशी तरी चॅटिंग करण्यात किंवा सोशल मिडीयावर उपलब्ध असणारे रिल्स बघण्यात आपला बहुमोल वेळ घालवतात.

या रिल्सलाही दोन बाजू आहेत. काहीवेळेला या रिल्सच्या माध्यमातून लोकांना उपयुक्त माहिती मिळते. काही वेळेला जागृती आणणारी माहिती मिळते; तर काही वेळेला या रिल्सच्या माध्यमातून लोकांची दिशाभूल केली जाते. एखादा सिनेमा जसा वास्तव आणि कल्पना यांचे मिश्रण असतो. तसचं हे रिल्सचं जगसुद्धा काही प्रमाणात वास्तव तर काही प्रमाणात आभासी असते. काहीना त्यातील वास्तव आणि कल्पना यांची जाणीव असते, पण बऱ्याच जणांना याची जाणीव नसते आणि त्यामुळे खर तर गैरसमज, भांडणतंटे उद्भवतात. नात्यांमध्ये दुरावा येतो,

नैराश्य येतं, चुकीचं पाऊल उचलले जाते आणि बरंच काही.

काही काळ मनोरंजनासाठी रिल्स बघता बघता तरुण या रिल्सच्या चक्रव्यूहात कधी फसतो हे त्याचं त्याला कळत नाही. या रिल्स बघण्याचा मनावर आणि शरीरावर इतका परिणाम होतो की वास्तवातलं जग त्रासदायक वाटायला लागतं आणि रिल्सची दुनिया हवीहवीशी वाटायला लागते.

रिल्समध्ये दाखवल्याप्रमाणे आयुष्य जगण्याच्या नादात तरूण बरच काही गमावून बसतात, पण याची जाणीव बऱ्याच उशीरा होते आणि मग पश्चाताप करण्याशिवाय हाती काहीच राहत नाही.

रिल्स बघण्याच्या नादात आजूबाजूच्या माणसांशी संवाद कमी होतो याची जाणीवच या तरुणांना होत नाही .आजकाल लहान मुले, शाळकरी मुलेही या रिल्सच्या मायाजालात फसली जात आहेत, ज्यांना अजून जग कळलेलं नाही अशी ही मुले या रिल्सच्या दुनियेला खर मानायला लागतात. तसं वागायला जातात आणि  आयुष्याचं नुकसान करून घेतात.

अति तेथे माती असते त्यामुळे रिल्स काय, इंटरनेट काय किंवा मोबाईल काय यांचा वापर मर्यादितच केला पाहिजे. मोबाईल आणि इंटरनेटचा वापर करत असताना सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवली पाहिजे. आपण जे बघतो आहोत यातलं किती खरं आणि किती खोटं याची जाणीव जर आपल्याला असेल तर आपण या रिल्सच्या मायाजालात अडकणार नाहीं. रिल्स बघूच नये असं माझं मत नाही पण ते किती काळ बघावं, कुठे बघावं, काय बघावं यावर नक्कीच नियंत्रण असले पाहिजे. नाहीतर हॉस्पिटलसारख्या ठिकाणी मोठमोठ्याने हसण्याचे आवाज आले तर ते विसंगत दिसेल. एखाद्याचे चालताना लक्ष मोबाईलमध्ये, रिल्स बघण्याकडे असेल तर एखादा अपघात होण्याची शक्यता असते. आणि सगळ्यात महत्वाचं रिल्सच्या नादात तुम्ही तुमची मौल्यवान माणसं गमवाल याच्याइतकं मोठं नुकसान आणखी काय असू शकतं.

त्यामुळे इंटरनेट, मोबाईल, रिल्स याचा वापर मर्यादित करून आपण आपला बहुमोल वेळ आपला देश, समाज, आपली माणसं यांना दिला पाहिजे म्हणजे, आपापसातले ऋणानुबंध अधिक दृढ होतील. रिल्सचा आस्वाद घ्या पण त्याचबरोबर आपल्या माणसातही रमा! म्हणजे तुमचं आयुष्य अधिक आनंदित होईल.



**फैज हाजू (११ वी विज्ञान)**



**आदित्य नागले (११ वी कला)**

# एकाच्या चुकीची शिक्षा सर्वांना का?

**वैष्णवी कांबळे** (१२ वी कला)

शिवापूर गावात रमा नावाची मुलगी तिच्या आईवडिलांसोबत सुखात आणि आनंदात राहत होती. काही कारणाने तिच्या आईच्या गर्भाशयाच्या पिशवीची शस्त्रक्रिया झाली, त्यामुळे घरात एकच वातावरण आता वंशाला



दिवा कसा मिळणार ?

रमाचे वडील रघुवीर याने दुसरे लग्न करायचा निर्णय घेतला. आई आणि रमा खूप दुःखी झाल्या. रमा तिच्या बाबांची खूप प्रिय होती. रमाला ते अगदी नजरेआडसुद्धा करत नसत; परंतु अशी काही परिस्थिती निर्माण झाली की तिला नि:शब्दपणे पूर्ण परिस्थितीला स्वीकारावे लागले.

रघुवीरचे दुसरे लग्न झाले पण; रमा मात्र वडिलांच्या मायेला पोरकी झाली. तिला तिचे बाबा सर्वकाही होते परंतु अशा घटनेने ती पूर्णतः एकटी पडलेली होती. तिने स्वतःला सावरत आईलासुद्धा सावरले. स्वतःच्या भावनांना आवर घातला.

हळूहळू रघुवीर रमाला दुजाभावाची वागणूक देत होता, तिच्याकडे दुर्लक्ष करत होता. रमा हे सर्वच सहन करत होती. रमा तिच्या वडिलांच्या मायेला सर्वांमध्ये शोधत होती. तिच्या मैत्रिणींच्या वडिलांनी जरी तिला प्रेमाने विचारले तरी तिचे डोळे भरून येत असत. ती नेहमी इतरांच्याप्रती नम्रपणे वागत असे, पण तिला नेहमीच वडिलांच्या मायेची कमतरता भासत असे. रमा नेहमीच तिच्या वडिलांची वाट पाहत असे, तिला वाटायचे तिचे वडील येतील आणि तिला मायेने जवळ घेतील, विचारतील रमा, तू कशी आहेस?

रघुवीर दुसरे लग्न करून फसला होता. तो सर्व गोष्टींकडून हरला होता. त्याची दुसरी बायको त्याला पैशाने लुबाडत होती. शेवटी रघुवीर रमाकडे गेला आणि चुकीची माफी मागू लागला. रमाने आपल्या वडिलांना मिठी मारली आणि म्हणाली, ''बाबा काहीच काळजी करू नका , मी आहे ना !'' हे ऐकून रघुवीर ढसाढसा रडू लागला. त्याला या सर्व गोष्टींचा पश्चाताप झाला. शेवटी मुलीची व बायकोची माफी मागून एकत्र पहिल्यासारखे सुखाने राहू लागले.



**तनया कांबळे (१२ वी विज्ञान)**




**तनया कांबळे (१२ वी विज्ञान)**





# जागतिक हवामान बदल

प्रा. दत्तात्रय माळवदे (भूगोल विभाग)

आज संपूर्ण जग तापमान वाढीच्या धोक्याने हादरले आहे. ऋतुचक्रही बिघडत आहे. पृथ्वीचे सरासरी तापमान सतत वाढत आहे आणि नैसर्गिक आपत्तीचे प्रमाण चिंताजनकरित्या वाढले आहे ही सर्व परिस्थिती म्हणजे जागतिक हवामान बदल. हा केवळ पर्यावरणीय विषय नाही तर अर्थव्यवस्था, आरोग्य, शेती आणि मानवाचे अस्तित्व यांच्याशी निगडित एक गंभीर प्रश्न आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचे सरासरी तापमान हे १४ अंश इतके आहे. सध्या शास्त्रज्ञांनी केलेल्या अभ्यासानुसार पृथ्वीच्या सरासरी तापमानात ०.८ अंशाने वाढ झाली आहे. हा तापमान वाढीचा अंक फार मोठा वाटत नसला तरी त्यामुळे होणारे परिणाम मात्र चिंता निर्माण करणारे आहेत.

हवामान बदलाची कारणे

जागतिक हवामान बदलाची प्रमुख कारणे मानवी क्रियाकलापांमध्ये दडलेली आहेत. औद्योगिक क्रांतीपासून मोठ्या प्रमाणावर कोळसा, डिझेल, पेट्रोल अशा जीवाश्म इंधनाचा वापर वाढला आहे. ज्या इंधनाच्या वापरामुळे वातावरणात कार्बन डाय–ऑक्साइड, मिथेन, नायट्रोजन डाय–ऑक्साइड यासारख्या हरितगृहांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. वृक्षतोड हवामान बदलातील दुसरा मोठा गुन्हेगार आहे शहरे विस्तारत आहेत, उद्योग आणि महामार्ग यात वाढ होत आहे पण त्यांच्या बदल्यात जंगलांचे नुकसान होत आहे. झाडे कमी झाल्याने वातावरणातील कार्बन शोषला जात नाही. त्यामुळे तापमानात अजून वाढ होत आहे.

शेतीतील रासायनिक खताचा अतिवापर, जनावरांमधून होणारे मिथेनचे उत्सर्जन वाढत आहे. वाहतूक व्यवस्था आणि कारखान्यामधून होणारे प्रदूषण हे सर्व मिळून पृथ्वीचे तापमान वाढवत आहेत.

**जागतिक हवामान बदलाची कारणे**

**मानवी कारणे**

१ कोळसा, पेट्रोल, डिझेल यासारख्या इंधनाचा वापर वाढल्याने वातावरणातील $CO_2$ चे प्रमाण वाढल्याने तापमानात वाढ होत आहे.

२ वृक्षतोड झाल्याने वातावरणातील कार्बनचे शोषण कमी झाले आहे.

३ कारखान्यातून हरितगृह वायू,($C0_2$,$CH_4$,$N_2O$) मोठ्या प्रमाणात बाहेर पडत असल्यामुळे तापमान वाढ होत आहे.

४. जगात टू व्हीलर, फोर व्हीलर यांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्याने वातावरणात कार्बन मोनॉक्साईड, कार्बन डाय–ऑक्साइड यात वाढ होत असल्याने तापमानात वाढ होत आहे.

५. औष्णिक बेटात वाढ

जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटा या अधिक त्रासदायक बनत आहेत. विशेष करून शहरात वनक्षेत्रांचे प्रमाण कमी होत आहे. रस्त्यांचे डांबरीकरण, काँक्रिटीकरण आणि वाढती सिमेंटची बांधकामे यामुळे नागरी क्षेत्रातील तापमानात वाढ होत आहे.

**नैसर्गिक कारणे**

ज्वालामुखीचा उद्रेक

ज्वालामुखीच्या उद्रेकातून वातावरणात बाहेर पडणारे एअरो सेल बराच काळ वातावरणात राहिल्याने तापमानात वाढ झाली आहे. (पिंटांबू१९९१)

सूर्य क्रियेतील बदल

'मिलन्कोव्हीच' आंदोलन हे हवामानात बदल होण्याचे महत्त्वाचे कारण आहे. सूर्य आणि पृथ्वी यांचे अंतर कमी होणे म्हणजे तापमानात वाढ होणे होय आणि सूर्यापासून पृथ्वी दूर जाणे म्हणजे तापमानात घट होय. जेव्हा आपण सूर्यापासून दूर जातो तेव्हा हिमयुग येण्याची शक्यता असते.

**जो वेळ काढतो त्याला सर्व काही मिळते.**

महासागराच्या प्रवाहातील बदल.

महासागरातील पाण्याचे तापमान वाढल्याने असे प्रवाह दूरपर्यंत पसरल्यास त्या त्या ठिकाणच्या तापमानात वाढ होते.

**हवामान बदलाचे दुष्परिणाम**

आज हवामान बदलाचे परिणाम आपल्यासमोर उघडपणे दिसू लागले आहेत.

**ग्लोबल वार्मिंग**

पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे २०२५ या वर्षात जागतिक सरासरी तापमान पातळीपेक्षा खूपच तापमान वाढले आहे .युरोपमध्ये यावर्षी ५० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाल्याने १६५०० लोकांचा मृत्यू झाला आहे .भारत व पाकिस्तान मध्ये ४८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

**अनियमित ऋतुचक्र**

पावसाच्या प्रमाणात मोठा चढ-उतार, दुष्काळ अतिवृष्टी यात वाढ झाल्याने निसर्गाच्या ऋतुचक्रात मोठे बदल होत आहेत.

**समुद्रपातळीत वाढ**

समुद्रपातळी प्रतिवर्षी सुमारे तीन मिलिमीटरने वाढत आहे. समुद्रपातळीत वाढ झाल्याने अनेक शहरे पाण्याखाली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. २०२१ पर्यंत समुद्र पातळी ९ ते ९० सेंटीमीटरने वाढण्याची शक्यता समुद्रपातळीचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांनी वर्तवली आहे. संवेदनशील प्रजातींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. सागरी तापमानात वाढ झाल्याने समुद्रातील प्रवाहांवर वीरंजनाची प्रक्रिया होत असल्याने ते रंगहीन होऊ लागले आहेत.

**मानवी आरोग्यावर परिणाम**

उष्णतेच्या लाटा तसेच पाणी व जीवनसत्व घटकांच्या कमतरतेमुळे रोगांचे प्रमाण वाढत आहे. कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

**डासांच्या संख्येत वाढ**

जागतिक तापमान वाढीमुळे डासांच्या संख्येत वाढ होऊन डेंग्यू सारख्या आजाराचे प्रमाण वाढत आहे.

**हिमनद्या व द्रव्य बर्फ वितळत आहेत**

मागील २५ वर्षात गंगोत्री हिमनदी ८५० मीटरपेक्षा जास्त मागे सरकली आहे तसेच ध्रुवीय प्रदेशातील बर्फ वेगाने वितळत आहे.

**अर्थव्यवस्थेचे नुकसान**

वैश्विक तापमान वाढीमुळे नैसर्गिक आपत्तीची तीव्रता वाढत चालली असून यांचा जबर फटका जागतिक अर्थकारणाला बसू लागला आहे. शेती उत्पादनात घट, उद्योगांवरील पर्यावरणीय ताण, पायाभूत सुविधांवर आपत्तीचा तडाखा. यामुळे जगातील सर्व देशांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

**समुद्रात जेलीफिशमध्ये वाढ**

समुद्राच्या पाण्याचे तापमान वाढल्याने जेलीफीशचे प्रजनन मोठ्या प्रमाणात होऊन त्यांचे प्रमाण वाढत चालले आहे.

२०२५ मध्ये जागतिक तापमान वाढीच्या काही देशांना बसलेल्या झळा.

*ब्रिटन-सर्वात उष्ण उन्हाळा

*नेदरलँड-उष्णतेच्या लाटांची संख्या वाढली

*जर्मनी-उष्माघातामुळे दीड हजार मृत्यूमुखी

*इराण-तीव्र उष्णता आणि दुष्काळ

*स्पेन-वणव्यांचे प्रमाण वाढले

*इटली-उष्माघाताने चार हजार बळी घेतले

*फ्रान्स-उष्णतेमुळे दीड हजारांवर मृत्युमुखी

*भारत-उत्तर भारतासह अनेक भागात शाळा बंद

*पाकिस्तान-अनेक भागात तापमान ५० अंशाच्या वर

*जपान-यावर्षी जून महिन्यात सर्वात जास्त तापमानाची नोंद.

(स्त्रोत -संयुक्त राष्ट्र संघ)

*हवामान बदल अभ्यासण्याची काही साधने.

पृथ्वीच्या प्राचीन हवामानाचा अभ्यास म्हणजेच पुरा हवामानशास्त्र होय. हवामानातील बदल अभ्यासण्यासाठी वृक्ष खोडांवरील वर्तुळे, बर्फाच्छादित प्रदेशातील गाभ्यातील नमुने, प्रवाळकट्टे आणि सागरीनिक्षेप या साधनांद्वारे हवामानातील बदल अभ्यासता येतो.

*हवामानात बदल थांबवणे अवघड असले तरी त्याची तीव्रता कमी करणे शक्य आहे. यासाठी व्यक्तिगत, सामाजिक आणि सरकारी पातळीवर प्रयत्न आवश्यक आहेत.

हवामान बदलाच्या समस्यांचा सामना करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःच्या जीवनशैलीत बदल घडविण्याच्या विचाराला आता बळकटी येऊ लागली आहे. यासाठी काही साधी सोपी पावले उचलता येतील.

-कमी अंतर पायी चालत जाणे- गरजेपुरतीच खरेदी करणे

-ऊर्जा बचत करणारी परिणामकारक उपकरणे वापरणे.

-लाकूड कोळशासारख्या जैवइंधनावरील अवलंबित्व कमी करणे.

-प्लास्टिकचा वापर थांबवणे.

-नियमित झाडे लावणे व ती जपणे.

-सौर, वारा, जलविद्युत यांचा वापर वाढवणे

-उद्योगांवरील कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण आणणे

-पाणी व्यवस्थापन, स्मार्ट शेती व हवामानस्नेही तंत्रज्ञानाचा वापर करणे.

-ओला व सुका कचरा व्यवस्थापन करणे.

हरितगृह वायूंच्या उत्सर्जनाला चाप लावला तर बऱ्याच अंशी या समस्येची तीव्रता कमी होऊ शकते असा अहवाल ब्रिटनमधील स्वयंसेवी संस्था, ख्रिस्तियन एडने केला आहे. वैश्विक तापमान वाढीमुळे झालेले नुकसान श्रीमंत देश सहन करू शकतात; कारण त्यांच्या मालमत्तांना विम्याचे संरक्षण असते, याउलट परिस्थिती गरीब देशांमध्ये पाहायला मिळते. कारण येथे लोकांकडे संसाधनाची मोठी कमतरता दिसून येते.

हवामानात बदल हा दूरचा किंवा काल्पनिक धोका नाही तो सध्या आपल्या दारी उभा आहे. पृथ्वी ही केवळ एक ग्रह नाही, ते आपले घर आहे. तिचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. या नव्या वर्षाच्या सुरुवातीपासूनच आपण सर्वांनी, जगातील हवामान बदल थांबवण्याचा आणि स्वच्छ व सुंदर भारत बनवण्याचा संकल्प करूयात.

*नको हवामान बदल,*
*मानवा, आता तरी सवयी बदल.*



**अन्वय देसाई (११ वी विज्ञान)**



**स्नेहा चव्हाण (११ वी वाणिज्य)**



**पार्थ शिरवडकर (१२ वी विज्ञान)**




# आरोग्य हेच खरे धन

**रिया वारिशे** (१२ वी कला)

आरोग्यं धनसंपदा ही संस्कृतमधील एक प्रसिद्ध म्हण आहे, ज्याचा अर्थ आहे आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. ही म्हण केवळ भाषिक दृष्टीकोनातून सुंदर नाही, तर ती अत्यंत वास्तववादी व जीवनावश्यक सत्य दर्शवते. आजच्या युगात जरी आर्थिक संपत्तीला मोठे महत्त्व दिले जात असले, तरीही शरीर आणि मन निरोगी नसेल तर त्या संपत्तीचा काहीच उपयोग होत नाही; म्हणूनच खरे धन म्हणजे उत्तम आरोग्य.

उत्तम आरोग्य म्हणजे केवळ रोगरहीत असणे नव्हे, तर शरीर आणि मन व आत्मा या तिन्ही पातळ्यांवर तंदुरुस्त असणे. जेव्हा एखादी व्यक्ती निरोगी असते, तेव्हा ती अधिक आनंदी, कार्यक्षम आणि समाधानी राहते. आरोग्य चांगले असेल तर जीवनातील इतर सर्व गोष्टी साध्य करता येतात. शिक्षण, व्यवसाय, कुटुंबजीवन, सामाजिक कार्य, इत्यादी, आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत आरोग्य राखणे ही मोठी जबाबदारी आहे .झपाट्याने वाढत चाललेली शहरीकरण, फास्ट फूड संस्कृती, ताणतणाव, व्यायामाचा अभाव आणि रात्रीची अपुरी झोप यामुळे शरीराचे व मनाचे संतुलन ढासळत चालले आहे. त्यामुळे मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, मानसिक आजार यांचे प्रमाण झपाट्याने वाढत चालले आहे.

शारिरीक आरोग्य राखण्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, स्वच्छता आणि वैदयकीय तपासणी यांचा समावेश आवश्यक आहे.

१) संतुलित आहार : फळे, भाज्या, धान्य, प्रथिने आणि पुरेसे पाणी यांचा योग्य प्रमाणात समावेश असलेल्या आहारामुळे शरीराचे कार्य सुरळीत चालते.

२) व्यायाम : दररोज किमान ३० मिनिटे चालणे, धावणे, योगासने किंवा खेळ खेळणे शरीर सशक्त ठेवते.

३) स्वच्छता : हात धुणे, आंघोळ करणे, यामुळे संसर्गजन्य आजारांपासून बचाव होतो.

४) झोप : शरीराची उर्जा पुन्हा मिळवण्यासाठी दररोज ७–८ तासांची झोप आवश्यक आहे.

मानसिक आरोग्य हा देखील आरोग्याचा महत्त्वाचा भाग आहे. आजकाल अनेकजण चिंता, नैराश्य, भीती आणि असमाधान यांना सामोरे जात आहेत. हे मानसिक आजार अगदी शरीरविकारांइतकेच गंभीर असतात.

आजकाल आरोग्यसेवा ही अनेकांना परवडत नाही. खासगी रुग्णालये महागडी असून सर्वसामान्य माणसाला त्याचा खर्च परवडत नाही. त्यामुळे सरकारी आरोग्यसेवा सक्षम असणे गरजेचे आहे आरोग्यम् धनसंपदा ही म्हण केवळ शब्दसौंदर्य नाही. तर ते जीवनाचे शाश्वत सत्य आहे. एखाद्या व्यक्तिकडे भरपूर पैसा असला, तरी तो आजारी असेल तर त्या पैशाचा आनंद घेता येत नाही. जर शरीर व मन निरोगी असेल तर थोड्याशा साधनसंपत्तीतही माणूस आनंदी राहू शकतो. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या जीवनशैलीकडे लक्ष द्यावे, चांगल्या सवयी अंगीकाराव्यात आणि स्वतःच्या तसेच समाजाच्या आरोग्यासाठी योगदान द्यावे.

संपत्ती हरवली तर ती पुन्हा येते, पण आरोग्य हरवले तर संपूर्ण जीवन अस्वस्थतेत जाते.

# भारतासमोरील आव्हाने

आभा साखळकर (१२ वी विज्ञान)




भारत हा फक्त एक देश नाही, तर एक संस्कार आहे, एक श्वास आहे, एक चैतन्य आहे. जिथं ज्ञानाची गंगा वाहते, अध्यात्माचं हिमालय उभं आहे आणि माणुसकीच्या भूमीत प्रत्येक हृदयात देव वसतो.

आजचा भारत म्हणजे परंपरा आणि प्रगती यांचा सुंदर संगम आहे. एक पाय शतकांपूर्वीच्या ज्ञानाच्या वारशात आणि दुसरा पाय भविष्याच्या विज्ञानात. ही ती भूमी आहे जिथं प्राचीन ऋषींच्या मंत्रोच्चारांमध्ये आजही ISRO च्या काउंटडाऊनचा स्वर मिसळतो आणि म्हणूनच भारताचं विश्वगुरुत्व हे स्वप्न नाही–ती एक जबाबदारी आहे.

ही ती भूमी आहे –
जिथं वेदांनी ज्ञान दिलं,
बुद्धानं करुणा शिकवली,
महावीरानं अहिंसेचं सामर्थ्य दाखवलं,
आदिशंकराचार्यांनी अद्वैताचं तत्त्वज्ञान दिलं,
सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा दीप लावला,
राणी लक्ष्मीबाईनं शौर्याची पराकाष्ठा दाखवली,
स्वामी विवेकानंदांनी आत्मविश्वासाची ज्वाला पेटवली,
अब्दुल कलामांनी आकाशाला स्पर्श केला,
आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी या भूमीला स्वराज्याचं स्वप्न दिलं.

हा आहे आपला भारत – विचार, संस्कृती आणि शौर्य यांचा संगम! आज पुन्हा एकदा आपण त्या तेजाकडे चाललो आहोत. जिथं भारत पुन्हा एकदा विश्वगुरू म्हणून उभा राहील. पण या तेजाच्या मार्गावर अनेक आव्हानं आहेत – जी फक्त सरकारनं नाही, तर प्रत्येक नागरिकानं ओळखून पार करायची आहेत.

आज भारत जगात नाव कमावतो आहे – विज्ञानात, तंत्रज्ञानात, अवकाश संशोधनात, क्रीडा आणि संस्कृतीत. पण विश्वगुरू बनायचं असेल, तर केवळ प्रगती नव्हे, तर प्रामाणिकता आणि मूल्यांचा संगम गरजेचा आहे. कारण विश्वगुरू म्हणजे फक्त बलशाली राष्ट्र नाही, तर एक असं राष्ट्र, जे इतरांना मार्गदर्शन करतं.

आपल्यासमोर पहिलं मोठं आव्हान आहे – शिक्षणाचं.

आपल्या देशात शाळा आहेत, कॉलेज आहेत, पण खरी शिक्षणाची दिशा हरवली आहे. आपण परीक्षा यशस्वी होतो, पण जीवनात मात्र अयशस्वी ठरतो, कारण आपण गुण शिकतो, पण मूल्यं विसरतो. ज्या शिक्षणाने विवेकानंद, टिळक, आंबेडकर घडवले, त्या शिक्षणात पुन्हा आत्मा फुंकायचा आहे. शिक्षण केवळ नोकरीसाठी नव्हे, तर चरित्रासाठी असावं, मगच आपण विश्वगुरू म्हणून जगासमोर उभे राहू शकू. आज अनेक विद्यार्थी मोबाईलवरील रील्समध्ये हरवतात, पण त्यांच्यात कल्पकतेची, सर्जनशीलतेची आग दडलेली असते.

आपल्याला अशी शिक्षणव्यवस्था हवी– जी प्रत्येक मुलाला सांगेल: तू फक्त मार्क्स साठी नाही, तर एक चांगलं व्यक्तिमत्त्व होशील म्हणुन शिक. Skill-based learning, Value education, Critical thinking आणि Emotional intelligence ही चार इंजिनं भारताचं भविष्य बदलू शकतात. कारण जगाचं नेतृत्व बुद्धीने होतं–पण नैतिकतेने टिकतं.

दुसरं मोठं आव्हान आहे – युवाशक्तीचं.

भारत आज जगातील सर्वात तरुण देश आहे,

पण प्रश्न आहे – ही तरुणाई आपली शक्ती कुठं वापरतेय? आजचा तरुण फक्त करियर बनवण्यासाठी धडपडत नाही, तो समाजासाठी काहीतरी देण्याची इच्छा ठेवतो. Startups, Innovation, Sports, Art, Science- प्रत्येक क्षेत्रात

भारतीय युवाशक्ती घवघवीत यश मिळवतेय. पण या प्रतिभेला योग्य दिशा, योग्य मार्गदर्शन आणि योग्य वातावरण हवं. आपल्याला अशी पिढी घडवायची आहे जी जगाच्या पाठी  न चालता– त्याला उजेड दाखवेल. विवेकानंद म्हणाले होते, Give me hundred energetic youth and I shall transform India. हीच वेळ आहे, आपण त्या शंभरांपैकी एक होण्याची. आपण उठलो, जागे झालो, तर भारताचं भविष्य उजळेल. कारण प्रत्येक तरुणाच्या हातात देशाचं भविष्य आहे.

तिसरं आव्हान – नैतिकतेचं.

आपण अवकाशात रॉकेट पाठवतो, पण कधी कधी माणुसकी जमिनीवर पडते. सोशल मीडियावर आपण कितीही 'फिल्टर' लाउ, पण आपण आपल्या विचारांवरती फिल्टर लावला पाहिजे, की मग ते जरा चांगले होतील. ज्या दिवसापासून प्रत्येक नागरिक स्वतःघह प्रामाणिक होईल, त्या दिवसापासून भारताला विश्वगुरू बनवण्यासाठी वेगळा नेता, वेगळी धोरणं कश्याचीच गरज उरणार नाही. कारण राष्ट्र म्हणजे सरकार नाही शासन म्हणजे आपण सगळे मिळून बनवलेला विचार! जो भ्रष्टाचार आपल्या देशात होतो तो फक्त पैशात नाही, तो विचारांमध्ये आहे. जो देश संतांच्या पवित्र परंपरेतून उभा राहिला, तिथं प्रामाणिकपणा हा पर्याय नसावा – तो स्वभाव असावा.सत्यमेव जयते हा केवळ शब्द नाही, तो भारताचा आत्मा आहे. जर प्रत्येकाने आपल्या कृतीत सत्य आणलं, तर भारताचं तेज कुणीही रोखू शकणार नाही.

आणखी एक आव्हान पर्यावरणाचं.

आपण विकासाच्या नावाखाली निसर्गाचा नाश करतोय.

पण विसरतोय की, माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः –

पृथ्वी आपली माता आहे, आपण तिची लेकरं आहोत.

वृक्षतोड, प्रदूषण, हवामान बदल – हे फक्त शब्द नाहीत, हे आपलं भवितव्य धोक्यात आणणारे संकेत आहेत. विश्वगुरू भारत तोच बनेल, जो निसर्गासोबत जगेल, विरोधात नाही संवादात. आज जगभरात climate refugees वाढत आहेत. हवामानाच्या बदलामुळे शेती, पाणी आणि जीवन धोक्यात आलंय. आपल्याकडे आयुर्वेद, योग, sustainable living यांचा शतकांचा वारसा आहे. आपणच जगाला सांगू शकतो विकासाचा वेग वाढवणं हे महान नाही, पण विकासाची दिशा योग्य ठेवणं महान आहे. Green India हा फक्त प्रोजेक्ट नाही ते भवितव्य वाचवण्याचं वचन आहे.

समाजातही एक मोठं आव्हान आहे एकतेचं.

धर्म, भाषा, प्रांत, जाती या भिंती आपणच उभ्या केल्या.

पण आपला मंत्र आहे वसुधैव कुटुंबकम्. आपण एकमेकांकडे माणूस म्हणून पाहायला शिकलो, तर भारताची ओळख पुन्हा तेजस्वी बनेल. गुरू तोच, जो एकतेचा धडा शिकवतो आणि भारताचा आत्मा नेहमीच सांगतो सर्वधर्मसमभाव. जगात कुठेही पाहा भांडणं भाषेवर, जातीवर, धर्मावर, मतांवर पण भारताची शक्ती सदैव विविधतेतून आलेली आहे. तिरंगा फक्त तीन रंगांचा नाही, तो तीन संदेश देतो – त्याग, शांती, आणि विकास. भिंती तोडल्या की रस्ता तयार होतो, आणि रस्ता तयार झाला की राष्ट्र पुढे चालतं.

आपल्याला तंत्रज्ञानात प्रगती करायची आहे, पण त्यासोबत संवेदना जपायच्या आहेत. AI, रोबोटिक्स, डिजिटल युग सगळं स्वागतार्ह आहे, पण मशीनच्या काळात माणूस हरवला नाही पाहिजे. AI, आहे, रोबोटिक्स आहे– पण भारताकडे असे काहीतरी आहे जे कुठल्याही मशीनमध्ये नसतं –

करुणा.

मानवी संबंध.

सामाजिक जबाबदारी.

तंत्रज्ञानाने प्रगती होईल,

माणुसकीने संपन्नता येईल. आपल्याला दोन्हींचा समतोल राखणारा भारत हवा. तंत्रज्ञान आपल्या हातात असावं, आपण त्याच्या ताब्यात नव्हे. विश्वगुरू तोच, जो बुद्धी आणि हृदय दोन्ही जपतो.

स्त्रीशक्ती हासुद्धा भारताच्या विश्वगुरुत्वाचा आधारस्तंभ आहे. सावित्रीबाईंपासून ते कल्पना चावला, पी.टी. उषा ते मिताली राज, भारतीय महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवला. भारत विश्वगुरू तेव्हाचं बनेल, जेव्हा प्रत्येक मुलगी निर्भय, शिक्षित आणि स्वतंत्र असेल. ती देवी म्हणून नाही, तर निर्णय घेणारी नागरिक म्हणून उभी राहील. आज भारतात महिला fighter pilots आहेत, ISRO मध्ये women scientists नेतृत्व करत आहेत आणि क्रीडाक्षेत्रात त्यांनी इतिहास बदलला आहे.

ज्या क्षणी एक मुलगी निर्भयपणे म्हणते, मी करू शकते, त्या क्षणी भारताचं विश्वगुरुत्व काही पावलं पुढे जातं.

पण सगळ्यात मोठं आव्हान आहे आत्मविश्वासाचं.

आपण स्वतःवरचा विश्वास हरवतो. आपण जगाकडून प्रमाणीकरण मागतो पण विसरतो की जग आपल्याकडून प्रेरणा घेतं. पाश्चात्य जगाकडे पाहून म्हणतो, ते पुढं गेले, आपण मागं पडलो. पण विसरतो की जगाने योग, ध्यान, अहिंसा, संस्कार हे सगळं आपल्याकडून शिकलं आहे. योग दिवस जगभर साजरा होतो, भारतीय सण जगभरात साजरे होतात, आणि भारतीय brainpower जगातल्या मोठ्या कंपन्या चालवतं. भारताने जगाला दिशा दिली आहे, आणि पुन्हा देईल फक्त आपल्याला आपली ओळख अभिमानाने जगावी लागेल. ही वेळ आहे मी भारतीय आहे ही ओळख केवळ सांगण्याची नाही, तर जगण्याची.

होय, आव्हानं मोठी आहेत,

पण त्याहून मोठं आहे भारतीयाचं स्वप्न! भारताचं स्वप्न हे एखाद्या नेत्याचं नाही, ते १४५ कोटी लोकांचं आहे. आणि जेव्हा १४५ कोटी लोक एकाच दिशेने चालतात, तेव्हा इतिहास घडतो.

*आपल्याकडे संस्कृतीचं सामर्थ्य आहे,*
*युवाशक्तीचं इंजिन आहे,*
*शास्त्रज्ञांची बुद्धी आहे,*
*शेतकऱ्याचे श्रम आहेत,*
*सैनिकांचं साहस आहे,*
*नागरिकांचा विश्वास आहे.*
*आणि ही सगळी शक्ती एकत्र आली,*
*तर भारत विश्वगुरू होणार का नाही होणार..*

तो दिवस दूर नाही, जेव्हा भारताचं ज्ञान, विज्ञान, संस्कृती आणि माणुसकी एकत्र उभी राहील आणि जगाला पुन्हा म्हणावं लागेल –

***ही भूमी साधूंची, वीरांची, विचारांची आहे***
***हीच भूमी आहे भारतभूमी!***
***आणि भारत पुन्हा एकदा विश्वगुरू बनणार आहे!***



**अदिती देसाई (११ वी विज्ञान)**



**अदिती देसाई (११ वी विज्ञान)**



**अन्वय देसाई (११ वी वाणिज्य)**



# सायबर गुन्हेगारी- जागरुकतेची गरज

**अदिती फडके** (११वी वाणिज्य)

चालू परिस्थितीमध्ये संपूर्ण जगभरातील ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ही आंतरजालचा वापर करताना आढळून येते. बऱ्याच मोठमोठ्या कंपन्या आणि उद्योगव्यवसायांचे मूळ जणू आंतरजाल बनले आहे. पण याच बहुपयोगी आंतरजालाचा चुकीच्या पद्धतीने केला जाणारा वापर हा सायबर गुन्हेगारीसारख्या मोठ्या समस्यांना कारणीभूत ठरतो. प्रदूषण, तापमानवाढ यांसारख्या गंभीर समस्यांबरोबरच आज जगाला सायबर गुन्हेगारीसारख्या प्रचंड मोठ्या आव्हानाला सामोरे जावे लागत आहे. ह्या आव्हानाला खंबीरपणे सामोरे जाण्यासाठी सामान्य जनतेमध्ये आंतरजाल वापरासंबंधी जागरुकता निर्माण होणे गरजेचे आहे.

आजच्या घडीला आपले प्रत्येक काम हे आंतरजालच्या माध्यमातूनच होते. मग ते काम सरकारी असो वा वैयक्तिक. आजकाल पैशांची देवाणघेवाणही आंतरजालच्या माध्यमातूनच होते. थोडक्यात काय तर कोणत्याही प्रकारची माहिती पसरवण्यासाठी अथवा लोकांना सांगण्यासाठी आंतरजाल हे महत्त्वाचे साधन बनले आहे. सर्व गोष्टीदरम्यान, वापरकर्त्यांचा मोबाईल, संगणक किंवा इतर संसाधने ही आंतरजालशी जोडली जातात, असे आपल्या लक्षात येते. म्हणजेच या वस्तू आंतरराष्ट्रीय पातळीवर कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही स्वरुपात उपलब्ध होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यातूनच सायबर गुन्हेगारीसारख्या समस्या उत्पन्न होतात.

सायबर गुन्हेगारी हा एक खूप मोठा गुन्हा आहे. यामध्ये संगणक, मोबाईल यांसारख्या गोष्टींचा वापर केला जातो. सहज शब्दात सांगायच तर एखादयाची वैयक्तीक माहिती ही त्याच्या संगणकावरून अथवा मोबाईलवरून त्याला न विचारता घेणे किंवा चोरणे किंवा ती चुकीच्या पद्धतीने वापरणे याला सायबर गुन्हेगारी असे म्हणतात. हा गुन्हा करणाऱ्याला सायबर गुन्हेगार असे संबोधले जाते. याला हॅकर असेही म्हणतात. सर्वसामान्य जनता, लहान मुले, वृद्ध लोक यांसारख्या गुन्ह्यांना सहज बळी पडतात.

या सायबर गुन्हेगारीचे अनेक प्रकार आहेत. संगणकाची व मोबाईलची संपूर्ण माहिती असलेले आणि आंतरजाल विषयीचेही सर्व ज्ञान असलेले काही समाज कंटक त्यांच्या ज्ञानाचा वापर चुकीच्या पद्धतीने करून ते सायबर गुन्हे घडवून आणतात. यामध्ये एखाद्याची वैयक्तीक माहिती चोरणे, ती मिटवून टाकणे म्हणजेच वापरकर्त्याचा संकेत बदलणे, फोटो बदलणे किंवा दस्तऐवज मिटवून टाकणे तसेच एखादयाच्या संगणकाचे भाग नष्ट करणे, बदलणे म्हणजेच बाहयनुकसान करणे किंवा ते चोरणे आणि याचबरोबर एखादयाच्या वैयक्तीक माहितीवर अथवा आंतरजालवरील रोजच्या हालचालींवर सतत लक्ष ठेवणे असे अनेक प्रकार आहेत.

या सायबर गुन्हेगारीतील एक प्रकार म्हणजे स्पॅमिंग, यामध्ये ई–मेल हा मुख्य घटक आहे. एखादया संकेतस्थळावरुन आपल्याला ई–मेल येतो आणि आपण तो पटकन उघडतो. पण याच ई मेलच्या माध्यमातून आपला संगणक अथवा मोबाईलच्या व्यवस्थेमध्ये व्हायरस किंवा मालवेअर डाऊनलोड होतो आणि संगणक खराब होतो. हे टाळण्यासाठी अज्ञात व्यक्तीच्या संदेशात किंवा इमेलमधील दुव्यावर चुकूनही कधी क्लिक करु नये. त्याचबरोबर आपण उघडलेले URL हे https:// सह

आहे ना याची खात्री करून घ्यावी. ते http:// सह नसावे.

दुसरा एक प्रकार म्हणजे फिशिंग. यामध्ये लोभ उत्पन्न होतील अशा आशयाच्या ऑफर, बक्षीस अथवा लॉटरीचे संदेश येतात. वापरकर्ता या सगळ्याला भूलून आपला बँकेचा तपशील, पत्ता यासारखी वैयक्तीक आणि गोपनीय माहिती अशा संदेशांना सांगतो आणि मग त्याची फसवणूक केली जाते. यासाठी कोणत्याही अज्ञात व्यक्तीकडून आलेला संदेश वाचू नये अथवा त्याला प्रतिउत्तर देऊ नये.

यातील पुढचा प्रकार म्हणजे हॅकींग. यामध्ये वापरकर्त्याच्या संगणकातील वैयक्तिक माहिती आणि संवेदनशील माहिती हॅकर्सकडून चोरली जाते. हा प्रकार इतका सहज घडतो की वापरकर्त्याला त्याबददल कळतही नाही. अनधिकृत प्रवेश करून माहिती चोरली जाते.

यापुढील सर्वात महत्त्वाचा एक प्रकार म्हणजे चोरी. या गुन्हयांमध्ये एखादयाची माहिती किंवा सामग्री चोरणारे समाविष्ट असतात. जेव्हा माणूस कॉपी-राईट या कायद्याचे उल्लंघन करतो तेव्हा हा अपराध होतो उदा. एखाद्या चित्रपटाची कॉपी करून ती विकली अथवा दाखवली जाते. संगीत, गेम, सॉफ्टवेअर यांबद्दलही असेच केले जाते.

सायबर गुन्हेगारीमधीलच एक म्हणजे सॉफ्टवेअर पाइरेसी... यामध्ये एखाद्याचे सॉफ्टवेअर कॉपी करुन स्वस्त दरात विकले जाते. सॉफ्टवेअर कंपन्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागते. सॉफ्टवेअर तयार करून संगणकावर पाठवतात ज्यामध्ये व्हायरस लपलेले असतात. यामध्ये जंत, ट्रोजन हॉर्स, लॉजिक हॉर्स असे विविध प्रकार आहेत. या विषाणूमुळे संगणकात विनाश अर्थात व्हायरस पसरवला जातो. बऱ्याच वेळा हा हल्ला इतका मोठा होतो की कोट्यावधींचा फटका बसतो.

यापुढील सर्वात जास्त घडणारा प्रकार म्हणजे फसवणूक बँक कॉल यामध्ये वापरकर्त्याला फसवणुकीचे कॉल येतात आणि लॉटरी लागणे, लाच देणे अशा कारणांसाठी त्यांच्याकडून त्यांचे बँकेचे तपशील मागितले जातात. बनावट कॉलद्वारे त्यांच्यावर दबाव आणला जातो आणि विविध प्रकारचे इशारे दिले जातात. बँक खात्यातून ऑनलाईन लूट केली जाते.

सर्वात भयानक प्रकार म्हणजे अफवा पसरवणे. एखादया व्यक्तीबद्दल एका दुसऱ्या वापरकर्त्याच्या खात्यावरून चुकीची माहिती पसरवणे. सोशल नेटवर्कींग साईट्सवर सामाजिक, धार्मिक, वैचारिक आणि राजकीय अफवा पसरवणे, सोशल मिडीयावर, संकेतस्थळांवर अशोभनीय टिप्पण्या करणे, इंटरनेटवर धोका निर्माण करणे याला एकत्रितपणे 'सायबर बुलिंग' असे म्हणतात. हा देखील सायबर गुन्हेगारीचा एक प्रकार आहे. आढळतात.

बाल अश्लीलता हा सायबर गुन्हेगारीतील मुलांशी संबंधित गुन्हा आहे.आजकाल लहान मुलेदेखील आपल्याला मोबाईल, संगणक वापरताना आढळतात . गुन्हेगारांना उपयोगी माहिती मिळवण्यासाठी, हा अत्यंत सोपा मार्ग ठरतो. लहान मुले, नवीन लोक यांच्याकडून त्यांची खाजगी माहिती काढली जाते. लहान मुले अज्ञान असल्याने त्यांना याची फार माहिती नसते. ज्यामुळे हे गुन्हेगार मुलांवर अत्याचार करतात, त्यांना धमकवतात. या गुन्ह्यात मुले मुली अधिक बळी पडतात.ऑनलाईन गेमिंग इतर सोशल मिडिया संसाधनांवर लहान मुले आज प्रचंड प्रमाणात सक्रीय आहेत. आणि सायबर गुन्हेगारांना हाच मार्ग खूप सोपा होऊन जातो.

आतापर्यंत बघितलेले विविध प्रकार सोडल्यास आणखीनही असे खूप प्रकार आहेत ज्यातून सायबर गुन्हेगारी केली जाते. फरक एवढाच की याबद्दल आपल्याला खूपदा काही माहिती नसते. त्यामुळे वापरकर्त्याने आपले संगणक ,मोबाईल सदृश्य इतर संसाधन काळजीपूर्वक हाताळली पाहिजेत. कोणत्याही व्यक्तीबरोबर कोणत्याही वेळी हा प्रकार घडू शकतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने याबद्दल सतर्क राहणे गरजेचे आहे.

सायबर गुन्हेगारी पासून वाचण्यासाठी कोणत्याही संकेतस्थळावर आपली वैयक्तिक माहिती सामायिक करु नये. ऑनलाईन खरेदी करताना विश्वसनीय संकेतस्थळावरुनच खरेदी करावी. तसेच ऑनलाईन पैसे भरताना लॉक चिन्ह पहावे. संगणक वापरताना त्यात चांगले अँटी-व्हायरस सॉफ्टवेअर वापरावे आणि सॉफ्टवेअर किंवा कोणतेही प डाऊनलोड करण्यापूर्वी योग्य ती खात्री करुन घ्यावी. आजकाल खूप ठिकाणी उदा. हॉटेल, मॉल येथे विनामूल्य वायफाय उपलब्ध असते. सर्वसामान्य माणूस अशी आमिषे पाहून त्याला सहजपणे भुलतो. तरी आपण सर्वांनी याप्रकारच्या विनामूल्य गोष्टी शक्यतो टाळाव्यात. सुरक्षित पासवर्ड वापरावेत.

ऑनलाईन गेमिंग हे तरुण मुलांसाठी पैसे कमावण्याचे व्यासपीठ बनले आहे. अनेक मुले-मुली आज शैक्षणिक जीवनापेक्षा आंतरजाल वर जास्त सक्रीय आहेत. ऑनलाईन गेमिंगमध्ये मुलांना विविध प्रकारचे खेळ खेळायला दिले जातात अथवा विविध प्रकारची कामे करायला सांगितली जातात. आणि त्याबदल्यात त्यांना पैसे दिले जातात. यासाठी कधीकधी त्यांच्याकडून त्यांचे बँक खात्याचे तपशील मागून घेतले जातात. आणि मग गुन्हेगार त्यामध्ये बदल घडवून सायबर गुन्हेगारी घडवून आणतात. बँक खात्यातील सगळे पैसे जाण्याची शक्यता यात असते. त्यामुळे यासारख्या ऑनलाईन योजनेत, पैसे जिंकण्याच्या लोभाला बळी पडू नये.

या सर्वप्रकारची काळजी जरी घेतली तरी काही वेळा अनावधानाने आपल्याकडून एखादी माहिती सांगितली जाते. आणि सायबर गुन्हा घडतो, परंतु अशा वेळी घाबरून न जाता लगेचच सायबर तज्ज्ञांचा सल्ला घेतला जाऊ शकतो. जवळच्याच पोलिस स्थानकात तक्रार नोंदवता येते. तसेच या सायबर गुन्हयाची तक्रार भारत सायबर क्राईम पोर्टल' या संकेतस्थळावर जाऊन नोंदवता येते. आजकाल ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही ठिकाणी

आपल्याला सायबर सेल विभाग आढळून येतात. आपण स्वतः त्यांच्याकडे जाऊन, तक्रार नोंदवून, त्यांच्या योग्य मार्गदर्शनाने आपल्या अडचणींना सामोरे जाऊ शकतो.

या सर्व माहितीवरून आपल्या असे लक्षात येते की सायबर गुन्हेगारी हे खरच एक मोठे आव्हान आहे. पण या सायबर गुन्हेगारीला जर आळा घालायचा असेल तर जगभरातील प्रत्येक नागरिकाने जागरुक राहणे गरजेचे आहे. याची सुरुवात आपण आपल्यापासूनच केली पाहिजे. आपणच वेळोवेळी सतर्क राहून इतरांनाही याबद्दल माहिती देऊन ही गुन्हेगारी थांबवू शकतो आणि हा गुन्हा घडवून आणणाऱ्या समाजकंटकांना योग्य ती शिक्षाही देऊ शकतो. चला तर मग –

**मोबाईल, संगणकाविषयी जागरूकता बाळगूया!**
**सायबर गुन्हेगारीला आळा घालूया!!**
**मोबाईल, संगणकाविषयी जागरूकता बाळगुया सायबर गुन्हेगारीला आळा घालुया !!**



**तनया कांबळे (१२ वी विज्ञान)**



**अन्वय देसाई (११ वी वाणिज्य)**



**गौरेश नांदगांवकर (११ वी कला)**

# आरोग्य धनसंपदा...!

पूजा गोरे (१२वी कला)

मानवाच्या आयुष्यातील सर्वात मोठी संपत्ती कोणती, असा प्रश्न विचारला तर बहुतेक लोक पैसे, मालमत्ता किंवा वैभव यांचा उल्लेख करतील; परंतु या सगळ्या गोष्टींपेक्षा अमूल्य अशी खरी संपत्ती म्हणजे आरोग्य. म्हणूनच जुनी म्हण आहे – आरोग्य हीच खरी धनसंपदा.

निरोगी शरीर असेल तर जीवनातील प्रत्येक आनंदाचा आस्वाद घेता येतो. पैसा, ऐश्वर्य, सुखसोयी असल्या तरी शरीर आजारी असेल तर त्याचा काही उपयोग राहत नाही. म्हणूनच निरोगी राहणे हे जीवनातील यशस्वीपणाचे पहिले पाऊल आहे.

आरोग्य टिकवण्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, स्वच्छता आणि सकारात्मक विचार हे घटक महत्त्वाचे आहेत. वेळेवर आहार घेणे, ताणतणाव टाळणे आणि निसर्गाशी नातं ठेवणे या सवयी आरोग्यदायी जीवनाकडे नेणाऱ्या आहेत.




आजच्या धावपळीच्या युगात पैसा कमावण्याच्या धडपडीत माणूस स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो. पण जेव्हा आजारपण येते तेव्हा लक्षात येते की पैशाने सर्व काही विकत घेता येते पण निरोगी जीवन नाही. म्हणूनच शरीराची व मनाची काळजी घेणे हेच आपलं खरं कर्तव्य आहे. आरोग्य टिकवले तर सुख, आनंद आणि यश आपोआप मिळतं खरी संपत्ती बँकेतल्या पैशात नाही, तर निरोगी आयुष्यात आहे. म्हणूनच आरोग्य जपा; कारण आरोग्य हीच खरी धनसंपदा आहे.

# वादळी विचार

दीक्षा मोहिते (११ वी कला)

मनातला प्रत्येक विचार आपल्या भावना जर कागदावर उतरवता आल्या असत्या तर किती बरं झालं असतं ना. असो काही गोष्टी न सांगितलेल्याच बऱ्या असतात.

आपल्या आयुष्यात अनेक व्यक्तींचा समावेश असतो. त्या प्रत्येक व्यक्तीचं काहीसं वेगळचं स्थान आपल्या आयुष्यात निर्माण झालेल असतं. मग आपण स्वतःहून त्या व्यक्तीपासून कितीही लांब जाण्याचा प्रयत्न केला तरीही आपण लांब जाऊ शकत नाही. कसं असतं ना, काही व्यक्ती आपल्याला स्वतःहून दूर लोटतात आणि कधी-कधी आपण स्वतःहून दूर जातो.जवळ-दूर लोटण्याचा हा खेळ असाचं चालू राहतो.पण शेवटपर्यंत ह्या खेळाचा निकाल काही लागतं नाही. कधी-कधी मनात असंख्य प्रश्नांचं वादळ येऊन जातं. असं वाटत त्या वादळासोबत आपणही कुठेतरी दूर निघून जावं. पण मग मनात विचार येतो कुठेतरी लांब जाऊन नव्या कोड्यांची निर्मिती करण्यापेक्षा जी कोडी आपल्या समोर आहेत तिचं सोडवत बसावी.आजकाल नाती म्हटलं ना की फक्त डोळ्यासमोर येतात ती नात्यातली बंधन. असं वाटतं ह्या नात्यातं बंधनांशिवाय काही उरलचं नाही आहे. मला मान्य आहे की नात्यात काही बंधने हीच त्या नात्याला बांधून ठेवण्याचं काम करत असतात. पण नंतर ह्याच बंधनांचा अतिरेक होतो आणि नाती कायमची संपतात.जर कोणतही नातं टिकवायचं



असेल तर नात्यात विश्वास हवा. कारण नाती विश्वासावर कायम असतात. नात्यातला विश्वास ढळून जर गैरसमजाचे ढग कडाडू लागले तर भावनांचा पाऊस पडल्याशिवाय राहत नाही.



**ऋषभ कोतवडेकर (१२ वी वाणिज्य)**

# अद्भूत भारताच्या हृदयात...!

प्रा. निनाद तेंडुलकर
(इतिहास विभाग)



नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झालं की इतिहास शोध आणि बोध अभियान मंडळाच्या सदस्यांना वेध लागतात ते मंडळाच्या सहलीचे.. खरं तर आदल्या वर्षीच्या सहलीतच पुढील वर्षीच ठिकाण ठरत त्याप्रमाणे यावर्षी सहलीसाठी मध्यप्रदेश राज्यातील ठिकाणं पाहण्याचं निश्चित झालं.

सहलीची यशस्वीता अचूक नियोजनावर आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्यावर अवलंबून असते त्याप्रमाणे जून पासून सहकारी शिक्षक डॉ. पंकज घाटे यांच्या सोबत नियोजनासंदर्भात चर्चा होत होती. काही जुजबी नियोजन झालं असताना रत्नागिरीतील पुरातत्व अभ्यासक तार्किक खातू याच्या सोबत बोलणं झालं आणि सहलीची ठिकाणं आणि पूर्ण नियोजन एका मिटिंग मध्ये ठरलं. सहलीचा कालावधी ठरला व रेल्वे तिकीट रिझर्वेशन करण्याच्या मोठ्या दिव्यातून कसबस पार झालो.

तार्किक याच्या वर्णनातूनच आम्ही ठिकाण पाहण्यासाठी अधिकच उत्सूक झालो होतो. अश्मयुगापासून मध्ययुगापर्यंतचा इतिहास मध्यप्रदेशातील ऐतिहासिक वारसा आम्ही विद्यार्थी व शिक्षक २६ ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत पाहणार होतो. भोपाळ-विदिशा-सांची-भीमबेटका भागातील इतिहासाच्या साक्षात दर्शनासाठी निघालो. हा प्रवास केवळ पर्यटन नव्हत, तर हजारो वर्षांपूर्वीच्या मानवजातीच्या पावलांवर चालण्याचा आणि भारतीय सभ्यता-संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेत जाण्याचा एक अविस्मरणीय अनुभव ठरणार होता. आणि तार्किकचा डेक्कन महाविद्यालयातील मित्र पुरातत्व अभ्यासक श्री. मंदार चौधरी पूर्णवेळ आमच्या सोबत असणार होता त्यामुळे आमच्या आनंदात भरच पडली आणि अभ्यास सहल या नावाला साजेसं व्यक्तिमत्व आम्हाला सहल मार्गदर्शक म्हणून लाभल.

**सांची स्तूप** - आमचं पहिल पाऊल सांची, रायसेन जिल्हा (भोपाळपासून सुमारे ४५ किमी) येथे थांबल. आमचा निवास सांची येथील स्तूपाच्या सानिध्यात होता. जे बौद्ध स्मारकांचा युनेस्को विश्ववारसा स्थळ आहे. यातील मुख्य आकर्षण म्हणजे महान सांची स्तूप, जे मौर्य सम्राट अशोकांनी इ.स.पू. तिसऱ्या शतकात बांधलेले आहे. सांची स्तूपाची विशाल अंडाकृती संरचना आणि चारही दिशांना उभारलेले उत्कंठावर्धक तोरणे आपल्या कोरीव शिल्पकलेमध्ये बुद्धाच्या जीवन कथा आणि जातककथा यांचे साधक रूपात प्रतिबिंब दर्शवितात. हे शिल्पकार काम पाहून आम्ही इतिहासातील कुशल शिल्पकारांच्या

हातांनी जन्माला आलेल्या अशा अद्भुत कलाकृतींचा साक्षात्कार करायला मिळाला. स्थळावरच्या शांत वातावरणात आणि हवेत इतिहासाचा गंध अनुभवत आम्ही आपल्या पूर्वजांच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक विचारधारेचा सखोल अनुभव घेतला.

✲ सतधारा स्तूप – सांचीच्या परिसरात सतधारा स्तूपाचे अवशेषही आमच्या भेटीचा भाग होते. ही स्थळे सांचीपासून पश्चिमेला सतधारा नदीकाठी आहेत ज्यात अनेक लहान आणि मुख्य स्तूपांचे समूह पाहायला मिळतात. हे ठिकाण आपल्या बौद्ध संप्रदायाच्या विस्तृत फैलावाचे संकेत देते. येथे ऐतिहासिक अवशेष आणि विहारांच्या भग्नावशेषांनी कल्पना येते की हे समुदाय प्राचीन काळात एक महत्त्वाचे बौद्ध अभ्यास व ध्यान केंद्र होते. विदिशा येथील सतधारा स्तूप येथे भेट दिली असता दार्जीलिंग येथून आलेले काही बौद्ध भिक्षू स्तूपाची प्रार्थना व धार्मिक विधी पार पाडत होते. विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी संवाद साधत बौद्ध धर्मातील प्रार्थना, धार्मिक विधी व त्यामागील आध्यात्मिक अर्थ समजून घेतला तसेच पूजाविधींमध्ये सहभाग नोंदवला. या थेट संवादामुळे इतिहासाशी जोडलेले जिवंत धार्मिक व सांस्कृतिक जीवन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवता आले. त्यानंतर कर्क रेषा पाहून दिवसाची सांगता केली.

दुसऱ्या दिवशी ग्यारसपूर परिसर पाहण्यास निघालो. ग्यारसपूरमध्ये मालादेवी मंदिर हे ८५०–९०० ई.च्या काळात प्रातिष्ठित जैन मंदिर आहे, जे गुर्जर–प्रतिहार वास्तुशिल्प शैलीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. मंदिराच्या नावावरून व काही मूर्तींवरून हे ठिकाण कधीकाळी हिंदू देवीच्या उपासनेशीही संबंधित असावे. हे मंदिर डोंगराच्या उतारावर स्थित असून खाली विस्तीर्ण दरी व निसर्गरम्य दृश्य दिसते. मंदिरात प्रवेशद्वार (तोरण), मंडप, गर्भगृह असे पारंपरिक भाग आहेत. भिंतींवर व स्तंभांवर जैन तीर्थंकर, यक्ष–यक्षिणी आणि विविध नक्षीकाम कोरलेले आहे. या मंदिरातील कोरीव शिल्प आणि विस्तृत सौंदर्य आम्हाला मध्ययुगीन स्थापत्यकलेची उत्कंठा देतात.

**हिंदोळा तोरण –** हिंदोळा तोरणाचे बांधकाम इ.स. ९व्या–१०व्या शतकात झाले असल्याचे इतिहासकार मानतात. हे तोरण गुर्जर–प्रतिहार काळातील असल्याचे मानले जाते. ग्यारसपूर हे प्राचीन काळात धार्मिक व सांस्कृतिक केंद्र होते. हिंदोळा तोरण त्या वैभवाची साक्ष देतो.जेथे दगडी स्तंभ आणि हिंदोळा डिजाइनची अनोखी शैली पाहायला मिळते, यामुळे इतिहासातील वास्तुशिल्पातील वैविध्याचा अनुभव मिळतो.

**ब्रजमठ मंदिर व आठखंबा मंदिर –** ब्रजमठ मंदिर व आठखंबा मंदिरांचे बांधकाम इ.स. ९व्या–१०व्या शतकात झाले असल्याचे मानले जाते. ही स्मारके गुर्जर–प्रतिहार काळाशी संबंधित आहे. ब्रजमठ मंदिर उत्तर भारतीय नागर शैलीत बांधलेले आहे. मंदिर उंच चौथऱ्यावर उभारलेले आहे. गर्भगृह, अंतराळ व मंडप अशी पारंपरिक रचना आढळते. आठखंबा या मंदिरात आठ भक्कम दगडी खांब (स्तंभ) उभे आहेत, म्हणून याला आठखंबा असे नाव पडले. खांबांवर सुंदर नक्षीकाम व कोरीव शिल्पे दिसून येतात. संपूर्ण रचना पाहता हे मंदिर किंवा मंडप खुल्या सभामंडपासारखे वाटते. आज मंदिराचा काही भाग नष्ट झाला असला तरी स्तंभ आजही उभे आहेत.



ग्यारसपूर हे त्या काळात धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध केंद्र होते.

**देखीनाथ स्तूप –** हा मध्य प्रदेशातील विदिशा जिल्ह्यातील ग्यारसपूर येथे असलेला एक प्राचीन बौद्ध स्तूप आहे. ग्यारसपूर परिसरातील हा एक महत्त्वाचा बौद्धकालीन अवशेष मानला जातो. देखीनाथ स्तूपाचा काळ साधारणतः इ.स. पूर्व २रे शतक ते इ.स. १ले शतक (शुंग–सातवाहन काळ) असा मानला जातो. हा स्तूप बौद्ध धर्माच्या प्रभावाखाली बांधण्यात आला होता. ग्यारसपूर परिसरात प्राचीन काळात बौद्ध, जैन व हिंदू परंपरा एकत्र नांदत होत्या, याचा हा पुरावा आहे. हा स्तूप अर्धगोलाकार (घुमटाकृती) स्वरूपाचा आहे. स्तूप विटा व दगड वापरून बांधलेला असल्याचे अवशेषांवरून दिसते. आज स्तूपाचा बराचसा भाग अवशेष स्वरूपात असून फक्त पाया व घुमटाचा भाग स्पष्ट दिसतो. स्तुपाजवळून परिसराचे विहंगम दृश्य दिसते. संध्याकाळी सांची स्तुपावरील लाईट आणि साउंड शो मध्ये गौतम बुद्धांचे जीवन चरित्र पाहिले. तिसऱ्या दिवशी थोडं दूर असणाऱ्या उदयपूर येथील निलकंठेश्वर मंदिर पाहण्यास निघालो.

**निलकंठेश्वर मंदिर, उदयपूर –** निलकंठेश्वर मंदिर हे मध्य प्रदेशातील उदयपूर (जिल्हा – रायसेन) येथे स्थित एक प्रसिद्ध

प्राचीन शिवमंदिर आहे. हे मंदिर आपल्या भव्य स्थापत्यशैलीसाठी व शैव परंपरेतील महत्त्वासाठी ओळखले जाते. निलकंठेश्वर मंदिराचे बांधकाम इ.स. १०व्या-११व्या शतकात झाले असल्याचे मानले जाते. हे मंदिर परमार राजवंशाच्या काळातील आहे. हे भूमिज शैलीतील मंदिर उत्तर भारतीय नागर शैलीत बांधलेले आहे. उंच शिखर, सुसंगत प्रमाणबद्ध रचना आणि भक्कम दगडी बांधकाम हे याचे वैशिष्ट्य आहे. मंदिराच्या गर्भगृहात भगवान शिवाचे 'निलकंठ' स्वरूपातील शिवलिंग प्रतिष्ठित आहे. मंदिराच्या भिंतींवर व शिखरावर शिव-पार्वती, नंदी, गणेश, विविध देवदेवतांची शिल्पे कोरलेली आहेत. कोरीव काम अतिशय सूक्ष्म व कलात्मक आहे. उदयपूर हे त्या



काळात मध्य भारतातील एक महत्त्वाचे धार्मिक व सांस्कृतिक केंद्र होते.

**उदयगिरी गुहा-** या मध्य प्रदेशातील विदिशा जिल्ह्यात, बेसनगरजवळ (सांचीपासून सुमारे ५ किमी) स्थित आहेत. या गुहा प्राचीन भारताच्या गुप्तकालीन इतिहास, धर्म आणि शिल्पकलेचा अत्यंत महत्त्वाचा ठेवा मानल्या जातात. उदयगिरी गुहांचा काळ इ.स. ४थे-५वे शतक असा आहे. या गुहा गुप्त सम्राट चंद्रगुप्त दुसरा (विक्रमादित्य) यांच्या काळात खोदल्या गेल्या. गुप्तकाळाला भारतीय इतिहासातील सुवर्णयुग म्हटले जाते, आणि उदयगिरी गुहा त्या वैभवाची साक्ष देतात. उदयगिरी येथे एकूण २० गुहा आहेत. या गुहा दगडात कोरलेल्या (Rock-cut caves) आहेत. काही गुहा हिंदू धर्माशी तर काही जैन परंपरेशी संबंधित आहेत. उदयगिरी गुहांमध्ये मुख्यतः वैष्णव, शैव आणि जैन परंपरेचे दर्शन घडते. भगवान विष्णू, शिव, गणेश यांची शिल्पे आढळतात. सर्वात प्रसिद्ध शिल्प म्हणजे वराह अवतार - विष्णूने पृथ्वीला (भूदेवीला) समुद्रातून वर काढतानाचे भव्य शिल्प. वराह अवताराचे शिल्प हे भारतीय शिल्पकलेतील एक अद्वितीय उदाहरण मानले जाते. काही गुहांमध्ये जैन तीर्थंकरांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. शिल्पांमध्ये प्रमाणबद्ध शरीररचना भावपूर्ण चेहऱ्यावरील भाव, धार्मिक प्रतीकात्मकता स्पष्टपणे दिसते.

**हेलीओडोरस स्तंभ -** हेलीओडोरस स्तंभ हा मध्य प्रदेशातील विदिशा जिल्ह्यातील बेसनगर (सांची जवळ) येथे स्थित एक अत्यंत महत्त्वाचा प्राचीन शिलालेखयुक्त स्तंभ आहे. हा स्तंभ भारतीय इतिहासात परदेशी व्यक्तीने स्वीकारलेल्या भारतीय धर्माचा ठोस पुरावा मानला जातो. या स्तंभाचा काळ इ.स. पूर्व २रे शतक (सु. इ.स.पू. ११०) असा मानला जातो. हा स्तंभ हेलीओडोरस नावाच्या ग्रीक (यवन) राजदूताने उभारला. हेलीओडोरस हा इंडो-ग्रीक राजा अँटिआल्किडास याचा राजदूत होता. तो शुंग वंशातील राजा भागभद्र यांच्या दरबारात आला होता. हा स्तंभ भगवान विष्णूला (वासुदेव) समर्पित आहे. हेलीओडोरस स्वतः ला शिलालेखात भगवत (भगवान विष्णूचा भक्त) असे म्हणतो. त्यामुळे हा स्तंभ वैष्णव धर्माचा सर्वात जुना पुरावा मानला जातो. हा शिलालेख धार्मिक सहिष्णुता व सांस्कृतिक देवाणघेवाणीचा पुरावा आहे. हा स्तंभ गरुडध्वज स्तंभ म्हणून ओळखला जातो. मूळतः स्तंभावर गरुडाची प्रतिमा असावी, असे मानले जाते. दगडात घडवलेला, साधा पण भक्कम स्तंभ आहे. भारतीय व ग्रीक संस्कृतीतील घनिष्ठ संबंधांचा पुरावा आहे. परकीय व्यक्तीने भारतीय देवतेची उपासना केल्याचे सर्वात जुने उदाहरण आहे. वैष्णव धर्माच्या इतिहासासाठी अत्यंत महत्त्वाचा पुरावा

* भीमबेटका रॉक शेल्टर्स - आमच्या सहलीचा शेवट दिवस भीमबेटका रॉक शेल्टर्स येथून सुरु झाला, जे मध्यप्रदेशातील रायसेन जिल्ह्यातील जगातील महत्त्वाचे प्रागैतिहासिक स्थल आहे. हे स्थल ३०,००० वर्षांहूनही जुने मानले जाते आणि येथे सापडलेली ७५० पेक्षा अधिक शैल आश्रय भाग आणि गुहेतील भित्तीचित्रे प्राचीन मानवाच्या जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकतात - शिकारी, नृत्य, मासेमारी, धार्मिक विधी आणि सामाजिक जीवन यांचे उत्कंठावर्धक दृश्यचित्रण या भित्तीचित्रांमधून दिसते. खरोखरच, या भित्तीचित्रांमधील अद्भुत रूपांनी आम्हाला

इतिहासाच्या अगदी जवळून स्पर्श केला. गुहांमध्ये प्रवेश करताच, आपण अक्षरशः भूतकाळाशी संवाद साधत असल्याचा अनुभव घेतला; प्राचीन मानवी जीवनाचे चित्रात्मक दस्तऐवज येथे भिंतींवर आजही सजीव दिसतात.

**भोजेश्वर महादेव मंदिर –** हे मंदिर भोजपूर गावात आहे, जे भोपाळपासून सुमारे २८ ते ३० किमी आहे. ११ व्या शतकात राजा भोज यांच्या काळात बांधलेले आणि ते थोडे अधूरेच राहिले. मंदिरात एक विशाल शिल्पित शिवलिंग आहे (१८ फूट उंच), जे प्राचीन भारतीय वास्तुकलेचे अप्रतिम उदाहरण आहे. सहलीत सांची वस्तू संग्रहालय, विदिशा संग्रहालय व भोपाळ राज्य संग्रहालयाला भेट दिली. तेथील विविध पुरातन मूर्ती व वस्तू पाहिल्या तसेच सांची स्तूपाचे उत्खनन व जतन कसं केल गेलं याच्या चित्रांचा संग्रह तिथे पाहण्यास मिळाला ज्यावरून आधी व नंतर यातील फरक लक्षात आला. विदिशा व आसपासच्या संग्रहालयात आम्ही प्राचीन वस्तू, शिलालेख, सिक्के, मूर्त्यांचे अवशेष आणि रोजच्या वस्तूंचे संग्रह पाहिले. हे संग्रह आपल्याला त्या काळातील सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक जीवनाची जगापर्यंतची कथात्मक साक्ष देतात. सहलीच्या शेवटच्या दिवशी मध्यप्रदेश शासनाचे उच्च शिक्षण, आयुष व तांत्रिक शिक्षण मंत्री मा. श्री. इंदर सिंह परमार यांनी विद्यार्थ्यांची आवर्जून घेतलेली भेट अविस्मरणीय ठरली. इतिहास विभागाच्या उपक्रमांचे त्यांनी कौतुक करत भारतीय ज्ञानपरंपरेचा वारसा जपून विकसित भारत घडविण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारावी, असे मार्गदर्शन केले. ही सहल अश्मयुगापासून ते मध्ययुगापर्यंतचा इतिहास केवळ पुस्तकी ज्ञानात न अडकता प्रत्यक्ष भूतकाळाशी जोडलेले अनुभव देणारी ठरली. प्रत्येक शिल्प, स्तूप, शिलालेख आणि गुहेतील भित्तीचित्रे – हे सारे इतिहासाचे जिवंत दस्तऐवज आहेत ज्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात शाश्वत अनुभव आणि उत्कंठा निर्माण केली. ही सहल इतिहासातील विविध कालखंडांतील संस्कृतींचे विस्तृत जाणिवात्मक दर्शन घेण्याची एक अमूल्य संधी ठरली. माझे सहकारी डॉ. पंकज घाटे, प्रा. अन्वी कोळबेकर, प्रा. अपर्णा तगारे यांच्या अमुल्य सहकार्यामुळे आणि विद्यार्थ्यांच्या औत्सुक्यपूर्ण सहभागामुळे सहल यशस्वी होऊ शकली.





# फर्निचर

प्रा. विस्मया कुलकर्णी (इंग्लिश विभाग)

रेवा आणि रुद्र यांचा प्रेमविवाह घरच्यांच्या संमतीने झाला होता. रेवा पुण्यातल्या मल्टिनॅशनल कंपनीमध्ये नोकरी करत होती तर रुद्रला स्वतःचं स्टार्टअप सुरू करायचं होतं. आर्किटेक्ट म्हणून तो पुण्यातल्या एका नामांकित बिल्डरकडे काम करत होता.रुद्र मध्यमवर्गीय तर रेवा अगदी सामान्य शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे पुण्या मुंबईत फ्लॅट घेण्यासाठी आई–वडिलांकडून भांडवल मिळणं शक्यच नव्हतं. रेवा बालपणापासून अतिशय हुशार असल्यामुळे तिने नामांकित इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये कम्प्युटर सायन्स मधून डिग्री संपादन केली. पुढे मेरिटवर आय. आय. एम. मधून एम.बी.ए. करत असताना तिथे तिला रुद्र भेटला. कोकणातल्या सामान्य गावातल्या अतिसामान्य आर्थिक परिस्थितीतून पुढे आल्यामुळे रेवाचे पाय अखंड जमिनीवर राहिले. आई – वडील कोकणातील शेतकरी. असेल ती भाजी – भाकरी आवडीने खायची ही घरातली सवय. उगाचच ऋण काढून सण करण्याची पद्धत त्यांनी कधीच घरात रुजवली नव्हती. त्यामुळे लहानपणी असलेल्या पैशात समाधानाने जीवन जगण्याची कला आपोआप तिच्या गुणसूत्रांमध्ये उतरली होती.

रुद्र पेशाने आर्किटेक्ट होता आणि लव्ह यु जिंदगी ही त्याच्या आयुष्याची टॅग लाइन होती. लग्न झाल्यावर ती दोघही रुद्रने भाड्याने घेतलेल्या फ्लॅटमध्ये राहायला लागले. फ्लॅटचा एफएसआय तसा कमी होता पण रुद्रच्या मनाचा आणि सौंदर्यदृष्टीचा एफएसआय मोठा असल्यामुळे त्याने तो अँटिक फर्निचरचा वापर करून चांगल्या प्रकारे सजवला होता. फर्निचर सेकंड हॅन्ड होतं. ओएलएक्सवरूनच त्याने ते खरेदी केलं होतं पण ज्या कुटुंबांकडून ते फर्निचर आयटम्स आणले होते, त्या कुटुंबातल्या कर्त्या स्त्री–पुरुषांशी तो आवर्जून बोलला होता. तो सोफा खरेदी करताना त्यांनी पैशांची जुळवाजुळव कशी केली इथपासून ते सोफ्यावर बसून त्यांनी वाफाळणाऱ्या चहाच्या घोटाबरोबर वाचलेल्या सकारात्मक बातम्या त्यांच्या मनात कशा रेंगाळल्या हे त्याने जाणून घेतलं होतं. डायनिंग टेबल त्याने पुणेस्थित एका आजी–आजोबांच्या घरातून विकत घेतलं होत. लहानग्यांसाठी थरथरत्या हाताने तयार केलेल्या स्वयंपाकामध्ये प्रेम आपोआप कसं उतरतं आणि मुळात गोड असलेली मऊसूत पुरणपोळी अधिक गोड बनल्यामुळे नातवंडांनी कशी मनापासून खाल्ली हे डायनिंग टेबल विकणाऱ्या आजींनी त्याला आपल्या खुमासदार शैलीत सांगितलं होतं.

ऑफिसला जाण्यापूर्वी रोज सकाळी एकत्र चहा घेण्याची त्यांनी सवय लावली होती. कितीही घाई असली तर हे आन्हिक ते आठवणीने पाळत असत. त्यामुळे रुद्रला त्या फर्निचरमधून वेगळीच ऊर्जा (एक्झॉटिक एनर्जी) मिळते असं वाटायचं. अशा प्रकारे वर्क लाइफ बॅलन्स उत्कृष्टपणे सांभाळण्याचा त्याचा हा प्रयत्न होता .

दोघांच्याही नोकऱ्या चांगल्या असल्यामुळे स्वतःचे घर असावे असं त्यांना सतत वाटत होतं. रुद्र आर्किटेक्ट असल्यामुळे त्याचा विविध बिल्डरशी तसा संबंधही यायचा. विविध बँकांमध्ये भेटी देऊन ते स्वतः घर घेण्यासाठी साधारण किती कर्ज घेऊ शकतात याचा त्यांनी अंदाज काढला होता. अंथरूण पाहून पाय पसरायचे हे तत्त्व ते पाळत होते आणि त्यामध्ये परवडेल अशा ठिकाणच्या आणि नोकरीला जाण्या – येण्याच्या सोयीनुसार नवीन घरांच्या जाहिराती पाहण्याचं काम चालू होतं. साईट्स व्हिजिट्स होत होत्या. बिल्डरशी बोलणं चालू होतं आणि अशाच जाहिराती पहात असताना एक सेकंड हॅन्ड फ्लॅट विक्रीची जाहिरात त्यांनी पाहिली.

पुण्यातल्या बावधनमधील पुणे – मुंबई हायवे पासून जवळच वसंत विहार भागामध्ये 'नक्षत्र' नावाची बिल्डिंग होती. दहा वर्षांपूर्वी बांधलेली. त्यामुळे लिफ्ट, जिम, क्लब हाऊस यांसारख्या सर्व अत्याधुनिक सुविधांची तिथे उपलब्धता होती. रेवाला तिथून हिंजवडीला नोकरीला जाणं शक्य होतं आणि रुद्रला त्याच्या ऑफिसला तसेच अन्य साईट विजिट करायला जाणंदेखील तितकच सोपं होतं म्हणून फ्लॅट मालकाची कॉल करून त्या दोघांनी लगेचच अपॉइंटमेंट घेतली.

आणि तो रविवार आला. संध्याकाळचे पाच वाजले होते. रुद्र आणि रेवा दोघेही ठरल्याप्रमाणे तिथे पोहोचले. सौ. उज्वला आणि उत्तम जोशी यांचे घर होतं.स्वतःचे फोटो लावलेली दोघांच्याही नावाची पाटी त्यांनी वाचली आणि दारावरची बेल दाबली. साधारण ७८ ते ८० च्या दरम्यान वय असणार ते जोडपं यांच्या स्वागतासाठी दार उघडायला एकत्र पुढे आलं. या दोघांनी त्यांना वाकून नमस्कार केला. त्यांच्या विनंतीला मान देऊन रुबाबदार सोफ्यावर ते बसले. समोरील भिंतीवर मोरपिसाची एक देखणी फ्रेम जणू यांच्या मनावर मोरपीस फिरवत होती.समोर एक छोटेखानी शोकेस होती. त्यामध्ये देशविदेशात भेटी देऊन तिथली आठवण म्हणून आणलेल्या छोट्या छोट्या वस्तू अगदी उच्च अभिरुची बाळगून सुशोभित केल्या होत्या. बाजूला एक भिंतीला लागून उंच जाणार पुस्तकांचं कपाट होतं. पु ल देशपांडे ,पीजी वूड हाऊस, शांताबाई शेळके, शेक्सपियर, प्रेमचंद यांसारख्या मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेतलं उत्तमोत्तम लेखकांचं दर्जेदार साहित्य तिथे उपलब्ध होतं आणि शेजारी एक छोटासा टीपॉय त्यावर एक पेन स्टॅन्ड, छोट नोट पॅड आणि पुस्तकांचा प्रेमळ ढीग. आराम खुर्ची. मंद प्रकाशाचा छोटा दिवा. बस! वेळ मिळाला की नव्हे तर वेळ काढून रिलॅक्स होण्यासाठी मखमली कोपरा. बाजूला एक हिरवगार बांबूचं झाड. वाढणाऱ्या वयाची हिरवाई जपणारं. रुद्रसाठी हे फर्निचर म्हणजे केवळ वस्तू नव्हत्या तर त्याच्या हृदयातल्या भावनांना आकार देणाऱ्या त्या रेषा बनल्या.

जोशी आजी-आजोबांशी त्यांचं बोलणं सुरू असताना त्यांनी या दोघांना स्वयंपाकघराची सफर घडवून आणली. तिथे त्यांचं स्वागत केलं ते नितळ ग्रॅनाईटच्या ओट्याने आणि गृहिणीचा हात व्यवस्थित पोहोचू शकेल अशी सर्व किचन कॅबिनेटनी. आकर्षक डायनिंग टेबलवर चविष्ट लोणचं, मुरंबा, चटण्या बाटल्यांमध्ये बसून जणू जेवणाचं आमंत्रण देत होत्या. जुन्या आणि नव्याचा संगम असलेले क्रोकरी, घासून पुसून लख्ख असं सिंक आणि शेजारी कॉक असलेला पाण्याचा माठ जणू संस्कृतीचे जतन करत होते. घरातच प्रवास करत करत ते आजी-आजोबांच्या बेडरूममध्ये गेले. गुलाबी पांढऱ्या रंगान नटलेल्या त्या भिंती त्या दोघांचं एकमेकांवर असलेल्या चिरंतन प्रेमाचं जणू प्रतीकच. चित्ताकर्षक वॉर्डरोब्स. त्यांनी ते उघडून दाखवले आणि या नवीन जोडप्याला मिळाला तो केवळ अहाहा इफेक्ट! सौ. जोशी आजी यांनी त्यांच्या लग्नातल्या, त्यांच्या,मुलाच्या आणि मुलीच्या लग्नातल्या, त्यांच्या लग्नाच्या ५० व्या वाढदिवसाच्या; अशा त्यांच्या आयुष्यातल्या मनाच्या कप्प्यात खोल जपून ठेवलेल्या क्षणांच्या आठवणी म्हणून नेसलेल्या सर्व साड्यांचा रंगतदार ढीग त्यांनी खूप दिमाखदारपणे रचून ठेवला होता. आजोबांचेही विशिष्ट प्रसंगात घातलेले सर्व कपडे आठवणीने त्यांच्या वॉर्डरोबमध्ये विराजमान झाले होते. ते क्षण जपून ठेवण्याचा त्यांचा केवढा हा प्रयत्न. खालच्या बाजूला सर्व अल्बम्स म्हणजे त्यांच्या आठवणींचा आरसा तिथे होता. दुसऱ्या बेडरूममध्ये मुलांना आणि नातवंडांना आवडेल असा मोठा दिमाखदार बेड तरुणाईला शोभेल अशी बेडशीट. तिथे गेल्यावर या दोघांना ती आपलीच खोली वाटली.

घरातलं फर्निचर, रंगसंगती, भिंतीवरचे वॉलपेपर्स ही रुद्रसाठी त्याच्या परफेक्ट फर्निचरची कल्पनाच होती आणि जोशी आजी आजोबांचं वागणं हे त्याच्या कल्पनेतल्या घराचं घरपण होतं.

घर पाहून झाल्यावर पुन्हा बाहेर सोफ्यावर ते विराजमान झाले. रुद्र आणि रेवाने बोलता बोलता घराबरोबर फर्निचरचीदेखील स्तुती केली आणि ती दोघेही भरभरून बोलायला लागली. आजोबांना सोफ्यावर घेतलेली पहिली डुलकी आठवली तर आजीला डायनिंग टेबलवर ठेवलेली पहिली कप बशी आणि तिचा रंग सांगावासा वाटला. मुलांच्या रूममधल्या स्टडी टेबलवर पहिल्या दिवशी त्यांच्या नातवंडांनी उतरवलेली अक्षरे आजोबांना आठवली, तर बाल्कनीतल्या झाडांना पाणी आणि खत घालून आलेली रंगीबेरंगी फुलं पूजेसाठी वापरताना मिळालेला आनंद आजीने बोलून दाखवला.

रुद्रच्या मनात विचारांचा प्रवास सुरू झाला. नव्याने घर घेताना किती हिंडून फिरून फर्निचर घ्यावं लागलं असेल यांना. तसं म्हटलं तर फर्निचर खरेदीचा प्रवास वस्तूंचा नसतोच मुळी. तो असतो नात्यांचा, निर्णयांचा, आठवणींचा आणि खरेदी करताना होणाऱ्या थोड्याशा वादावादीनंतर येणाऱ्या सामंजस्याचा.

जोशी आजोबा बोलता बोलता म्हणाले, ते दोघेही शेजारच्या वृद्धाश्रमात राहायला जाणार होते. दोन्ही मुलं परदेशी स्थायिक झाल्यामुळे त्यांच्यासोबत राहू शकत नव्हती. या दोघांना कोणतीही आर्थिक अडचण नव्हती. समवयस्कांबरोबर राहण्याचा आनंद त्यांना माहीत होता. वृद्धाश्रमामध्ये पैसा असेल तर ए ग्रेड सर्विस मिळते याची त्यांना माहिती होती. या घराशेजारीच एका वृद्धाश्रमातील रूम त्यांनी बुक केली होती . फक्त त्यांना अशा कुटुंबाला हे घर विकायचं होतं की जे नंतर यांना वाटलं तर काही क्षण त्या फ्लॅटमध्ये फिरून जाऊ शकतील आणि हे नक्कीच त्या मालकाच्या परवानगीनेच ते करणार होते.

रुद्र आणि रेवा दोघांनाही हा फ्लॅट आवडला आणि विशेषतः तिथलं फर्निचर आवडलं. कारण ते मुकं निर्जीव फर्निचर नव्हतं तर जिवंत माणसांच्या वयाला अनुरूप अशा सर्व भावनांची गुंतवणूक घेऊन उभे राहिलेले ते पक्क फर्निचर होतं. जणू त्यांच्यासाठी ते एक पावर हाऊस होतं.

रुद्रच्या लक्षात आलं हे घर फक्त बांधलेलं नाही तर हे घर जपलेलं घर आहे. त्याला वाटलं त्याच्या प्रयत्नाला जणू २.० यश आलं आणि तात्काळ त्याने ते रेवाच्या परवानगीने विकत घ्यायची तयारी दर्शवली.






**छायाचित्रे : भावना निगरे (१२ वी वाणिज्य)**





# आनंदाचं हळदीकुंकू

**प्रा. अदिती कोकजे** (अर्थशास्त्र विभाग)

काय सांगू तुम्हाला! आम्हा सगळ्यांची नुसती दगदग सुरू आहे.... आज काय परीक्षा.... मग आलं सुपरव्हिजन.... मग आले पेपरचे गठ्ठे..... मग लाल पेनांची गरज लागली आणि जुन्या स्मृतींना उजाळा देत हळदी कुंकवाची आठवण आली. संक्रांतीचा माहोल आणि त्यात केलेली लाल पेनांची लुटालुट आठवली. मग लक्षात आलं अरेच्चा! अजून यंदाचं हळदी कुंकू बाकी आहे. संक्रांतीचा दिवस तिळगुळ खात खात वर्गात पहारा करण्यात गेला खरा....पण डोक्यात येणाऱ्या अनेक पुढच्या विचारांपैकी एक विचार हळदी कुंकवाचाही येऊन गेला बरं का! महिलांना कसं काय कोण जाणे पण अशा बाबतीत एकमेकींच्या मनातलं लगेच कळतं. लगेच ग्रुप होतात....चर्चा होतात....आणि यंदाही तसंच झालं. यावर्षीची खास बाब म्हणजे आम्ही –घगउ च्या सर्व महिलांनी एकत्र येऊन हळदी कुंकू करूया असा विचार मांडला आणि लगेचच कार्यवाही सुद्धा सुरू केली. सुपरव्हिजन करताना करताना मिळणाऱ्या वेळाचा असा चांगला विचार करण्यासाठी उपयोग करायचा .... मंग काय समजलीव!!

हळदी कुंकू करूया ना! असा नुसता विषय कानावर पडला आणि भर परीक्षांच्या वेळेला सुद्धा सुपरविजन करून आलेला थकवा थोड्या वेळा पुरता का होईना दूर झाला. काय लगबग सुरू झाली सांगते तुम्हाला! काय लुटायचं? किती जणी आहेत? वाणं किती लागतील? तिळगुळ कोण आणेल? मुख्य म्हणजे खायला काय ठेवूया? आणि अनेक प्रश्नांना सुरुवात झाली. एकमेकींना भेटल्यानंतर आता हीच चर्चा रंगू लागली. तू काय देणार? मी काय देऊ? कुठली साडी नेसायची? वगैरे वगैरे गोष्टी आता प्रामुख्याने बोलल्या जाऊ लागल्या. अखेर वेगवेगळी काम आपापसात वाटून घेऊन सगळ्या महिलांना सामावून घेणारा असा ठरला आमचा हळदी कुंकवाचा समारंभ!!

ڈیجیٹل انفراسٹرکچر کی فراہمی اس کا مطلب یہ ہے کہ ہر شہری کو انٹرنیٹ کنکشن، ڈیجیٹل شناخت (جیسے آدھار)، موبائل فون اور بینک اکاونٹ جیسی سہولتیں فراہم کی جائیں۔ اس ستون کے تحت براڈبینڈ کنیکٹیوٹی، فائبر آپٹک نیٹ ورک اور موبائل نیٹ ورک کو مضبوط بنایا جارہا ہے۔ گورننس اور خدمات کی ڈیجیٹل ترسیل اس کا مقصد سرکاری خدمات کو ڈیجیٹل ترسیل اس کا مقصد سرکاری خدمات کو آن لائن اور آسان بنانا ہے، جیسے آن لائن فارم بھرنا، سرٹیفکیٹس حاصل کرنا، بلوں کی ادائیگی، ٹیکس فائلنگ اور شکایات درج کرنا۔ اس سے وقت، پیسہ اور محنت کی بچت ہوتی ہے اور بدعنوانی میں بھی کمی آتی ہے۔ شہریوں کو ڈیجیٹل خواندگی کو فروغ دیا جاتا ہے تاکہ ہر شہری ٹیکنالوجی کا صحیح استعمال کر سکے۔ دیہی علاقوں میں کمپیوٹر ٹریننگ، آن لائن تعلیم اور ڈیجیٹل بیداری مہمات اسی کا حصہ ہیں۔

ڈیجیٹل انڈیا کے نمایا منصوبے: ڈیجیٹل انڈیا کے تحت کئی اہ، منصوبے شروع کیے گئے، جن میں سے چند درج ذیل ہیں:

آدھار کارڈ: ایک منفرد ڈیجیٹل شناخت جو سرکاری اسکیموں سے فائدہ اٹھانے میں مددگار ہے۔

ڈیجیٹل پیمنٹ سسٹم: جیسے UPI, BHIM

ایپ، موبائل والٹ اور نیٹ بینکنگ، جن سے کیش لیس معیشت کو فروغ ملا۔

خوفِ مرض، موت کاڈر، روز گار کا عدم تحفظ اور تنہائی نے لوگوں میں ذہنی دباو، ڈپریشن اور بے خوابی جیسے مسائل کو جنم دیا۔ بہت سے افراد مایوسی اور ناامیدی کا شکار ہو گئے۔ گھریلو تشدد اور خاندانی جھگڑوں میں بھی اضافہ ہوا، کیونکہ لوگ طویل عرصے تک گھروں میں محدود رہے عالمی وبا کے دوران سماجی رویوں میں بھی نمایاں تبدیلی دیکھنے میں آئی۔ ایک طرف خود غرضی، ذخیرہ اندوزی اور افواہوں کا بازار گرم ہوا، تو دوسری طرف انسانیت، ہمدردی اور ایثار کی روشن مثالیں بھی سامنے آئیں۔ بہت سے لوگوں نے غریبوں اور ضرورت مندوں کی مدد کی، فلاحی تنظیموں نے راشن تقسیم کیا اور نوجوانوں نے رضاکارانہ خدمات انجام دیں۔ اس سے یہ ثابت ہوا کہ مشکل حالات میں سماج کے اندر خیر اور بھلائی کی قوتیں بھی زندہ رہتی ہیں۔ میڈیا اور سوشل میڈیا نے بھی عالمی وبا کے دوران اہم کردار ادا کیا۔ مثبت پہلو یہ تھا کہ لوگوں کو احتیاطی تدابیر اور تازہ معلومات ملتی رہیں، مگر منفی پہلو یہ رہا کہ جھوٹی خبریں اور افوہیں تیزی سے پھیلیں، جس سے خوف وہراس میں اضافہ ہوا۔ اس صورتحال نے ذمہ دارانہ صحافت اور شعور کی اہمیت کو اجاگر کیا۔ آخر میں یہ کہا جاسکتا ہے کہ عالمی وبا نے انسانی سماج کو ہر سطح پر متاثر کیا ہے۔ اس نے ہمیں یہ سبق دیا کہ صحت سب سے بڑی دولت ہے اور اجتماعی تعاون کے بغیر کسی بھی بحران کا مقابلہ ممکن نہیں۔ ہمیں چاہیے کہ ہم سائنس، تحقیق اور صحت کے نظام کو مضبوط بنائیں، سماجی ہم آہنگی کو فروغ دیں اور مشکل وقت میں ایک دوسرے کا سہارا بنیں۔ اگر ہم ان اسباق کو یاد رکھیں تو مستقبل میں آنے والی کسی بھی عالمی وبا کا بہتر انداز میں مقابلہ کر سکتے ہیں۔

## شعور

شعور کی ایک سطح وہ ہے جہاں انسان بدکلامی کا جواب بدکلامی سے دیتا ہے اینٹ کا جواب میں پتھر دے مارتا ہے۔

شعور کی دوسری سطح وہ ہے جہاں انسان بدکلامی کے جواب میں خاموشی اختیار کرتا ہے اور بدکلامی کرنے والے کو اپنے حال پر چھوڑ دیتا ہے۔

شعور کی ایک تیسری سطح ہے اس میں انسان نہ صرف یہ کہ اپنے جذبات پر قابو پاتا ہے بلکہ بُرے اخلاق کا جواب بہترین اخلاق سے دیتا ہے۔

شعور کی یہی تیسری سطح جو بدترین دشمن کو بہترین دوست میں تبدیل کر دیتی ہے اور جس کی وجہ سے معاشرہ میں اچھا اخلاق پروان چڑھتا ہے۔

جو کل تھے خواب، وہی آج اشتہار ہوئے
جذبے بھی اب تو بازار میں تیار ہوئے

منزل سے آگے بڑھ کر منزل تلاش کر
مل جائے تُجھ کو دریا تو سمندر تلاش کر

# عالمی وبا اور اس کے سماجی اثرات

سحر اقبال عصف (بارھویں آرٹس۔ی)

عالمی وبا سے مراد وہ مہلک بیماری ہے جو کسی ایک ملک یا خطے تک محدود نہ رہے بلکہ پوری دنیا میں تیزی سے پھیل جائے۔ تاریخِ انسانی میں طاعون، چیچک، ہیضہ اور حالیہ دور میں کورونا وائرس (کووِڈ-19) جیسی وبائیں اس کی واضح مثالیں ہیں۔ عالمی وباؤں نے نہ صرف انسانی صحت کو شدید خطرات سے دوچار کیا بلکہ معاشرتی، معاشی، تعلیمی اور نفسیاتی سطح پر بھی گہرے اثرات مرتب کیے۔ ان وباؤں نے انسانی زندگی کے معمولات کو بدل کر رکھ دیا اور سماج کے ہر طبقے کو کسی نہ کسی صورت میں متاثر کیا۔ عالمی وبا کے سب سے پہلا اور نمایاں اثر انسانی صحت پر پڑتا ہے۔ جب کوئی وبا پھیلتی ہے تو اسپتال مریضوں سے بھر جاتے ہیں، طبی وسائل کم پڑنے لگتے ہیں اور ڈاکٹرز و نرسیں شدید دباو کا شکار ہو جاتی ہیں۔ اس صورتحال میں عام لوگوں میں خوف، بے چینی اور غیر یقینی کیفیت پیدا ہو جاتی ہے۔ بہت سے افراد بروقت علاج نہ ملنے کے باعث جان سے ہاتھ دھو بیٹھتے ہیں، جس سے معاشرے میں غم و اندوہ کی فضا قائم ہو جاتی ہے۔ سماجی سطح پر عالمی وبا نے انسانی میل جول کو شدید متاثر کیا۔ سماجی فاصلہ، لاکڈاون اور قرنطینہ جیسے اقدامات ناگزیر ہو گئے۔ شادی بیاہ کی تقریبات، مذہبی اجتماعات، میلوں ٹھیلوں اور دیگر سماجی سرگرمیوں پر پابندیاں لگ گئیں۔ لوگ ایک دوسرے سے ملنے جلنے سے گریز کرنے لگے، جس کے نتیجے میں سماجی رشتوں میں سرد مہری پیدا ہوئی۔ بزرگ افراد اور بچے خاص طور پر تنہائی کا شکار ہوئے، جس سے خاندانی نظام پر منفی اثر پڑا۔ عالمی وبا کے سماجی اثرات میں ایک اہم پہلو معاشی بدحالی ہے۔ جب کاروبار بند ہوتے ہیں، فیکٹریاں رک جاتی ہیں اور بازار سنسان ہو جاتے ہیں تو لاکھوں افراد بے روزگار ہو جاتے ہیں۔ یومیہ اجرت پر کام کرنے والے مزدور سب سے زیادہ متاثر ہوتے ہیں۔ غربت میں اضافہ ہوتا ہے اور طبقاتی فرق مزید گہرا ہو جاتا ہے۔ امیر اور غریب کے درمیان فاصلہ بڑھنے سے سماجی بے چینی اور جرائم میں اضافہ دیکھنے میں آتا ہے۔ تعلیمی میدان بھی عالمی وبا کے اثرات سے محفوظ نہیں رہتا۔ اسکول، کالج اور جامعات بند ہو جاتی ہیں، جس سے طلبہ کا تعلیمی سلسلہ متاثر ہوتا ہے۔ اگرچہ آن لائن تعلیم ایک متبادل کے طور پر سامنے آئی، مگر ہر طالب علم کو انٹرنیٹ اور جدید آلات کی سہولت حاصل نہیں ہوتی۔ اس طرح تعلیمی ناہمواری میں اضافہ ہوا اور دیہی علاقوں کے طلبہ خاص طور پر پیچھے رہ گئے۔ بچوں کی ذہنی نشوونما اور سماجی تربیت بھی متاثر ہوئی۔ نفسیاتی اثرات بھی عالمی وبا کا ایک سنگین پہلو ہیں۔









**छायाचित्रे : भावना निगरे (१२ वी वाणिज्य)**

जीवन म्हणजे पराकोटीचा आनंद होय.

# विविध समित्यांचे कार्यअहवाल



**कासीम बुड्ये (१२ वी वाणिज्य)**

# अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विविध मंडळांचे २०२५-२०२६ चे कार्य अहवाल

## वसुंधरा जिज्ञासा मंडळ

दि.११ जुलै २०२५ रोजी अभ्यंकर कनिष्ठ महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी हे उपस्थित होते. वसुंधरा जिज्ञासा मंडळाचे समन्वयक प्रा. दत्तात्रय माळवदे यांनी लोकसंख्या वाढ आणि तिचे दुष्परिणाम याविषयी अनेक उदाहरणे देऊन सविस्तरपणे माहिती सांगतली. तसेच सध्या भारतात तरुण लोकसंख्या जास्त आहे, ती इतर देशांकडे नाही. त्यामुळे येत्या चार–पाच वर्षात जगातील अनेक देशात नोकरीच्या संधी उपलब्ध होतील याविषयी माहिती सांगितली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. सुनील गोसावी यांनी लोकसंख्या ही प्रत्येक देशाची साधन संपत्ती कशी आहे व ती जर सुदृढ व शैक्षणिक दृष्ट्या चांगलीअसेल तर त्या देशांचा विकास होतो याविषयी माहिती सांगितली.

वसुंधरा जिज्ञासा मंडळाने दिनांक ३१जुलै २०२५ रोजी रत्नागिरी येथील हवामान वेध शाळेला क्षेत्रभेट दिली. यावेळी वेधशाळेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.आर. बी. सोनार साहेब व सहाय्यक व वैज्ञानिक अनिल कुमार सिंह, सुमित खटावकर, अभिनव कुमार या तज्ञ अधिकाऱ्यांनी तेथील हवामान मोजण्याच्या प्रक्रिया, तापमापक यंत्र, आर्द्रता मापक यंत्र, हवादाब मापक यंत्र, पर्जन्यमापक, वाऱ्याचा वेग व दिशा मापक इत्यादी उपकरणाचे प्रात्यक्षिक दिले.

दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी कनिष्ठ महाविद्यालयात वसुंधरा जिज्ञासा मंडळाचा उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला .या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून गोगटे जोगळेकर महाविद्यालयातील प्रा. बाबासाहेब सुतार हे उपस्थित होते. पृथ्वीगोलाचे पूजन करून तसेच दीपप्रज्ज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्याख्याते प्रा. सुतार यांनी शुभांशू शुक्ला यांची, चांद्रयान मोहीम याविषयी स्लाईड शोच्या आधारे माहिती सांगितली.

दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी वसुंधरा जिज्ञासा मंडळाची क्षेत्रभेट भाट्ये येथील नारळ संशोधन केंद्र या ठिकाणी आयोजित करण्यात आली. यामध्ये येथील नारळ संशोधन केंद्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मालशे आणि श्रीमती बिर्जे मॅडम यांनी नारळ संशोधन केंद्रातील नारळ, सुपारी, फणस ,आंबा अशा विविध पिकांची तसेच कीड व्यवस्थापन कसे करावे व रोपांची कलमे कशी बांधावी, मसाल्यांच्या पिकांची लागवड कशी करावी तसेच लाखी बाग संकल्पना, मधुमक्षिका पालन, गांडूळ खत निर्मिती याविषयी सविस्तर माहिती दिली.

तसेच अजून भूगोल विषयांतर्गत भित्तीपत्रक, हस्तपुस्तिका, तारांगणास भेट इत्यादी उपक्रम नियोजित आहेत.

वसुंधरा जिज्ञासा मंडळाचे कामकाज समन्वयक प्रा. दत्तात्रय माळवदे तसेच सदस्य नितीन पेटावे, प्रा. दिलीप जाधव, प्रा. सुनील भोईर, प्रा. आदेश मुकणे, प्रा. दत्तात्रय सरगर, प्रा. सोनाली पाटील हे पाहत आहेत.

मान. प्राचार्य मकरंद साखळकर, मान.प्रशासकीय उपप्राचार्य डॉ. सुरेंद्र ठाकूरदेसाई, उपप्राचार्य प्रा.सुनील गोसावी, कला विभाग प्रमुख प्रा.वैभव कानिटकर विज्ञान शाखाप्रमुख प्रा. दिलीप शिंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे कार्य चालू आहे.

**प्रा. दत्तात्रय माळवदे**
समन्वयक

## सुयश अकॅडमी

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीची सुयश अकॅडमी विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे संगोपन करण्यासाठी आणि ११वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांना मेडिकल, इंजिनिअरिंग तसेच फार्मसी सारख्या स्पर्धा परीक्षांच्या मार्गदर्शनासाठी वचनबद्ध आहे, ज्याचा उद्देश IIT, NIT, -IIMS,

IISER, NISER आणि अशा अनेक प्रतिष्ठित सरकारी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळविणे हा आहे.

**विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शैक्षणिक सुविधा रत्नागिरी सारख्या ठिकाणी मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे सुयश अकॅडमी कारण –**

१) स्मार्ट क्लासरूम,

२) परस्पर संवादी अध्यापन (इंटर ॲक्टिव्ह टीचिंग)

३) राजस्थान मधील कोटा येथील ZAP लर्निंग सोल्युशन्स यांचे विशेष मार्गदर्शन

४) रोज सरावासाठी विशेष सत्र

५) आठवड्यात शिकवलेल्या भागावर विशेष चाचण्या आणि प्रात्यक्षिके

६) सराव चाचण्या झाल्यावर लगेचच विद्यार्थ्यांच्या गुणांचे विश्लेषण

७) गुणवत्ता पूर्ण अभ्यास साहित्य, या सर्व भौतिक सुविधा इथे उपलब्ध आहेत

८) याचबरोबर स्मार्ट क्लासरूमच्या शेजारीच साधन समृद्ध ग्रंथालय उपलब्ध आहे.

९) डॉ. राजीव सप्रे, डॉ. विवेक भिडे, प्रा. महेश नाईक यांसारखे व्यासंगी आणि अनुभवी शिक्षक वर्ग ही या अकॅडमीची अत्यंत लक्षवेधी बाब आहे.

१०) विद्यार्थ्यांना वैयक्तिक शंका समाधानाची उत्तम संधी आहे. तसेच विद्यार्थ्यांचे गरजेनुसार आणि योग्य वेळी समुपदेशन केले जाते.

११) वर्ग खोल्या वातानुकूलित आहेत.

१२) पालकांसाठी खुशखबर म्हणजे सर्व बाबी अत्यंत माफक फी मध्ये विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे अकॅडमी चे पहिले वर्ष असून अकॅडमीमध्ये इयत्ता ११वी मध्ये एकूण ३२ विद्यार्थ्यांनी आणि इयत्ता १२ मध्ये एकूण ३४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. (१२ वीची बॅच थेट १२ वीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची होती.)

बारावीच्या प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी २५ विद्यार्थी MHT-CET परीक्षेला प्रविष्ट झाले होते. सर्व विद्यार्थी चांगल्या पर्सेंटाईलने उत्तीर्ण झाले. फहीम अनिस धामसकर याने ९४.८७ पर्सेंटाईल तर आदित्य जवरात याने ९१.५२ पर्सेंटाईल प्राप्त केले.

**प्रा .चेतन मालशे**
समन्वयक

# सांस्कृतिक विभाग

सांस्कृतिक विभागाच्यावतीने विविध उपक्रमांचे/ कार्यक्रमांचे आयोजन कनिष्ठ महाविद्यालयात केले जाते. त्यामध्ये विशेषतः विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा आणि त्यांच्या कलागुणांसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे तसेच विद्यार्थ्यांमधील विविध अभिजात कलांची ओळख व्हावी हा सांस्कृतिक विभागांतर्गत वर्षभरात घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा उद्देश असतो.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये सांस्कृतिक मंडळ समिती स्थापन करण्यात आली आणि या विभागामध्ये जवळपास १८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

सदर वर्षभरामध्ये आमच्या मंडळाने उपप्राचार्य यांच्या मार्गदर्शनानुसार खालीलप्रमाणे उपक्रम घेण्यात आले त्यामध्ये १५ ऑगस्ट २०२५ रोजी देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेमध्ये एकूण ११ विद्यार्थी संघ सहभागी झाले होते. त्यामध्ये स्वराधीश ग्रुप (प्रथम), स्वातंत्र्यस्वर ग्रुप (द्वितीय), जयतू भारत ग्रुप (तृतीय) अशा प्रकारे निकाल देण्यात आला. तसेच या स्पर्धेचे नियोजनबद्ध आखणी करून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

तसेच इतर विविध सांस्कृतिक उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविला गेला त्यामध्ये २३ नोव्हेंबर २०२५ येथे दादर माटुंगा सांस्कृतिक आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन सुगम संगीत स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयातील कु. हर्ष बोंडाळे व कु. सार्था गवाणकर यांनी सहभाग घेतला आणि त्यांची मुंबईमध्ये होणाऱ्या अंतिम फेरीसाठी रत्नागिरी केंद्रातून निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आयोजित कला उत्सव उपक्रमात एकल स्वरवादन स्वर्धेत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी युवा कलाकार, संवादिनीवादक कु. श्रीरंग जोगळेकर याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच नोव्हेंबर २०२५ मध्ये

झालेल्या राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धेसाठी कु. श्रीरंग जोगळेकर याने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. याबदल त्याने सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. या वैशिष्ट्यपूर्ण कलाकौशल्य नैपुण्य विध्यार्थ्यांचे अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने विशेष कौतुकही करण्यात आले.

विद्यमान वर्षाच्या विविध स्पर्धांमध्ये व महाविद्यालयाच्या वार्षिक 'छंदोत्सव' यामध्ये सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थी सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या विविध कलाकौशल्याचे प्रदर्शन केले.

**प्रा.एस. एस. फळणीकर**
समन्वयक

# परीक्षा समिती

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनासाठी विविध परीक्षांचे आयोजन करण्यात आले.

एप्रिल २०२५ मध्ये रत्नागिरी पॅटर्न अंतर्गत अभ्यासक्रमावर आधारित बारावीची पहिली सराव परीक्षा जुलैच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात आली. ऑगस्ट २०२५ च्या दुसऱ्याआठवड्यात बारावीची दुसरी सराव परीक्षा घेण्यात आली.

ऑक्टोबर २०२५ मध्ये अकरावीची घटक चाचणी १ व बारावीची प्रथम सत्रांत परीक्षा घेण्यात आली.

डिसेंबर २०२५ च्या पहिल्या आठवड्यात बारावीच्या विद्यार्थ्यांना सराव व्हावा म्हणून पूर्व परीक्षा क्रमांक १ लेखी स्वरुपात घेण्यात आली. याचवेळी अकरावीची प्रथम सत्रांत परीक्षा घेण्यात आली.

जानेवारी २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात बारावीची पूर्व परिक्षा क्रमांक २ व अकरावीची घटक चाचणी क्रमांक २ यांचे नियोजन केले.

मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात अकरावीची वार्षिक परीक्षा नियोजित आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यापीठाच्या विविध परीक्षा आणि उपलब्ध सोयी सुविधा यांचा समग्र विचार करून सर्वांच्या सहकार्याने आणि माननीय प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा समितीचे काम सुरु आहे.

**प्रा. हमीद नांदगावकर**
समन्वयक

# विद्यार्थी सहाय्यता निधी समिती

र. ए. सोसायटीच्या, अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयात प्रत्येक वर्षी इयत्ता अकरावी व बारावी कला, वाणिज्य व शास्त्र शाखेतील आर्थिकदृष्ट्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वर्गीकृत करून त्यांना सामाजिक बांधिलकी या हेतूने कनिष्ठ महाविद्यालय तर्फे अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक खर्चासाठी काही रोख रक्कम दिली जाते.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ या वर्षीही कनिष्ठ महाविद्यालयाच्या कला शाखेतील २०, वाणिज्य शाखेतील ७ व शास्त्र शाखेतील १४ अशा एकूण ४१ विद्यार्थ्यांना रोख रक्कम वाटण्यात आली. महाविद्यालयाची ही आर्थिक दृष्ट्या गरीब विद्यार्थीभिमुख योजना यशस्वी होण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. मकरंद साखळकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी आणि पर्यवेक्षक प्रा. विद्याधर केळकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. याबरोबरच कला, वाणिज्य व शास्त्र विभागाचे विभागप्रमुख यांची वर्गातील अशा विद्यार्थ्यापर्यंत महाविद्यालयाने दिलेली मदत प्रत्यक्ष पोहोचविण्याकरिता महत्वाची भूमिका ठरली आहे.

**प्रा. हमीद नांदगावकर**
समन्वयक

# कार्यक्रम समिती

विद्यमान शैक्षणिक वर्षी पुढील उद्दिष्टे समोर ठेऊन कार्यक्रमांचे आयोजन व सादरीकरण करण्यात आले.विद्यार्थ्यांना विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रवृत्त करणे, विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढविणे व त्यांच्यातील कौशल्य विकसित करणे व त्यांच्या

चांगल्या गुणांचे कौतुक करणे.सदर उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीकोनातून पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दिनांक १६ मे २०२५ रोजी इयत्ता बारावीच्या यशवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव श्री श्रीकांत दुदगीकर, शालेय समिती अध्यक्ष श्री आनंदराव देसाई, रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या आजीव सभासद मंडळाचे सचिव श्री. महेश नाईक, श्री. मनोज पाटणकर, उपप्राचार्य श्री. सुनील गोसावी, पर्यवेक्षक श्री. विद्याधर केळकर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

**प्रा. व्ही .व्ही. जोशी**

समन्वयक

# राष्ट्रीय सेवा योजना

अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय रत्नागिरीमध्ये कार्यरत असणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कामकाज बारावीच्या ५० विद्यार्थ्यांना सोबत घेऊन सुरू झाले. यावर्षी प्रा. अभिजीत भिडे यांची कार्यक्रमाधिकारी व प्रा.सुनील भोईर, प्रा.भूषण केळकर, प्रा. रिद्धी हजारे, प्रा. वैशाली यादव यांची सहकार्यक्रमाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.

या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेले उपक्रम –

**जागतिक योग दिन : २१/०६/२०२५**

जागतिक योग दिन राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांना कार्यक्रमाधिकारी प्रा. अभिजीत भिडे यांनी योगा प्रोटोकॉलची माहिती दिली व सर्व स्वयंसेवकांकडून योगासने व प्राणायाम करून घेतला. या कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी, पर्यवेक्षक प्रा.विद्याधर केळकर ,क्रीडा शिक्षिका प्रा .लीना घाडीगावकर व सहकार्यक्रमाधिकारी उपस्थित होते.

**भात लावणी उपक्रम :-**

मेर्वी या गावातील श्री जयंत फडके यांच्या शेतात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या ४० स्वयंसेवकांनी भात लावण्याचा आनंद घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी रोप काढणे, बांध घालणे, पॉवर ट्रेलर चालवणे यांसारख्या शेतीविषयक कामांची माहिती घेतली.

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग उद्‌घाटन व उद्बोधन :- २४/०९/२०२५**

एन.एस. एस विभागाच्या उद्‌घाटन व उद्बोधन वर्ग २४/०९/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. ज. शं.केळकर सेमिनार हॉलमध्ये संपन्न झाला. या उद्बोधन वर्गासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. प्रभात कोकजे उपस्थित होते. त्यांनी एन.एस.एस ची स्थापना, त्यामागील हेतू तसेच एन.एस.एस लोगो व गीताची माहिती दिली. राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे कोणते उपक्रम आयोजित केले जातात त्याची माहिती दिली. तसेच एन.एस.एस चे विद्यार्थ्यांच्या घडणीतील महत्त्व विविध उदाहरणांच्या माध्यमातून समजावून दिले. देशभक्ती, नम्रता, वक्तशीरपणा, सहनशीलता, जुळवून घेणे यासारख्या गुणांची जोपासना राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमातून होते. अतिशय रंजक पद्धतीने पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे त्यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मार्गदर्शनात उपप्राचार्य प्रा.सुनील गोसावी सरांनी विद्यार्थ्यांनी समाजविकासात योगदान द्यावे, आपला वेळ ग्रामविकासास द्यावा व स्वतःचा व्यक्तिमत्व विकास करावा, श्रमसंस्कार शिबिरातील सात दिवस आजन्म पुरतील एवढे अनुभव देऊन जातील याचे मार्गदर्शन केले व वर्षभरातील सर्व उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.

**शुभेच्छापत्र तयार करणे : ०२/०७/२०२५**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी शुभेच्छापत्र तयार करण्याच्या कार्यशाळेत सहभाग दर्शवला व १३० शुभेच्छापत्रे तयार केली.

**गुरुपौर्णिमा : १०/०७/२०२५**

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. स्वयंसेवकांनी शुभेच्छापत्र कार्यशाळेत तयार केलेली शुभेच्छापत्र शिक्षकांना दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शाखांचे उपप्राचार्य, पर्यवेक्षक, विभाग प्रमुख, वर्ग शिक्षक व विषय शिक्षकांना स्वयंसेवकांनी शुभेच्छापत्र देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.

**लोकमान्य टिळक अभिवादन : २३/०७/२०२५**

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे २३ जुलै २०२५ रोजी लोकमान्य टिळकांच्या जन्मदिनानिमित्ताने रत्नागिरी येथील जन्मस्थानाला भेट देऊन अभिवादन केले व टिळकांचे राष्ट्रकार्य समजावून घेतले. यामध्ये ७० स्वयंसेवक सहभागी झाले.

**समूहगीत गायन स्पर्धा :**

कनिष्ठ महाविद्यालयातील देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेत राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा संघ सहभागी झाला.

**मशाल हस्तलिखित :**

१५/०८/२०२५

प्रतिवर्षी १५ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'मशाल' या हस्तलिखिताचे प्रकाशन केले जाते. स्वयंसेवकांनी यावर्षीच्या हस्तलिखितासाठी 'आरोग्यम् धनसंपदा' हा विषय देण्यात आला. स्वयंसेवकांनी या विषयावर लेख, कविता, कथालेखन केले व विविध चित्र रेखाटली. या साहित्याचा समावेश अंकात केला गेला. या हस्तलिखिताचे प्रकाशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मकरंद साखळकर सर यांच्या हस्ते झाले. हस्तलिखित वेळेत पूर्ण व्हावे म्हणून संपादक प्रा. भूषण केळकर व संपादक मंडळातील स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.

**राष्ट्रीय सेवा योजना दिन: - २४/०९ /२०२५**

विद्यार्थ्यांमध्ये अमुलाग्र बदल करण्याची क्षमता राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या उपक्रमांमध्ये आहे व त्यातून राष्ट्राप्रती समर्पित होऊन काम करणारी पिढी निर्माण होऊ शकते, असे प्रतिपादन प्रा. प्रभात कोकजे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना दिनाच्या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना स्वयंसेवकांच्या व्यक्तिमत्व विकासात एनएसएसचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानात प्रा. प्रभात कोकजे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्थापनेमागचा हेतू समजावून दिला. भारतात असणाऱ्या ३५ लाख एन. एस. एस स्वयंसेवकांमध्ये आपण आहोत याचा प्रत्येक स्वयंसेवकाने अभिमान बाळगावा. कमी वयात आपणाला समाजसेवेची संधी राष्ट्रीय सेवा योजनेमुळे मिळते. पुढे आपल्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मूळ उद्दिष्टांमध्ये काळानुसार बदल करून त्यामध्ये वर्तमानकाळातील समस्यांवर काम करणे गरजेचे आहे. यामध्ये मोबाईल डिक्शन, वाहतूक समस्या,पालक मुलांमध्ये सुसंवाद, जातीय सलोखा यावरती स्वयंसेवकांनी पथनाट्य, रॅली, परिसंवाद यांच्याद्वारे जनजागृती करावी असे सांगितले. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा.सुनील गोसावी उपस्थित होते.

**महात्मा गांधी जयंती:- ०२/१०/२०२५**

अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय,रत्नागिरी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे २ ऑक्टोबर २०२५ रोजी महात्मा गांधी जयंती व लालबहाद्दूर शास्त्री जयंतीच्या निमित्ताने श्रमदान व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर पर्यवेक्षक प्रा. विद्याधर केळकर, प्रमुख व्याख्याते प्रा.पंकज घाटे व कार्यक्रमाधिकारी प्रा.अभिजीत भिडे,प्रा.सुनील भोईर, प्रा. भूषण केळकर प्रा. रिद्धी हजारे, प्रा. वैशाली यादव उपस्थित होते. याप्रसंगी एन. एस. एस च्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये एक तास स्वच्छता व श्रमदान केले. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी 'महात्मा गांधीजींचे विचार' या विषयावर गोगटे जोगळेकर महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा. पंकज घाटे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानात सरांनी गांधीजींचे विचार ओघवत्या शैलीत कथन केले. अहिंसा, सत्याग्रहाच्या तत्त्वावर कायम राहत गांधीजींनी राष्ट्रीय चळवळ आकाराला आणली. गांधीजींनी तळागाळातील लोकांचा विचार केला. वर्णभेद, रंगभेद याचा विरोध केला गांधीजींनी साधी राहणी व उच्च विचारसरणीचा अंगीकार केला. श्रमप्रतिष्ठेचा आदर करून त्यात द्वेषाची भावना नसते हे समजावून दिले. गांधीजींनी पोटतिडकीने शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. खेड्यांचे महत्त्व सांगताना गांधीजी म्हणत ग्रामराज्य ते रामराज्य हा प्रवास शक्य आहे. आरोग्याविषयी गांधीजी सजग होते त्यांनी आयुर्वेदातील उपवासाचे महत्त्व जाणले होते. गांधीजी अर्थ विचारवंत, स्वच्छतेचे उपासक, सर्वधर्मसमभावाचे प्रणेते राष्ट्रपिता होते. अशा अनेक गुणांचा परिचय सरांनी करून दिला. अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य प्रा.सुनील गोसावी यांनी महाविद्यालय परिसरात केलेल्या श्रमदानाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले व गांधीजींनी स्वावलंब, स्वच्छता, स्वदेशी हे गुण आपल्या अंगी बाणवले व नंतर इतरांना उपदेश केला असे प्रतिपादन केले.

**विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर : कुर्धे दिनांक २५ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०२५**

विद्यमानवर्षी अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसांचे ग्रामीण पुनर्रचना निवासी श्रमसंस्कार शिबिर कुर्धे गावातील राधा पुरुषोत्तम पटवर्धन माध्यमिक विद्यामंदिर ,कुर्धे येथे दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ ते ३१ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन २५/१०/२०२५ रोजी कुर्धे गावातील राधा पुरुषोत्तम पटवर्धन माध्यमिक विद्यामंदिर येथे झाला. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी, पर्यवेक्षक श्री. विद्याधर केळकर, माजी कार्यक्रमाधिकारी दामले सर, तेंडुलकर सर, मुख्याध्यापक श्री. विजयानंद निवेंडकर व ग्रामस्थांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

निवासी शिबिरात विद्यार्थ्यांकरता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराची सुरुवात सकाळी साडेसहा वाजता प्रार्थना व योगाभ्यासाने होत होती. तर सांगता रात्री ९:४५वाजता अहवाल वाचन व पसायदानाने होत असे. या सात दिवसांच्या श्रमदानामध्ये कुर्धे येथे ४० फुटी लांबीचा बंधारा बांधण्यात आला. तसेच गणेशगुळे समुद्रकिनारा स्वच्छ केला. श्री सर्वेश्वर व महाविष्णू मंदिर परिसर व शालेय परिसर स्वच्छता सुशोभीकरण केले.

निवासी शिबिर कालावधीत विविध तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, व्याख्याने, कार्यशाळा यांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात कृतीसत्रांवर भर देण्यात आला. यामध्ये पथनाट्य कार्यशाळा – श्री सुरेंद्र जाधव, सायबर संस्कार – डॉ. अक्षय फाटक, सूत्रसंचालन कार्यशाळा – सौ. सुप्रिया टोळये , बहूआयामी रंगात रंग – श्री. श्रीकांत ढालकर, व्यंगचित्र कार्यशाळा – श्री. योगेश हातखंबकर, कथाकथन–श्री. जयंत फडके, लाईफ बॅलन्स शीट – श्री. प्रभात कोकजे, माजी विद्यार्थी अनुभव कथन, महिला मेळावा मार्गदर्शन – सौ क्षमा पुनसकर, तसेच भजनसंध्या– पंचरत्न प्रासादिक भजन मंडळ, कुर्धे इत्यादी कार्यक्रम पार पडले. शिबिरार्थींसाठी ग्रामस्थांनी भजनाचा सुश्राव्य कार्यक्रम सादर केला.

शिबिरांतर्गत विविध स्पर्धा घेण्यात आल्या .त्याचे विजेते गट व पुरस्कार प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे –

- पथनाट्य स्पर्धा विजेता – वृंदावन ग्रुप
- डॉजबॉल विजेता – रत्ननगरी ग्रुप
- प्रश्नमंजुषा विजेता– बाजीगर ग्रुप
- उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा –
- प्रथम क्रमांक – अनन्या गोरे
- द्वितीय क्रमांक – वैष्णवी कांबळे
- तृतीय क्रमांक – ऋग्वेद ठाकूर
- सर्वोत्कृष्ट श्रमदान – विद्यार्थी – सार्थक कदम, विद्यार्थिनी– मैथिली पवार
- अष्टपैलू शिबिरार्थी – विद्यार्थी – ऋग्वेद ठाकूर, विद्यार्थिनी – दीक्षा मोहिते.
- सर्वोत्कृष्ट गटनेता– पर्णवी प्रभूदेसाई
- आदर्श शिबिरार्थी – ऋग्वेद बोंडवलकर (विद्यार्थी), वेदांगी नागले ( विद्यार्थिनी)
- आदर्श मार्गदर्शक– हिंदवी कीर
- सर्वोत्कृष्ट गट – बाजीगर गट

सर्व विजयी स्वयंसेवकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात आले. सदर शिबिराला अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. यामध्ये संस्था पदाधिकारी, शिक्षक व ग्रामस्थ यांचा सहभाग होता.

शिबिराच्या सांगता समारंभासाठी व्यासपीठावर प्राचार्य डॉक्टर मकरंद साखळकर, श्री. उदय फडके, मुख्याध्यापक विजयानंद निवेंडकर, माजी कार्यक्रमाधिकारी प्रा. निनाद तेंडुलकर, कार्यक्रमाधिकारी अभिजीत भिडे, प्रा. सुनील भोईर ,प्रा.भूषण केळकर, प्रा. रिद्धी हजारे व प्रशालेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. सांगता समारंभात स्वयंसेवकांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

विद्यमान वर्षी कार्यक्रमाधिकारी प्रा. अभिजीत भिडे, प्रा सुनील भोईर, प्रा भूषण केळकर, प्रा. वैशाली यादव, प्रा. रिद्धी हजारे व सेवक श्री.गोरख घाडगे, यांनी शिबिराचे नियोजन केले.

**छंदोत्सव २०२५ एनएसएस ची कामगिरी–**

छंदोत्सव २०२५ अंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयातर्फे अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये स्वयंसेवकांनी सहभाग घेतला व बक्षिसे संपादन केली.

समूहनृत्य– द्वितीय क्रमांक (एन एस एस कलासार्थ)

विनोदी भूमिका – अथर्व सुपल

**माजी विद्यार्थी पुरस्कृत आदर्श स्वयंसेवक पुरस्कार :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या शैक्षणिक वर्ष २०१५ ते २०१९ या वर्षातील माजी स्वयंसेवकांनी २०२२ पासून आदर्श स्वयंसेवक पुरस्कार देण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला. सलग दोन वर्ष एनएसएसमध्ये कार्यरत असणाऱ्या व निवासी शिबिरात सहभागी होणाऱ्या बारावीच्या स्वयंसेवकाला आदर्श स्वयंसेवक पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीचा आदर्श स्वयंसेवक पुरस्कार २०२५ – २६ कु. हर्षा

विनायक पाथरे बारावी कला हिला प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार छंदोत्सव २०२५ मध्ये मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्था पदाधिकारी व प्राचार्य उपप्राचार्य व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

**स्वामी विवेकानंद जयंती राष्ट्रीय युवक दिन - १२ जानेवारी २०२६**

स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रीय युवक दिनाच्या निमित्ताने स्वयंसेवकांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. माननीय सौ. विभावरी करमरकर यांनी विद्यार्थ्यांना 'स्वामी विवेकानंदांचे विचार' या विषयावर मार्गदर्शन केले.

**प्रा. अभिजीत भिडे**
समन्वयक

# पोस्टर प्रेझेंटेशन समिती

दरवर्षीप्रमाणे 'अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय रत्नागिरी' येथे २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त 'पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा' घेण्यात आली. 'अमृत महोत्सवी भारताची वैज्ञानिक प्रगती' या विषयावर एकूण २० गटांमधून सहभागी झालेल्या १०० विद्यार्थ्यांनी विविध आणि आकर्षक अशी २० भित्तीपत्रके बनवली होती. या स्पर्धेत अमृत महोत्सवी भारताच्या विविध क्षेत्रातील वैज्ञानिक प्रगतीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला. या स्पर्धेमध्ये विज्ञान, वाणिज्य, कला आणि एम सी व्ही सी शाखेच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर सर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच या उद्घाटन प्रसंगी पर्यवेक्षक केळकर सर, विज्ञान विभाग प्रमुख शिंगाडे सर, संस्थेच्या आजीव सभासद मंडळाचे सचिव नाईक सर, वालावलकर सर तसेच सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी स्पर्धकांना प्राचार्यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले आणि उपस्थित सर्व मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेचे परीक्षण गोगटे जोगळेकर (स्वायत्त) महाविद्यालयाच्या जीवशास्त्र विभागाच्या डॉ. कदम मॅडम, रसायनशास्त्र विभागाच्या डॉ. महादे मॅडम आणि राज्यशास्त्र विभागाचे निलेश पाटील सर यांनी काम पाहिले.

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी भित्तीपत्रक प्रदर्शन खुले करण्यात आले. विज्ञान शाखेतील एकूण ६५० विद्यार्थी, तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी प्रदर्शनाचा लाभ घेतला.

बक्षीस वितरणाने स्पर्धेची सांगता करण्यात आली. बक्षीस वितरण समारंभ मा. प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर यांच्या हस्ते पार पडला. या वेळी उपप्राचार्य श्री. सुनील गोसावी, पर्यवेक्षक श्री. विद्याधर केळकर, विज्ञान विभाग प्रमुख श्री. दिलीप शिंगाडे, वाणिज्य विभागप्रमुख सौ. शिल्पा तारगावकर आणि कला विभाग प्रमुख श्री. वैभव कानिटकर व रसायनशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. मिलिंद गोरे तसेच शिक्षक आणि संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. नवीन शैक्षणिक धोरणानुसार आत्ताचा विद्यार्थी हा विज्ञानशील व्हावा व या प्रकारच्या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे मत अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मकरंद साखळकर यांनी स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात वेळी व्यक्त केले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक अकरावी वाणिज्य अ गट, द्वितीय क्रमांक अकरावी विज्ञान अ गट आणि तृतीय क्रमांक अकरावी विज्ञान ब गटाला मिळाला. विजेत्यांना रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक श्री.सुयोग सावंत तसेच सूत्रसंचालन श्री.ऋषिराज नागवेकर यांनी केले.सदर कार्यक्रमाला सौ.पेवेकर ,श्री.केतन नाईक, श्री निलेश जोशी, श्री.सुमेध मोहिते, सौ. वैशाली पाटील, सौ.स्नेहा ठाकूर, श्रीमती अनिषा जानवलकर, सौ. अर्पिता कांबळे यांचे सहकार्य लाभले.

माननीय प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी यांच्या पाठिंब्यामुळे ही स्पर्धा, अतिशय उत्तमरीत्या पार पडली तसेच शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

**प्रा. सुयोग सावंत.**
समन्वयक

# विद्यार्थी -शिक्षक सहाय्यता कक्ष

विद्यमान वर्षीही 'विद्यार्थी– शिक्षक सहाय्यता कक्ष' या समितीची स्थापना माननीय उपप्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या समितीमध्ये नऊ अनुभवी शिक्षक समितीसदस्य म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थी शिक्षक यांचे काही अनुत्तरित प्रश्न, समस्या जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न या समितीमार्फत केला जातो. हाच या समितीचा प्रमुख हेतू आहे.

इयत्ता अकरावीचे अध्यापन ज्या दिवशी सुरू झाले त्या दिवशी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात नव्याने आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करणे, तसेच त्यांना त्यांच्या वर्गांमध्ये सहज कसे जाता येईल? अशा प्रकारचे शाखा निहाय नियोजन करून ते उत्तम प्रकारे पार पाडले.

चालू शैक्षणिक वर्षी इयत्ता बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी फिनोलेक्स अकॅडमी येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांचे तुकडी निहाय गट करून घेतले. सकाळी नऊ पासून दुपारी चार वाजेपर्यंत विद्यार्थ्यांनी अकॅडमी मधील सर्व विभागांची माहिती घेतली. ॲकॅडमीमधील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना इंजीनियरिंग कोर्सची माहिती तसेच भविष्यातील शिक्षणाच्या व व्यवसायाच्या/ नोकरीच्या संधी या संदर्भात मार्गदर्शन केले.

माननीय उपप्राचार्य यांच्या सूचनेनुसार जानेवारीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षकांकरिता एक दिवसीय सहलीचे आयोजन करण्यात येणार आहे.

**प्रा. निशा नानिवडेकर**
समन्वयक

# छंदोत्सव

अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभ्यासेतर उपक्रमांचा मानबिंदू असलेला व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उत्तम व्यासपीठ प्राप्त करून देणारा 'छंदोत्सव' हा युवा महोत्सव दि. १५ ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत संपन्न झाला. विद्यार्थ्यांमधील कला, क्रीडा, नेतृत्व, लेखन अशा अनेक अंगभूत कौशल्याच्या विकासामध्ये छंदोत्सवाचे खूप मोठे योगदान आहे. या उपक्रमातून आजवर राज्य व राष्ट्रीय स्तरावर अनेक कलाकार नावारूपाला आलेले आहेत.

अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाच्या छंदोत्सवांतर्गत वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८.०० वा. मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. विद्यार्थ्यांमध्ये खिलाडूवृत्तीची जोपासना व्हावी या उद्देशाने क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी र. ए. सोसायटीचे उपकार्याध्यक्ष मा. विजयराव साखळकर , कार्यवाह श्री. सतीशजी शेवडे, सहकार्यवाह श्री. श्रीकांत दुदगीकर, नियामक मंडळ सदस्य व जिमखाना अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर केळकर,प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. सुनील गोसावी, पर्यवेक्षक श्री. विद्याधर केळकर त्याचप्रमाणे शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आमची माजी विद्यार्थिनी श्रीमती ऐश्वर्या सावंत इ प्रमुख मान्यवर तसेच सर्व विभागप्रमुख, क्रीडाशिक्षक, प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

या उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. अदिती घाणेकर यांनी केले. यानंतर रस्सीखेच स्पर्धेने सर्व सामन्यांना सुरुवात झाली.

दि. १५ डिसेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत झालेल्या विविध इनडोअर व मैदानी स्पर्धामध्ये खेळाडू विद्यार्थी व विद्यार्थिनीनी लक्षणीय सहभाग नोंदविला.

दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता छंदोत्सव २०२५ या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध प्रदर्शनाचे आणि फूड फेस्ट चे उद्घाटन र. ए. सोसायटीचे, कार्यवाह श्री. सतीशजी शेवडे, सहकार्यवाह प्रा. श्रीकांत दुदगीकर, शालेय समिती अध्यक्ष मा. आनंदराव देसाई इ. मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. यामध्ये चित्रकला, रांगोळी, फोटोग्राफी, कॅलिग्राफी इ. विविध प्रदर्शने दोन्ही दिवस सर्व विद्यार्थ्यांना पाहण्यासाठी खुली होती. बहुसंख्य विद्यार्थांनी याचा लाभ घेतला. प्रदर्शन खोल्यांच्या बाहेर खास सजावट केलेला 'सेल्फी पॉईंट' उभारला होता. विद्यार्थ्यांसाठी हे एक प्रमुख आकर्षण होते. प्रदर्शन समितीने विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. परीक्षक म्हणून श्री. निलेश पावसकर व श्री. गौरव पिलणकर यांनी काम पहिले. छंदोत्सवाचा

विद्यार्थीप्रिय उपक्रम म्हणजे फूड फेस्ट होय. विद्यार्थ्यांना जाहिरात, विक्री आणि संवाद कौशल्य यांचा परिचय करून देणारा हा उपक्रम यावर्षीही कमालीचा यशस्वी झाला. पहिल्या दिवशी २ तर पुढील दोन दिवशी विविध चटपटीत स्वादांचे पदार्थ देणारे ११ स्टॉल्स लावण्यात आले होते. एकूण १३ संघांनी या उपक्रमात भाग घेऊन या व्यवसायासाठी आवश्यक कौशल्ये विकसित केली. मान्यवरांच्या हस्ते या स्टॉल्सची उद्घाटने पार पडली. खाद्यपदार्थांची चव चाखून विद्यार्थ्यांच्या पाक कौशल्याचेही मान्यवरांनी कौतुक केले. फूड फेस्ट मधील सर्व स्टॉल्सना दररोज भेट देउन परीक्षण करण्याचे काम प्रा. सौ. विनया दातार व श्री रश्मीन दुर्वे यांनी केले.

दि. १९ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाचा मानबिंदू असलेल्या 'छंदोत्सव २०२५' या युवा महोत्सवाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचा शुभारंभ भव्य शोभायात्रेने झाला. र .ए. सोसायटीचे सचिव श्री. सतीशजी शेवडे व महाविद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष श्री. आनंदराव देसाई यांनी श्रीफळ वाढवून उपस्थित संस्था पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, निमंत्रित मान्यवर, प्राध्यापक व सर्व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत शुभारंभ करून दिला व छंदोत्सव २०२५ ला शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या जवाहर क्रीडांगणावर या शोभायात्रेला प्रारंभ झाला. शोभायात्रेत बॅनरधारी, ५० जणांचे लेझीम पथक, २० जणांचे ढोलताशा पथक, नटराज विराजमान झालेली पालखी, सर्व ५२ विद्यार्थी प्रतिनिधी, सर्व उपस्थित मान्यवर, सर्व विद्याशाखांतील विद्यार्थी, वर्गशिक्षक, इतर सर्व शिक्षक अशा सर्वांचा सहभाग असलेल्या शोभा यात्रेची सांगता खातु नाट्य मंदिर येथे श्री नटराजाची स्थापना करून झाली.

या नंतर ठीक ४ वा. जल्लोषपूर्ण वातावरणांत रंगमंचीय कार्यक्रमांना खातु नाट्य मंदिर येथे प्रारंभ झाला. संस्था कार्यवाह मा. सतीशजी शेवडे , शामराव करंडक एकांकिका स्पर्धेचे मुख्य प्रायोजक मा. राजनजी मलुष्टे इ. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून आणि श्रीफळ वाढवून झाले.

यावेळी सचिव श्री. सतीशजी शेवडे, सहसचिव प्रा. श्री. श्रीकांत दुदगीकर, शालेय समिती अध्यक्ष श्री. आनंद देसाई, प्रशासकीय उपप्राचार्य डॉ सुरेंद्र ठाकूरदेसाई, उपप्राचार्य श्री. सुनील गोसावी, पर्यवेक्षक श्री. विद्याधर केळकर,सर्व विभागप्रमुख इ. मान्यवर उपस्थित होते.

मुख्य प्रायोजक श्री.राजनजी मलुष्टे यांचा संस्थेचे सचिव श्री. सतीश शेवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी मान्यवरांनी छंदोत्सव अंतर्गत होणाऱ्या शामराव करंडक एकांकिका स्पर्धेला शुभेच्छा दिल्या. या उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन छंदोत्सव प्रमुख प्रा.मकरंद दामले यांनी केले.

शामराव करंडक एकांकिका स्पर्धेचे हे ३० वे वर्ष आहे. अनेक कलाकार घडविण्यात या एकांकिका स्पर्धेचा मोठा हातभार आहे. विद्यार्थ्यांच्या अंगभूत असलेले अभिनय, संगीत, नेपथ्य, प्रकाश योजना, ध्वनीसंयोजन इ. कला कौशल्यांना संधी प्राप्त करून देणारे व्यासपीठ म्हणून शामराव करंडक एकांकिका स्पर्धेची ओळख आहे. यावर्षी 'नातीगोती' हा शब्द देण्यात आला होता. या शब्दाला अनुसरून विद्यार्थ्यानी आपली कला सादर केली. ज्येष्ठ रंगकर्मी श्री. भाग्येश खरे व श्री. प्रदीप तेंडुलकर यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.

उद्घाटनानंतर ५ कसदार एकांकिका विद्यार्थ्यांनी सादर केल्या. सर्व एकांकिकाना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. तसेच दोन एकांकिकांच्या मध्ये मनोरंजक असे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रमही विद्यार्थ्यांनी सादर केले. अशा भरगच्च, रंगतदार व सुनियोजित कार्यक्रमांनी छंदोत्सवचा पहिला दिवस संपन्न झाला.

दि. २० डिसेंबर २०२५ रोजी 'छंदोत्सव' च्या दुसऱ्या दिवशीच्या रंगमंचीय कार्यक्रमांची सुरूवात गीतगायन स्पर्धेने सकाळी १०.३० वा.नियामक मंडळाचे सदस्य मा. मनोज पाटणकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून झाली. एल. इ. डी.स्क्रीन वॉल व दोन एल. इ. डी. विंग्स असल्यामुळे सर्व कार्यक्रमांचा मनमुराद आनंद सर्वांना लुटता आला.

यानंतर विविध १८ गीतांची मेजवानी असलेल्या गीतगायन स्पर्धेचा कार्यक्रम पार पड़ला. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचे परीक्षण सुप्रसिद्ध गायक श्री. श्रीधर पाटणकर आणि श्री ओंकार बंडबे यांनी केले.

ठीक १२ .३० वाजता वैयक्तिक नृत्य स्पर्धा सुरु झाली. एकूण १८ सरस नृत्ये यावेळी सादर करण्यात आली. उपस्थितांनी या स्पर्धेचा मनसोक्त आनंद लुटला.

या नृत्य स्पर्धेनंतर एक बक्षीस समारंभ करण्यात आला.यासाठी शालेय समिती अध्यक्ष श्री. आनंद देसाई, सहकार्यवाह श्री.श्रीकांत दुदगीकर, मा.प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर इ मान्यवर उपस्थित होते. यावेळी विविध प्रदर्शन स्पर्धेची बक्षिसे देण्यात आली.मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाचा आदर्श विद्यार्थी, आदर्श विद्यार्थिनी आणि माजी उपप्राचार्य चिंतामणी दामले पुरस्कृत अष्टपैलू विद्यार्थी यांना त्यांच्या पालकांसह गौरविण्यात आले. यानंतर २०२६ मध्ये निवृत्त होणाऱ्या प्रा. प्रसाद गोखले यांचा शालेय समिती अध्यक्ष श्री. आनंद

देसाई, प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर व संस्था सहसचिव प्रा. श्रीकांत दुदगीकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन आतापर्यंत विविध अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती उपक्रम तसेच छंदोत्सवमध्ये त्यांनी दिलेल्या उत्तम योगदानाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच छंदोत्सव यशस्वी होण्यासाठी काम करणाऱ्या छंदोत्सव प्रमुख व सर्व १८ समित्यांच्या प्रमुखांना गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच मंडप व्यवस्था, ध्वनी व्यवस्था, प्रकाश योजना, एल.इ.डी. स्क्रीन व्यवस्था, छायाचित्रण व्यवस्था, वाद्यवृंद, इ. जबाबदारी सांभाळणारे तंत्रज्ञ यांचे प्रतिनिधी, या सर्वांचे प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर व संस्था सहसचिव प्रा. श्रीकांत दुदगीकर यांनी कौतुक केले. या कृतज्ञता सोहळ्याचे सूत्रसंचालन छंदोत्सव प्रमुख प्रा. मकरंद दामले यांनी केले.

या छोट्याशा सोहळ्यानंतर दुपारी २ वा. एकल व समूहनृत्य स्पर्धेला प्रारंभ झाला. उत्तम तयारीनिशी सर्व संघ स्पर्धेत उतरले होते. एकूण १२ समूहनृत्ये यावेळी सादर झाली. पालखी नृत्य हे विशेष आकर्षण ठरले. या दोन्ही नृत्य स्पर्धांना विद्यार्थ्यांचा जल्लोषपूर्ण व अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. या नृत्य स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्रीम. इशा जोशी व कु. तेजस घोगले यांनी काम पाहिले.

या शिवाय मधुनमधून फिलर्स म्हणून वाद्यवादन, स्टँडअप कॉमेडी, फ्यूजन, कविता वाचन, मिमिक्री इ. वैशिष्ट्यपूर्ण छोटे कार्यक्रमही विद्यार्थ्यांनी सादर केले व छंदोत्सवच्या रंगमंचीय कार्यक्रमांची यशस्वी सांगता झाली. एकंदरीतच विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व सृजनशीलतेचे सर्वांनी भरभरून कौतुक केले.

यानंतर संध्याकाळी ५ वाजता दिमाखदार अशा बक्षीस वितरण समारंभाला प्रारंभ झाला.

यावेळी संस्थेचे सचिव श्री. सतिशजी शेवडे, सहसचिव व एम. सी. व्ही. सी. विभाग प्रमुख प्रा. श्रीकांत दुदगीकर, प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी, पर्यवेक्षक प्रा. विद्याधर केळकर, संस्थेच्या आजीव सभासद मंडळाचे अध्यक्ष प्रा. महेश नाईक, कला शाखा प्रमुख प्रा. वैभव कानिटकर, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सौ. शिल्पा तारगांवकर, शास्त्र विभाग प्रमुख प्रा. दिलीप शिंगाडे, शामराव करंडक स्पर्धा सहप्रायोजक प्रा. दत्तात्रय वालावलकर इ. मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते विजेत्यांना प्रमाणपत्रे, बक्षिसे व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली.

विविध स्पर्धांचे निकाल याप्रमाणे -

१. फूड फेस्ट स्पर्धा - प्रथम-Veg Climate group द्वितीय-Quick Bites group, तृतीय-seven stars group,

२. गीतगायन स्पर्धा - प्रथम-उर्जा आपटे , द्वितीय-श्रिया केळकर तृतीय-गिरीराज लिंगायत

३. वैयक्तिक नृत्य स्पर्धा - प्रथम-जान्हवी कळंबटे, द्वितीय-यामिनी पोयरेकर, तृतीय-ऋत्वी केदार

४ युगुल नृत्य लक्षवेधी सादरीकरण - आयुषी नाईक, लावण्या नार्वेकर

५. समूह नृत्य स्पर्धा - प्रथम-आई एकविरा ग्रुप, द्वितीय-कलासार्थक ग्रुप, तृतीय-जोगवा ग्रुप

६. छंदोत्सव डील, मेक अ रील स्पर्धा - प्रथम-रुद्र शिवलकर, द्वितीय-कल्पेश पालकर, तृतीय-ज्ञानदा कातकर

**रांगोळी स्पर्धा- माझा भारत - माझा अभिमान**

प्रथम-कु.श्रावणी बाहुबली नाईक, कु. गार्गी विवेक केळकर

द्वितीय-कु.तन्वी श्रीपाद पालकर

तृतीय- कु.पूर्वा श्रीनिवास बिज्ररगी, कु. प्रांजल जयवंत कुडचिकर

**शैक्षणिक रांगोळी**

प्रथम-कु. क्षितीज रुपेश नांदावडेकर

द्वितीय-कु. आर्यन संदीप सालम

तृतीय-कु. वीणा योगेश काळे, कु. हर्षाली सुदय चाळके

**पर्यावरण छायाचित्र - निसर्गातील आकृतीबंध**

प्रथम-कु. वरद उदय आरेकर

द्वितीय-कु. निधी प्रदिप सुर्वे
तृतीय-कु. अमन अमित कुरूप

**छायाचित्र - रंग कोकणचे**
प्रथम-कु. रिद्धी प्रदिप ब्रीद
द्वितीय-कु. ज्ञानदा उत्तम कातकर
तृतीय-कु. अनुष्का दिलीप शिंदे

**चित्रकला -माझे आवडते व्यक्तिमत्व**
प्रथम-कु. ऋषभ हर्षद कोतवडेकर
द्वितीय-कु. पार्थ समीर शिरवडकर
तृतीय-कु. क्षितीज रुपेश नांदावडेकर

**आदर्श विद्यार्थी पुरस्कार - ऋषिकेश कोतवडेकर -१२ वी शास्त्र.**
**आदर्श विद्यार्थिनी पुरस्कार - जान्हवी सावंत - १२ वी वाणिज्य**
**अष्टपैलू व्यक्तिमत्व पुरस्कार - वीणा काळे - १२ वी शास्त्र**

**वार्षिक क्रीडा स्पर्धेतील विशेष नैपुण्याबद्दल देण्यात येणारे २ पुरस्कार-**
१) गोल्डन बॉय-मानस मानावे १२ कला
२) गोल्डन गर्ल-पद्मिनी भितळे ११ वाणिज्य

एन. एस. एस. विभागाच्या माजी स्वयंसेवकांकडून दिला जाणारा आदर्श स्वयंसेवक पुरस्कार यावर्षी हर्षा पाथरे १२ कला अ हिला प्रदान करण्यात आला. एन. एस. एस. कार्यक्रमाधिकारी प्रा. अभिजीत भिडे यांनी या पुरस्काराची यावेळी उद्घोषणा केली.

**शामराव करंडक एकांकिका स्पर्धेचा निकाल**
**सर्वोत्कृष्ट तांत्रिक अंग-** एकांकिका 'परित्राण'
**सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना -**
प्रथम-संस्कार दत्ताराम पांचाळ 'परित्राण'
द्वितीय-शौर्य पंकज सिवंदे - 'विरक्त'
तृतीय-प्रणय शैलेंद्र भाटकर - 'नात्यांचं गणित'

**सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत**
प्रथम-विनित विवेक पवार-विरक्त
द्वितीय-गंधार सुनिल दामले, गिरीराज दिगंबर लिंगायत, वृंदा संतोष दळवी-परित्राण
तृतीय-आभा मृणाल म्हैसकर-नात्यांचं गणित

**सर्वोत्कृष्ट नेपथ्य**
प्रथम-ऋषिकेश शशिकांत कोतवडेकर- 'परित्राण'
द्वितीय-स्वरदा सत्यजित गुरव- 'विरक्त'
तृतीय-अथर्व योगेंद्र चव्हाण- 'नात्याचं गणित'

**सर्वोत्कृष्ट लेखन**
प्रथम–यश प्रभाकर पावसकर–परित्राण
द्वितीय–मयुरेश प्रवीण सावंत–नात्याचे गणित
तृतीय–यामिनी किशोरकुमार पोयरेकर–विरक्त

**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन**
प्रथम–विघ्नेश सुजित जोशी–परित्राण
द्वितीय–आभा मंगेश साखळकर–विरक्त
तृतीय–सुर्याक्ष सचिन रेमणे–नात्याचं गणित

**सर्वोत्कृष्ट पुरुष अभिनय**
प्रथम–वेदांत उदय कोकजे–विरक्त
द्वितीय–यश प्रभाकर पावसकर–परित्राण
तृतीय–सुर्याक्ष सचिन रेमणे–नात्याचे गणित

**सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनय**
प्रथम–हर्षाली दिगंबर सावंत–परित्राण
द्वितीय–आयुशी संदीप नाईक–विरक्त
तृतीय–ऊर्जा हर्षद आपटे–बुरगुंडा

**सर्वोत्कृष्ट विनोदी व्यक्तिरेखा**
अथर्व रुपेश सुपल–राजे

**सर्वोत्कृष्ट खलनायक / खलनायिका**
रोहन महेश भोवड–विरक्त

**सर्वोत्कृष्ट एकांकिका**
प्रथम–परित्राण
द्वितीय–विरक्त
तृतीय–नात्याचं गणित

या अंतिम बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन छंदोत्सव प्रमुख प्रा. मकरंद दामले व शामराव करंडक एकांकिका स्पर्धा प्रमुख प्रा. प्रभात कोकजे यांनी केले.

दिनांक २४ डिसेंबर या दिवशी छंदोत्सव अंतर्गत घेण्यात आलेल्या वार्षिक क्रीडा स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ जवाहर मैदानावर पार पडला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त श्री. रवींद्र उर्फ मुन्नाशेठ सुर्वे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी साडेतीनशे विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारांची पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावर्षी क्रीडा स्पर्धांचे सांघिक विजेतेपद कला शाखेने पटकावले. या बक्षीस वितरण कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयातील शिक्षक आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

या संपूर्ण छंदोत्सवात एन. सी. सी. च्या ५५ कॅडेटसनी तसेच ५२ वर्गप्रतिनिधींनी (११ वी, १२ वी) शिस्तपालनासाठी घेतलेले कठोर परिश्रम अत्यंत वाखाणण्याजोगे होते. रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, श्री. राजनशेठ मलुष्टे व उपप्राचार्य श्री. सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही पर्यवेक्षक, सर्व विभाग प्रमुख, सर्व समिती प्रमुख, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व विद्यार्थी यांच्या अमूल्य सहकार्याने छंदोत्सव २०२५ हा युवा महोत्सव यशस्वीरित्या संपन्न झाला.

**प्रा. मकरंद दामले**
छंदोत्सव प्रमुख

# महिला विकास कक्ष समिती

१) महिला विकास कक्षाचे उद्घाटन -

अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयात महिला विकास कक्ष २०२५ - २६ चे उद्घाटन प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

डॉ. अक्षता शेंबेकर यांचे 'मासिक पाळी, PCOD जागरूकता आणि मानसिक स्वास्थ्य' या विषयावर मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित केले गेले.

२) भित्तीपत्रक प्रदर्शन

दरवर्षी २६ जानेवारीला महिला विकास कक्ष समितीतर्फे भित्तिपत्रक प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. यावर्षी 'रणांगणावर शौर्य गाजवणाऱ्या भारतीय महिला' या विषयावरील भित्तीपत्रक प्रदर्शित केले जाणार आहे.

**प्रा. अपर्णा तगारे**
समन्वयक

# इतिहास शोध व बोध अभियान

इतिहास शोध व बोध अभियान मंडळामध्ये यावर्षी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विभागातून ११६ मुलांची मंडळाचे सदस्य म्हणून नोंदणी करण्यात आली.

यावर्षीचा अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय आणि गोगटे जोगळेकर वरिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहास शोध आणि बोध अभियान मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रम २३ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये संपन्न झाला. याप्रसंगी लोकमान्य टिळक जयंती निमित्त पत्रकार आणि लेखक श्री. राजेंद्रप्रसाद मसूरकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी माननीय प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. सुनिल गोसावी उपस्थित होते.

यावर्षीच युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेश संरक्षित स्मारकामध्ये केला आहे. या किल्ल्यांची माहिती देणारे भितीपत्रक महाविद्यालयामध्ये प्रदर्शित करण्यात आले. तसेच यानिमित्त आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेला वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींचा चा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या निबंध स्पर्धेचा निकाल

गट १ - कनिष्ठ महाविद्यालय
प्रथम - कु. आदिती जितेंद्र पाटील (११वी विज्ञान)
द्वितीय - कु. रिया अनंत पांचाळ (११वी विज्ञान)
तृतीय - कु. श्रावणी योगेश खांडेकर (१२वी कला)
उत्तेजनार्थ
१) कु. प्रणव अंकुश हातिसकर (११वी वाणिज्य)
२) कु. तन्वी उपेंद्र पाटकर (१२वी विज्ञान)
३) कु. सरगम महेश कांबळे (१२वी कला.)

गट २ वरिष्ठ महाविद्यालय
प्रथम - कु. सानिका अनंत पांचाळ
द्वितीय - कु. आसिया ईरशाद अत्तरवाले
तृतीय - कु. सृष्टी जयदास पाटील
उत्तेजनार्थ - कु. नेहा संदीप पवार

छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित १२ किल्ल्यांचा समावेश असलेल्या भारतातील मराठा लष्करी भूदृश्येला युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता दिली आहे. यापैकी साल्हेर किल्ल्याची माहिती देणार भित्तिपत्रक कु. सानिका अनंत पांचाळ, कु. सृष्टी जयदास पाटील यांनी तयार केले. व ते १५ ऑगस्ट २०२५ रोजी प्रदर्शित करण्यात आले.

इतिहास शोध आणि बोध अभियान मंडळा तर्फे 'गोष्ट नाण्यांची' या विषयावर श्री. चिन्मय बेर्डे यांच्या मुलाखती (PODCAST) चे आयोजन गुरुवार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले. मुलाखतकार म्हणून कु. जान्हवी जोशी हिने काम पाहिले.या मुलाखतीत श्री. चिन्मय बेर्डे यांनी प्राचीन नाण्यांचा इतिहास, त्यांचे संशोधन व अभ्यास याबाबत रोचक माहिती दिली. विविध कालखंडातील नाण्यांमधून राजकीय, सामाजिक व आर्थिक घडामोडींचा मागोवा कसा घेता येतो याचे उत्कृष्ट विवेचन त्यांनी केले. त्यांच्या संग्रहात सध्या भारतातील व जगभरातील अनेक देशांची ५००० नाणी व ३०० नोटा आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील शिवराई त्यांचा संग्रहाला विशेष महत्व प्राप्त करून देते. या कार्यक्रमाचे स्वरूप मुलाखतीच्या (पॉडकास्ट) स्वरुपात केल्याने विद्यार्थी व शिक्षकांनी प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

इतिहास शोध आणि बोध अभियान मंडळाच्या ४० विद्यार्थ्यांनी मार्गदर्शक शिक्षकांसह १६ नोव्हेंबर २०२५ रोजी जागतिक वारसास्थळाचा दर्जा प्राप्त झालेल्या विजयदुर्ग किल्ल्याला तसेच कनकादित्य (सूर्य) मंदिर, कशेळी या सांस्कृतिक वारशाने समृद्ध स्थळांना भेट दिली. क्षेत्रभेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष स्थळावर जाऊन किल्ल्यांची रचना, संरक्षण प्रणाली, सागरी मार्गावरील रणनीती, तसेच प्राचीन मंदिरांच्या स्थापत्यवैशिष्ट्यांचा व सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करून देणे हा होता.या क्षेत्रभेटीदरम्यान पाऊलखुणा पर्यटन उपक्रम चालविणारे श्री. श्रीवल्लभ साठे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२८ नोव्हेंबर २०२५ रोजी 'म्युझियम ऑन व्हील्स' हा आगळावेगळा उपक्रम गोगटे-जोगळेकर महाविद्यालय व अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्तालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मुंबईचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या फिरत्या संग्रहालयाने विद्यार्थ्यांना सिंधू-सरस्वती संस्कृती, भारतीय संस्कृतीची आणि इतिहासाची रोमांचक दुनिया प्रत्यक्ष अनुभवण्याची दुर्मिळ संधी दिली. जवाहर क्रीडांगणावर या विशेष बसमध्ये सिंधू-सरस्वती संस्कृतीचे आकर्षक, माहितीपूर्ण आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सादरीकरण पाहण्यासाठी दिवसभरात १९०० हून अधिक विद्यार्थी आणि १०० शिक्षक उत्साहाने दाखल झाले. जीजीपीएस शाळा, बाबुराव जोशी गुरुकुल, रा. भा. शिर्के प्रशाला, नानल गुरुकुल, अभ्यंकर- कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग घेतला. गोगटे जोगळेकर महाविद्यालयाच्या इतिहासाच्या विद्यार्थ्यांसोबतच कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील अन्य विषयांच्या विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त २९ नोव्हेंबर २०२५ रोजी इतिहास शोध आणि बोध अभियान मंडळातर्फे 'अतुल्य भारत प्रश्नमंजुषा' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण १२ शाळांनी सहभाग दर्शवला. यामध्ये एकूण ३६ विद्यार्थी व १२ मार्गदर्शक शिक्षक सहभागी झाले.

स्पर्धेचा निकाल

प्रथम क्रमांक-रा. भा. शिर्के प्रशाला-अत्रेय देवस्थळी, श्रेया वाडकर, चैतन्य मुळ्ये, मार्गदर्शक-राजेश आयरे.

द्वितीय विभागून-नवनिर्माण हाय-प्रसेनजित कांबळे, जयराज चौरी, भार्गवी पवार, मार्गदर्शक-सौ. अलमास लांबे आणि जीजीपीएस-आभा भाटवडेकर, आयुष ठाकूर, राधा खानोलकर, मार्गदर्शक सोनिया कांबळे,

तृतीय- फाटक हायस्कूल- रुद्र घडशी, तपस्या बोरकर, सिद्धी मोडक, मार्गदर्शक शिक्षक सौ. श्रेया रानभरे.

इतिहास शोध व बोध मंडळातर्फे शैक्षणिक अभ्यास सहल दि. २६ ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आली. अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांनी मध्यप्रदेशातील भोपाळ व विदिशा परिसरातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसास्थळांना भेट देत उत्तर पुराश्मयुगीन काळापासून ते बाराव्या शतकापर्यंतच्या इतिहासाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. या अभ्यास सहलीत विद्यार्थ्यांनी सांची स्तूप, सतधारा स्तूप, उदयपूर येथील नीलकंठेश्वर मंदिर, ग्यारसपूर येथील ब्रजमठ मंदिर, देखीनाथ स्तूप, आठखंबा मंदिर, हिंदोळा तोरण, मालादेवी मंदिर तसेच विदिशा व भोपाळ येथील संग्रहालयांचे अवलोकन केले. गुर्जर-प्रतीहार काळातील नीळकंठेश्वर व मालादेवी मंदिरे ही नागर शैलीतील स्थापत्याची उत्कृष्ट उदाहरणे असून त्यामध्ये हिंदू व जैन स्थापत्यशैलीचा सुंदर संगम विद्यार्थ्यांना अभ्यासता आला. याचबरोबर उदयगिरी गुंफा व हेलिओडोरस स्तंभ यांसारख्या महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांबाबतमाहितीघेण्यात आली. तसेच पृथ्वीचे कर्कवृत्त (Tropic of Cancer) ज्या ठिकाणाहून जाते तेथेही विद्यार्थ्यांनी भेट दिली. यानंतर विद्यार्थ्यांनी प्रागैतिहासिक कलेसाठी प्रसिद्ध असलेल्या जागतिक वारसा स्थळ भीमबेटका याठिकाणी भेट दिली. येथे आदिम काळातील मानवांनी अनेक गुहा व शैलाश्रयांचा (रॉक शेल्टर) वापर केला होता. त्यांचा वापर पुराश्मयुगापासून ऐतिहासिक तेमध्ययुगीन काळापर्यंत सातत्याने केला जात होता. सहलीच्या शेवटच्या दिवशी मध्यप्रदेश शासनातील उच्च शिक्षण, आयुष व तांत्रिक शिक्षण मंत्री श्री. इंदर सिंह परमार यांनी मध्यप्रदेश भेटीवर आलेल्या विद्यार्थ्यांची आवर्जून भेट घेतली. इतिहास विभागाच्या चालू उपक्रमाचे

त्यांनी कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञानपरंपरेचा वारसा जपून विकसित भारत घडविण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी मार्गदर्शन केले. या सहलीत एकूण ३१ विद्यार्थी व ४ शिक्षक सहभागी झाले होते. पुरातत्त्व अभ्यासक श्री. मंदार चौधरी यांनी संपूर्ण सहलीदरम्यान मार्गदर्शक म्हणून सखोल व अभ्यासपूर्ण माहिती दिली. सहलीचे सुयोग्य नियोजन श्री. निनाद तेंडुलकर व डॉ. पंकज घाटे यांनी केले, तर सहलीच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीम. तन्वी कोळंबेकर व श्रीमती अपर्णा तगारे यांनी मोलाचे सहकार्य केले.

इतिहास शोध व बोध अभियान मंडळाचे कामकाज प्रा. निनाद तेंडुलकर, प्रा. अपर्णा तगारे, प्रा. अन्वी कोळंबेकर, प्रा. दिलीप जाधव, प्रा. दत्तात्रय माळवदे पहात आहेत. मा. प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी व पर्यवेक्षक प्रा.विद्याधर केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे कार्य चालू आहे

**प्रा .निनाद तेंडुलकर**
समन्वयक

# दिनविशेष समारंभ समिती

कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध दिनांचे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक महत्त्व समजावे तसेच त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासास चालना मिळावी, या उद्देशाने अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयातर्फे दरवर्षी दिनविशेष समारंभ समितीच्या माध्यमातून विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांसमोर वेगवेगळे आदर्श व्यक्तिमत्त्व उभे राहतात आणि त्यांच्यात मूल्याधिष्ठित विचार, नेतृत्वगुण व सामाजिक भान विकसित होते.

यावर्षी या समितीतर्फे घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी दि. २१ जून २०२५ रोजी मा. उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी आणि पर्यवेक्षक प्रा. विद्याधर केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सभा घेण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी समिती तर्फे खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

१. दि. २६ जून २०२५ रोजी महाविद्यालयात सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, रत्नागिरी यांच्या परिपत्रकानुसार राजर्षी शाहू महाराजांचा आदर्श विशेषत्वाने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा आणि समाज परिवर्तनाची योग्य दिशा त्यांना मिळावी हा मुख्य हेतू. या निमित्ताने कनिष्ठ महाविद्यालयात सामाजिक न्याय संकल्पना आणि वर्तमान भारतीय समाज या विषयावर डॉ. शिवाजी उकरंडे यांचं व्याख्यान आयोजित करण्यात आले.

२. दि. १० जुलै २०२५ रोजी महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. कला, वाणिज्य, विज्ञान तसेच एमसीवीसी या सर्व शाखांतील विद्यार्थी या उपक्रमामध्ये सामील झाले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना पुष्प आणि भेटकार्ड देऊन त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली. तसेच वर्गावर्गांमध्ये शिक्षकांबद्दल आदर व्यक्त करणारी भाषणे, काही कवितांचे व उताऱ्याचे वाचन करण्यात आले.

३. दि. ५ सप्टेंबर २०२५ रोजी गणपतीची सुट्टी असल्याकारणाने दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी दिनविशेष समारंभ समितीतर्फे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्याविषयी लेख, त्यांचे चित्र तसेच विद्यार्थ्यांच्या दैनंदिन आयुष्यातील शिक्षकांचे महत्त्व पटवून देणारे लेख भित्तिपत्रकाच्या माध्यमातून कला, विज्ञान, वाणिज्य आणि एमसीवीसी या चारही विभागांमध्ये प्रदर्शित करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांच्या मनातील शिक्षकांची अचूक प्रतिमा त्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी अशा विविध भाषांमधून व्यक्त केली. याचबरोबर अतिशय बोलकी चित्रे काढून त्यांनी त्यांच्या मनातील शिक्षकांच्या प्रतिमेला खूप छान आकार दिला.

४. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाद्वारे नशा मुक्त भारत अभियानांतर्गत मादक पदार्थांच्या गैरवापराच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी देशभरात नशामुक्त भारत अभियानाच्या माध्यमातून भारताला अमली पदार्थ मुक्त करण्याच्या दृष्टिकोनातून अमली पदार्थाच्या वापराबाबत मोठ्या प्रमाणावर जागृती निर्माण करण्यात येत आहे. या निमित्ताने जिल्हा परिषद रत्नागिरीच्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भवन समाज कल्याण विभागाच्यावतीने कळविण्यात आल्याप्रमाणे अमली पदार्थ विरुद्ध जागरूकता म्हणून ११ ऑगस्ट २०२५ रोजी सर्व विद्यार्थ्यांना वर्ग शिक्षकांमार्फत प्रतिज्ञा देण्यात आली. भारताच्या एकूण प्रगतीमध्ये नशा मुक्तीचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले आणि पुढे त्यांनी तसे आचरण करावे म्हणून त्यांना शपथ देण्यात आली.

५. शिक्षण विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन तसेच सलाम मुंबई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था या अभियानांतर्गत तंबाखू सेवनामुळे होणारे दुष्परिणाम दर्शवणारी पोस्टर्स अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाच्या दर्शनी भागात दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी प्रदर्शित करण्यात आली. तसेच सलाम मुंबईच्या ॲपवर शिक्षण विभागाने

निर्गमित केलेल्या ९ निकषांची पूर्तता करण्यात आली.

६. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'घेऊया एकच वसा–मराठीला बनवू या ज्ञानभाषा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते प्रा. वैभव कानिटकर यांनी 'ग्रंथ अभिवाचन : एक कला' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

७. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. सर्व वर्गांमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे प्रगट वाचन करण्यात आले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या मनामध्ये राष्ट्रभक्ती आणि समाजकार्याची भावना निर्माण व्हावी या उदात्त हेतूने कार्यरत असलेल्या युथ फॉर भारत या व्यासपीठाचे प्रतिनिधी श्री. निखिल आपटे यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांच्या संघाने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या उपक्रमांतर्गत स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांना संविधानाची प्राथमिक माहिती, नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये यावर मार्गदर्शन केले. तसेच कुमार वयात विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना रुजवण्यासाठी त्यांच्या पातळीवर करता येणारी सर्व कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रेरणा दिली.

८. दिनविशेष समारंभ समितीच्या वतीने आणि जिल्हा अल्पसंख्याक कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या सूचनेनुसार दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी 'आंतरराष्ट्रीय अल्पसंख्यांक हक्क दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. त्याला विद्यार्थ्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेमध्ये स्पर्धकांनी अल्पसंख्याक नागरिकांचे हक्क, जबाबदाऱ्या व कर्तव्य, विविध मूल्ये यांविषयी प्रखर मते मांडून उपस्थिताची मने जिंकली. या स्पर्धेमध्ये कु. फरहीन अझमत अली अंसारी (११वी विज्ञान ब) हिने प्रथम, कु. सुहैराह मुदस्सर मजगावकर (११वी विज्ञान अ) हिने द्वितीय व कु. सर्वेश राजेश सनगरे (११वी विज्ञान अ) याने तृतीय क्रमांक पटकाविला. याप्रसंगी प्रमुख व्याख्यात्या. प्रा. विस्मया कुलकर्णी यांनी अल्पसंख्याकाना भारतीय संविधानाने दिलेले हक्क, समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाविषयी सखोल मार्गदर्शन केले. याबरोबरच प्रत्येक भारतीय व्यक्तीने जात, पात, पंथ, भेद बाजूला ठेवून प्रत्येकाने आपल्या वर्तनातून एकात्मता जपली पाहिजे असेही मत मांडले. तसेच या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतामध्ये श्री. विद्याधर केळकर यांनी आपल्या देशात जातिभेदाची दरी निर्माण होऊ नये व भारताचा आदर्श नागरिक म्हणून आपण काय करावे याचा विचार करावा असे सांगितले.

९. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती– ३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने गोगटे जोगळेकर महाविद्यालयाच्या प्रा.उमा जोशी यांनी 'सुशिक्षित स्त्रियांपुढील आव्हाने' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले तसेच अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुनील गोसावी यांनी स्त्री सबलीकरणा बरोबरच मुलींना आपल्या अधिकार, हक्क, आणि जबाबदारीची जाणीव असणे आवश्यक आहे असे सांगितले.

या सर्व कार्यक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त व भरभरून प्रतिसाद लाभतो, हेच या उपक्रमांचे खरे वैशिष्ट्य ठरते.

समितीचे समन्वयक म्हणून प्रा. मनस्वी लांजेकर यांनी काम पाहिले. तसेच या समितीत प्रा. विस्मया कुलकर्णी, प्रा. अदिती कोकजे, प्रा. दिलीप जाधव, प्रा. रोशनी हळदवणेकर, प्रा. श्वेता चौधरी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**प्रा. मनस्वी लांजेकर**
समन्वयक

# पर्यावरण जाणीव जागृती अभियान मंडळ

पर्यावरण संदर्भात व्याख्याने, माहितीपट, निसर्ग सहल याद्वारे पर्यावरणाबाबत जाणीव जागृती निर्माण करणे व संरक्षण या प्रमुख उद्दिष्टाला धरुन आम्ही यावर्षीच्या कामकाजाला सुरुवात केली. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही अनेक उपक्रम करण्यात आले. यावर्षी एकूण १९६ विद्यार्थी पर्यावरण मंडळाचे सभासद झाले.

**मंडळाची उद्दिष्टे**

- तज्ज्ञ व्यक्तींच्या व्याख्यानांद्वारे पर्यावरणीय संकल्पनांबद्दल अधिक माहिती करून देणे.
- निसर्ग सहलींद्वारे प्रत्यक्ष पर्यावरणातील घटक, समस्या, स्थानिक पर्यावरण याबद्दल विद्यार्थ्यांना समजावून देणे.
- छायाचित्र स्पर्धेद्वारे प्रत्यक्ष पर्यावरण व विविध परिसंस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे कुतूहल वाढवणे.
- विविध पर्यावरणीय दिन साजरे करून पर्यावरणीय समस्यांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष आकर्षित करणे.
- विविध पर्यावरणीय दिनांमार्फत आपली पर्यावरण संवर्धनातील भूमिका विद्यार्थ्यांना समजावून देणे.

* पर्यावरण संवर्धन संबंधित सामाजिक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सामावून घेणे (उदा. समुद्रकिनारे, देवराया यांची स्वच्छता).

**१. पर्यावरण मंडळ उद्घाटन १८ जुलै २०२५**

उद्घाटनप्रसंगी जलजीविका संस्था व कांदळवन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. मोहन उपाध्ये (कासव संवर्धन तज्ज्ञ) यांचे कासव संवर्धन व जागरूकता या विषयावरचे व्याखान आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास १२० विद्यार्थी उपस्थित होते.

**२. 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत ४० विद्यार्थ्यांनी उपक्रमात सहभाग नोंदवला.**

**३. विविध पर्यावरणीय दिन**

* पर्यावरण दिन दि. ५ जून २०२५ : विद्यार्थ्यांनी दिलेले लेख व चित्रे असलेली भित्तीपत्रके लावण्यात आली. तसेच यावर्षीचे घोषवाक्य Ending plastic pollution globally या विषयाशी संबंधित माहिती सर्व व्हाट्सअप ग्रुप पाठविण्यात आली.

* जागतिक महासागर दिन ८ जून २०२५ : सागराचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

* खारफुटी दिन २६ जुलै २०२५ : खारफुटी संवर्धानासंबंधित माहितीपट व कांदळवनांची माहिती विद्यार्थांना पाठवण्यात आली.

* व्याघ्र दिन २९ जुलै २०२५ : माहिती ग्रुपवर पाठवण्यात आली. खारफुटीविषयी माहितीपट व Tigers of Chandrapur माहितीपट / फिल्म प्रदर्शन करण्यात आले.

* आंतरराष्ट्रीय ओझोन दिवस १६ सप्टेंबर २०२५ : ओझोन दिनानिमित्त माहितीपट व माहिती पाठविण्यात आली.

* वन्यजीव सप्ताह २ ते ८ ऑक्टोबर २०२५ : अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यावरण जाणीव जागृती अभियान मंडळ व कांदळवन कक्ष, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने कांदळवन कक्ष वनविभाग यांच्यामार्फत जाणीव जागृती व्याख्यान आयोजित करण्यात आले व पश्चिम घाटातील वन्य जीवनाविषयीची माहिती व व्हिडिओ ग्रुप वर दाखविण्यात आले.

* पक्षी सप्ताह ५ ते १२ नोव्हेंबर २०२५ : पक्षी सप्ताह निमित्त भारतातील वैशिष्ट्यपूर्ण पक्षी हि चित्रफित पाठविण्यात आली.

* जागतिक मृदा दिन ५ डिसेंबर २०२५ : जागतिक मृदा दिनाचे महत्व व माहिती व UNESCO द्वारा प्रकाशित चित्रफित पाठविण्यात आली.

* जागतिक पाणथळ दिन २ फेब्रुवारी २०२६ : जागतिक पाणथळ दिनानिमित्त माहिती व चित्रफित पाठविण्यात येणार आहे.

* ३ मार्च २०२६ वन्यजीव दिवस : World Wildlife Day 2026 – Medicinal and Aromatic Plants: Conserving Health, Heritage and Livelihoods. ह्या थिम वर व्हिडिओ ग्रुपवर पाठविण्यात येणार आहे.

* २१ मार्च २०२६ आंतरराष्ट्रीय वन दिन : आंतरराष्ट्रीय वनदिनानिमित्त माहिती व चित्रफित पाठविण्यात येणार आहे. यंदाचा विषय समृद्धी आणि कल्याणासाठी वन आणि अर्थशास्त्र निसर्ग आधारित उपाय (Forest and economics nature based solutions for prosperity and well-being).

* २२ मार्च २०२६ जागतिक जल दिन : जागतिक जल दिनानिमित्त माहिती व चित्रफित पाठविण्यात येणार आहे. यंदाचा विषय The vital role of water and sanitation in achieving gender equality

* २२ एप्रिल २०२६ जागतिक वसुंधरा दिन : जागतिक वसुंधरा दिनानिमित्त माहिती व चित्रफित पाठविण्यात येणार आहे.

४. स्पर्धा

१. पर्यावरण संस्था रत्नागिरी आयोजित तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत २३ व चित्रकला स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयातील २० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. सदर चित्रकला स्पर्धेत कु. सौख्यदा संतोष ठाकूरदेसाई हिने द्वितीय क्रमांक व कु. तीर्था कमलेश शिरधनकर हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

२. दिनांक १८ डिसेंबर ते २० डिसेंबर दरम्यान छंदोत्सव अंतर्गत पर्यावरण मंडळातर्फे छायाचित्र स्पर्धा आयोजित करण्यात आली. सदर स्पर्धेसाठी निसर्गातील आकृतीबंध Patterns In Nature हा विषय देण्यात आला. सदर स्पर्धेत ८३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सदर छायाचित्र स्पर्धेचे विजेते प्रथम-कु. वरद उदय आरेकर, द्वितीय-कु. निधी प्रदीप सुर्वे, तृतीय-अमन अमित कुरूप.

५. निसर्ग सहल २९ नोव्हेंबर २०२५

पर्यावरण मंडळाचे अभ्यास सहल निसर्गभ्रमण शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी पोमेंडी येथील महालक्ष्मी देवराईमध्ये

पार पडली. सदर सहलीसाठी ७६ विद्यार्थी व ६ शिक्षक उपस्थित होते. सदर भ्रमणाच्या वेळी उंबर, धामण, जामुन, घाणेरी, अर्जुन, कुडा, रानटी अबोली, अनंतमूळ, दिंडा, गरुडवेल, साग, मुरुड शेंग, आंबा, अर्धी सुपारी इत्यादी औषधी वनस्पती आढळल्या. दुर्मिळ वनौषधींची व देवराईंची माहिती घेण्यात आली. श्री. गुरव सर (वनस्पतीशास्त्र) यांनी मार्गदर्शन केले

पर्यावरण जाणीव जागृती अभियान मंडळामध्ये प्रा. पाथरे, प्रा. पवार, प्रा. दातार, प्रा. दाते प्रा. ताम्हणकर, प्रा. नागवेकर, प्रा. केळकर यांनी कामकाज बघितले.

तसेच पर्यावरण मंडळाच्या कामकाजासाठी प्राचार्य डॉ. साखळकर व उपप्राचार्य प्रा. गोसावी, पर्यवेक्षक प्रा. केळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा स्मिता पाथरे**
समन्वयक

# जिमखाना

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व व सर्वांगीण विकासासाठी समाजाचा एक आदर्श घटक म्हणून ओळखला जाण्यासाठी जिमखाना विभागातर्फे शारीरिक विकासाच्या दृष्टीने आवश्यक अशा खेळांच्या सर्व आवश्यक सुविधा सुवर्ण महोत्सवी वर्षात कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. शासनाच्या बहुविध क्रीडा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय, विभागीय राज्यस्तरीय, राष्ट्रीय अशा वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धेत भाग घेऊन विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी क्रीडा नैपुण्य प्रकट केले.

**तालुकास्तरीय स्पर्धा**

तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये तायक्वांदो स्पर्धेत कु. रिया मुकेश मयेकर, मृदुला पाटील व ओम अपराज या तिघांची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी झाली बुद्धिबळ स्पर्धेत अद्वैत काळे द्वितीय शौनक आठल्ये तृतीय व सर्वेश परुळेकर चतुर्थ असे येऊन त्यांची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी झाली. मैदानी क्रीडा स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात तन्मेश कटनाक १०० मी. प्रथम, वंश पावसकर ४०० मीटर प्रथम, आदित्य पाटील तिहेरी प्रथम लांब उडी द्वितीय, प्रवीण बुरुंगळे गोळा फेक तृतीय, श्रेयस झगडे १५०० मीटर द्वितीय, साहिल माइंगडे १०० मीटर तृतीय तसेच ४X१०० मीटर रिले विजयी संघ त्यामध्ये तन्मेश कटनाक, रुद्र वाडकर, प्रवीण बुरुंगुळे, साहिल माइंगडे यांचा समावेश १९ वर्षे वयोगटात साहिल खवळे ४०० मी धावणे प्रथम, मानस मानावे ८०० व १५०० मीटर प्रथम राजीव परवडे १०० मीटर तृतीय, शंतनू मोहिते लांब उडी तृतीय तसेच ४X४०० मीटर रिले प्रथम त्यामध्ये मानस मानावे, साहिल खवळे, संकेत भरणकर, तन्मय शिवलकर या विद्यार्थ्यांचा समावेश होता. मुलींमध्ये १०० मीटर व २०० मीटर धावणे प्रथम पद्मिनी भितळे १०० मीटर धावणे प्रथम, सायली दिलीप कर्लेकर ८०० मीटर व १५०० मीटर धावणे प्रथम, सिमरन संदीप पवार तीन किलोमीटर चालणे प्रथम, १५०० मीटर धावणे द्वितीय तसेच ४X१०० मीटर रिले, ४X४०० मीटर रिले प्रथम यामध्ये दिव्या दीपक पालये, पद्मिनी अशोक भितळे, रिया रवींद्र गावडे, सायली दिलीप कर्लेकर, सिमरन संदीप पवार यांचा समावेश होता.

बॅडमिंटन स्पर्धेमध्ये मुलींचा संघ विजयी व मुलांचा संघ उपविजयी झाला. तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेमध्ये मुले व मुलींचा संघ विजयी, व्हॉलीबॉल मुली उपविजयी, कबड्डी स्पर्धेमध्ये मुले व मुलींचा संघ विजयी, खो–खो स्पर्धेमध्ये मुले व मुलींचा संघ विजयी या विजयी संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

**जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा**

डेरवण येथे झालेल्या जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेमध्ये ४० ते ४२ वजनी गटात कु.रिया मुकेश मयेकर प्रथम, ओम पांडुरंग अपराज ७३ ते ७८ किलो वजनी गटात प्रथम व १७ वर्षाखालील वयोगटात मृदुला योगेश पाटील ४६ ते ४९ वजनी गटात प्रथम येऊन त्यांची निवड कोल्हापूर येथे विभागीय स्पर्धेसाठी झाली. योगासन स्पर्धेमध्ये आर्टिस्टिक योगासने तसेच ट्रॅडिशनल योगामध्ये रत्नेश हितेश आडविरकर प्रथम येऊन कोल्हापूर येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी झाली. जलतरण स्पर्धेमध्ये सतरा वर्षाखालील वयोगटात योगेंद्र गिरीधर तावडे ५० मीटर, १००मिटर फ्री स्टाईल व पन्नास मीटर बटरफ्लाय प्रथम क्रमांक, कु आरोही अजित पिलणकर ५० मीटर, १०० मीटर, २०० मीटर बॅकस्ट्रोक मध्ये प्रथम, कु. सान्वी सतीश पवार १०० मी, २०० मी ब्रेस्ट स्ट्रोक व ८०० मीटर फ्री स्टाइल प्रथम येऊन सांगली येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

तलवारबाजीमध्ये ईपी व फॉइल या प्रकारात कु श्रिया संजय झोरे प्रथम, कु. पूर्वा रवींद्र कांबळे ही फॉइल या प्रकारात प्रथम,

सेबर या प्रकारात द्वितीय व आदिती देसाई सेबर या प्रकारात प्रथम व ईपी या प्रकारात तृतीय या तिघींचीही कोल्हापूर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. वेटलिफ्टिंग स्पर्धेत ५८ किलो खालील वजन गटात कु श्रिया संजय झोरे प्रथम, ६० किलो खालील वजनी गटात कल्पेश किरण पालकर प्रथम, ११० किलो खालील वजन गटामध्ये संघरत्न राजेंद्र सावंत हा प्रथम येऊन त्यांची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली. स्क्वॅश या खेळ प्रकारात कु. श्रुती राजेश शिवदे ही जिल्ह्यात प्रथम आली. कराटे स्पर्धेत ४० ते ४५ किलो वजनी गटात दिव्य सुनील यादव प्रथम आला. बुद्धिबळ स्पर्धेत अद्वैत काळे व सर्वेश परुळेकर याची निवड सातारा येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी झाली. रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये दहा मीटर एयर पिस्टल क्रीडा प्रकारात शुभम सागर पुसाळकर याची कोल्हापूर येथे निवड झाली. जिल्हास्तरीय शालेय पेंटॅथलॉन स्पर्धेत कु. आरोही अजित पिलणकर ही प्रथम आली. कॅरम स्पर्धेमध्ये निधी सतीश घाडी व सेजल सुभाष जाधव यांची निवड कुडाळ येथे झालेल्या विभागीय स्पर्धेसाठी झाली. जिल्हास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेत मुलींचा संघ विजयी होऊन त्यांची निवड विभागीय स्तरावर झाली. आर्या गवस, नेहा मुळे, श्रेया आगाशे, रिदी शेट्टी, कनक जैन यांचा समावेश होता. खो-खो स्पर्धेमध्ये सायली दिलीप कर्लेकर हिची विभागीय स्तरावर निवड चाचणीसाठी निवड झाली. राज पाडावे, स्वरा भाटकर व मैथिली गावकर यांची विभागीय कबड्डी निवड चाचणीसाठी निवड झाली. बास्केटबॉल स्पर्धेमध्ये मुलांचा संघ विजयी झाला. फुटबॉल स्पर्धेत मुलांचा व मुलींचा संघ विजयी झाला. टेनिस क्रिकेट संघ विजयी झाला. डेरवण येथे झालेल्या मैदानी स्पर्धेमध्ये कु.पद्मिनी अशोक भितळे ४०० मीटर व ८०० मीटर धावणे प्रथम,कु. दिव्या दीपक पालये हिचा १०० मीटर व २०० मीटर धावणे प्रथम, सायली कर्लेकर १५०० मीटर प्रथम तसेच मुलांमध्ये मानव मानावे १५०० मीटर धावणे द्वितीय, साहिल खवळे ४०० मीटर धावणे तृतीय, मुलींमध्ये ४X१०० मीटर व ४X४०० मीटर धावणे प्रथम या सर्वांची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली.

**विभागीय स्पर्धा**

सातारा येथे झालेल्या बास्केटबॉल स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांच्या संघाचा तृतीय क्रमांक आला. ओरस कुडाळ येथे झालेल्या कबड्डी स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक आला. त्यामध्ये राज पाडावे याची निवड राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी झाली. विभागीय तायक्वांदो स्पर्धेत कु.रिया मुकेश मयेकर हिचा प्रथम क्रमांक आला, तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. सांगली येथे झालेल्या विभागीय शालेय जलतरण स्पर्धेमध्ये १७ वर्षाखालील गटात योगेंद्र गिरीधर तावडे ५०X१०० फ्री स्टाईलमध्ये प्रथम व ५० मीटर बटरफ्लाय स्पर्धेत प्रथम, कु. आरोही अजित पिलणकर ५०X१०० मीटर बॅक स्ट्रोकमध्ये प्रथम क्रमांकाने विजयी होऊन या दोघांची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली. डेरवण येथे झालेल्या विभागीय शालेय कॅरम स्पर्धेत कु. सेजल सुभाष जाधव हिचा चतुर्थ क्रमांक येऊन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली. डेरवण येथे झालेल्या मुलींच्या मैदानी विभागीय स्पर्धेत ४X१०० मीटर रिले मध्ये तृतीय व ४X४०० मीटर रिले मध्ये द्वितीय क्रमांक पटकावला.

**राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा**

डेरवण येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय कॅरम स्पर्धेत कु. सेजल सुभाष जाधव हिचा चतुर्थ क्रमांक येऊन तिची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघात झाली. लातूर येथे झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये १७ वर्षाखालील वयोगटात योगेंद्र गिरीधर तावडे व १९ वर्ष वयोगटात कु. आरोही अजित पिलणकर यांचा सहभाग होता. संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी मध्ये कु. श्रिया संजय झोरे व आदिती देसाई यांचा सहभाग होता. गेल्यावर्षी २८ आणि २९ जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत कु. रिया मुकेश मयेकर हिला कांस्यपदक मिळाले.

**राष्ट्रीय स्पर्धा**

बंगळूर येथे झालेल्या ४४ व्या कुमार गट मुले-मुली राष्ट्रीय खो-खो स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला सुवर्णपदक मिळाले. त्यामध्ये बारावी वाणिज्यमधील दिव्या दीपक पालये हिचा समावेश होता.

कु. मोहिनी लक्ष्मण फड हिने राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय ड्रॅगन बोट चॅम्पियनशिपमध्ये ७ सुवर्ण, ३ सिल्वर, १ ब्राँझ अशी पदके मिळवली.

**छंदोत्सव वार्षिक क्रीडा स्पर्धा**

छंदोत्सवानिमित्त वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ आंतरराष्ट्रीय दर्जाची व महाराष्ट्र राज्याची शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त खो-खो खेळाडू कु. ऐश्वर्या सावंत यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमाला उपकार्याध्यक्ष ॲड. विजय साखळकर, प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, उपप्राचार्य सुनील गोसावी, पर्यवेक्षक व्ही. टी. केळकर, सहकार्यवाह श्रीकांत दुदगीकर, सर्व शाखांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

मुलांमध्ये सांघिक विजेतेपद शास्त्र शाखेला, उपविजेतेपद कला शाखेला, मुलींमध्ये सांघिक विजेतेपद शास्त्र शाखेला, सांघिक उपविजेतेपद एमसीव्हीसी शाखेला मिळाले. सर्वसाधारण नैपुण्यपद कला शाखेला मिळाले. गोल्डन बॉय हा किताब मानस सुहास मानावे (१२ वी कला) व गोल्डन गर्ल हा किताब पद्मिनी अशोक भितळे (११ वी वाणिज्य) यांनी पटकाविला.

**प्रा. लीना न. घाडीगावकर**
समन्वयक

# व्यावसायिक शिक्षण विभाग (एम.सी. व्ही.सी.)

आजपर्यंतच्या इ. १२वी च्या परिक्षेतील उत्तुंग यशाची परंपरा कायम राखत यावर्षीही एम.सी.व्ही.सी. विभागाचा निकाल १००% लागला, Medical lab Technician विभागातील कु. रफा खालिद डावे ही विद्यार्थीनी ९२.६७% मिळवून एच. एस. सी. व्होकेशनल विभागात प्रथम आली, तर अकाउंटिंग अॅड ऑफिस मॅनेजमेंट विभागातील कु. मारिया राहील भाटकर ही ९०.६७% मिळवून व्दितीय तसेच याच विभागाची कु. सेजल अजय आजगेकर हिने ९०% मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता अकाउंटिंग अॅड ऑफिस मॅनेजमेंट विभागातील ०६ विद्यार्थ्यांची महाराष्ट्र विद्युत महामंडळात प्रशिक्षणार्थी म्हणून निवड झाली. तसेच एम.एल.टी विभागातील ०२ विद्यार्थ्यांची Pathology laboratory मध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून निवड झाली

विद्यमान वर्षी विद्यार्थी व शिक्षक यांनी विविध संस्था, कंपन्या व उद्योगसमूह, ऑडिट फर्मस् येथे भेटी देऊन प्रात्यक्षिक ज्ञान मिळविले. त्या अंतर्गत E.T. विभागाच्या विद्यार्थ्यांनी JIO Tower, बाळासाहेब ठाकरे तारांगण येथील इलेक्ट्रॉनिक्स विभाग, Compus Technologies, बारटक्के इन्स्टिट्युट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी येथे भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. AOM व L.S.M विभागाच्या विद्यार्थ्यांनी Navalai Infra, Exotic Industries येथे भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. एम.एल.टी विभागातील विद्यार्थ्यांनी वालावलकर रुग्णालय, स्वयं क्लिनिकल लॅब, चिंतामणी हॉस्पिटल, लोटलीकर हॉस्पिटल आणि रेड क्रॉस ब्लड बँक येथे भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी एप्रिल व में मध्ये '२१ दिवसांचे ऑन द जॉब ट्रेनिंग' यशस्वीपणे पूर्ण केले. तसेच विद्यार्थ्यांकरीता संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली. २०२५- २६ मध्ये प्रतिवर्षाप्रमाणे १२वी तील सर्व विद्यार्थ्यांना संगणकीकृत अभ्यास साहित्य विभागातर्फे पुरविण्यात आले. तसेच दरवर्षीप्रमाणे १२वी AOM व L.S.M विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी बारटक्के इन्स्टिट्यूटमध्ये Tally ERP 9 चे प्रशिक्षण देण्यात आले.

महिला विकास कक्षा तर्फे PCOD जागरूकता आणि मानसिक स्वास्थ्य या विषयावर डॉ. अक्षता शेंबेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले, ज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींचा सहभाग होता. तसेच DEMAT Account ह्या विषयावर श्री. अमोल सहस्त्रबुद्धे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. 'कांदळवनातील वन्यजीवन' या विषयावर वन्यजीव सप्ताहानिमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले होते ज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त नगर परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेत प्रथम क्रमाक कु. साक्षी हरळीकर व द्वितीय क्रमांक कु. माधुरी रावणांग या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्याथीनींनी पटकावला. 'छंदोत्सव २०२५' या कनिष्ठ महाविद्यालयाच्या वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विभागातील विद्यार्थ्यांचा स्पृहणीय सहभाग होता. शामराव करंडक एकांकिका स्पर्धा उत्कृष्ट एकांकिका 'परित्राण' मध्ये इ.१२ वी E. T. या विभागाचा कु. संस्कार पांचाळ याचा सहभाग होता. तसेच त्याला उत्कृष्ट प्रकाश योजना यासाठी प्रथम क्रमांक मिळाला. मैदानी स्पर्धांमध्ये कु. निर्मिती प्रसन्न सुर्वे ही बुद्धिबळमध्ये उपविजयी ठरली. Badminton मध्ये कु. श्रेया सतिश आगाशे ही विजयी तर कु. रीधी भास्कर शेट्टी ही उपविजयी ठरली. क्रिकेट व रस्सीखेचमध्ये ११वी मुलींचा संघ विजयी झाला. Volleyball मध्ये ११ वी मुलांचा संघ विजयी झाला. सांघिक उपविजेतेपद ११ वी विद्यार्थिनींनी पटकाविले. गौरवाची गोष्ट म्हणजे रिया मयेकर हिने राष्ट्रीय स्तरावर तायक्वांदो स्पर्धेमध्ये सहभाग घेतला.

विद्यमान वर्षीदेखील इ. १२वी च्या विद्यार्थ्यांकरीता अधिक तासांचे नियोजन, अप्रगत विद्यार्थ्यांकरीता जानेवारी महिन्यात केले जाणारे विशेष मार्गदर्शन इत्यादी उपक्रम सुरु आहेत.

**प्रा श्रीकांत दुदगीकर**
विभाग प्रमुख

# सुवर्ण महोत्सव

अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय २०२५ - २६ साल हे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

१) अमेरिकास्थित उद्योजक व सन्माननीय देणगीदार श्री. अनिलजी तोरगलकर यांचा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांशी संवाद हा शुभारंभाचा कार्यक्रम दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी सेमिनार हॉल येथे संपन्न झाला.

२) सुवर्ण महोत्सवी वर्ष उद्घाटन समारंभ १७ ऑक्टोबर २०२५ रोजी सेमिनार हॉल येथे संपन्न झाला. यावेळी प्रमुख वक्ते मा. प्रा. श्री. दिलीप बेतकेकर यांचे 'पुढील १० वर्षातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसमोरील आव्हाने' या विषयावर उद्बोधनपूर्ण व्याख्यान झाले.

३) र. ए. सोसायटीच्या सर्व घटक संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची सहविचार सभा ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सेमिनार हॉल येथे संपन्न झाली.

४) सर्व विद्या शाखातील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर १५, १७ व १८ नोव्हेंबर २०२५ या तीन दिवशी खातू नाट्य मंदिर रंगमंच येथे भरविण्यात आले. लाभार्थी - २०४५ विद्यार्थी व २८ स्टाफ मेंबर्स.

५) रत्नागिरी शहर व परिसरातील अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांची सहविचार सभा १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सेमिनार हॉल येथे संपन्न झाली.

६) वैभवी लक्ष्मी रक्तपेढीच्या संयुक्त विद्यमाने खातू नाट्यमंदिर येथे रक्तदान शिबिर २२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन पदवीधर मतदार संघाचे आमदार श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते झाले. गोगटे कॉलेज व अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय यांनी एकत्रितरित्या आयोजन केलेल्या या शिबिरात ७५ जणांनी सहभाग नोंदवला व एकूण ५२ युनिट्स रक्त जमा झाले.

७) शहरस्तरीय अतुल्य भारत प्रश्नमंजुषा स्पर्धा यामध्ये रत्नागिरी शहर परिसरातील १३ शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. संयोजक होते गोगटे कॉलेज व अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय इतिहास शोध व बोध अभियान मंडळ.

८) आजी व माजी विद्यार्थी सामना महाविद्यालयाच्या जवाहर क्रीडांगणावर दि. २१-१२-२०२५ रोजी पार पडला. या सामन्याला माजी विद्यार्थी, आजी विद्यार्थी, शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. आजी विद्यार्थी संघाने या मर्यादित षटकांच्या सामन्यात बाजी मारली.

सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने एकंदर सात कार्यक्रम संपन्न झाले. या विविध कार्यक्रमांना र. ए. सोसायटी कार्याध्यक्ष श्रीम. शिल्पाताई पटवर्धन, उपकार्याध्यक्ष ॲड. विजयराव साखळकर, कार्यवाह श्री. सतीश शेवडे, सहकार्यवाह श्री. श्रीकांत दुदगीकर, शालेय समिती अध्यक्ष श्री. आनंद देसाई व सदस्य श्री. मनोज पाटणकर, श्री. विवेक भावे, श्री. सचिन वहाळकर, नियामक मंडळ सदस्य डॉ. संजय केतकर व विविध मान्यवर संस्था पदाधिकारी तसेच प्राचार्य प्रा.डॉ. मकरंद साखळकर, आजीवन मंडळ सदस्य श्री. महेश नाईक, उपप्राचार्य श्री. सुनील गोसावी, पर्यवेक्षक श्री. विद्याधर केळकर, कला विभागप्रमुख श्री. वैभव कानिटकर, वाणिज्य विभागप्रमुख श्रीम. शिल्पा तारगांवकर, विज्ञान विभाग प्रमुख श्री. दिलीप शिंगाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

पुढील चार महिन्यांमध्ये स्वच्छता अभियान, सुवर्ण महोत्सवी पदयात्रा, विविध वाङ्मयीन तसेच सांस्कृतिक स्पर्धा, डॉक्युमेंटरी, पथनाट्ये, माजी शिक्षक मेळावे, माजी विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रम, सांगता समारंभ इत्यादी विविध कार्यक्रमांचे सुवर्ण महोत्सवानिमित्त नियोजन करण्यात आले आहे. मा. प्राचार्य व संस्था पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सुवर्ण महोत्सव समिती व समन्वयक यांनी सर्व कार्यक्रम यशस्वी केले.

**प्रा. वैभव कानिटकर**
समन्वयक

# श्री. शंकर ढोले स्टुडंट्स एनरिचमेंट सेल

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ऑक्टोबर २०२२ रोजी श्री शंकर ढोले स्टुडंट्स एन्ट्रीचमेंट सेल ची स्थापना करण्यात आली. निवृत्त प्राध्यापक श्री. शंकर ढोले यांच्या संकल्पनेतून आणि अर्थसहाय्यातून या उपक्रमाचा

उगम झाला आहे. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना अभ्यासेतर उपक्रमांसाठी एक व्यासपीठ निर्माण करून द्यावे या हेतूने या सेलची स्थापना करण्यात आली आहे. या सेल अंतर्गत होणाऱ्या विविध उपक्रमांसाठी आवश्यक असणारे अर्थसहाय्य निवृत्त प्राध्यापक श्री शंकर ढोले हे स्वतः करणार आहेत.

या उपक्रमाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत

१. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मनामध्ये व्यवहारचातुर्य निर्माण करणे.

२. व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण करणे आणि वृद्धिंगत करणे.

३. व्यावसायिक जगतामध्ये होणाऱ्या तांत्रिक बदलांविषयी विद्यार्थ्यांचे ज्ञान वृद्धिंगत करणे.

४. विद्यार्थ्यांमध्ये व्यवस्थापनाची विविध कौशल्य निर्माण करणे.

५. व्यावसायिकांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणे.

६. उपलब्ध उद्योग आणि व्यवसाय संधीबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

७. विविध स्पर्धांचे आयोजन करणे उदाहरणार्थ निबंध, वक्तृत्व, इत्यादी

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांमध्ये या उपक्रमाअंतर्गत दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी 'साहित्यिकांशी गप्पा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व कळावे आणि त्याचा व्यवसायाशी असणारा संबंध कळवा या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सांगली येथील जेष्ठ साहित्यिक प्राध्यापक श्री. वैजनाथ महाजन लाभले होते. यावेळी १६५ विद्यार्थी उपस्थित होते. याच सेल अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये दि. १९ जानेवारी २०२६ रोजी उद्योजक श्री. चिन्मय भारती यांच्या उपस्थितीत नव उद्योजकता आणि तरुण पिढी या विषयावर एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये नवउद्योजक, वैशिष्ट्ये, गुण, जबाबदारी, गुणवत्ता याबाबत चर्चा आणि मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, उपप्राचार्य श्री सुनील गोसावी, पर्यवेक्षक श्री. विद्याधर केळकर तसेच वाणिज्य शाखा विभागप्रमुख सौ. शिल्पा तारगावकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

**प्रा. प्रभात कोकजे**
समन्वयक

# सखी सावित्री समिती

सखी सावित्री समितीच्या दोन सभा संपन्न झाल्या. इयत्ता अकरावी मध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींपर्यंत महाविद्यालयाचा परिसर, सुरक्षा विषयक उपाययोजना यांची माहिती पोहोचवण्यासाठी नियोजन करण्यात आले. चाइल्ड हेल्पलाइन नंबर (१०९८) चे सूचनाफलक महाविद्यालयामध्ये प्रदर्शित करण्यात आले. महाविद्यालयामध्ये असलेल्या तक्रार पेटीविषयी सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली. तक्रार पेटीतील मुद्द्यांची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात आली. महाविद्यालयांमध्ये सुरू असलेल्या बांधकामामुळे विद्यार्थी विद्यार्थिनींच्या सुरक्षेबाबत नियोजन करण्यात आले.

**प्रा. अपर्णा तगारे**
समन्वयक

# विद्यार्थी सुरक्षा समिती

शैक्षणिक संस्थेमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक, शारीरिक, मानसिक व भावनिक सुरक्षितता अबाधित राखण्याच्या उद्देशाने विद्यार्थी सुरक्षा समिती कार्यरत आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या समितीची स्थापना करण्यात आली असून खालीलप्रमाणे समितीने आपली कार्यवाही प्रभावीपणे राबवली आहे.

**समितीची उद्दिष्टे**

१) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देणे

२) रॅगिंग, छेडछाड व गैरप्रकारांना आळा घालणे.

३) तक्रार निवारणासाठी पारदर्शक व्यवस्था निर्माण करणे

४) सुरक्षित व सकारात्मक शैक्षणिक वातावरण निर्माण करणे.

सदर समितीतर्फे विद्यार्थ्यांना सुरक्षा विषयक नियमांची माहिती देण्यासाठी जागरूकता सत्र आयोजित करण्यात आले.महाविद्यालय परिसरात तक्रार पेटी उपलब्ध करून देण्यात आली. महिला विद्यार्थ्यांसाठी विशेष समुपदेशन सत्र घेण्यात आले.रॅगिंगविरोधी नियम व आपत्कालीन संपर्क क्रमांक फलकावर प्रदर्शित करण्यात आले. विद्यार्थी सुरक्षा समितीच्या कार्यामुळे महाविद्यालयीन परिसरात शिस्तबद्ध, सुरक्षित व भयमुक्त वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेबाबत सकारात्मक जाणीव निर्माण झालेली दिसून येते.

**प्रा. अपर्णा तगारे**
समन्वयक

# अंतर्गत तक्रार निवारण समिती

अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयात 'कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळांस (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ नुसार अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली. या समितीच्या दर तीन महिन्यांनी सभा घेऊन कोणत्या प्रकारची तक्रार आहे का याचा आढावा घेण्यात आला. तसेच अशा प्रकारच्या तक्रारींचे निवारण कसे करावे याची कार्यपध्दती ठरविण्यात आली.

तक्रार प्राप्त झाल्यास तिचे निवारण कायद्यानुसार, निष्पक्षपणे व गोपनीयता राखून कसे करावे, याबाबतची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. महिलांना सुरक्षित, सन्मानजनक व निर्भय कार्यपरिसर उपलब्ध करून देणे हे या समितीचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**डॉ. स्वराली शिंदे**
अध्यक्ष

# वाङ्मय मंडळ

कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विविध भाषिक कौशल्यांचा विकास करण्यासाठी आणि त्यांच्या मनामध्ये साहित्याविषयी अभिरुची निर्माण करण्याच्या उद्देशाने वाङ्मय मंडळ अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये वाङ्मय मंडळाचे समन्वयक श्री. भालचंद्र रानडे आणि सदस्य म्हणून श्री. दिलीप सरदेसाई, श्री. विकास शिंदे, श्री. चारुदत्त पड्यार, सौ. सुप्रिया टोळ्ये व श्रीम. समीक्षा लिंगायत यांनी विविध स्तरावर काम करून विद्यार्थ्यांना वर्षभर अनेक स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. विद्यार्थ्यांमध्ये लेखन, वाचन, वक्तृत्व व अभिवाचन या कौशल्यांचा विकास करून त्यांचे चांगले व्यक्तिमत्व घडविण्यासाठी त्यांना विविध स्पर्धांची माहिती देऊन त्यामध्ये सहभागी करण्यात आले. त्यातून विद्यार्थ्यांना बाहेरील जग पाहण्याचे आणि आपले विचार व्यक्त करण्याचे एक उत्तम व्यासपीठ मिळाले. विद्यार्थी रत्नागिरी शहर, तालुकास्तरीय तसेच जिल्हास्तरीय निबंध, वक्तृत्व व अभिवाचन स्पर्धेत सहभागी झाले. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास उंचावला आणि त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात भर पडली.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील विविध स्पर्धांमधील विद्यार्थी सहभाग पुढीलप्रमाणे :

१) दिनांक २५/०७/२०२५ रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा रत्नागिरी आणि उदय सामंत प्रतिष्ठान रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने कै. प्र.ल.मयेकर कथालेखन स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये निरंजन समीर सावरे (१२ वी विज्ञान) या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक संपादन केला तर वीणा योगेश काळे (१२ वी विज्ञान) हिने उत्तेजनार्थ दुसरा क्रमांक प्राप्त केला.

२) दिनांक २२/०७/२०२५ रोजी रत्नागिरी नगर परिषदेतर्फे लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्ताने आयोजित निबंध स्पर्धेत मधुरा रावणंग (१२ वी एम.सी.व्ही.सी.) या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक मिळविला. साक्षी हरळीकर (१२ वी एम.सी.व्ही.सी.) हिने द्वितीय क्रमांक तर तृतीय क्रमांक रिया अनंत पांचाळ (११ वी विज्ञान) हिने प्राप्त केला.

वक्तृत्व स्पर्धेमध्ये विदुला रामकृष्ण कुलकर्णी (१२ वी वाणिज्य) मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक पटकाविला.

३) दिनांक १२/०९/२०२५ रोजी नवनिर्माण शिक्षण संस्था संचलित एस. एम. जोशी विद्यानिकेतन रत्नागिरी द्वारा कै. मृणाल हेगशेट्ये स्मृती राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विदुला रामकृष्ण कुलकर्णी (१२ वी वाणिज्य) ही विद्यार्थिनी सहभागी झाली.

४) दिनांक १६/०९/ २०२५ रोजी वेरवली पंचक्रोशी शिक्षण मंडळ वेरवली बुद्रुक संचलित श्रीराम विद्यालय व तु.पु.शेट्ये कनिष्ठ महाविद्यालय लांजा यांनी जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यामध्ये स्वानंदी शिरीष शेंबवणेकर (११ वी वाणिज्य) या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक संपादन केला. स्नेहल रमेश कोकरे (११ वी वाणिज्य) ही विद्यार्थिनीदेखील या स्पर्धेमध्ये सहभागी झाली होती.

५ ) दिनांक ०७/१०/२०२५ रोजी रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे श्रीमंत मंगेश बापूजी तोरगलकर कनिष्ठ महाविद्यालयाने शब्दवेध अभिवाचन स्पर्धा आणि निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातून अभिवाचन स्पर्धेमध्ये दोन गट सहभागी झाले. वीणा योगेश काळे (१२ वी विज्ञान), वैदेही विवेक वैद्य (१२ वी कला), अर्पिता आनंदा बापट (११ वी वाणिज्य) या विद्यार्थिनींच्या गटाने द्वितीय क्रमांक संपादन केला, तर स्वरदा महेश केळकर, श्रेया अभिजीत केळकर व श्रावणी योगेश खांडेकर या सर्व (१२ वी कला) वर्गामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनींच्या गटाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. शब्दवेध निबंध स्पर्धेत प्रणव अंकुश हातीसकर (११ वी वाणिज्य) मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक संपादन केला.



६) प .पू. स्वामी स्वरूपानंद सेवा मंडळ पुरस्कृत स्वामी स्वरूपानंद आंतरराज्यीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन गोगटे जोगळेकर वरिष्ठ महाविद्यालय (स्वायत्त) रत्नागिरी आणि अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय रत्नागिरी यांनी केले होते. या स्पर्धेत (११ वी वाणिज्य) मध्ये शिकणारी स्वानंदी शिरीष शेंबवणेकर हिने उत्तेजनार्थ द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

वरील सर्व विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी मंडळातील सर्व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

**प्रा. भालचंद्र रानडे**
समन्वयक



# वेचक..वेधक...सुवर्णक्षण...

## क्रीडा विभाग



विभागीय शालेय टेनिस क्रिकेट स्पर्धेत उपविजयी संघ.







विभागीय शालेय कबड्डी स्पर्धेत तृतीय क्रमांक.



जिल्हास्तरीय शालेय फूटबॉल स्पर्धेतील विजयी संघ.







जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेतील विजयी संघ.

# वेचक..वेधक... सुवर्णक्षण...

## क्रीडा विभाग



जिल्हास्तरीय शालेय बॅडमिंटन विजयी संघ.







जिल्हास्तरीय शालेय फूटबॉल विजयी संघ.



जिल्हास्तरीय शालेय कबड्डी उपविजयी संघ.







जिल्हास्तरीय शालेय खो-खो उपविजयी संघ.

# वेचक.. वेधक... सुवर्णक्षण...



‘छंदोत्सव’ अंतर्गत वार्षिक क्रीडा स्पर्धांच्या उद्‌घाटनप्रसंगी उपकार्याध्यक्ष ॲड. विजयराव साखळकर आणि जिमखाना अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर केळकर



छंदोत्सवातील ‘फूड फेस्ट’चे उद्‌घाटन करताना शालेय समिती अध्यक्ष आनंदजी देसाई.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिरात बोलक्या बाहुल्यांचा खेळ दाखविणाऱ्या श्री. श्रीकांत ढालकर यांचा सत्कार.




राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी कुर्धे शाळेचे मुख्याध्यापक श्री. निवेंडकर आणि मान्यवर.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिरात व्यंगचित्र कार्यशाळेत मार्गदर्शन करताना योगेश हातखंबकर.




स्वामी स्वरुपानंद आंतरराज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिकप्राप्त स्वानंदी शेंबवणेकर हिला गौरविताना मान्यवर.

# वेचक..वेधक... सुवर्णक्षण...



प्रजासत्ताकदिनी अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाच्या ‘सहकार’ या वार्षिक अंकाचे प्रकाशन करताना मान्यवर आणि संपादक मंडळ.



शामराव करंडक एकांकिका स्पर्धेचे उद्‌घाटन करताना मुख्य प्रायोजक राजनशेठ मलुष्टे.



छंदोत्सव अंतिम पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी मान्यवर आणि ‘परित्राण’ एकांकिकेचे विजेते.

# वेचक..वेधक... सुवर्णक्षण...



महिला विकास कक्षाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, उपप्राचार्य सुनील गोसावी आणि डॉ. अक्षता शेंबेकर.




महिला विकास कक्ष आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. अक्षता शेंबेकर.



वसुंधरा जिज्ञासा मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी उपप्राचार्य सुनील गोसावी व व्याख्याते प्रा. बाबा सुतार.




सागर महोत्सव २०२५ बक्षीस प्राप्त विजेत्यांसह महाविद्यालयाचे प्रशासकीय उपप्राचार्य डॉ. सुरेंद्र ठाकूरदेसाई व प्रा. डॉ. चित्रा गोस्वामी.



राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेप्रसंगी मान्यवर व विद्यार्थी.



शिक्षक दिनानिमित्त प्रदर्शित करण्यात आलेल्या भित्तीपत्रकाचे अनावरण करताना मान्यवर व विद्यार्थी.

# वेचक..वेधक...सुवर्णक्षण...



गुरूपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.




पर्यावरण मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी श्री. मोहन उपाध्ये यांचे स्वागत करताना प्रशासकीय उपप्राचार्य डॉ. सुरेंद्र ठाकूरदेसाई व मान्यवर.



आंतरराष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेतील विजेते आणि मान्यवर.



सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यानाप्रसंगी मान्यवरांसोबत.



उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा २०२५ मधील गुणवंत विद्यार्थी आणि मान्यवर.

# वेचक... वेधक... सुवर्णक्षण...



स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित केलेल्या
देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेतील एक क्षण.



'शब्दवेध' अभिवाचन स्पर्धेत पारितोषिकप्राप्त विद्यार्थिनी मान्यवरांसोबत.



मध्य प्रदेश सरकारचे उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण आणि आयुष मंत्री
मा. इंदरसिंह परमार यांच्यासोबत इतिहास शोध बोध विभाग.



श्री. शंकर ढोले एनरिचमेंट सेल अंतर्गत प्रमुख साहित्यिक
श्री. वैजनाथ महाजन यांचा सत्कार करताना उपप्राचार्य सुनील गोसावी.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिरात बंधारा पूर्ण झाल्यानंतर जल्लोष करताना स्वयंसेवक.

# वेचक..वेधक... सुवर्णक्षण...



सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित मा. श्री. दिलीप बेतकेकर यांच्या 'कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसमोरील आव्हाने' या व्याख्यानाच्या कार्यक्रमाप्रसंगी दीपप्रज्ज्वलन करताना मान्यवर.




सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त शहरस्तरीय अतुल्य भारत प्रश्नमंजुषा स्पर्धेतील पारितोषिक वितरणप्रसंगी मान्यवर व विजेते.



छंदोत्सव अंतर्गत प्रदर्शनांचे उद्घाटन करताना कार्यवाह श्री. सतीशजी शेवडे, सहकार्यवाह प्रा. श्रीकांत दुदगीकर, शालेय समिती अध्यक्ष श्री. आनंदजी देसाई, उपप्राचार्य सुनील गोसावी आणि मान्यवर.

# वेचक...वेधक... सुवर्णक्षण...




आयडियल एज्यु. अ‍ॅन्ड वेल्फेअर सोसायटीतर्फे सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुंग कार्यासाठी अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाचा सन्मान स्वीकारताना उपप्राचार्य सुनील गोसावी आणि एल्. एम्. बोर्डाचे अध्यक्ष महेश नाईक.




सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त माजी विद्यार्थी सहविचार सभेप्रसंगी उपस्थित मान्यवर.




सुवर्ण महोत्सवानिमित्त महाविद्यालय आणि वैभवीलक्ष्मी रक्तपेढीच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे उद्घाटन करताना पदवीधर शिक्षक मतदारसंघाचे आमदार श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे आणि मान्यवर.

# वेचक..वेधक...सुवर्णक्षण...

## क्रीडा विभाग



प्रमुख पाहुणे मा. श्री. चिन्मय भारती यांचा सत्कार करताना निवृत्त प्राध्यापक शंकर ढोले व मान्यवर.



तंबाखूमुक्त परिसर संदर्भातील फलक प्रदर्शित करताना मान्यवर.




विद्यार्थी शिक्षक सहाय्यता कक्षाच्यावतीने फिनोलेक्स अभियांत्रिकी महाविद्यालयाला शैक्षणिक भेट.



पर्यावरण मंडळाची रत्नागिरीनजीकच्या पोमेंडी येथील महालक्ष्मी देवराई येथे निसर्ग सहल.




वन्य जीव सप्ताहानिमित्त कांदळवन कक्ष वन विभागातर्फे
स्वस्तिक गावडे यांचे व्याख्यान.



सुवर्ण महोत्सवानिमित्त रक्तदान शिबिराचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल वैभवीलक्ष्मी
रक्तपेढीचे विश्वस्त श्री. अजय भिडे यांनी महाविद्यालयाला सन्मानपत्र देऊन गौरविले.



खारफुटी आणि टायगर्स ऑफ चंद्रपूर याविषयी माहितीपट सादर करताना.




विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिरात पथनाट्य कार्यशाळा घेताना सुरेंद्र जाधव.




सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त माजी विद्यार्थी सहविचार सभेप्रसंगी मनोगत
व्यक्त करताना माजी विद्यार्थी व सहकार्यवाह प्रा. श्रीकांत दुदगीकर.




राष्ट्रीय कला उत्सवात स्वरवाद्य गायन प्रकारात
विशेष पारितोषिकप्राप्त श्रीरंग जोगळेकर.




**सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित आजी विद्यार्थी विरुद्ध माजी विद्यार्थी सामन्यातील विजेता आजी विद्यार्थी संघ मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारताना.**



**छंदोत्सवातील एक नृत्याविष्कार.**



**इतिहास शोध बोध मंडळाच्या मध्य प्रदेश अभ्यास सहलीमधील विदिशा येथील क्षणचित्र.**